UNIVERSAL
LIBRARY
OU_192891
UNIVERSAL
LIBRARY

ॐ नमो भगवते वासुदेवाय ।

# गीता - दत्त

★

आक्टोबर १९४० ॥

लेखक
भा. वि. वरेरकर

किंमत एक रुपया

# आवाहन

या कादंबरीचा इतिहास मराठी वाङ्मयातील इतर कोणत्याही कादंबरीपेक्षां वेगळा आहे. चित्रपटाची कादंबरी झाली आहे, कादंबरीचे चित्रपट झाले आहेत, एका लेखकानें लिहिलेल्या चित्रपटकथेवरून दुसऱ्या लेखकानें कादंबरी लिहिली आहे, पण या कादंबरीचा इतिहास या सर्वांपेक्षां निराळा आहे.

माझे मित्र मि. कात्रक यांनीं एक कथा चित्रपटासाठीं लिहिली होती. ती कथा चित्रपटीकरणाकरितां घेतांना सिर्को चित्रपटाचे मॅनेजिंग डायरेक्टर आणि गुजराती वाङ्मयांतील एक लेखक चिमणलाल त्रिवेदी यांनीं त्या कथेंतून गीतेच्या तत्वज्ञानाचा परिपोष करण्याचें ठरवलें. या कामासाठीं कात्रक, त्रिवेदी आणि या चित्रपटाचे दिग्दर्शक पार्श्वनाथ आळतेकर यांनीं माझी योजना केली. त्या अगदींच छोट्याशा मूळ कथेंतून ‘ गीता ’ ही चित्रपटकथा तयार झाली. त्याच कथेची ही विस्तृत कादंबरी आहे.

Story, Screen-play, Scenario, Director's Script या चित्रपट सृष्टींतल्या भिन्नभिन्न प्रकारांना सरसकट ‘ सिनारिओ ’ म्हणण्याची प्रथा आहे ती चुकीची आहे. हे सर्व प्रकार एकमेकांपासून भिन्न आहेत. या प्रकारांपैकीं या चित्रपटाचा स्क्रीनप्ले मला लिहावा लागल्यामुळें त्यांतूनच ही कादंबरी निर्माण झाली.

चित्रपटाचें स्थान नाटक आणि कादंबरी यांच्या मध्यस्थानीं आहे. नाटक ही वाङ्मयांतील अत्युच्च अशी शेवटची पायरी आहे. पण आजचा चित्रपट नाटकाची ती जागा बळकावून बसलेला असल्यामुळें किंबहुना तशी ती जागा चित्रपटानें बळकावली आहे असा चित्रपटकारांचा समज झालेला असल्यामुळें, त्या पटकथेचें नाट्य आणि वर्णनात्मक स्वरूप यथातथ्य आणि यथास्थित प्रमाणांत प्रेक्षकाला कळण्यासाठीं त्या पटकथेची कादंबरी चित्रपट

प्रकाशनाच्या वेळींच प्रसिद्ध होणें अवश्य आहे असें मला वाटत होतें. माझ्या ‘ विलासी ईश्वर ’ या चित्रपटाची कादंबरी प्रसिद्ध करण्याचा विचार होता. पण त्यावेळीं तो अंमलांत आला नाहीं. मराठी भाषेच्या किंबहुना भारतीय भाषेंतील कोणत्याही भाषेच्या इतिहासांत ‘ सौंगडी ’ या माझ्या पटकथेवरून मीच लिहिलेली ‘ मलबार हिल ’ ही कादंबरी पहिली होय. त्यानंतर खांडेकर यानीं आपल्या स्वतःच्या पटकथेच्या लिहिलेल्या कादंबऱ्या आणि अन्यांच्या पटकथेवरून निरंतर आणि रमाकांत यांनीं यांनीं लिहिलेल्या कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या आहेत.

खरें पाहिलें तर हें काम चित्रपट निमार्त्यांनीच केलें पाहिजे. पण अजून त्यांना या प्रकाराचें महत्व कळून आलेलें नाहीं, किंवा मूळ लेखकाच्या पटकथेंत निर्माते आणि दिग्दर्शक जो धुडगूस घालतात तो उघडकीस येऊं नये म्हणून निर्माते अजून पटकथेची कादंबरी प्रकाशित करायला सरसावत नाहींत. प्रसिद्धीकरणाच्या पायीं हजारों रुपये खर्च करणाऱ्या प्रदर्शकांना तरी पटकथेची कादंबरी काढण्याचें महत्व कळेल तर नाटकांच्या वेळी नाटकाचें पुस्तक प्रसिद्ध झाल्यानें जो फायदा नाटक मंडळीला मिळत होता तोच फायदा चित्रपटाला मिळून वाङ्मयांतही चांगली भर पडेल.

मुंबई, हाजीकासमवाडी

भा. वि. वरेरकर.

गांधी जयंति २-१०-४०

: प्रकाशक :

नरहर रामचंद्र जोशी,
करमणूक ऑफीस मुंबई नं. ७.

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन

मुद्रक

रघुनाथ गोविंद वालावलकर,
आर्यबंधु प्रिन्टिंग प्रेस,
कॅनेडी ब्रिज मुं. नं. ७.

# १

महायुद्धाच्या सुरवातीचा तो काल होता. युद्धाच्या परिस्थितींची झळ शहराप्रमाणें खेडयालाही त्यावेळीं जाणवत होती. खाण्यापिण्याच्या जिन्नसाच्या किंमतींत एकदम झालेल्या वाढीमुळें शहरापासून खेडयांतला प्रत्येक माणूस हवालदील झाला होता.

कोणत्याही प्रकारची राजकीय चळवळ त्यावेळी जोरांत नव्हती. रिक्रुटिंग-साठीं येणारीं सरकारी माणसं खेडयांतल्या शेतकऱ्यांच्या तरण्या जवान मुलांना पलटणींत भरती करून नेत होतीं. त्यावेळीं लढाईची कल्पना नव्हती—पोटाला अन्न मिळायची पंचाईत—लढाईवर गेल्यानं चार पैसे मिळून ते घरीं पाठवतां येतील या आशेनं हातांतला नांगर टाकून खांद्यावर बंदुक घेऊन शेतकऱ्यांचे जवान बच्चे लढाईवर निघून जात होते.

गावांत माणसांचा तुटवडा भासत होता पैशांचा तुटवडा पूर्वीचाच होता. उद्योगधंदा कांहींच नव्हता. शेतीवर पोट भरत नव्हतं. माणसं जशीं लढाईवर जात होतीं तशींच गिरणींत कुठंतरी नोकरी मिळेल म्हणून मुंबईच्या मार्गालाही लागलीं होतीं. मागं घरीं राहिलेल्या बायकापोरांची आबाळ गांव सोडून जाणाऱ्या माणसांच्या ध्यानी आली तरी तिचा प्रतिकार करण्याचा उपाय कुणाऱ्याच हातीं नव्हता.

अशा वेळीं शरणगांवच्या दुर्गाबाईनं अपंग झालेल्या कुटुंबांना एकत्रित करून उदरनिर्वाहाचं साधन उत्पन्न करण्याचे उपाय योजायला सुरवात केली होती.

एका कालीं शरणगांवांत गरिबांच्या उपयोगीं पडणारं जाडंभरडं कापड निघत असे. गिरण्या जोरांत आल्यापासून शरणगांवचे चरखे आणि माग रिकामे पडले होते. स्वदेशीच्या चळवळीमुळं गिरण्यांना जोर आला तरी खेडगांवच्या गरीब कोष्ट्यांच्या तोंडचा घांस नाहींसा झाला होता, याची जाणीव स्वदेशी चळवळ करणारांना त्यावेळीं जाणवली नव्हती.

अशावेळींच दुर्गाबाईला ही परिस्थिती जाणवली. अडगळींत पडलेले चरखे बाहेर काढून तिनं पुनः चालू केले. घरीं माग राहिलेल्या म्हाताऱ्या कोताऱ्यांना, पडून राहिलेले माग चालंत करायला उत्तेजन दिलं.

ती श्रीमंत नव्हती—म्हणजे आज श्रीमंत नव्हती. असा एक काळ होता, कीं तिच्या घरीं रोज दहाबारा अतिथि सहज जेवून जात होते. गरीब-गुरिबांना मृगाच्या नक्षत्राला वियाण्यासाठीं कर्ज काढायला तिच्या घरांत चार पैसे मिळत होते. अर्ध्या उघडया पडलेल्या कुणाही वाटेच्या वाटसराला अंगभर कपडा घालण्यासाठीं दुर्गेचा नवरा शंकर चारुदत्ताप्रमाणें आपल्या अंगावरचा कपडा काढून देत होता.

चारुदत्ताप्रमाणेंच या अवास्तव उदारपणामुळं त्याला दारिद्य आलं. त्याच्याच कर्जावर पोसलेले त्याचेच शेजारीपाजारी आज श्रीमंत होऊन बसले होते आणि त्यांच्याच दारीं जाऊन दमडीदुगाणींचं कर्ज काढण्याचा प्रसंग शंकरवर आला होता. ज्यांच्यावर उपकार केले तेच उलटले असं पाहून शंकरनं विचार करायला सुरवात केली—

त्याच्यापुढं दोन मार्ग होते, असंच दारिद्र्यांत खितपत रहाणं—दारिद्र्यांत समाधान मानून कृतघ्न झालेल्या आपल्या शेजाऱ्यांच्या लाथा खात रहाणं—हें एक, किंवा कृतघ्नतेचा सूड घेण्यासाठीं पूर्वीची वृत्ती टाकून प्रत्येकाला चांगली अद्दल घडवणं.

दुसरा मार्ग त्याला योग्य वाटला, पण दुर्गेला तो पटला नाहीं. त्या प्रेमळ जोडप्यांत विरोधाचं विषबीज रोवलं गेलं. दोघांचे मार्ग भिन्न झाले पण दोघांत तात्कालिक वैषम्य आलं नाहीं.

'तूं तुझ्या मार्गानं चाल—मी माझ्या मार्गानं जाईन!' असं म्हणून एकमेकांनीं एकमेकांना आव्हान दिलं.

आतां तीं एका भाडयाच्या घरांत रहात होतीं. शंकर, दुर्गा आणि त्यांचा आठ वर्षांचा मुलगा मोहन—एवढाच या दुःखीसुखी कुटुंबाचा पसारा मोहन बापाचा मोठा लाडका होता. आईपेक्षां पहिल्यापासूनच तो शंकरला

बिलगून असे. बदललेल्या वृत्तींत शंकरच्या तालमींत तो तयार होत आहे असं पाहून दुर्गेला दुःख होत असे. बापापासून त्याला दूर करण्याचा तिनं शक्य तेवढा प्रयत्न केला पण तो सिद्ध झाला नाहीं. तिच्या प्रयत्नांचा परिणाम उलट होऊन त्या कोवळ्या मुलाच्या मनांत स्वतःच्या प्रेमळ आईबद्दल एक प्रकारचा तिटकारा उत्पन्न झाला. बापाचं अनुकरण करून तो तिची हेटाळणी करूं लागला, इतकंच नव्हे, तर चारचौघांदेखत प्रत्यक्ष आपल्या प्रेमळ आईची थट्टा करायला देखील तो मागंपुढं पाहीनासा झाला. एवढ्याशा मुलाची ही अशी वृत्ती पाहून दुर्गेच्या हृदयाला यातना होत असत. तें दुःख विसरण्यासाठी ती गांवच्या लोकांचीं मुलंबाळं गोळा करून त्यांना शिक्षण देण्याचा प्रयत्न करी.

दुर्गेचं घर म्हणजे लहानसा कारखानाच झाला होता. तिथं चरखे होते, माग होते, शिवण्याची यंत्रं होतीं, मुलांची खेळणी करण्यासाठीं लागणारीं लहान हत्यारं होतीं—तिथं लोणच्याच्या बरण्या भरल्या जात होत्या, पापड घातले जात होते, मुरंबे मोरावळे तयार करण्याचा तिथं एक लहानसा कारखानाच होता.

पण या साऱ्या कारखान्यापासून तिला स्वतःला कोणताच फायदा नसे याचीच शंकरला चीड येई. गांवच्या गरीबगुरीबांना राबवून तिनं स्वतःची भर करण्याचं साधन निर्माण केलं असतं तर त्याला तिच्या त्या कार्याबद्दल वैषम्य वाटलं नसतं. पण उत्पन्न होणाऱ्या या साऱ्या जिनसांवर जो फायदा होत असे तो ती ती कामं करणाऱ्या गांवकरी बायाबापड्यांच्या संसाराला कसा उपयोगी पडेल याची काटेकोरपणानं काळजी घेई, म्हणूनच शंकरला तिची चीड येई—म्हणूनच गांवच्या गरीबगुरीबांची ती ' आई ' होऊन बसली होती.

रोज ती गीतेवर प्रवचन सांगत असे. या प्रवचनाच्या बळावरच गांवच्या लोकांना पहिल्यानं तिनं आपल्याकडे खेचून आणलं होतं. प्रवचन सुरू असतांना वाती करण्यांत निष्कारण वेळ घालवण्यापेक्षां वर उल्लेखिलेलीं

कामं श्रोत्यांकडून ती करून घेत असे. चरखे सुरू असायचे, शिवणकाम सुरू असायचं, खेळणीं तयार केलीं जायचीं, पापड लोणचीं तयार होत असायचीं—हातानं हीं कामं होत असतां कानानं गीतेच्या प्रवचनाचं श्रवण सर्वत्रांनीं करायचं, असा तिचा नियम होता.

लहानपणापासूनच तिला संस्कृत भाषेचा चांगला अभ्यास घडला होता. उपनिषदं, पुराणं, योगवशिष्ठासारखे वेदांतपर ग्रंथ यांचा अभ्यास झालेला असल्यामुळं तिचं गीतेवरचं प्रवचन मोठमोठ्या विद्वानांना सुद्धां थक्क करून टाकील अशा विद्वत्तेनं भरलेलं पण सुबोध, साध्या आणि प्रांजल भाषेनं नटलेलं असं होत असे.

म्हणूनच सारा गांव तिच्याकडे ओढला जात होता. शंकरनं सुरू केलेल्या गांवच्या अत्याचारामुळं हवालदील झालेल्या लोकांच्या अंतःकरणावर दुर्गेच्या ग्रामसेवेचा परिणाम अगदीं निराळ्या प्रकारं होत होता.

शरणगांव मुंबईपासून फारशा दूर अंतरावर नव्हतं. रेल्वेच्या प्रवासामुळं एका कालीं लांब वाटणारी मुंबई शरणगांवच्या लोकांना आतां अगदीं जवळची झाली होती. मुंबईच्या बाजारांतल्या चैनीच्या वस्तु शरणगावच्या चिंचोळ्या रस्त्यांतील वळचणींतून हातगाड्यांवरून विकल्या जात होत्या.

मुंबईचीं फळं आणून शरणगांवात विकणारा एक शेतकरी हातचा नांगर टाकून फळांची छोटी हातगाडी गावांतून फिरवीत होता. रस्त्यावरून जाणाऱ्या शंकरबरोबर असलेल्या मोहनची नजर त्या गाडीकडं गेली. त्याच्या तोंडाला पाणी सुटलं. जें दिसेल तें आपलं समजायची वृत्ती मोहनच्या ठिकाणीं उत्पन्न झाली होती. फळांच्या गाडीसभोंवार गोळा झालेल्या गिऱ्हाइकांतून घुसून मोहननं मालकी हक्कानं फळं काढून घेतलीं. त्याचा हात धरण्याची कोणाचीच छाती झाली नाहीं. फळविक्यानं त्याचा हात धरताच शंकरच्या हातचा जोराचा तडाखा त्याला खावा लागला. जमलेले लोकं मोठमोठ्यानं हंसूं लागले असं पाहून विचारा फळवाला ओशाळल्या सारखा होऊन म्हणाला, “ माझीं फळं चोरीत होता पोरटा ! ”

" गप्प बैस ! " शंकर ओरडला.

" पण माझीं फळं—" फळवाला तोंडातल्या तोंडांत बोलायचा प्रयत्न करीत होता.

मोठमोठ्यानं हंसत शंकर उद्गारला, " तुझीं फळं ! तुझीं !—" शंकर हंसत होता—गोळा झालेले लोकही त्याच्याबरोबर हंसत होते. केविलवाणं तोंड करून फळविक्या सहानुभूतीच्या अपेक्षेनं प्रेक्षकांकडे पहात होता.

" पण माझीं फळं——" तो पुनः बोलायचा प्रयत्न करूं लागला.

" तुझीं नाहींत–" शंकर ओरडून म्हणाला, " तुझीं नाहींत ! त्याचीं—माझा मुलगा आहे तो. या शंकरचा मुलगा आहे. शरणगांवच्या या मालकाचा मुलगा आहे. इथल्या प्रत्येक वस्तूवर त्याची मालकी आहे. कळलं ?—चलरे मोहन. " असं म्हणून त्यानं मोहनला आपल्या बरोबर ओढून नेलं. जात असतांना मोहन फळवाल्याला वेडावून दाखवीत होता.

फळवाल्याची झालेली फजिती पाहून आतांपर्यंत हंसणारे लोक शंकर निघून जातांच आपआपसांत कानाशीं लागून शिव्या देऊं लागले.

तितक्यांत फळवाल्याच्या पाठीवर कुणीतरी हलुच थाप मारली—त्याच्या कानीं शब्द आले, " चुकलेलं कोंकरूं आहे तें. त्याला क्षमा कर. ईश्वर तुला क्षमा करील- ! "

फळवाल्यानं वळून पाहिलं, तों गांवच्या मिशन हाऊसमधला म्हातारा पाद्री त्याला आश्वासन देत होता असं त्याला दिसून आलं. तिरस्कारपूर्ण नजरेनं त्याच्याकडे पहात आपल्याशींच हंसत फळवाल्यानं आपली हातगाडी लोटून न्यायला सुरवात केली.

पाद्रीनं एक दीर्घ निश्वास सोडला.

बऱ्याच वर्षांपासून तो पाद्री त्या लहानशा गावांत आपल्या धर्माचा बाजार मांडून बसला होता. गावानं टाकलेल्या महारमांगांना ख्रिस्ती धर्माची

दीक्षा देऊन त्यानं माणसांत आणलं होतं, म्हणूनच गांवच्या लोकांचा त्याच्यावर राग होता. दुर्गाबाईप्रमाणंच गांवातल्या अनाथअपंगांची सेवा करण्याची प्रत्येक संधी जरी तो साधीत होता, तरी कुणाचीच त्याच्याबद्दल सहानुभूती नव्हती. खिस्तीधर्माच्या तत्वाप्रमाणें निरपेक्ष बुद्धीनं सेवाधर्म बजावीत रहाण्यापलीकडे त्यानं गांवच्या लोकांना कोणत्याही प्रकारचा जरी त्रास दिला नव्हता, तरीही त्यानं केलेल्या निरपेक्ष जनसेवेचा गांवच्या लोकांकडून विपर्यास केला जात होता.

कुणीतरी म्हटलं, "पाहिलंत कसा त्रास देतोय साऱ्या गांवाला. एका काळचा सज्जन माणूस—पण कशी बुद्धी पालटली याची, देव जाणे ! ती बिचारी गांवच्या कल्याणासाठीं रोज मरते आहे आणि हा इकडे—" दचकून त्यानं मागं वळून पाहिलं आणि जिभेला आळा घातला.

"देवा, याला सुबुद्धी दे !" आकाशाकडे पहात पाद्री उद्गारला. त्याची ती काकुळती देवाच्या कानीं पोचली कीं नाहीं हें कुणालाच सांगतां आलं नसतं; पण शेजारींच उभा राहून ऐकणाऱ्या त्या गांवकऱ्यानं अश्रद्धेनं त्याच्या या विनवणीची हेटाळणी केली. दोघेही आपल्या रस्त्यानं गेले.

भरपूर फळं सत्तेच्या जोरावर चोरून घेऊन मोहन आपल्या बापाबरोबर घरीं येत होता, त्याच वेळीं दुर्गाबाईचं गीतेवरचं प्रवचन सुरू होतं. ती म्हणत होती, "म्हणूनच भगवंतांनीं म्हटलं आहे— कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन— वामनांनीं याचं असं विवेचन केलंय— पावेन म्हणसी निराकार । यालागीं कर्मीच तुज अधिकार । आणी कर्मफल संस्कार । नसे अधिकार तुज येथें ॥ निराकाराप्रत पावावं अशी जर तुझी इच्छा असेल तर पार्था, एवढंच समज, कीं तुझा अधिकार कर्मापुरता— आणि कर्मफल संस्कार नसे अधिकार तुज येथें— केल्या कर्माचं फळ मिळावं अशी संस्कारामुळं जी आशा उत्पन्न होते त्या फळावर तुझा अधिकार नाहीं. नानाकर्में नानाफळें । परी किती एक फळें जीं अढळें । तीं काम्यें करितां सकळें । न सोडिती ॥ निरनिराळ्या कर्मांचीं निरनिराळीं फळें

आहेत. कांहीं फळं अशीं आहेत कीं तीं काम्यें— म्हणजे फलाच्या अपेक्षेनें केलीं तर मोहाचा पगडा बसून कर्माच्या प्रवृत्तीपेक्षां फळाची अपेक्षा प्रबळ होते— म्हणजे फळाच्या अपेक्षेनं केलेलीं कर्मे बंधनात्मक होतात— तीं सुटत नाहींत. म्हणूनच भगवंतांनीं म्हटलं आहे— फलाची अपेक्षा करूं नकोस— मा ते संगोस्तु अकर्माणि— कर्म न करण्याची प्रवृत्ती ठेवूं नकोस. कर्माच्याच ठायीं तुझा अधिकार— फलाच्या ठायीं नाहीं— म्हणून— योगस्थः कुरु कर्माणि— मीपणा सोडून कर्माचं आचरण कर— त्या कर्मात आसक्त होऊं नकोस—"

तितक्यांत घड्याळांत तीन ठोके पडले. प्रत्येक काम ठराविक वेळीं, ठराविक मुदतीपर्यंत करण्याची शिस्त कडकपणें पाळली जात असल्यामुळं दुर्गाबाईनं हातांतील पानं खालीं ठेवून समारोप करण्यास सुरवात केली, "हा भगवंतांचा उपदेश ध्यानीं धरून जो आपल्या कार्याला लागेल त्याला या जगांत कशापासूनही भय नाहीं. हरयेनमः, हरयेनमः, हरयेनमः."

पुस्तकावर मस्तक ठेवून नंतर ती उभी राहिली, "अच्युतं केशवं रामनारायणं कृष्ण दामोदरं वासुदेवं हरे । श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं जानकीनायकं रामचंद्र हरे ॥ हरयेनमः हरयेनमः हरयेनमः" सर्वांनीं एका वाणीनं तो जयघोष केला.

प्रत्येकजण आपापले जिन्नस उचलून काळजीपूर्वक ठराविक जागीं ठराविक रीतीनं ठेवून देऊन दुर्गाबाईला नमस्कार करून जाऊं लागली.

"तुझी आई कशी आहे आतां सोने?" निघून जात असणाऱ्या एका छोट्या मुलीला थांबवून दुर्गाबाईनं विचारलं.

"आतां बरी आहे कालपासून," सोनी म्हणाली, "तुम्ही तें औषध दिलंत ना आणून—"

"बरं बरं, तेंच औषध चालू ठेव." दुर्गाबाई म्हणाली. आपण औषध आणून दिल्याचा उल्लेख ऐकणं सुद्धां तिला परवडलं नाहीं.

"पत्र आलं का ग तुझ्या नवऱ्याचं?" जात असलेल्या एका बाईला थांबवून तिनं विचारलं.

"जी होय !" ती बाई म्हणाली, 'गिरणींत नोकरी लागलीया मुंबईला. म्होरल्या महिन्याला पैसे धाडणार हायती !"

" अस्सं ? छान !" असं म्हणून दुर्गाबाईनं तिची रवानगी केली.

पहातां पहातां सर्वजणी निघून गेल्या. सारं सामान जागच्या जागीं लावून ठेवण्यांत आलं होतं. तृप्तीच्या समाधानी नजरेनं दुर्गाबाईनं चोहींकडे नजर फेकली. समाधानाचा एक मोठा निश्वास तिच्या हृदयांतून बाहेर पडला.

दिवाणखान्याच्या मध्यभागीं स्थापन केलेली गीताकार श्रीकृष्णाची मूर्ती, तिला वाटलं, तिच्याकडे पाहून हंसत होती. हळुहळु पावलं टाकीत त्या मूर्तीसमोर येऊन ती उभी राहिली. मूर्तीसमोर डोकं टेकून नमस्कार करीत ती म्हणाली, " हें असंच चालूं दे देवा तुझ्या कृपेनं ! अशीच सेवा घे माझ्या हातून. सुखी होऊं देत हे दुःखी जीव—मग माझं कांहींही होवो !—" तिनं मूर्तीकडे आतुरतेनं पाहिलं. तिला वाटलं, देवानं तिला आशीर्वाद दिला. तिला वाटलं, पहातां पहातां देवाची मुद्रा कठोर झाली—

मागं कुणाची चाहूल लागली म्हणून तिनं वळून पाहिलं तोंच शंकरनं लोटून दिलेला मोहन फळांसकट धाड्कन तिच्या पायाशीं येऊन पडला.

---

## २

हा प्रकार रोजचाच होता. मोहनच्या मागोमाग शंकर आंत आल्याचं पहातांच दुर्गा अस्वस्थ झाली. खालीं पडलेलीं फळं गोळा करीत ती म्हणाली, "कुठून आणलीस हीं ?"

मोहन कांहींच बोलेना. तो नुसता घाबरून तिच्या चेहऱ्याकडे पहात होता. तिनं पुनः ताकिदीच्या आवाजांत विचारलं, " बोल मोहन, हीं एवढीं फळं कुठून आणलींस ?"

"वाटेल तिथून, " शंकर पुढं सरसावून म्हणाला, " काय झालं ?"

" कांहीं झालं नाहीं," दुर्गा म्हणाली, " पण या वयांत—ही असली खोड—बरं नाहीं हे !

" असली खोड !" शंकर चिरडीला येऊन म्हणाला, " असली खोड खरी नाहीं तर काय बरं आहे ? गांवातल्या प्रत्येक माणसानं फळं खावीं अन् माझ्या मुलानं काय नुसतं पहात बसावं ? फळवाल्यानं माझ्या मुलाचा हात पकडावा आणि मीसुद्धां काय नुसतं पहात रहावं ?"

"ऐकलं ? —" दुर्गा बोलण्याचा उपक्रम करीत होती. शंकरनं तिला बोलूं दिलं नाहीं.

" हो हो ! " शंकर डोळे वटारीत म्हणाला, " चोरी करूनच आणलीं आहेत तीं. चोरी नव्हे बहादुरी—कुणाची छाती झाली नाहीं शंकरच्या मुलाचा हात धरायची--समजलीस ? "

" समजलं. " दुर्गा एक मोठा सुस्कारा सोडून म्हणाली, " कीं बापाच्या पावलावर पाऊल टाकून मुलगा पापाच्या वाटेला लागलाय !"

" अन् तूं पुण्याच्या वाटेवर चढतेयस !" शंकर उद्गारला, " हें गीतेचं रडगाणं गातेयस म्हणजेच ना पुण्य ? हा चरखा, ही ग्रामसेवा, हा सर्वभूतीं समतेचा उपदेश—हीच ना तुझी पुण्याची वाट? जगानं लाथा माराव्या, जगानं मुंडी मुरगळावी आणि आपण बायकासारखं बसून नुसतीं टिपं गाळावीं—साऱ्या जगानं छळ करावा आणि आपण तो मुकाटयानं सहन करावा--कां तर म्हणे सहनशील म्हणवून घेण्यासाठीं ! हें नाहीं जुळणार दुर्गा--शंकरलांही जुळणार नाहीं आणि त्याच्या मुलालाही जुळणार नाहीं."

" नशिब माझं ! " दुर्गा गंभीरपणें म्हणाली, " सारा गांव माझं ऐकतो पण माझ्याच घरीं माझं कोण ऐकत नाहीं !"

" काय ऐकायचं तुझं ?" संतापून शंकरनं विचारलं, " तुझा उपदेश ? कसला तुझा उपदेश ? कां म्हणून ऐकायचा ? केव्हांही घरीं आलं तरी हाच गीता आणि हाच चरखा. पुरे झाली ही कटकट ! आग लागो या घराला आणि या उपदेशाला ! चलरे मोहन--" असं म्हणून त्यानं खालीं पडलेल्या मोहनला हिसडा देऊन उभं केलं.

" कुठं ? " दुर्गेनं काकुळतीनं विचारलं

“ वाट फुटेल तिथं–” शंकर बेफिकिरीनं म्हणाला, “ जिथं ही तुझी कटकट रोजरोज माझ्या कानीं येणार नाहीं—तिथं. जिथं मी आणि माझा मोहन दुनियेच्या वैभवांत लोळत राहूं—तिथं ! ”

“ म्हणजे ? ” दुर्गा उद्गारली.

“ म्हणजेबिणजे कांहीं नाहीं ” शंकर किंचाळला, “ आम्ही निघालों. ”

“ अन् मी ? ” केविलवाण्या मुद्रेनें शंकरकडे पहात दुर्गेनं विचारलं.

“ तूं ? ” शंकर मोहनला हातीं धरून निघत म्हणाला, “ तूं तुझा गांव सुधार. उपदेश कर लोकांना. उपाशी मरत असतील त्यांना अन्न घालण्यासाठीं स्वतः उपाशीं मर. मी तें करून पाहिलं. कृतघ्नांना अन्न घालूं ? सापाला दूध पाजलं तरी गरळाशिवाय तो काय देणार ? चांगला अनुभव आला मला—आपला ऋणानुबंध सपला—” दरवाजाकडे जात जात तो म्हणाला, “ मी गेलों कीं तुझं घर देखील सुधारेल दुर्गा ! ”

—त्याच्या मागोमाग धांवत जात काकुळतवाणीनं दुर्गा म्हणाली, “ स्वामी—”

“काय आहे ?” शंकर एकदम मागं वळून पाहून खोटं हसूं चेहऱ्यावर आणीत म्हणाला, “ मी कसा जाईन म्हणतेस ? काळजी वाटली माझी तुला ?—प्रवास कसा घडेल म्हणून ? पैसे देतेस—आण—”

“ पैसा ? ” दुर्गा म्हणाली, “ कुठला पैसा आहे माझ्याकडे ? ”

इतका वेळ एक शद्ब सुद्धां न बोललेला मोहन एकदम पुढं सरसावून म्हणाला, “ नाहीं ? मग त्या तिथं काय आहे तें ?—” देव्हाऱ्याकडे बोट करून त्यानं बापाला डोळा घातला.

“ अस्सं ? ” शंकर देव्हाऱ्याकडे जात म्हणाला, “ देवाच्या देव्हाऱ्याची तिजोरी बनवली आहेस अं ? ”

“ थांबा—” दुर्गा त्याला आड येत म्हणाली, “ बाहेरच्या पायानं असं शिवायचं नाहीं देव्हाऱ्याला. देवाचा प्रसाद आहे तो. आतां येणार आहे जन्माला, त्याच्यासाठीं देवाच्या नांवानं बाजूला काढून ठेवलाय.”

" मूल देणारा देव तुला पैसा नाहीं देणार ! " असं म्हणून त्यानं देव्हाऱ्याखालीं ठेवलेली रेशमाची पिशवी ओढून काढून हातीं घेतली. दुर्गा त्या पिशवीवर झडप घालण्यासाठीं पुढं होत होती तोंच मोहन तिला आडवा आला. पिशवींतलें पैसे ओढून पिशवी फेकीत शंकर म्हणाला, " चलरे मोहन. "

दोन्हीं हात पसरून दुर्गा म्हणाली. " मोहन, बाळ, इकडे ये. माझं ऐक. जाऊं नकोस असा—"

तिनं मोहनला ओढायचा प्रयत्न केला. तिच्या हाताला हिसका देऊन तो बापाला जाऊन बिलगला. शंकर म्हणाला, " पाह्यलंस ? झाली तुझी खात्री ? मोहन माझा मुलगा आहे— तुझा नव्हे— पटलं आतां ? तो माझ्याबरोबर येणार. तुझ्याकडे कशाला ? लोकांचे शिव्याशाप घ्यायला ? बायक्या बनून चरखा फिरवायला ? सवाईशंकर बनणार आहे तो— दुनिया गाजवणार आहे. चलरे मोहन. "

पुनः दुर्गेनं मोहनला हांक मारली. बापाबरोबर निघून जातांना मागं वळून त्यानं आईला वाकुल्या दाखवल्या. तिच्या हृदयाचं पाणी झालं. आपल्या पोटचा गोळा प्रत्यक्ष आपला नवराच आपल्याकडून खेंचून घेऊन जात आहे— सत्कार्यासाठीं नव्हे, कुकार्याच्या मार्गावर दोघेही पाऊल टाकणार आहेत— अधोगतीची पाऊलवाट चोखाळीत दोघांचाही अधःपात होणार आहे, ही कल्पना मनांत येऊन तिचं अंतःकरण विरघळून गेलं.

दारांत उभी राहून ती पहात होती. पुढं जात असतांना त्या दोघांनीं मागं वळून सुद्धां पाह्यलं नाहीं. मायेचे जीव म्हणून ज्यांच्यासाठीं तिनं सारं आयुष्य खर्ची घातलं त्यांनीं दाखवलेला हा असामान्य कठोरपणा पाहून तिचा जीव खचून गेला. ती आपल्याशींच पुटपुटली, " गेले ! घरची लक्ष्मी टाकून बाहेरची लक्ष्मी शोधायला गेले ! कोण जाणे, हातीं लक्ष्मी लागेल कीं अवदसा ! "

ती सारी रात्र तिनं तळमळून काढली. भविष्यकाळाच्या अज्ञात कल्पनेनं तिचं हृदय भारावलं होतं. विवेकानं मनाचं समाधान करण्याचा ती

प्रयत्न करीत होती. वैभवाच्या काळीं घडलेल्या सुखाच्या संसाराच्या साऱ्या आठवणी तिनं नजरेसमोर आणल्या. तें वैभव गेलं, दारिद्य आलं, त्या दारिद्र्यांत सुद्धां पहिले दिवस सुखानं गेले होते. एकमेकांच्या आसवांत आसवं मिसळून त्यांनीं मनाचं सांत्वन केलं होतं. समाधान मनाचं असतं—धनाचं नव्हे, असं म्हणून त्यानीं एकमेकाला धीर दिला होता. पण काय झालं कोण जाणे, शंकरची वृत्ती एकदम पालटली. संताचा सैतान बनला. साऱ्या गांवाला त्याचा उपसर्ग होऊं लागला. तिच्याकडे पाहून गांव त्याला गय करीत होता. गावांतील श्रीमंत गरीब, लहानथोर, साऱ्यांच्या मायेचा ती आधार बनली होती. तो आधार दुखवूं नये म्हणून गावानं त्याला क्षमा केली. पण दिवसेंदिवस त्याचे अत्याचार वाढूं लागले. पदर पसरून, काकुळतीला येऊन तिनं प्रत्येकाची मनधरणी केली आणि त्याला पदोपदीं संकटांतून सोडवलं. तुरुंगाची हवा खाण्यासाठीं जेवढे म्हणून उपाय करावे लागतात तेवढे सर्व त्यानं केले होते. तरीही अजून तो जो तुरुंगाबाहेर राहिला होता तो गांवच्या लोकांच्या तिच्याबद्दलच्या आदरामुळेंच.

तिला वाटलं, जाऊन जाऊन कुठं जाईल? रोजच्या जाचणीला कंटाळून धाक देण्यासाठीं पूर्वी कितीतरी वेळ त्यानं असंच घर सोडून जाण्याचं अवसान आणलं होतं, पण थोड्याच वेळांत परत येऊन त्यानं तिच्याशीं समेट केला होता.

पण आज तिला शंका वाटली. आज तिच्या संग्रहांतली सारी ठेव त्यानं हिरावून नेली होती. यावेळीं त्याच्या हातीं पैसे होते म्हणूनच तिला वाटलं, कीं आज तो गेला तरी ते पैसे संपेपर्यंत परत येणार नाहीं.

तिला नऊ महिने भरत आले होते, घरांत दुसरं कुणीच नव्हतं, हातीं असलेला पैसाही निघून गेला होता. दुसऱ्याकडे याचना करणं म्हणजे तिला मरणप्राय दुःख वाटे. प्रसंग असा होता, कीं आतां याचना करण्याखेरीज दुसरा उपायच राहिला नव्हता.

पण याचना तरी कुणाकडे करायची? तिचा संबंध येत होता तो नुसता दरिद्री लोकांशीं. श्रीमंतापासून ती दूर रहात असे. मग आतां त्या

तसल्या लोकांच्या दारीं याचनेचा हात पसरण्यासाठीं जावं लागणार का ?

हृदयाच्या चिंधळ्या उडत आहेत असं तिला वाटलं. विचाराच्या आत्यंतिक परिभ्रमणांत तिचा डोळा लागला.

इकडे मोहनला घेऊन शंकरनं स्टेशन गांठलं होतं. तिकिट कले-क्टरला धक्की देऊन तडक तो एका डब्यांत घुसला होता. त्या डब्यांत बेसुमार गर्दी होती. सामान ठेवण्याच्या वरच्या फळीवर चढून वरचं सामान पायानं लोटीत शंकरनं जागा केली. मोहन तिथंच कुठं तरी खालीं कोंपऱ्यांत बसून राहिला होता.

गाडी सुरू होतांच कुणी भिकारी आपली एकतारी काढून गाऊं लागला. खऱ्या धर्मात्म्यांची ओळख आगगाडीच्या प्रवासांतच कळत असते. गर्दीत कशीबशी जागा करून बसलेला एकेकजण मोठ्या कष्टानं आपल्या खिशांत हात घालून एकेक पैसा काढून त्या भिकाऱ्याला देत होता. कुणी पैसा देण्यासाठीं आपल्या खिशांतलीं पैशाचीं पाकिटं उघडीत होते, तें मोह-नच्या नजरेंतून निसटले नाहींत.

वरच्या फळीवरून शंकरनं मोहनला डोळा घातला. मोहनला त्याची खूण कळली. बसल्या जागींच त्यानं चाळे करायला सुरवात केली. शेजारच्या उतारूकडे पाहून तो म्हणाला, " एक पैसा द्या ना इकडे."

"कशाला ? " उतारूनं विचारलं.

" जरा गंमत दाखवतों ! " मोहन म्हणाला, " माझा जादूचा खेळ तर पहा."

एकतारी घेऊन गाणारा भिकारीसुद्धां पुढं सरसावला. कुणीतरी एक पैसा दिला. मोहननं त्या एक पैशाचे दोन पैसे करून दाखविले. उतारू लोकांचं लक्ष त्याच्याकडे वेधलं. कुणी पैसा, कुणी पावली, कुणी अधेली आणि एकानं तर रुपयाच दिला. रुपया देणारानं आपल्या खिशांत घातलेलं पाकीट मुक्कामाला गेल्यावर त्याला खात्रीनं मिळालं नसावं.

मोहन हातचलाखीचे खेळ करून दाखवीत होता आणि ते दाख-

चीत असतांना किती जणांचीं पाकिटं त्यांच्यां नकळत त्याच्या खिशांत गेलीं झालीं.

तितक्यांत कुणीतरी पुढं सरसावला. त्याच्या खांद्यावर पाय देऊन उतरायचा शंकरनं प्रयत्न केला.

आणि त्या सरशीच मारामारी जुंपली. डब्यांत एकच गोंधळ उडाला असं पाहून मोहननं धांवत जाऊन सांखळी खेंचली. गाडी उभी राहिली असं पहातांच खिडकींतून उडी टाकून मोहन काळोखांत पसार झाला.

" पोऱ्या पळाला—पोऱ्या पळाला !" असा आरडाओरडा होण्या-बरोबरच गार्ड डब्यांत शिरला होता. " कुठं गेला माझा पोर ?" असं म्हणत शंकर खाली उतरूं लागला, तोंच गार्डानं त्याला अडवलं. " गाडीची सांखळी कुणी ओढली ? " असं गार्ड विचारतो आहे तोंच त्याला झुकांडी देऊन शंकर नाहींसा झाला.

सांखळी कुणी ओढली याचा कांहींच पत्ता लागेना. गार्ड तरी आणखी काय करणार होता ? बऱ्याच लोकांचे पैसे घेऊन पोऱ्या पळून गेला होता. शंकरचा आणि त्या पोऱ्याचा कांहीं संबन्ध असावा असं तोंपर्यंत कुणालाच वाटलं नव्हतं.

गाडीला खोटी होऊं नये म्हणून गार्डनं गाडी सोडण्याचा हुकूम दिला. ज्यांचीं पाकिटं चोरीस गेलीं होतीं त्यांनीं मुंबईच्या स्टेशनवर पोलिसांत वर्दी द्यावी असं सांगून गार्ड निघून जातांच गाडी सुरू झाली.

काळोखांत उतरलेला मोहन कुठं गेला होता याचा शंकरला कांहीं वेळ पत्ता लागेना. मोहननंच शंकरला शोधून काढलं. दोघेही भेटतांच झालेल्या प्रकाराबद्दल पोट धरधरून दोघांनींही भरपूर हंसून घेतलं.

मुंबई तिथून फारशी दूर नव्हती. तरीही मुंबईपर्यंत चालत जाणं शक्य नव्हतं. पहांट होईपर्यंत त्यांनीं माग काढीत रस्ता गांठला आणि रस्त्याच्या कडेला झाडाला टेकून कांहीं वेळ विश्रांति घेतली. पुढं काय

करावं याचा दोघांनाही विचार पडला होता, तोंच समोरून येणारी एक मोटार त्यांच्या नजरेला आली. दोघांनीही बेत ठरवला—

मोटर तिथं यायला आणि मोहन धाड्कन् रस्त्यावर पडायला एकच गांठ पडली. मोटरवाल्यानं एकदम ब्रेक लाऊन गाडी उभी केली आणि गाडींतून उडी टाकून मुलाचा समाचार घेण्यासाठीं तो पुढं आला.

" फार लागलं का ? कुठं लागलं ? " असं त्यानं विचारतांच शंकर ओरडला, " कुठं लागलं काय विचारतोस ? दिसलं नाहीं तुला ? मिजासखोर असतां तुम्हीं मोटरवाले. माणसांच्या जिवाची पर्वा असते का तुम्हांला ? तुमची मोटर लवकर जावी म्हणून किती जणांचे बळी घेतां ?—"

" बाबारे, कृपा कर—" मोटरवाला खिशांतून पाकीट काढून एक पांच रुपयाची नोट त्याच्या हातीं देत म्हणाला, " हे घे आणि मुलाला उपचार कर. इथं कुठं तरी डॉक्टर असेल. फारसं लागलेलं दिसत नाहीं त्याला. मला घाई आहे मुंबईला जायची—" असं म्हणून नोट त्याच्या हातांत कोंबून तो गाडींत बसत होता, त्याला एक हिसडा देऊन शंकरनं त्याला बाहेर खेचलं आणि म्हटलं, " मुंबईला जायचंय म्हणे. माणसाचा जीव म्हणजे जसा कांहीं कोंबड्याकुत्र्याचाच जीव. मी कुठं जाऊं डॉक्टरला शोधायला ? वाटेचा वाटसरू मी—या पोराला काय खांद्यावर टाकून नेऊं ? उचल त्याला आणि ठेव तुझ्या गाडींत !"

बिचारा मोटरवाला सालस माणूस होता. दुसरा कुणी असता तर आधीं थांबलाच नसता पण एकदां थांबल्यावर आल्या प्रसंगाला तोंड देण्यासाठीं मोहनला उचलून त्यानं गाडींत ठेवलं—शंकर उडी मारून आंत बसला आणि गाडी सुरू झाली.

मोटरवाल्यांच्या बेचाळीस पूर्वजांचा उद्धार गाडींत बसून शंकर करीत होता. मोटरचा शोध ज्यानं पहिल्यानं लावला त्याच्यापासून आरंभ करून ही मोटर घेऊन येणाऱ्या माणसाच्या साऱ्या वाडवडिलांचा उद्धार करूनही त्याचं समाधान होत नव्हतं.

शंकरची बडबड चालू असतांच समोरच्या आरशाकडे मोटरवाल्याची नजर गेली आणि त्याच बरोबर सुरीचं पातं आपल्या मानेवर खरखरत आहे असं त्याला वाटलं. घाबरून त्यानं एकदम ब्रेक लावून गाडी थांबवली. शंकरनं एका हातानं त्याची मानगुटी पकडून दुसऱ्या हातानं सुरा त्याच्या मानेवर धरला होता. मोहन चट्कन उडी मारून पुढं झाला आणि त्याच्या खिशांतले सारे जिन्नस त्यानं काढून घेतले. दोघांनीही त्याच्या तोंडांत बोळा देऊन त्याला बांधून टाकलं आणि गाडींतून उडी घेऊन दोघेही आड-रस्त्यानं मार्गाला लागले.

ते जुहूच्या रस्त्याला आले तेव्हां झुजुमुंजु दिसूं लागलं होतं. शंकर पूर्वी त्या भागांत कधींच आला नव्हता. यापूर्वी मुंबईला केव्हांकेव्हां येऊन जाण्याचा योग जरी त्याला आला होता तरी मुंबईच्या आजूबाजूच्या प्रत्येक भागाची त्याला पुरेशी माहिती नव्हती. सरळ रस्त्यानं जायचं नाहीं—कुठंतरी आडरस्ता गांठायचा—एवढ्याच विचारानं ते दोघेही रस्ता सोडून सरळ चालत निघाले ते जुहूच्या किनाऱ्यावर येऊन पोंचले. पहांटेची वेळ झाली होती तरीहीं तिथल्या तंबू झोपड्यांतून माणसांची जाग सुरू झाली होती. समुद्रस्नानासाठीं येणारी हौशी मंडळी आपले कपडे किनाऱ्यावर काढून ठेवून पोहायला जात होती. कुणी नुसतेच पायीं चालत होते, कुणी घोड्यावरून रपेट करीत होते, कुणी इकडे तिकडे हिंडत होते किंवा धांवत होते. या लोकांची चाललेली ही अकारण वर्दळ पाहून त्या दोघांनाही आश्चर्य वाटलं. खेडेगांवात असलं दृश्य दिसण्याचा कधीं योग नव्हता. कामा-शिवाय कुणीच माणूस खेडेगावांत कधीं कुठं जात नसे. इथं चाललेली ही उगीच धावाधाव, उगीच पळापळ पाहून त्या बापलेकांना मोठं कौतुक वाटत होतं. किनाऱ्यावर पडलेल्या कांहीं कपड्यांकडे मोहनची नजर गेली. एका मोठ्या माणसाचे आणि त्या बरोबरच एका लहान मुलाचे कपडे नज-रेला पडतांच मोहननं बापाला नुसत्या डोळ्याच्या खुणेनं इषारा दिला.

अगदीं आपलेच कपडे गोळा करून घ्यावे त्याप्रमाणें हातीं घेऊन मोहन ऐटीनं चालत माडांच्या मुळाशीं गेला. अजून चांगलं दिसूं लागलं नव्हतं.

दोघांनीही तिथं कपडे बदलले. जुन्या कपड्यांची पुरचुंडी करून त्यांनीं ती दूर फेकून दिली.

" सुरवात तर ठीक झाली !" शंकर म्हणाला, " एक सुतळीचा तोडा घेतल्याशिवाय आपण आपल्या घराबाहेर निघालों. वर्षभर मुंबईत चैनीत रहाण्याइतकी रक्कम एका रात्रींत आपण मिळविली आहे. कांहीं पत्ता लागायचा नाहीं कुणाला—" मोहनची पाठ थोपटीत शंकर म्हणाला, " माझा मुलगा शोभतोस खरा. आज बेमालूम कामगिरी बजावलीस. स्वतःच्या जबाबदारीवर एव्हांच तुला इतकी कर्तबगारी दाखवतां आली—आतां मीं निर्धास्त झालों. आतां मुंबई जिंकायला मला कांहींसुद्धां वाटणार नाहीं—"

मोहन नुसता हंसत होता. तो नुसता कर्तबगार होता—बडबड्या नव्हता. बोलण्याची त्याला जितकी आवड नव्हती तितकाच शंकर फाजील बोलका होता. मोहन म्हणाला, " डबक्यांतून समुद्रांत आलों आहोंत आपण. दूरवर नजर फेकली पाहिजे—रागावूं नका बाबा—तोंडाला अगदीं कुलूप घातलं पाहिजे !"

" खरं आहे—खरं आहे " शंकर म्हणाला, " मला हुकूम करायचा अधिकार आज मिळवला आहेस पोरा. बालादपि सुभाषितं ग्राह्यम् असं तुझी आई म्हणते ना वारंवार—"

" आतां आईचं नांव काढायचं नाहीं !" मोहन म्हणाला, "आतां एकच—मुंबई—!"

" अन् मुंबईची मालकी !" शंकर छाती पुढं काढून उद्गारला, "शरणगांवसारख्या टिचभर खेड्यांत जी मालकी गाजवली तीच या अफाट मुंबईत गाजवायची—"

मोहन नुसता हंसत होता. मोठ्यां रुबाबांत दोघेही सहल करण्याच्या आवेशांत चालत निघाले—

## ३

सकाळ उजाडली. दुर्गा नित्याप्रमाणें गृहकृत्याला लागली-पण दोघां-चाही पत्ता नव्हता. अजूनही तिला आशा वाटत होती. तिला काळजी वाटत होती काय ती मोहनची. यापूर्वी शंकर असाच भांडण करून ज्यावेळीं गेला होता त्यावेळीं मोहनला त्यानं बरोबर नेलं नव्हतं. मोहनला त्यानं चालत नेलं असेल, थंडीत फरफटवीत नेलं असेल, चालतांना वाटेंत तो थकला असेल-- कुठं खायला मिळालं असेल कीं नाहीं—या काळजीनं तिचा जीव तिळतिळ तुटत होता.

दुपार झाली. स्नान उरकून तिनं नित्याप्रमाणें देवाची पूजा केली, देवाला नैवेद्य दाखवला आणि नैवेद्याचं ताट पुढं घेऊन ती जेवायला बस-णार तोंच दारावर कुणीतरी थाप मारली.

"आले वाटतं !" असं म्हणून तिनं दार उघडलं—

पण तें दृश्य पाहून तिच्या काळजाचं पाणी झालं. कोर्टाचं बेलीफ घेऊन मालक घराचा ताबा घेण्यासाठीं हजर झाला होता.

"काय आहे ?" तिनं भीत भीत विचारलं, "जप्ती का ?"

"हो हो जप्ती-" मालक म्हणाला; "किती वाट पाह्यची आम्हीं ! किती वायदे ऐकायचे ! तुझा नवरा आम्हांला वाटेल तशी तंबी देतो. घर आमचं—आणि सत्ता गाजवायची तुम्हीं ! इतके दिवस सांगून पाह्यलं—तुम-च्याकडे पाहून उगी राह्यलों--पण आतां हद्द झाली."

"आणखी थोडे दिवस नाहीं कां थांबतां यायचं ?" तिनं काकुळतीला येऊन विचारलं.

"आतां ?" मालक म्हणाला, "आतां तर मुळींच नाहीं. काल शंकर पळून गेला—मुलाला घेऊन पळाला, ते कळलंय आम्हाला. आम्हीं जप्तीचा हुकूम घेतला होता हें त्याला कळलं होतं. आतां तो पळून गेला--भाडं मिळायची कांहीं आशा नाहीं.—आतां ताबा मिळाला घराचा म्हणजे पुष्कळ झालं—"

घराचा ताबा घेण्याबद्दल त्यानं आपल्या नोकरांना हुकूम केला.

दुर्गेनं चोहींकडे पाह्यलं. तिला आभाळ कोसळल्यासारखं झालं होतं. मालकाचे नोकर देव्हाऱ्याकडे जात असलेले पाहून ती धावतच पुढं गेली आणि म्हणाली, " माझे देव !"

" बरं बरं-" मालक म्हणाला, " घेऊं द्या तिला आपले देव. काय किंमत यायची आहे त्या देवांची ?"

देव घेऊन तिनं एका संबळींत घातले आणि ती हातांत घेऊन घराबाहेर पडण्यासाठीं ती दारार्शी आली. मालकाचीं माणसं चरखे, शिवण्याचीं यंत्रं यांना हात घालीत होती हें पाहून ती म्हणाली, "दुसऱ्याचे जिन्नस आहेत ते ! आमचे नव्हत. "

" कुणाकुणाचं काय काय आहे त्याची एक यादी करून द्या. " मालक म्हणाला, " अन् ज्यांना त्यांना सांगा आपापले जिन्नस घेऊन जायला. "

हातांतली संबळी खालीं ठेऊन तिनं जवळच्या फडताळांतली कागद् पेन्सील घेऊन एक यादी करून ती घरमालकाकडे दिली.

साऱ्या घरावर तिनं एकदां नजर टाकली. जुन्या आठवणींच्या छाया तिच्या नजरेसमोर येऊन जात होत्या. एकाकाळीं हें घर तिच्या मालकीचं होतं. पुढं तें दुसऱ्याच्या मालकीचं झालं—विकलं गेलं. भाडेकरू या नात्यानं आपल्या स्वतःच्याच घरांत रहाण्याचा प्रसंग आल्यावेळीं झालेल्या यातना विसरून तिनं गांवच्या लोकांना गोळा करण्याचा जो उपक्रम केला होता तेव्हांपासून त्यावेळपर्यंतचा सर्व इतिहास तिच्या नजरेसमोरून जात होता. आंसवांनी डबरलेल्या दृष्टीसमोर तिला तो इतिहास स्पष्ट दिसत होता.

तिनं घराच्या बाहेर पाऊल टाकलं तोंच नित्याप्रमाणें पहिली बाई आली. दुर्गा बाहेर चाललेली पाहून ती आश्चर्यचकित झाली.

बळेंच हसूं आणून दुर्गा म्हणाली, " मी चाललें बरं. बंद झाला आपला आश्रम !"

"कां ?" त्या बाईनं विचारलें.

दुर्गेनं घराकडे नजर फेकली. आंतलं सामान बाहेर काढलं जात होतं. त्या बाईलाही आतां कल्पना आली. तें दृश्य पाहून त्या बाईलाही हुंदका आला. मन घट्ट करून दुर्गा म्हणाली, "मी सांगितलंय त्यांना तुमचा चरखा द्यायला—अन् नर्मदाबाईना म्हणावं, आपलं शिवायचं मशीन पण घेउन जा—" एकदम वळून तिनं रस्ता पकडला.

एक छोट्याशा मुलीनं एकदम येऊन तिचा हात धरला. तिचा प्रश्न येण्यापूर्वीच दुर्गा म्हणाली, "राधा, आजपासून आपले वर्ग बंद !"

एकामागून एक बायकामुली येऊं लागल्या होत्या. पण त्यांच्याकडे नुसतं वळून पहाण्याचा सुद्धां प्रयत्न न करतां ती तडक रस्ता सुधारींत होती. सर्वांचे डोळे भरून आले होते—हृदयें भरून आलीं होतीं—निरोप देण्यासाठीं सुद्धां पुढं होण्याचं धैर्य कुणाला होत नव्हतं.

आपण कुठं जाणार याची यत्किंचित सुद्धां कल्पना न करतां दुर्गा सारखी चालूं लागली होती. तिचं मन कोरडं झालं होतं. भूत किंवा भविष्यकाळाची कोणतीच कल्पना आतां तिच्या मनात येत नव्हती. वर्तमानकालसुद्धां अस्पष्ट झाला होता. त्या अस्पष्ट मार्गानं पुढं पाऊल टाकीत असतां मस्तकाचा पावलाशीं संबंध राहिला नव्हता. जिकडे पावलं नेतील तिकडे ती जात होती. रस्त्यावर परिचित माणसांची रहदारी सुरू होती. पण त्या कुणाकडेही तिनं ढुंकून पाहिलं नाहीं.

त्या प्रवासाला मुक्काम नव्हता. त्या प्रवासाला खळ नव्हता. त्या प्रवासाचा शेवट कुठं होणार याची तिनं कदर केली नव्हती. नऊ महिनें भरत आलेले--भर दुपारची वेळ--पोटांत अन्न नाहीं--देहांत त्राण नाहीं अशा स्थितींत तीं गांवाच्या सीमेबाहेर झाली. पुरता एक मैल सुद्धां प्रवास झाला नव्हता पण हजारों योजनं चालल्याचे परिश्रम ती अनुभवित होती. त्या खडतर अनुभवांतून तिला काय लाभणार होतं !

समोरच एक मोठा वाडा दिसला. तिथं एक सदावर्त होतं. कुणी

धर्मात्म्यानं साधूसंत, गोसावी बैरागी, वाटेचे वाससरू यांना दुपारच्या वेळीं पैसै न देतां पोटभर अन्न मिळण्याची तिथं सोय केली होती. थकत चालेलल्या पायांनीं आसऱ्यासाठीं तिला त्या इमारतीच्या कठड्यापर्यंत नेऊन पोचवलं आणि तिथंच त्यांची कामगिरी संपली. कोलमडत, डळमळत, ती कशीबशी कठड्याला टेकून उभी राहिली. पांथस्थ जेवून ढेकरा देत आंचवण्यासाठीं बाहेर येत होते त्यांतील एकाची नजर तिच्याकडे गेली. त्यानं सदावर्ताच्या व्यवस्थापकाला तिची परिस्थिती दाखवून दिली.

तोंपर्यंत ती सावध झाली होती. व्यवस्थापक म्हणाला, " आंत या बाई, जेवण वाढून तयार आहे. "

" काय आहे हें ? " तिनं विचारलं.

" हें सदावर्त आहे. "

" कुणाचं ?"

" देवळचंदशेठचं "

" ते मुम्बईचे सावकार होय ?" दुर्गा म्हणाली.

" हो हो तोच धर्मात्मा " आंचवत असतां एक भल्या मोठ्या पोटाचा भटजी ढेकर देत म्हणाला, " सारा मुलुख ओळखतो त्याला. आजच उघडलं हें अन्नछत्र त्यानं. बरी झाली आहे सोय. म्हटलं काय आहे तें एकदां पहावं. तशी जेवणाची व्यवस्था कांहीं फारशी वाईट नाहीं. पहिलाच दिवस आहे हा—पुढं असंच टिकेल तेव्हां खरं— "

" बरे उपकार केले आहेत सर्वांवर ! " दुसरा एकजण उद्गारला.

" कसले उपकार ? " तो ढेरपोट्या म्हणाला, " आजपर्यंत किती जणांच्या किती प्रकारें मुंडया मुरगळल्यायत बेट्यानं ! किती घरं ओस पाडलींयत ! किती जणांचीं किती घरं चक्रवाढ व्याजाच्या हिशेबांत घशाखालीं घातलींयत. आतां गरिबांसाठीं मूठपसा दिला तर काय झालं ? सारा शरणगांव बेट्यानं जसाचा तसा गिळलाय. "

" कुणी ? " दुर्गेनं विचारलं.

" याच धर्मात्म्यानं !"—तो ढेरपोटया म्हणाला.

" कांहीं का असेना, आज फुकट खायला तर मिळतंय ! " आंतून बाहेर येणारा एक अतिथी म्हणाला.

" पण अशानं का पाप धुऊन जाणार ?" पंचानं तोंड पुशीत त्या ढेरपोटयानं निकाल दिला, " आणि हें अन्न चारताहेत साधूबैराग्यांना ! पुण्यात्मेच ते ! पापाचं अन्न पोटांत गेलं तर पुण्यात्म्याच्या जठराग्नींत त्याचं सोनं-सुवर्ण होतं "

सारेच मोठमोठयानं हंसले. ढेकरा आणि हंशा एकांत एक मिसळून जो एक कुश्चळ आवाज आला तो कानीं पडतांच दुर्गेच्या आंगावर शहारे आले.

" जो निश्चय ठेऊन बैसतो--त्याला घरीं बसल्या राम देतो--रे बापहो अखंड हरि हरि वदा--किती सेवाल धन दुर्मदा !" कुणीतरी अतिथी गात होता.

" खरं आहे—" दुर्गा आपल्याशींच म्हणाली, " फुकटचं अन्न--पापाचं अन्न—माझ्या कुसव्यांतल्या जिवाच्या तोंडीं जगाचा उजेड पाहायच्या पूर्वी नको जायला हें असलं अन्न !"

" काय म्हटन्त बाई ?" व्यवस्थापक म्हणाला. त्याला उत्तर नव्हे, पण स्वतःच्या जिवाचं समाधान करण्यासाठीं दुर्गा उद्गारली, "पापाच्या अन्नांतून पुण्यात्मे कसे निर्माण होतील ?" पुनः व्यवस्थापकानें प्रश्न केला त्यावेळीं, " कांहीं नाहीं--कांहीं नाहीं—माफ करा " असं म्हणून ती तशीच धडपडत पुढं मागं चालूं लागली.

ढेरपोट्या म्हणत होता, "असा हा मूर्खपणा चाललाय जगांत. जें मिळतं तें पदरांत घ्यावं—पापाचं आहे कीं पुण्याचं आहे याची चौकशी कशाला ? एवढी विचक्षणा करूं लागला माणूस, तर तोंडांत घालायला अन्नाचा एक दाणासुद्धां सापडायचा नाहीं कुठं ! सारा मूर्खांचा बाजार आहे झालं !"

"अन्नदाता सुखीभव !" असें म्हणत आपल्या भल्या मोठ्या पोटावरून हात फिरवीत एक मोठा जटाधारी गोसावी सदावर्तीच्या पायऱ्या उतरून मार्गाला लागला. मोठ्या कष्टानं एक एक पाऊल उचलीत जाणारी दुर्गी त्याच्या नजरेला पडली. त्यावेळीं तो आपल्याशींच उद्गारला, "क्या पागल औरत है !"

आपल्या मतानं दुर्गी पुढला मार्ग आक्रमित होती खरी पण खरं पाहिलं तर ती फिरून शरणगांवच्या दुसऱ्या टोकाला येऊं लागली होती. तो रस्ता भयाण होता. रस्त्यावर चिटपाखरूं सुद्धां नव्हतं. तिच्या पायांतून कळा येऊं लागल्या. घटकाभर एका झाडाच्या मुळाला टेकून तिनं विश्रांती घेतली. पुनः सारा भूतकाल तिच्या नजरेसमोरून जाऊं लागला होता. त्या भूतकालांतून भविष्यकालांत पाऊल टाकणाऱ्या मोहनचा चेहरा तिच्या नजरेसमोर दिसत होता.

तिच्या पोटांत भुकेनें कल्लोळ केला होता खरा-पण मोहन जेवला असेल काय-या एकाच प्रश्नामुळं होणाऱ्या यातना तिच्या अंतःकरणाला पीळ पाडीत होत्या. त्या यातनांच्या जाणिवेंतच त्या झाडाच्या बुंध्याशीं तिचा डोळा लागला.

---

## ४

जें कांहीं करायचं तें अचाट—आपल्या शक्तीबाहेरचं--हा शंकरचा बेत असल्यामुळं पोषाखाच्या जोरावर त्या दोघांनीं मुंबईच्या एका प्रख्यात हॉटेलांत प्रवेश केला.

हॉटेलांत जायचं, याच्या पलीकडे त्या दोघांना कसलीच कल्पना नव्हती. हॉटेलांत जाण्याची पद्धत काय असते, तिथं वागायचं कसं, फार काय जिन्नस मागवायचे कसे याची देखील त्यांना कल्पना नव्हती.

हॉटेलांत प्रवेश केल्याबरोबर वेटरनं त्यांना एका टेबलाजवळ नेऊन बसवलं. तो पोषाखाचा प्रभाव होता. वेटरनं मेनू हातीं देतांच शंकरनं तो

फेकून दिला. वेटर आश्चर्यचकित झाला. शंकर म्हणाला, "आण काय असेल तें—खायचं आण!"

बिचारा वेटर तरी काय आणणार होता? 'खायचं आण' म्हणजे काय काय समजायचं याचा बरोबर अंदाज न आल्यामुळं त्यानं पुनः एकदां मेनू शंकरच्या पुढं केला. हातांतला मेनू उडवून देऊन तो म्हणाला, "जा, जें काय असेल तें घेऊन ये." बिचारा वेटर स्वतःच्या बुद्धीवर विसंबून राहून आपल्या कामासाठीं निघून गेला.

नाच सुरू होता. ऑर्केस्ट्रा वाजत होता ही गडबड जेवणाच्या वेळीं कां याची कल्पना त्या दोघांनाही येईना. बाकीचीं टेबलं हळुहळु भरत होतीं. वेटरनं एकेक जिन्नस आणून टेबलावर ठेवल्याबरोबर त्यांनीं आधाशासारखं खायला सुरवात केली. सूपची बशी तोंडाला लावून ते दोघे पिऊं लागले तेव्हां आजूबाजूचे लोक अचंब्यानं त्यांच्याकडे पाहूं लागले. गोऱ्या बायका फिदीफिदी हसूं लागल्या. शिस्तीला अनुसरून पुरुषांनीं आपली गंभीरता कायम ठेवली होती. इतर खाण्याचे जिन्नस सुद्धां काटाचमचा बाजूला टाकून तें हातानंच खात आहेत असं पाहून बिचारा वेटरसुद्धां घाबरून गेला.

तितक्यांत एक उंचा पुरा धिप्पाड गृहस्थ एका बाईला बरोबर घेऊन मुद्दाम राखून ठेवलेल्या एका टेबलाजवळ येऊन बसला. तो सर्वांच्या परिचयाचा असावा असं दिसून येत होतं. कुणी त्याला सलाम करीत होते, कुणी शेकहँड करीत होते, तर कुणी खाणं विसरून नुसतेच टकमक पहात होते. शंकरचं लक्ष साहाजिकच त्याच्याकडे गेलं. त्यानं वेटरला विचारलं तेव्हां वेटर म्हणाला, "हे केशवलाल शेठ-बडे व्यापारी आहेत मुंबईचे. सारा मुंबईचा बाजार त्यांच्या हातीं आहे. मोठा दरारा आहे त्यांचा साऱ्या मुंबईत."

शंकरनं ठरवलं—पहिला हल्ला या व्यक्तीवर. मोठ्यांतला मोठा असेल त्यालाच पहिल्यानं धक्का द्यायचा.

केशवलालबरोबर असलेली स्त्री फारशी सभ्य दिसत नव्हती. तिचा पोषाखही महाराष्ट्रीय पद्धतीचा होता, त्यावरून ती त्याची बायको नसावी

खास, असं शंकरला वाटलं. वेटरला विचारतांच तो नुसता हंसला, त्यावरून शंकरनं जो कांहीं बोध घ्यायचा तो घेतला. जेवण पुरं होतांच ते दोघेही जे उठले ते नाच चालत असलेल्या जागीं जाऊन उभे राहिले. ही गोष्ट शिस्तीच्या विरुद्ध होती, पण त्याची त्या दोघांना कुठं पर्वा होती ? कांहीं वेळ ते नुसतेच नाच पहात उभे राहिले होते तोंच वेटर बिल घेऊन आला.

शंकरनं आपल्या खिशांत हात घातला—त्याच्या हाताला कार्ड लागलं. तें कार्ड काढून त्यानं वेटरच्या तबकडींत टाकलं. कार्ड पहातांच वेटर मुजरा करून निघून गेला. कार्ड तबकडींत टाकण्यांत शंकरचा कांही विशेष उद्देश होता असं नाहीं. जमलं तर जमलं नाहींतर थट्टेवारी न्यायचं, असं ठरवून त्यानं तबकडीत कार्ड फेकलं होतं. पण त्याचा इष्ट परिणाम झालेला पाहून त्याचं त्यालाच आश्चर्य वाटलं. तें कार्ड एका प्रख्यात बॅरोनेटचं होतं. त्या हॉटेलशीं त्या बॅरोनेटचा जिव्हाळ्याचा संबंध होता. केव्हां केव्हां तो हॉटेलला भेट देत असे. या माहितीला अनुसरून वेटरनं बिलाचे पैसे विचारण्याचं धैर्य केलं नव्हतं. मोहननं मात्र चलाखी केली. एक अधेली काढून त्याच्या तबकडींत टाकली. टिप् देण्याची पद्धत जरी त्याला माहीत नव्हती तरीही शेजारचे लोक काय करतात हें पहिल्यापासून तो नीट निरखून पहात होता. त्या लोकांचं अनुकरण करूनच त्यानं टिप् देण्याची ही तत्परता दाखवली होती. बांहेर येतांच शंकर मोहनला ह्मणाला, "शेवटीं पदरचा पैसा दिलास?"

"नाहीं !" मोहन मिस्किलपणें हंसून म्हणाला, "त्या वेटरच्याच खिशांतल्या अधेल्या होत्या त्या. तो वाढायला आला तेव्हांच मी लांबवल्या होत्या. एक खोटी होती तीच परत दिली."

"शाबास मोहन !" शंकरनं त्याची पाठ थोपटली.

दोघेही बेफिकीरपणें रस्ता आक्रमीत होते. बरेच चालून गेल्यावर एका मोठ्या इमारतीसमोर 'भाड्यानें देणें आहे'ची पाटी दिसली. तितक्याच बेफिकीरपणें त्यांनीं आंत प्रवेश केला.

द्वारावरच्या भय्यानं त्यांना आंत नेऊन जागा दाखवली. त्या फर्निश

रूम्स होत्या. सामान घेण्याची उठाठेव करायला नको या विचारानं शंकरनं तीच जागा पसंत केली. शंकर म्हणाला, " सध्यां इथं कुणी रहातं का ?"

" नाहीं. " भय्या म्हणाला, " नुकतींच इथलीं माणसं जागा खाली करून गेलीं."

" त्यांचंच का हें सामान ?" शंकरनं विचारलं.

" नाहीं, " भय्या म्हणाला, " हें सामान इथलंच आहे. सामाना-सकट ही जागा भाड्यानं देतों आम्हीं. "

" ठीक आहे " शंकर म्हणाला, " आम्ही राह्यलों इथं. छान आहे जागा. समोर समुद्र दिसतोय, अफाट दूरवर नजर जातेय, कोंदट नाहीं वाटत आपल्या गांवासारखं—"

काठेवाडी पगडी गांधलेला एक भला लठ्ठ गृहस्थ समोर येऊन उभा रहातांच शंकरनं विचारलं, " कोण तुम्ही ?"

" मी मेथाजी आहें इथला. मीच व्यवस्था पहातों इथली—" तो म्हणाला.

" ठीक आहे." शंकर म्हणाला, "जागा पसंत आहे आम्हांला—आम्हीं राहिलों इथं—" तरीही मेथाजी जात नाहीं असं पाहून शंकरनं पुनः निक्षून सांगितलं, " आम्हीं राहिलों इथं, जा तुम्हीं. "

" मग ॲडव्हान्स—" मेथाजी म्हणाला. शंकर नुसता पहातच राहिला असं पाहून मेथाजी पुढं म्हणाला, " कायदा आहे आमचा—एक महिन्याचं भाडं अगाऊ दिलं पाहिजे. सव्वाशें रुपये भाडं आहे इथलं."

आतां मात्र शंकरची पंचाईत आली. खिशांतले पैसे काढण्याखेरीज आतां गत्यंतर नव्हतं. कोटाच्या खिशांतलं पाकीट काढून त्यानं पाहिलं—चांगल्या पांचसातशेंच्या नोटा आंत असल्याचं त्याला दिसून आलं. त्यांतल्या नोटा काढून त्यानं मोठ्या रुबाबांत मेथाजीच्या अंगावर फेकल्या. मेथाजीनं आपलं पावती बुक बरोबरच आणलं होतं. मेथाजी पावती लिहितांना त्याच्या मागं उभा राहून मोहन पहात होता.

पावती मिळाली——बाकीचे पैसे मिळाले——मेथाजी निघून गेला——पण शंकरचा चेहरा मात्र उदासवाणा झाला होता. मोहन हंसत होता.

" हंसतोस काय गाढवा !" शंकर म्हणाला, " पहिल्यानंच रोख पैसे द्यावे लागले !"

खिशांतून एक भलं मोठं सोन्याचं घड्याळ काढून हळूच दाखवून तें पुन्हां खिशात ठेवीत मोहन हळुच म्हणाला, " मेथाजीचं !"

" शाबास ! माझा मुलगा शोभतोस खरा !" शंकर उद्गारला.

आगाऊ भाड्याचे पैसे देण्यांत जरी ही बचत झाली होती तरी खिशांतले पैसे काढण्याखेरीज यापुढं गत्यंतर नव्हतं. त्या फ्लॅटमधें जरी फर्निचर भरपूर होतं तरी अर्थातच इतर कांहीं नव्हतं. कपडालत्ता, ट्रंका, पेट्या वगैरे सामान विकत घेण्याखेरीज गत्यंतर नव्हतं.

पुढं काय करायचं याचा अंदाजही शंकरला नव्हता. केशवलाल त्याच्या नजरेसमोर आला होता. तो एक मुंबईतला मोठा माणूस आहे——फारच मोठा माणूस आहे——असं त्याला कळलं होतं आणि म्हणूनच त्याच्याशीं सामना द्यायचं त्यानं ठरवलं होतं. पण तो कुठं असतो, काय करतो, तो मोठा माणूस कां झाला, ज्या क्षेत्रांत कांहीं विशेष कामगिरी केल्यामुळं त्याला मोठेपणा आला आहे त्या क्षेत्रांत प्रवेश करणं आपल्याला सुलभ आहे कीं नाहीं, याची शंकरला यत्किंचितही कल्पना नव्हती.

स्वतःच्या बुद्धीच्या जोरावर त्यानं शरणगांव हादरून टाकलं होता. त्या यशाच्या कैफामुळं मुंबई सुद्धां आपल्या मुठींत आणीन अशी त्याची अपेक्षा होती. पण मुंबई म्हणजे काय हें प्रत्यक्ष पाहिल्यानंतर त्याचं बेडर हृदय क्षणभर हादरलं.

कुणाचीच ओळख नाही, मार्गदर्शक कुणीच नाहीं, कुणाची तरी ओळख करून घेण्याचा कोणत्याही प्रकारची अनुकूलता नाहीं, अशी परिस्थिती असतांना पुढं आपण काय करणार हें त्याला ठरवतां येईना. अविचारानं त्यानं आरंभ केला होता——त्या अविचाराच्या बळावरच पुढं मुंबईत

आपलं बस्तान थाटायचं असं त्यानं ठरवलं होतं. शरणगांवला मुठींत आणण्यासाठीं ज्या आविचारानं त्याला हात दिला त्या अविचाराची शंभरपट —हजारपट करून मुंबई काबीज करण्याचा त्यानं संकल्प केला.

ज्यावेळीं शंकरनं येऊन मुंबईत ठाण मांडलं त्याचवेळीं तिकडे दुर्गा कुणाचा तरी आधार शोधीत होती. झाडाच्या बुंध्याशीं तिला आलेली झोप रातकिड्यांच्या किरकिरीनं दूर झाली. खरं पाहिलं तर तीं झोप नव्हती. उपासानं आणि श्रमानं आलेली ग्लानी होती. तिनं उठण्याचा प्रयत्न करून पाहिला. तिचे पाय लटपटूं लागले. आधार घ्यायला जवळ काठी सुद्धा नव्हती. देवांच्या संबळीला टेकून तीं कशीबशी उभी राहिली.

संबळी हातात घेऊन मोठ्या कष्टानं ती एकेक पाऊल टाकीत होती. समोरच्या झाडींत मिणमिणणारा एक दिवा दिसत होता. त्यावरून तिथं माणसांची वस्ती असावी असा अंदाज करून ती एकेक पाऊल मोठ्या प्रयासानं उचलीत होती. तिच्या उदराचा आश्रय करणारा अभागी जीव जगाचा प्रकाश पहाण्यासाठीं उतावळा झाला असावा असं तिला वाटूं लागलं.

समोर दिसणाऱ्या मुक्कामापर्यंतचा प्रवास सुखानं घडणार कीं नाहीं याची तिला शंका वाटत होती. होत असलेल्या यातना सहन करण्यासाठीं दांतओठ खाऊन ती कशीबशी एकेक पाऊल टाकीत होती. त्या तसल्या दुबळ्या स्थितींतही हातांतल्या संबळीची पकड ढिली न होण्याचा ती आटो-काट प्रयत्न करीत होती.

मोठ्या कष्टानं त्या दिव्यापर्यंत येऊन ती पोचली. ती मनुष्य वस्ती-चीच जागा होती. पुनः फेरा घेऊन ती शरणगांवच्या सीमेवरच आली होती. त्या सीमेवर मिशनरी लोकांनीं स्थापन केलेलं तें एक प्रसूतिगृह होतं.

मिणमिणाऱ्या दिव्याच्या प्रकाशांत तिनं ती पाटी पाहिली. ईश्वरानं आपल्याला हात देऊन योग्य जागीं आणलं असंच तिच्या श्रद्धाळू हृदयाला वाटलं.

दारांतल्या घंटेच्या दोरीला हात लावण्याचा तिनं दांतओठ खाऊन

प्रयत्न केला. त्या वेणा तिला असह्य झाल्या होत्या. डोळ्यापुढं अंधेरी येत होती. कसाबसा घंटेचा दोरा खेचून दाराजवळ येण्याचा प्रयत्न करीत असतां ती कोसळून पडली आणि त्याच वेळीं दरवाजा उघडून म्हातारा पाद्री बाहेर आला.

त्या गावांतील प्रत्येक माणूस दुर्गाबाईला ओळखत होता—तसाच पाद्रीही ओळखत होता. दोघांचेही मार्ग भिन्न असल्यामुळं एकमेकांचा परिचय होण्याचा योग केव्हांच आला नव्हता. दुर्गाबाई निराधार झाल्याची हकिकत त्याच्या कानीं येऊन पोचली नव्हती, म्हणूनच ती दाराशीं येऊन मूर्च्छित पडलेली पहातांच तो आश्चर्यचकित झाला. माणसांची मदत घेऊन पाद्रीनं तिला आंत नेलं. उपचाराला सुरवात झाली. तशा त्या बिकट अवस्थेंत ती एकच वाक्य पुटपुटत होती, "द्यायचा तर मुलगाच दे देवा!"

उपचार सुरू झाले होते—

नुकत्याच जन्मलेल्या एका मानवी जीवाचा आवाज कानीं पडतांच दुर्गेनं डोळे उघडले. "मुलगाच!" नर्स उद्गारली.

दुर्गेच्या चेहऱ्यावर हर्षातिरेकाची छाया निर्माण झाली. "शेवटीं देवानं माझं गाऱ्हाणं ऐकलं!" असं म्हणून तिनं पुनः डोळे मिटले.

तिची प्रकृति फार नाजूक झाली होती. आसन्नप्रसव स्थितींत उपास घडून प्रवास करावा लागल्यामुळं आधींच दुबळ्या झालेल्या तिच्या देहावर जो ताण पडला होता त्याच्या परिणामामुळं तीं हिंडतीफिरतीं व्हायला जरा कालावधी लागला. पाद्री येऊन तिच्या बिछान्याशेजारी तासाचे तास बसत असे. निरनिराळ्या विषयावर चर्चा करून तिच्या मनाचं सांत्वन करण्याचा जिव्हाळ्याचा प्रयत्न करीत असे.

परोपकाराच्या व्रतासाठींच त्या पाद्रीनं मिशनरी पेशा पत्करला होता. धर्मांतर करून घेण्याच्या मूळ उद्देशानं जरी ती संस्था स्थापन झाली होती तरीही खेडेगांवच्या लोकांच्या दुस्थितीच्या जाणिवेनं ख्रिस्ताच्या कळपांत माणसं पकडण्यापेक्षां दुःखदारिद्र्याच्या पकडींतून खेडवळांना सोडवण्यांतच

तो आनंद मानीत होता. म्हणूनच दुर्गेबद्दल त्याला आदर वाटे. दोघांचंही ध्येय एकच होतं. पण दोघांचे उपचार भिन्न होते. अमेरिकन मिशनच्या पैशांचा पाद्रीला पाठिंबा होता—दुर्गा असहाय होती. त्या असहायतेच्या बळ वरच ती जें कार्य करीत होती तें कार्य मिशनच्या पैशाच्या बळानं होणाऱ्या कार्यापेक्षां जास्त महत्वाचं होतं—जास्त भरीव स्वरूपाचं होतं.

गांवाच्या सेवेसाठीं तिनं कसं क्लेश पत्करले, दैन्यांतून समाधान कसं मिळवलं, याचा उब्दोधक इतिहास पाद्रिनं हळुहळु तिच्याकडून काढून घेतला. आत्मस्तुतीचा तिला तिटकारा होता, आपण केलेल्या सेवेचा स्वतःच्या तोंडानं उच्चार सुद्धां करायचा नाहीं असा तिचा बाणा होता. अर्थातच ही सारी हकिकत तिच्या तोंडून वदवून घेतांना त्या पाद्रीला मोठे प्रयास पडले.

प्रसूतीच्या वेळीं जरी तिला फार क्लेश झाले होते तरी मुलावर त्याचा परिणाम झाला नव्हता.मुलगा मोठा गुटगुटीत होता, निकोप प्रकृतीचा होता. त्या मुलाच्या तोंडाकडे पाहाताच दुर्गाबाईच्या निस्तेज चेहऱ्यावर आनंदाची टवटवी येई. त्या मुलाच्या जन्मासाठीं ती तळमळत होती. तिला मुलाचीच उणीव भासत होती—तिला मुलगाच पाहिजे होता.

एकप्रकारें तिनं आपल्या नवऱ्याशीं युद्ध पुकारलं होतं. पापापुण्याच्या झगड्यांत जय कुणाचा होतो हें ठरविण्यासाठीं म्हणूनच तिला एक मुलगा पाहिजे होता. आपल्या कल्पनेप्रमाणं त्या मुलाच्या मनाची घडण घडवावी अशी तिची इच्छा होती. "बुद्धी जन्मजात असते पण त्या बुद्धीला लावायचं वळण माणसाच्या इच्छेवर अवलंबून असतं. विशिष्ट प्रकारानं वाग-वलेली मुलं आपल्या इच्छेप्रमाणें घडवितां येतील अशी तिची कल्पना होती.

सत्याच्या पायावर उभारलेल्या शिक्षणाचा घास देऊन त्याच्यावरच हा मुलगा वाढवीन आणि सत्याच्या पुरस्कार करण्यासाठीं जगांतल्या साऱ्या खोटेपणाशीं झगडून तो विजयी झालेला आपल्या नवऱ्याला दाखवीन, असं गीताकाराचं स्मरण करून तिनं आपल्या मनाशीं ठरवलं होतं. म्हणूनच त्या मुलाला पाहून तिला प्रतिक्षणीं आनंदाचं भरतं येई.

तिच्या आश्रमांत काम करणाऱ्या एका म्हाताऱ्या बाईनं पंधरावीस दिवसांतच पाद्रीच्या संमतीनं तिला आपल्या घरीं नेऊन ठेवलं. तें तिचं घर सुद्धां फारसं मोठं नव्हतं. ती एक लहानशी झोपडी होती. तिथं दुसरी खोली सुद्धां नव्हती. पोटभर अन्न मिळण्याची सुद्धां त्या बाईला वानवा होती. दुर्गाबाईला कळूं न देतां पाद्रीनं कांहीं दिवसपर्यंत दोघांच्याही चरितार्थाची सोय करून दिली होती.

नवरा आणि बायको या दोघांचेही मार्ग अशा प्रकारें भिन्न झाले. पापाच्या पैशावर तो मुंबईत ज्यावेळीं अधिष्ठित होऊन राहिला होता त्याच वेळीं, एका काळीं ज्या गावांत वैभवाचा अभिमान मिरवला त्याच गांवांत, ती धर्माच्या अन्नावर आयुष्य कंठीत होती.

तिला पुन्हां पुन: वाटे, हा झगडा कुठं संपणार ? जय कुणाचा होणार ? पापाचा की पुण्याचा ? सत्याचा की असत्याचा ? धर्माचा कीं अधर्माचा ?

गीताकाराचं नांव घेऊन ती भविष्यकालाकडे नजर ठेवून राहिली होती.

---

## ५

जरा हिंडणं फिरणं शक्य होतांच दुर्गा पुन:पूर्वीच्या कामाला लागली. स्वस्थ बसून रहाणं तिला शक्य नव्हतं. सुखासमाधानाच्या काळांतसुद्धां तिनं जे उद्योग सुरू केले होते ते प्रस्तुतच्या दु:खाच्या कालांत परोपकारापेक्षां स्वार्थाच्या बुद्धीनं करावे लागणार आहेत, याचंच तिला दु:ख होत होतं.

त्या काळांत खादीची चळवळ सुरू झालेली नव्हती किंवा ग्रामोद्धाराची उठाठव करण्याचंही कुणाच्या मनांत आलं नव्हतं. महात्मा गांधींच्या राजकीय क्षेत्रांतलि पुढारीपणाला आणि त्या बरोबरच खादीच्या चळवळीलाही तोंड लागण्यापूर्वी चरखा आणि माग याचं महत्व दुर्गाबाई त्या गांवाला पटवून देत होती पूर्वी तो गांव कोष्टयांचा होता. आणि म्हणूनच तिनं केलेला हा चरखे—मागाचा पुनरुद्धार तेथील लोकांना पटत होतं.

ज्या गरीब बाईनं दुर्गेला आपल्या घरांत आश्रय दिला होता ती स्वतः अगदींच अपंग होती. दुर्गेला नकळत पाद्रीनं दिलेल्या मदतीवर कांहीं दिवस त्यांचा जो चरितार्थ चालला होता, त्याचं मूळ दुर्गेला कळून येतांच तिनं म्हातारीलाही पाद्रीकडची मदत घेण्याची मनाई केली. म्हणजे पाद्रीची मदत घ्यायला तो 'पाद्री' म्हणून तिचा विरोध होता असं नव्हे, तर कुणाच्याही धर्माच्या अन्नावर जगायचं नाहीं असाच तिचा बाणा होता.

जीं कांहीं कामं रोज चालत असत त्यांत ती पूर्वीपेक्षां जास्त उत्साहानं आणि जास्त स्वार्थी नजरेनं भाग घेऊं लागली. 'स्वार्थी नजरेनं' म्हणण्याचा उद्देश एवढाच, कीं यापूर्वी ती स्वतःच्या चरितार्थापुरताच काम करीत असे. आतां एका म्हातारीचा आणि एका तान्ह्या बाळाचा भार तिच्या आंगावर पडला होता. म्हणून पूर्वींचं प्रवचनाचं काम थोडंसं कमी करून आंगमेहनतीच्या कामाकडे ती जास्त प्रमाणांत लक्ष देऊं लागली.

पापड आणि लोणचीं तयार करून मुंबईला पाठविण्याचा एक मोठा कारखानाच त्यानीं अस्तित्वांत आणला. त्याला एक कारण झालं. दुर्गाबाई अपंग स्थितींत म्हातारीच्या घरीं येऊन राहिल्यावर तिनं आपलं जुनं कार्य ज्यावेळीं सुरू केलं त्याच वेळीं तिथं काम करणाऱ्या इतर बायकांना तिच्या उदरनिर्वाहाची काळजी वाटूं लागली. कित्येकानीं आपसांत थोडथोडी वर्गणी करून त्या कुटुंबाच्या चरितार्थासाठीं लहानशी रक्कम गोळा करायचं ठरवलं. ही बातमी ज्यावेळीं दुर्गेच्या कानावर गेली तेव्हां ती म्हणाली, "माझ्यासाठीं तुम्ही तसदी घेऊं नका. तुम्ही जो बेत ठरवला आहे तो मला पटत नाहीं—तें दान आहे—ती भिक्षा आहे—त्या भिक्षेच्या अन्नावर मला जगायचं नाहीं—माझा मुलगासुद्धां भिक्षेच्या अन्नावर वाढतां कामा नये. जें कांहीं अल्पस्वल्प मिळवायचं तें स्वतः निढळाच्या घामानंच मला मिळवलं पाहिजे—"

"त्यांत काय झालं ?" एकजण म्हणाली, "गांवांत मुलांना शिकवायचं काम जे पंतोजी करीत असत त्यांचा चरितार्थ पूर्वी गांवचे लोक नव्हते का चालवीत ? तसंच हें ! ही सेवा आहे आमची—"

" सेवा करायची आहे जगाची—" दुर्गा म्हणाली, "माझी नव्हे. मी देखील एक सेविकाच आहे. जशा तुम्ही तशीच मी. मी इथं पंतोजींचं काम करीत नाहीं—गुरूचं काम करीत नाहीं.—इथं सर्वांचं नातं समान आहे. आपण साऱ्याच सेविका आहोंत. दहा जणींच्या वीस हातांनीं आपण काम करतों आहों तीं सर्वांच्या सेवेसाठीं. हा माझा चरखा मला माझ्या पोटापुरतं अन्न रोज देईल. याच्यावर मी रोज अडीच तीन आणे मिळवूं शकतें. या भावांत माझ्या उदरनिर्वाहाला ते पुरेसे आहेत. पण आतां माझ्यावर आणखी भार पडले आहेत. तो बोजा हलका करण्यासाठीं मला आणखी कांहीं तरी काम केलं पाहिजे. इथं रायवळ आंबे पुष्कळ मिळताहेत. त्यांचं लोणचं घालून तें जर आज मुंबईला पाठवलं तर आपणा सर्वांचंच उदरनिर्वाहाचं साधन त्यांतून निर्माण होईल--"

ती कल्पना सर्वांना पटली. लहानशा प्रमाणांत तो कारखाना सुरू झाला आणि हळुहळू मोठ्या प्र ाणांत त्याची वाढ होऊं लागली. त्या कारखान्यांतून होणाऱ्या उत्पन्नांत ा चरितार्थाला पुरेसा भाग तेवढाच ती स्वतः घेत असे. बाकीचा भाग कारखाना वाढवण्याकडे लावीत असे.

हीं कामं चालत असतांच प्रवचनाचं कार्यही सुरूं होतं. दुर्गा तत्वज्ञ होती पण तिची वृत्ति सनातनी नव्हती. तत्वज्ञानाचा अभ्यास ज्याच्याकडून घडला आहे ती व्यक्ती, पुरुष असो कीं स्त्री असो, सहसा मागासलेल्या विचारांची राहूं शकत नाहीं. अंधश्रद्धा आणि तत्वज्ञता या दोहोंत केवढं तरी मोठं अंतर आहे. भोळ्या भाविकांना व्रतवैकल्याच्या नादीं लावणारं शास्त्रीपंडिती थाटाचं तिचं पुराण नव्हतं. तिची स्वतःचीच वृत्ती प्रवृत्तीपर असल्यामुळं निवृत्ती मार्गाकडे ती स्वतःच कधीं झुकली नाहीं—अर्थात् दुसऱ्यांनाही अडाणी बनवणाऱ्या निवृत्तीमार्गाकडे झुकवण्याचा तिनं प्रयत्न केला नाहीं.

म्हणूनच गीतेचं प्रवचन करतांना सर्वत्र लोकप्रिय असलेली ज्ञानेश्वराची 'ज्ञानेश्वरी' टाकून तिनं वामनाची 'यथार्थदीपिका' हातीं घेतली होती.
भवद्रुमातें छेदी शस्त्र । ऐसें तुझें गीताशास्त्र । त्याची दाविती पाठ मात्र ।

धार रूपविती ये रीती ।। असं म्हणणाऱ्या वामनाचं गर्भीभूर्ती वासुदेव पाहून वासुदेवाची सेवा करणं–भूतमात्रांची सेवा करणं–कर्मफलाची यत्किंचितही अपेक्षा न करतां सेवेसाठीं सेवा करणं, हेंच गीतेचं महत्तम तत्व ती जसं उपदेशित होती तसंच आचरीतही होती.

सांप्रदायिक ज्ञानेश्वरी टाकून यथार्थदीपिका हा ग्रंथ प्रमाण म्हणून धरल्यामुळं सांप्रदायिकांकडून तिला विरोध होत होता. विरोध करणारांचा ज्ञानेश्वरीचा अभिमान ज्ञानेश्वर या लेखकाबद्दल त्याच्या चमत्कारपूर्ण चरित्रामुळं उत्पन्न झालेल्या अंधश्रद्धेवर आधारलेला होता. दुर्गेला बालपणापासूनच संस्कृतचा अभ्यास घडला होता. शंकराचार्यांचं गीताभाष्य तिनं अभ्यासलेलं होतं. म्हणूनच तिला ज्ञानेश्वरीचं महत्त्व वाटलं नाहीं. अलंकारिक भाषेत केलेलं, सुरेश्वराचार्याच्या टीकेवर आधारलेलं, ज्ञानेश्वरी हें शांकरभाष्यचं नुसतं रूपांतर आहे असाच तिचा समज होता. वामनानं आपल्या यथार्थदीपिकेंत असल्या सांप्रदायिकांची चांगलीच हजेरी घेतलेली होती. त्याचे विचार स्वतंत्र होते. शंकर असो, वल्लभ असो कीं रामानुज असो या तिन्ही महनीय व्यक्तींच्या अद्वैत, द्वैत आणि विशिष्टाद्वैत या तिन्हीं तत्वांपेक्षां वामनानं भक्तीच्या समर्थनासाठीं बाराव्या अध्यायाचा मध्यबिंदु कल्पून गीतेच्या तत्वज्ञानाची भक्तीच्या केंद्रावर केलेली रचना, सांप्रदायिक नसली तरी स्वतंत्र होती म्हणूनच तिला पटली–आणि म्हणूनच वामनाच्या गीतार्थाचा प्रसार करण्यास ती पुढं सरसावली होती.

खेडेगांवच्या भाविकांना गीतेचा तो कर्मपर अर्थ जास्त आकर्षक वाटत होता. त्यांत अंधश्रद्धेला कुठंच थारा नव्हता. सर्वसाधारण अशिक्षितांची अंधश्रद्धेकडे झुकण्याची प्रवृत्ति तोडून काढण्यासाठीं गीतार्थाची धार हातीं देणाऱ्या यथार्थ दीपिकेचा म्हणूनच तिला मोठा अभिमान वाटत होता.

दुर्गेचं हें ग्रामकार्य अशा स्वरूपांत चाललेलं असतांना तिकडे शंकर मुंबईतही आपलं बस्तान बसवण्याच्या मागाला लागलेला होता. अनुभवाच्या अभावीं पहिल्यानं जरी त्याला बरेच धक्के खावे लागले तरी निर्भयतेच्या

स्वाभाविक वृत्तीवर त्यानं ते सहन केलं. बेमालुम गुन्हे करण्याच्या शास्त्रांत तो तरबेज झाला होता. सरळ मार्गानं पैसा मिळवून श्रीमंत होण्याचे व्याप जरी त्याच्या नजरेसमोर होते तरीही त्या खटाटोपांतून अल्पावधींत भरपूर पैसा निर्माण करण्याचं साधन त्याला दिसून येईना.

पहिल्यानं त्यानं घोड्याच्या शर्यतिकडे नजर वळविली. रेसबाज लोक हें एक शास्त्र आहे असं समजतात, म्हणून त्या शास्त्राचा त्यानं अभ्यास केला, शर्यतीच्या शास्त्रांत टराविक गणिती नियमांपेक्षा लफंगेगिरीच जास्त उपयोगी पडते हें जेव्हां त्याला कळून आलं, तेव्हां तो त्या धंद्यांत यश मिळविण्यासाठीं नवेनवे मार्ग हुडकून काढूं लागला. त्या नव्या मार्गांच्या जोरावर थोड्याच दिवसांत त्यानं भरपूर पैसा कमवला. शर्यतीच्या क्षेत्रांत त्याचं नांव सर्वतोमुखी झालं. थोड्याच दिवसांत तो घोड्यांचा मालक झाला आणि या मालकीच्या जोरावर पैशाच्या उलाढालींच्या इतर क्षेत्रांतही तो मोठ्या दिमाखानं दौड करीत प्रवेश करूं लागला. शर्यतीबरोबरच सट्टा—सट्टयाबरोबरच जुगार—या सर्व क्षेत्रांत त्याची हातचलाखी जसजशी यशस्वी होऊं लागली तसतसं त्याचं नांव साऱ्या मुंबईत गाजूं लागलं.

मुंबईत पाय ठेवल्या दिवशींच केशवलालचा मुंबईच्या बाजारांत असलेला दरारा त्याला कळून आला होता. त्याला त्याचा मत्सर वाटला होता. नुसता मत्सर वाटून मनगटं चावीत बसण्याइतका तो कर्तृत्वशून्य नव्हता म्हणूनच मुंबईच्या बाजरांत असलेलं केशवलालचं स्थान हिरावून घेण्याची त्यानं प्रतिज्ञा केली. त्याच धोरणानं तो उद्योगाला लागला.

केशवलालच्या प्रत्येक हालचालींवर एकाद्या कसलेल्या डिटेक्टिव्हप्रमाणें त्यानं करडी नजर ठेवली.

केशवलाल आणि शंकर या दोघांच्या कर्तबगारींत एक महत्वाचा, पण लहानसा भेद होता. केशवलालनं आपल्या सभोंवार गुंड लोकांचा एक कंपू गोळा केला होता, त्या आपल्या हस्तकांकरवीं तो उलटापालटी चालवित असे, कोणत्याही भानगडींत स्वतःचं नांव येऊं न देण्याची तो शक्य तेवढी खबर-

दारी घेत असे. कापूस बाजारांतला एक बडा व्यापारी म्हणून त्याची ख्याती होती. त्या ख्यातीला एवढासुद्धां कलंक लागू नये म्हणून तो डोळ्यांत तेल घालून जपत होता आणि म्हणूनच आपल्या इतर उलाढाली करण्याचं काम भिकूशेट नांवाच्या त्याचा हस्तक असलेल्या एका कापडाच्या व्यापाऱ्यावर त्यानं सोपवलं होतं.

त्याचा उलाढालीचा व्याप फारच मोठा होता. प्रत्येक क्षेत्रांतल्या प्रत्येक कामासाठीं त्यानं एकाएका माणसाची योजना केली असून त्या सर्वांची सरदारी भिकूशेटकडे होती. या प्रत्येक क्षेत्रांतला तो मुख्य केव्ह केव्हां पोलिसांच्या तावडींत सांपडत असे, त्याला शिक्षाही होत असे, पण त्याचा धागादोरा केशवलालपर्यंत येऊन कव्हांच पोंचला नव्हता.

केशवलालची ही योजना सुरक्षित स्वरूपाची नाहीं असं शंकरला वाटलं. त्यानं निरनिराळ्या क्षेत्रांत कारवया करतांना जीं माणसं हाताजवळ घ्यायचीं तीं तेवढ्यापुरतींच घेऊन सोडून देण्याचा उपक्रम सुरू केला. कुणाही माणसाला त्याना बांधून ठेवलं नाहीं. रोज नवीन माणसं येऊं लागल्यामुळं होऊन गेलेल्या उलाढालींचं धागेदोरे तिथल्यातिथं तुटत असत. या धाग्यादोऱ्यांच्या ताण्यावाण्यांनीं निर्माण होणाऱ्या जाळ्यांत केशवलाल गुरफटून जात होता पण हे धागेदोर जिथल्या तिथंच तोडले गेल्यामुळं शंकरची सत्ता अनिर्बंध राहिली होती.

केशवलालच्या कर्तबगारीला उणेपणा आणणारा आणखी एक दोष शंकरच्या नजरेला आला. जुगाराचे अड्डे सुरू करण्यासाठीं त्यानं पहिल्या पासूनच वेश्यांची मदत घेतली होती. वृत्तीनं तो विलासी असल्यामुळं या साऱ्याच वेश्यांच्या पाशांत जरी गुरफटला नव्हता तरी त्याच्या विलासी वृत्तीचा चरितार्थ होण्यासाठीं कौटुंबिक बंधनाच्या पाशांतून घटकाभर दूर राहाण्याचं एक स्थान त्यानं निर्माण केलं होतं.

सुंदरी ही एक गोमांतकीय कलावंतीण होती. नाचगाण्याच्या एका बैठकींत तिचा आणि केशवलालचा परिचय झाला होता. त्यावेळी ती कुमारी

होती तिच्या कौमार्याचा भंग करण्याचं मंगलकार्य हजारों रुपये खर्चून करणाऱ्या केशवलालशीं ती कुणाही विवाहित पत्नीइतकीच एकनिष्ठेनं रहात होती. एकाद्या विवाहित पत्नीइतकीच केशवलालच्या सर्व कार्यांत ती अर्धांगीचं कर्तव्य बजावीत होती. केशवलालचे मार्ग तिला पसंत नव्हते पण निष्ठावंत हिंदु पत्नी पातिव्रत्याच्या भावनेनं बद्ध झाली असतां दुराचारी पतीच्या दुर्वर्तनावर ज्या भक्तीनं पांघरूण घालते, त्याच्या संरक्षणाच्या कळकळीनं ज्या निष्ठेनं सहकार्य करते, त्याच भक्तिनिष्ठ अंतःकरणानं केशवलालच्या प्रत्येक कृत्यांत ती सहभागी होत होती.

पण या निष्ठेचा मोबदला मात्र केशवलालकडून तिला मिळत नव्हता. विलासी वृत्तीच्या चरितार्थासाठीं तो आपल्या मधुकरी वृत्तीला केव्हांच आळा घालीत नसे. सुंदरीला हें दिसत होतं, त्या वृत्तीपासून त्याला परावृत्त करण्याचा ती पदोपदीं प्रयत्न करीत होती, पण त्याचा कांहींच उपयोग होत नव्हता.

केशवलालच्या आचरणांत शंकरला जें मोठें वैगुण्य वाटलं तें त्याच्या याच वृत्तीचं. या वृत्तीपासून दूर रहाण्याचा त्यानं निश्चय केला. थोड्याच अवधींत स्वतःच्या कर्तबगारीच्या बळावर तो जवळ जवळ केशवलालच्या तोडीला आला होता. प्रतिष्ठित व्यापाऱ्यांत केशवलालचं वजन असलं तरी त्याचं हें वैगुण्य त्याला कमीपणा आणायला जसं कारणीभूत होतं, तसंच एवढ्याच नैतिक बाबतींत असणारं शंकरचं विशुद्ध चारित्र्य त्याला केशवलालशीं टक्कर देऊन वरची पायरी गांठायला हळुहळु सहाय्यभूत होत होतं.

मुंबईच्या व्यापारी क्षेत्रांत केशवलाल आणि शंकर ( आतां तो आपल्याला शंकरलाल म्हणवीत होता ) दोघेही चुरशीचे सामनेवाले म्हणून गाजले जाऊं लागले. स्वतःची प्रतिष्ठित परिस्थिति ध्यानीं घेऊन आपल्याला निर्माण होणाऱ्या या सामनेवाल्याला हाणून पाडण्यासाठीं केशवलाल ईर्षेनं सरसावला. ईर्षेमुळंच नित्याच्या व्यवहाराकडे त्याचं अल्पस्वल्प दुर्लक्ष होऊं लागलं.

केशवलालच्या दुर्लक्षामुळं ढिली झालेली वीट निखळून त्याच्या प्रतिष्ठेच्या अभेद्य तटबंदीवर मारा करण्याची शंकरनं सुरवात केली.

वैऱ्याला तोंडघशी पाडण्याचं प्रबल साधन म्हणजे वेश्या—असा केशवलालचा समज होता. या साधनाचा त्याच्याकडे भरपूर संग्रह होता. त्या संग्रहाचा उपयोग करून शंकरलालला आपल्या पकडींत पकडण्याचा उपक्रम त्यानं सुरू केला.

केशवलालच्या कर्तबगारीचीं व्यंगं ओळखून शंकरलाल त्याच्यावर मारा करीत होता त्याच वेळीं केशवलाल शंकरलालला नैतिक अधःपाताला प्रवृत्त करूं पहात होता. पण या कामीं शंकरलाल अभेद्य होता. मदिरा आणि मदिराक्षी या दोहोंच्या नादीं लागणारा कोणत्याही क्षेत्रांतला कर्तबगार माणूस केव्हांही पेचांत आल्यावाचून रहाणार नाहीं याची पूर्ण जाणीव असल्यामुळं केशवलालनं टाकलेल्या या फासांत तो कधींच सांपडला गेला नाहीं. काल आलेला हा उपरा माणूस आज वरचढ होऊन बसत आहे असें पाहून केशवलालचा आत्मविश्वास खिळखिळा होऊं लागला होता आणि त्या व्यंगाचा फायदा घेऊन शंकरलाल एका एका क्षेत्रांतील त्याचं महत्त्व कार्बाज करीत जाण्याचा यशस्वी प्रयत्न करीत होता.

या सर्व प्रयत्नांच्या शिक्षणक्रमांत नुसता द्रष्टा या नात्यानंच मोहन पहात राहिला नव्हता. वयोमानाला शोभतील असे लहानसन उपद्व्याप त्यानं शक्त्यनुसार सुरू केले होते. तोच त्याचा खरा शिक्षणक्रम होता. या कामीं तो केव्हांच आपल्या बापाचा सल्ला घेत नसे. बापाप्रमाणेंच त्याची वृत्ति बेडर होती. पण पूर्वाश्रमींच्या सौजन्यामुळं शंकरलालाच्या अंःतकरणांत कुठंतरी जो एक चांगुलपणाचा ओलावा राहिला होता, त्यामुळंच पूर्वीची परोपकारी वृत्ती त्याच्या ठायीं जी मधून मधून जागी होत होती, तें सौजन्याचं बीज मुळांतच नसल्यामुळं मोहनची बेडरवृत्ती शंकरपेक्षां जास्त तीव्र होत चालली होती.

मुलगा आपल्या सारखाच किंबहुना आपल्यापेक्षांही जास्त कर्तबगार बनत चालला आहे असं पाहून शंकरच्या महत्वाकांक्षी बुद्धीला चेतना उत्पन्न होत होती.

---

# ६

दोन ठिकाणीं दोघांचे संस्कार दोन प्रकारें चालले होते. गरीब गुरीबांना चारपैसे मिळवून देऊन अन्नाची ददात मिटवण्यासाठीं दुर्गा शरणगांवला कांहींतरी उद्योग करीत होती, त्याच वेळीं मुंबईला शंकर श्रीमंत, हौशी, चैनी व्यापारी लोकांच्या संपत्तीवर डल्ला मारून नवी दौलत थाटीत होता. दोघांचीं कामें सारख्याच निष्ठनं सुरू होतीं. दोघांनाही आपल्या ध्येयाबद्दल केवढी तरी मोठी तळमळ होती—पण दोघांचीं ध्येयं मात्र भिन्न होतीं. एक स्वार्थत्यागाच्या पायावर पुण्याची इमारत उभारीत होती-तर दुसरा दुसऱ्याच्या संपत्तीचा अपहार करून पापाचे डोंगर रचीत होता.

पूर्वाश्रमींच्या जाणिवेमुळं शंकरच्या हातून एक पाप मात्र घडत नव्हतं. त्याचा राग होता तो श्रीमंतांवर—उपकार विसरून कृतघ्न होणाऱ्या पैशाच्या बळावर मस्तवाल झालेल्या श्रीमंतांवर. तंट्या भिल्ल, उमाजी नाईक प्रभृति जुन्या काळच्या दरोडेखोरांची शंकर ही आधुनिक आवृत्ती होती; पण यांतही थोडा फरक होता. तंट्या आणि उमाजी श्रीमंतांचे पैसे काढून घेऊन त्यांतला बराचसा भाग गरिबांना वाटीत असत. त्यांच्या या आधुनिक आवृत्तींत एवढंच प्रकरण वगळलेलं होतं. स्वतःचंच वैभव वाढवण्याकडे शंकरचं सारं बुद्धिसर्वस्व खर्ची पडत होतं.

आणि त्याचं उरलेलं कार्य तिकडे शरणगांवांत दुर्गा करीत होती. शंकरच्या हातीं जेवढा पैसा खेळत होता तेवढा जर दुर्गेच्या हातीं असता तर तिनं शरणगांवची कुबेरनगरी केली असती. या सत्कार्यासाठीं तिला पापाचा पैसा नको होता. निढळाच्या घामावर केलेल्या कमाईनंच गरिबांच्या घरचीं दुःखं तिला पुसून टाकायचीं होतीं.

तिच्या या ग्रामकार्यामुळं आकर्षित झालेले कांहीं श्रीमंत गृहस्थ पैशाची मदत करायला जेव्हां पुढं सरसावले तेव्हां तिनं त्यांचा पैसा कुठून आला याची आधी चौकशी केली. या प्रत्येक धर्मात्म्याच्या पैशाचं मूळ

पापांत होतं असं कळून आल्यावर मोठ्या मिनतवारीनं तिनं त्यांची देणगी नाकारली. गांवांतल्या लोकांना तें रुचलं नाहीं, त्यानीं तिला दोष दिला, पण कुणाच्या निंदेची किंवा स्तुतीची, बक्षिसांची किंवा तिरस्काराची पर्वा न करतां तिनं आपलं कार्य चालू ठेवलं.

• मिशन हाऊसमधल्या पाद्रीचा परिचय झाल्यापासून तो हळुहळु वाढत जात होता. दुर्गाबाईच्या निरपेक्ष जनसेवेमुळं तिच्याबद्दलचा पाद्रीचा आदरही तितकाच वाढूं लागला होता. या दोघांचे मार्ग भिन्न होते, मिशननं आखून दिलेल्या कार्यक्रमापलीकडे त्याला कांहीं करता येत नव्हतं. अमेरिकेतून जे पैसे येत होते ते त्याच्या विशिष्ट कार्यासाठींच वापरले जाणं अवश्य होतं, म्हणून दुर्गाबाईच्या अनुकरणानं जरी ग्रामकार्य थाटण्याचा त्याचा उद्देश प्रत्यक्ष स्वरूपांत परिणत झाला नाहीं—तरीही म्हणूनच स्वतःच्या कार्यापेक्षां दुर्गाबाईनं चालविलेल्या कार्याकडे तो जास्त सहानुभूतीच्या नजरेनं पहात होता.

दुर्गाबाईचा छोटा मुलगा कुमार तिच्याच वळणांत वाढत होता. कयाधूच्या उदरांत असलेल्या प्रल्हादाला नारदानं केलेला उपदेश जसा त्याच्या जन्मानंतर फळाला आला, तसाच दुर्गाबाईचा स्वयंसिद्ध शिक्षणक्रम कुमाराचं भवितव्य घडवीत होता,

पाद्रीच्या शाळेंतच त्याचं शिक्षण होत होतं. शाळेची नित्याची वेळ सोडून पाद्रीबावा त्याला इंग्रजी शिक्षणही देत असे, अशाप्रकारें इंग्रजी आणि मराठी अशा दोन्ही भाषांचा त्याचा अभ्यास एकाच वेळीं चालला होता.

अशींच कांहीं वर्षे गेलीं. शंकरची कांहींच खबर दुर्गाबाईला कळत नव्हती—कळण्याला कांहीं मार्गच नव्हता. मुंबईत शंकरची प्रतिष्ठा जरी वाढली होती तरी त्याचा कोणताच इतिहास दुर्गाबाईपर्यंत येऊन पोचत नव्हता. मुंबईला जाणाऱ्या शरणगांवच्या माणसांनाही त्याची भेट होण्याचा मुळींच संभव नव्हता. तीं माणसं—कांहीं गरीब होती, कांहीं मध्यम वर्गातलीं होती—पण शंकर या दोन्ही पायऱ्यांबरोबर आणखी कित्येक पायऱ्या ओलांडून कितीतरी वर चढून गेला होता.

त्या पितापुत्रांची दुर्गाबाईला नित्य आठवण होत असे. त्यांचं कल्याण व्हावं, त्यांना सद्बुद्धी व्हावी म्हणून रोज ती देवाची प्रार्थना करी. त्या प्रार्थनेचा परिणाम होईल अशी तिची श्रद्धा होती. पण देव तिच्या अर्ध्याच वचनांत होता असं ठरत होतं. त्यानं त्यांचं कल्याण केलं पण त्यांना सुबुद्धी दिली नाहीं.

दुर्गाबाईचा नित्य क्रम घड्याळाच्या गतीप्रमाणें चालला होता. त्या एकसूत्री जीवनाचा तिला कधींच कंटाळा आला नाहीं. ती आपल्या कर्तव्यांत रंगून गेली होती—तादात्म्य पावली होती. तें कर्तव्य म्हणजेच तिच्या जीवनाचं बीज होऊन बसलं होतं. तें कर्तव्य थांबलं असतं तर ती जीव धरून ठेवूं शकली नसती.

या कर्तव्यपालनांत उत्साह देणारी एकच व्यक्ती तिच्या पाठीशीं होती—ती व्यक्ती म्हणजे तो पाद्री.

दुर्गाबाईच्या आश्रमांत पाद्री जरी वारंवार येत असे तरी त्यांच्या मिशन हाऊसमधें ती क्वचितच जाई. जें कार्य तिनं हातीं घेतलं होतं त्याच्या मुळाशीं धर्माचा पाया होता. धार्मिकतेच्या कोणत्याही परिस्थितींत व्यंग येऊं नये म्हणून तिला ही खबरदारी घ्यावी लागत होती. जें कार्य तिनं हातीं घेतलं होतं त्या कार्याला तिनं धर्माचं अधिष्ठान दिलं होतं. तिची तशी श्रद्धा होती. या अधिष्ठानाशिवाय खेडेगावांत आपलं कार्य यशस्वी होणार नाहीं याची तिला पूर्ण जाणीव होती आणि म्हणूनच स्वतःच्या इच्छेविरुद्ध पाद्रीसारख्या सत्पुरुषापासून तिला शक्य तेवढं दूर राहावं लागत होतं.

धर्म अधर्माचा प्रश्न खेडेगांवांत फार नाजूक असतो. जगद्धर्माची भावना शहरांतल्या सुशिक्षित समाजांतसुद्धां जिथं रुजूं शकली नाहीं तिथं संकुचित वृत्तीच्या, संकुचित क्षेत्रफळाच्या लहानशा खेड्याची दृष्टी व्यापक होण्याची अपेक्षा कुणी कां करावी ?

तत्त्वज्ञानावरचे ग्रंथ वाचल्यामुळं धर्मभेदाची भावना दुर्गाबाईच्या अंतःकरणांतून मावळली होती. ‘ सर्व धर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज ’

असं म्हणणाऱ्या गीताकाराची ती निष्ठावंत अनुयायी होती, म्हणूनच परधर्मांविषयीं तिला केव्हांही अनादर वाटला नाहीं.

त्यांतूनही कृष्णाचीं आणि ख्रिस्ताचीं धर्मतत्वं एकाच धर्मभावनेचीं असल्यामुळं कृष्णाइतकाच तिला ख्रिस्ताबद्दलही आदर असे. विशेषतः ख्रिस्ताच्या नावानं चाललेल्या निरपेक्ष जनसेवेचं कार्य पत्करून हजारों मैलांवरून आलेल्या त्या पाद्रीनं आपलं सारं आयुष्य एका खेड्यासाठीं वेचलेलं पाहून ख्रिस्ताच्या उपदेशाबद्दल तिला आपुलकी वाटत असे.

सर्वांचे नित्यक्रम अशाच रितीनं चालले होते तोंच पाद्रीकडे राहाण्यासाठीं एक छोटी मुलगी आली. ती हिंदु होती. पाद्री तिला बाटवून ख्रिस्ती करणार अशी भूमका कुणीतरी उठवली होती.

पण वस्तुस्थिती तशी नव्हती. तिला हिंदूप्रमाणेंच वागवण्यांत येत होतं. तिच्या खाण्यपिण्यासाठीं मुद्दाम स्वतंत्र हिंदु स्वैपाकी आणून ठेवण्यांत आला होता. तिच्या अंगावरचे कपडेही ज्या मोलाचे दिसत त्यावरून ती कुणातरी श्रीमंताची मुलगी असावी असं वाटल्यावाचून रहात नसे. तिचे आचारविचार जरी हिंदूचे होते तरी तिचा पोषाख मात्र इंग्रजी थाटाचा असे. मुंबईसारख्या शहरांत त्या पोषाखाबद्दल कुणाला वैषम्य वाटलं नसतं पण सर्वत्र परकर चोळी नेसणाऱ्या मुली असणाऱ्या शरणगांवात तिचे इंग्रजी गाउन, केसांच्या वेण्या, त्यांना लावलेलीं रिबन्स, तिथल्या लोकांच्या डोळ्यांत खुपल्यावांचून राहिलीं नाहींत.

म्हणूनच गांवचीं पोरं तिची थट्टा करीत. 'किरिस्तांव, किरिस्तांव' म्हणून तिच्या मागून ओरडत तिला चिडवीत. बिचाऱ्या लतेला तो जाच असह्य होत असे.

गांवची मुलं अशा प्रकारं तिला छिजवूं लागलीं म्हणजे दुर्गाबाईचा कुमार तिच्या सोडवणुकीला धावून येई.

एके दिवशीं अशींच मुलं तिच्यामागं लागलीं होतीं. 'किरिस्तावाची मुलगी—किरिस्तावाची मुलगी' म्हणून ओरडत तिला वाकोल्या दाखवीत

होती. रोज तोच तोच प्रकार होत असल्यामुळं ती चिडून गेली होती. नित्याप्रमाणें कुमार तिच्या मदतीला धावून आला. त्या मुलांना तो म्हणाला, "किरिस्तावाची मुलगी कोण रे ?"

त्यांनीं लतेकडे बोट दाखवलं.

" कशावरून ती किरिस्तांवाची मुलगी ?" कुमारनं विचारलं.

" पोषाख पहा ना तिचा !" एक मुलगा म्हणाला.

" हिंदु सुद्धां करतात असला पोषाख !" कुमार चिडून म्हणाला.

" मी नाहीं किरिस्तांव "—लता एकदम नागिणीसारखी मागं वळून ओरडली, " समजलं ?—मी किरिस्तांव नाहीं. "

" मग पाद्रीकडे राहतेस ती ?" एक मुलगा म्हणाला, " अन् हे तुझे झगे ?"

" म्हणून काय झालं ?" लता म्हणाली, " मी हिंदु आहे."

' हिंदु किरिस्तांव—हिंदु किरिस्तांव ' असं म्हणून मुलं ओरडूं लागलीं.

कुमारला चीड आली. त्यानं एकदम तुटून जाऊन दोघा तिघांना चांगलंच लोळवलं तेव्हां तीं मुलं दूर पळून जाऊन ' कुमार किरिस्तांव, लता किरिस्तांव !' असें म्हणत टाळ्यांचा ठेका धरीत दूर पळून गेलीं.

" काय मेला हा त्रास !" लता रडकुंडीला येऊन म्हणाली.

" व्हायचाच तो !" कुमार उद्गारला, " कशाला हे असले कपडे घालतेस ?"

" देवी देते ना ?" लता म्हणाली, " देवी देईल तें वापरायचं !"

" कोण ही देवी ?"

" मला तरी कुठं माहित आहे ? बावाजी सांगतात देवी देते म्हणून. देवीकडनं येतं तें ते मला देतात, मी तें वापरतें. कसला छानछान खाऊ पाठवते देवी मला !"

" म्हणजे आकाशांतली देवी होय ? "

" आकाशांतली नव्हे–ती इथंच असते कुठं तरी. लांब—तिकडे मुंबईला असते वाटतं. "

" तिचं नांव देवी वाटतं ?"

" तें तरी कुठं मला माहिती आहे ? ' देते ती देवी, ' असं सांगतात मला बावाजी "

" अस्सं !—मग तिच्याकडेच माग कीं परकरचोळी. "

" मला नाहीं आवडत परकर चोळी; अगदीं बावळट दिसते ती. पहिल्यापासूनच मला असल्या कपड्यांची संवय—"

" यापूर्वी कुठं राहात होतीस तूं? कुणाकडे राहात होतीस?"

" बोर्डिंगांत रहात होतें. खूप मुली होत्या तिथं—माझ्याचसारख्या. तिथनं आणून मला इथं ठेवलं. "

" कोण कोण आहे तुझं ?"

" बावाजी आहेत ना !" ओशाळून लता म्हणाली. कांहीं तरी कमी आहे असं तिचं तिलाच वाटलं.

" पण बावाजी तर इथंच आहेत—"कुमार म्हणाला, 'तिकडे—काय म्हटलंस तें ? - बोर्डिंग—त्या बोर्डिंगांत कोण होतं तिथं ?"

" मास्तरणी होत्या की—खूप होत्या. पण बावाजिसारख्या मायाळू नव्हत्या—"

" देवी होती का तिथं ?"

" असती तर मी नसतं कां सांगितलं ? मी कुठं पाहिली आहे अजून देवी ?—" ती रडकुंडीला येऊन म्हणाली.

विषय बदलण्याच्या उद्देशानं कुमार म्हणाला, " मग केव्हां मागणार आहेस परकरचोळी देवीकडं ?—हो खरंच—परकरचोळी तुला आवडत नाहीं ना ? मग साडीच माग ना."

" हो जी हो ! " टाळ्या पिटीत लता म्हणाली , " साडीच–साडीच बरी दिसेल मला. आतां साडीच मागून घेणार मी."

दोघंही मिशन हाऊसकडे यायला निघालीं. कंपाउंडांत आल्याबरोबर आंत जात असलेल्या लतेला थांबवून कुमार म्हणाला, " हें पहा, हें तुझ्या-साठीं आणलंय." असं म्हणून त्यानं कागदांत गुंडाळून आणलेले लाडू दाखवले.

" नको मला. " लता म्हणाली.

" असं काय बरं ? मी मुद्दाम आणले ना तुझ्यासाठीं ?"

" कुठनं ?"

" आईनं दिले. "

"आईनं दिले !" गाडिवरून येऊन लता उद्गरली, " आईनं तुला दिले. मला नाहीं दिले."

" तुलाच दिले. " कुमार तिला कवटाळून म्हणाला, " आईनं— माझ्या आईनं तुला दिले."

" तुझ्या आईनं होय ?" असं म्हणतांना लतेचा गळा भरून आला होता.

" तुझ्यामाझ्या आईनं " तिची हनवटी धरीत कुमार म्हणाला.

—लता हंसली. कुमारकडे लडिवाळपणानें पहात म्हणाली, " लबाड आहेस. ती तुझी आई. तुझीच—"

" हो. " कुमार म्हणाला, " अन् तुझीहि. तुझी, माझी, साऱ्या गांवाची आई. सारेच तिला आई म्हणतात मग तुझी आई कां व्हायची नाहीं ती ?"

" माझी आहे देवी !" लता गाल फुगवून म्हणाली.

" माझी आहे देवी !" कुमार तिला डिंवचून म्हणाला.

" कोण—कोण तुझी देवी ?"

" माझी आई ! "

' माझी आई, माझी आई ' म्हणत असतांना लतेला एकदम रडूं

कोसळलं. तिला चुचकारीत कुमार म्हणाला, " आधीं हें खा अन् चल माझ्या घरीं तिथं देतों मी तुला आई. "

दोघंही व्हरंड्यावर बसून आणलेला खाऊ खाऊं लागलीं.

कुमार लहान असला तरी लतेच्या मनःस्थितीची कल्पना त्याला चांगल्या प्रकारें आली होती. आई नसलेलीं मुलं त्याच्या आईच्या आश्रमांत रोज येत असत. त्यांच्या गोष्टी दुर्गाबाई त्याला रोज सांग. आई नसणं म्हणजे काय याची म्हणूनच त्याला चांगली कल्पना होती. लतेला आई नाहीं याचं त्याला दुःख वाटलं.

ती देवी कोण, याची कल्पना त्याला करतां येईना. देवाची बायको ती देवी, एवढंच त्याचं ज्ञान होतं. देव म्हणजे श्रीकृष्ण—दुसऱ्या कुठल्याच देवाला तो ओळखत नसे. गावांतल्या देवळांतसुद्धां तो कधीं जात नसे. म्हणूनच ' देवी ' या शब्दामागली भावना त्याच्या बालबुद्धीला उकलेना.

दोघांनीही खाणं आटपलं. कुमाराचा निरोप घेऊन हात झाडति लता आंत निघून गेली. कुमार व्हरंड्याखालीं उतरला, तोंच मिशन हाऊसच्या मागल्या दारानं भडक पोषाक केलेली एक बाई घाईघाईनं जातांना त्याला दिसली.

त्यानं तिला ओझरतंच पाहिलं पण तेवढ्यावरून त्याला वाटलं, कीं ही कुणीतरी आपणा सर्वांपेक्षा अत्यंत श्रेष्ठ दर्जाची बाई असावी. तिच्या अंगावरचे हिऱ्यामोत्यांचे दागिने सूर्य प्रकाशांत चमकत होते. जातां जातां तिनं एकदां मागं वळून पाहिलं—कुमारला तिनं पाहिलं नाहीं, पण कुमारनं तिला चांगलं निरखून पाहिलं—त्याला वाटलं, अशी बाई आपण जगांत पाहिली नाहीं. लता म्हणते ती 'देवी' हीच तर नसेल, अशी शंका क्षणभर त्याच्या मनांत आली. देव आणि माणूस, देवी आणि मानवी—काय फरक असेल बरं या दोघांत !

झालेली हकिकत आईला कळवण्यासाठीं कुमार धावतच घरीं गेला.

# ७

कुमार आणि लता ज्यावेळीं बाहेर आपली कर्मकथा बोलत होतीं त्यावेळीं मिशन हाऊसमधल्या पाद्रीबावाजीच्या अंतर्गृहांत आणखी एक कर्मकथा चालली होती.

पाद्रीकडे एक पाहुणी आली होती. या नमुन्याची पाहुणी मिशन हाऊसच्या सात्विक वातावरणांत शोभून दिसण्याजोगी नव्हती.

शंकर पहिल्यानंच मुंबईला गेला त्या वेळीं हॉटेलमधें केशवलाल बरोबर जी बाई आली होती तीच ही–सुंदरी. सत्कृद्दर्शनीं सभ्य समाजांत वावरण्यास अपात्र दिसणारी ही बाई पाद्रीच्या मिशनहाऊसमधें ज्या कामासाठीं आली, ज्या भावनेनं आली—तो उद्देश आणि ती भावना तिच्या बाह्यस्वरूपावरून दिसणाऱ्या ढंगाला शोभेशी नव्हती.

पाद्रीबावा म्हणत होते, " मी शंभर वेळीं तुम्हांला सांगितलं आहे, कीं तुम्ही इथं येत जाऊं नका. एक सामाजिक कार्यकर्ता या नात्यानं माझ्यावर मोठी जबाबदारी आहे. ती जबाबदारी पार पाडतांना कोणत्याही प्रकारचा व्यत्यय उत्पन्न होणं माझ्या कार्याच्या दृष्टीनं इष्ट नाहीं. मुंबईच्या बोर्डींग हाऊसच्या सुपरिंटेंडन्टनं ज्यावेळीं तुमचा माझा परिचय करून दिला, त्या वेळींच मला ही भीति वाटली होती. सत्कार्यासाठीं कोणत्याही लोकप्रवादाची पर्वा करायची नाहीं अशी जर माझी वृत्ती नसती तर मी हें जोखीम पत्करलं नसतं. आम्हां परदेशी लोकांच्या दृष्टीनं यांत विशेष काहीं नाहीं. हें जरी खरं असलं तरी तुम्हां हिंदी लोकांच्या नजरा जास्त बारकाईनं पाहणाऱ्या आहेत, म्हणूनच मला भ्यावं लागतं. लतेला आपला इतिहास मुळींच माहीत नाहीं—तो इतिहास जाणायची जिज्ञासा अजून तिला झालेली नाहीं. तुम्हीं अशा येऊं लागलांत, क्वचित तिच्या नजरेला पडलांत तर तिची जिज्ञासा—निदान संशय—जागा होईल. तुमचा उद्देश सिद्ध व्हायचा असेल तर तिला संशय येऊं देतां कामा नये. म्हणून म्हणतों, कीं तुम्हीं इथं येऊं नका. तिला चाळवूं नका. आज तरी ती मोठ्या आनंदांत असते—"

"असं कसं म्हणतां बावाजी?" सुंदरी म्हणाली, "बहिणीचा जीव आहे माझा. माझी कुळीथळी मी तिला कळूं दिली नाहीं. पहिल्यापासूनच तिला माझ्यापासूनच दूर ठेवली. माझी आई वारली तेव्हां ती सारी तीन वर्षांची होती. माझ्याखेरीज दुसऱ्या कुणाचा तिला आधार नव्हता. तिला घरीं आणून ठेवणं मला शक्य होतं--तिच्यासाठीं चार नोकर ठेवणं मला मोठं कठीण नव्हतं--पण कुळधर्माप्रमाणें मी ज्या पापाच्या खाईंत पडलें आहें त्याचा सुगावा सुध्दां तिला लागूं नये म्हणून पहिल्यापासूनच मी तिला दूर केली. हिंदूंचीं अनाथगृहं म्हणजे काय आहेत, तें मला माहीत आहे हिंदूपणाच्या अभिमानानं माझी बहीण तिथं ठेवण्यापेक्षां मिशनच्या बोर्डिंगांत ठेवणं मला जास्त बरं वाटलं. मी केली ती चूक केली कीं काय, अशी मला केव्हां केव्हां शंका येते. पण विचारूं कुणाला ? माझं म्हणायला कोण आहे ? अफाट वैभवांत मी लोळतें आहे तरी जें कौटुंबिक दारिद्र्य मला अनुभवावं लागतं आहे तें कांहीं पैशानं भरून येत नाही. म्हणूनच म्हणतें, बहिणीचा जीव आहे माझा. तिला एकदां पहावं असं वाटूं नये का मला?"

"तें खरं आहे?" पाद्री म्हणाला, "पण तूं स्वतःला कधीं आरशांत पाहिलं आहेस०?" कांहींच उत्तर न देतां सुंदरीनं नुसती मान खालीं घातली असं पाहून पाद्रीला त्या प्रश्नाबद्दल लाज वाटली. तो म्हणाला, "तरीही तुला असं वाटतं ? माफ कर, मी ख्रिस्ती आहें--मिशनरी आहें. विश्वासानं आपली बहीण तूं माझ्या ताब्यांत दिलीस. ख्रिस्ती मिशनऱ्याच्या ताब्यांत मूल सांपडलं, कीं तें बाटवलं जातं असं कळून सुद्धां तिला तूं माझ्या ताब्यांत दिलीस. मी तुझ्या विश्वासाचा गैरफायदा घेणार नाहीं. हिंदु म्हणूनच तिला वागवीत आलों आहें--हिंदु म्हणूनच ती वाढवली जाईल याबद्दल तूं निश्चिंत रहा. पण एवढं मात्र खरं, कीं तूं तिच्या दृष्टीला पडतां कामा नयेस--"

"पण एकदां नुसती आडून तरी--" काकुळतीला येऊन सुंदरी म्हणाली.

" नाहीं. " पाद्री अधिकारवाणीनं बजावून म्हणाला, " तें शक्य नाहीं. माणसाचं मन मी ओळखतों. त्यांतून तूं एक स्त्री—वात्सल्यासाठीं आसोसलेला तुझा जीव तुला भलत्या वेळीं दगा देईल. तिला पाहिलंस तर तुला आपलं मन आवरता यायचं नाहीं. तुझा सारा जीव तिच्यावर गुंतला आहे. ती नुसती दिसली तरी तुझं मन ताब्यांत रहाणार नाहीं—"

" खरं आहे तें ! " सुंदरी आपल्याशींच पुटपुटली.

" खरं आहे ना ?" पाद्री म्हणाला, " मग माझ्यावर विश्वास ठेव. तिचा धर्म मी राखतों आहें—तिला माणूस करतों आहें—त्यांत विक्षेप आणूं नकोस. तुझं पाप तिला कळतां नये. पहातांच ती तुला ओळखील—एकदम करपून जाईल आणि मग मात्र माझ्या हातीं कांहीं राहाणार नाहीं. म्हणून म्हणतों, तिच्या कल्याणासाठीं मन ताब्यांत ठेव. जा—आतां वेळ झाली—ती येईल कदाचित."

केविलवाणी मुद्रा करून सुंदरी दरवाजाकडे पहात होती. पाद्रीनं एवढं सांगितलं तरीही तिला वाटत होतं, कीं लता यावी आणि ती आपल्या नजरेला पडावी. तिची त्या वेळची वृत्ती पाद्रीच्या ध्यानांत आली आणि तो मोठ्या कठोरपणानं म्हणाला, " आतां जा पाहूं इथून !"

हँडबॅग उघडून तिनं नोटाचं पुडकं काढून पाद्रीच्या हातीं दिलं. पुनः मागं वळून पहात ती म्हणाली " तुमच्या ओटींत टाकलीय मी माझी लता—ती वाढूं दे—फुलूं दे—आपल्या सुवासानं सारं जग भारून टाकूं दे—" एकदम तिचा आवाज भरून आला. ओठावर येणारा हुंदका आवरीत ती म्हणाली, " मन आवरायला मोठं कठीण जातंय बावाजी. मी आतां लहान नाहीं. पण मातृत्वाला कायमचीं मुकलें आहें. लता माझी बहीण नव्हे-तरीही माझ्या पोटचा गोळा वाटते मला. तिला दूर करतांना मला केवढ्या यातना होताहेत त्याची तुम्हांला कल्पना नसेल असं मी म्हणत नाहीं. आईचंच हृदय आहे तुमचं हें मी जाणतें, अन म्हणूनच म्हणतें—"

" आतां कांहीं बोलूं नकोस, " पाद्री म्हणाला, " एकदम इथून निघून जा. ती यायच्या अगोदर निघून जा. "

पाद्रीनं जवळ जवळ लोटून तिला दाराबाहेर घातलं तोंच लतेची हाक त्यांच्या कानीं आली. सुंदरीचा जीव कासावीस झाला. पाद्रीची आज्ञा मोडून क्षणभर तरी लतेला भेटावं असं वाटून ती मागं वळणार तोंच पाद्रीनं तिला दुसऱ्या दाराकडे लोटीत नेलं आणि मिशन हाउसच्या मागिलदारच्या रस्त्यानं तिला बाहेर काढलं. दाराबाहेर भिकूशेट उभा होता. तो तिच्या बरोबरच आला होता. केव्हांही ती कुठं जाऊं लागली तरी केशवलालचा हा हनुमान तिची पाठ सोडीत नसे.

एकप्रकारें तो सुंदरीला निष्ठेच्या दृष्टीनं पहात होता. मिशन हाऊसमधें ती ये जा करूं लागल्यापासून जरी तो तिच्याबरोबर येत होता तरी तिचं रहस्य त्यानं केशवलालकडे कधींच उक्त केलं नाहीं. म्हणूनच तिचाहि त्याच्यावर विश्वास बसला होता. तो म्हणाला, " गाडीची वेळ झाली. चला लवकर. "

" थांबा---" सुंदरी म्हणाली, "तुम्हीं पुढं जाऊन तिकीट काढा. मी तुमच्या मागोमाग येतें. मी तुमच्याबरोबर आल्याचं कुणाच्या नजरेला न येणंच बरं."

भिकूशेट निघून गेला आणि एक क्षणभर वाट पाहून सुंदरीही त्याच्या मागोमाग निघाली. कुमारला जी बाई मिशन हाऊसमधून जातांना दिसली ती हीच.

सुंदरीला बाहेर घालवून दरवाजा बंद करून पाद्री आंत येतो न येतो तोंच लता येऊन त्याला बिलगली. मोठ्या प्रेमळपणानं तिच्याकडे पहात पाद्रीनं तिला विचारलं, " काय झालं ?"

मिठी सोडून दूर होऊन लता बाजूला उभी राहिली आणि आपल्या पोषाखाकडे वरपासून खालीपर्यंत हात दाखवीत म्हणाली, " पहा !"

" पाहिलं ! " पाद्री म्हणाला.

" काय वाटतं ? कशी दिसतें मी ?"

"छान दिसतेस !"

"कसे दिसतात हे माझे कपडे ?"

"वा:! फारच उत्तम—फार छान !"

"तुम्हांला छान दिसतात—" एकदम चेहरा पाडून लता म्हणाली, "लोकांना नाहीं. त्रास देतात मला सारे लोक. अन् कां ? तर नुसते हे कपडे करतें म्हणून. मला नकोत हे कपडे."

"बरं बरं !" पाद्री हंसत म्हणाला, "मग काय परकरचोळी हवी? देवीला सांगितलं तर देवी देईल परकरचोळी."

"इश्श ! मला नाहीं आवडत परकरचोळी."

"मग काय हवं ? कोट पाटलोण ?"

"इश्श !" नाक मुरडीत लता म्हणाली, "मुली कोट पाटलोण घालतात वाटतं ? साडी हवी मला !"

"अस्सं ?" पाद्री म्हणाला, "ठीक. आतां देवीला निरोप धाडतों साडी पाठवून द्यायला."

"कोण ही देवी ?" पाद्रीला एकदम बिलगून काकुळतवाणीनें त्याच्या तोंडाकडे पहात लतेनं विचारलं, "सांगा ना, कोण ही देवी ?"

पाद्रीनं पुन्हा तेंच उत्तर सांगितलं, " जी देते ती देवी. जें मागावं तें—जें कुणाला सुद्धां मिळणार नाहीं तें—मागितल्या बरोबर देते ती देवी. आतां ही साडी मागतों तिच्याजवळ, कीं पाठवलीच म्हणून समज."

"मग आणखी एक मागाल ?" लडिवाळपणानं लता म्हणाली.

"हो हो !"

"मग माझ्यासाठीं एक आई मागा !"

पाद्रीच्या डोळ्याला टच्कन् पाणी आलं. देवीनं सर्व कांहीं दिलं असतं पण आई दिली नसती हें त्याला माहीत होतं. लतेची ही मागणी सुद्धां पुरी केली पाहिजे असं त्याला वाटलं. ही मागणी जिच्याकडे करायची ती देवी निराळी होती हें त्याला माहीत होतं. शरणगांवचं तें जागृत देव-

स्थान होतं. त्या देवस्थानाकडे प्रार्थना केली तर लतेची मायभूक शमवणं अशक्य नव्हतं असं वाटून तो म्हणाला, " हो हो, आई सुद्धां देईल देवी ! "

लतेचा चेहरा आनंदानं फुलून निघाला. कुमारला आई आहे तशी आपल्याला नाहीं—आई नाहीं तोंपर्यंत बाकीच्या साऱ्या वैभवाची किंमत नाहीं–असं कुमारच्या बोलण्यावरून तिला वाटे. कुमारच्या अंगावरचे कपडेसुद्धां चांगलेसे नसत. हवी ती गोष्ट त्याला मिळत नसे. कितीतरी कष्ट करावे लागत त्याला—तरीही तो जो आनंदांत असे तो आपल्या आईमुळं, हें लतेला कळून चुकलं होतं.

आतां आपल्याला आई मिळणार या आनंदाच्या कल्पनेंत रंगून जाऊन ती नाचत बागडत निघून गेली.

कुमार तडक घरीं गेला. त्याचं मन उदासवाणं झालं होतं. आपल्या परीनं लतेची समजूत घालायचा त्यानं प्रयत्न केला होता खरा पण त्याचं स्वतःचंच समाधान होत नव्हतं. ' माझी आई तीच तुझी आई ' असं जरी तो म्हणाला होता तरी नुसत्या म्हणण्यानं कुणाची कोण आई होऊं शकत नाहीं याची त्याला कल्पना होती.

त्याच वेळीं स्वतःच्या आईवरही त्याचा मोठा विश्वास होता. गावांतल्या कुठल्याही आई नसलेल्या मुलाची ती आई होऊं शके हें त्यानं पाहिलं होतं. कुठलंही मूल आपल्याइतक्याच लडिवाळपणानं तिच्याशीं वागतं हेंही त्यानं पाहिलं होतं. त्याला वाटलं, मग लतेनं तरी कां तिला आई म्हणूं नये ?

कुमारची मुद्रा पाहून दुर्गाबाईनाही प्रश्न पडला. खोल विचाराची छाया त्याच्या चेहऱ्यावर दिसत होती असं पाहून ती म्हणाली, " काय झालं रे कुमार ? "

" मला मोठा प्रश्न पडलाय !" कुमार म्हणाला; " तो सोडवायचा प्रयत्न करतोंय ! "

" कसला प्रश्न ? गणिताचा ? "

" गणितापेक्षांसुध्दां बिकट आहे हा प्रश्न ? "

" असं ! " दुर्गाबाई म्हणाली. कुमारला गणिताची फार भीती वाटे —–इतर कोणत्याही विषयाची तो पर्वा करीत नसे हें तिला माहीत होतं म्हणूनच ती म्हणाली, " गणितापेक्षांही बिकट असा कुठला हा प्रश्न ? "

" तुला लता माहित आहे ?" कुमारनं दुर्गाबाईला अगदी बिलगून विचारलं, " पाद्रीबाबाकडे असते ती. तिला आई नाहीं. तिला एक आई हवी आहे. तिची एक देवी आहे, ती देवी तिला सारं कांहीं पाठवून देते. ती देवी कांहीं तिनं पाहिलेली नाहीं. आई, कशी असते ग देवी ? देवा-सारखीच असते का ? "

" हां. " दुर्गाबाई म्हणाली, " देवासारखीच असते देवी. देव जसा कुणाला दिसत नाहीं तशीच देवीही दिसत नाहीं—" कांहींतरी उत्तर द्यावं म्हणून दुर्गाबाई बोलली खरी पण 'लतेची देवी' म्हणजे काय याची तिलाही कल्पना नव्हती. लता नांवाची एक मुलगी मिशन हाऊसमधें राहून सुद्धां हिंदुत्वानं राहिली आहे, एवढंच तिला कळलं होतं. फाजील चौकसपणा तिला आवडत नसे म्हणून तिनं या बातमीकडे दुर्लक्ष केलं होतं.

कुमारची समजूत कशी घालावी याचा ती विचार करीत आहे तोंच पाद्री तिथं आला. त्याला पाहातांच नमस्कार करून दुर्गाबाई म्हणाली, " ऐकलंत बावाजी, आमच्या कुमारला मोठं कोडं पडलं आहे. त्याच्या एका मैत्रिणीला एक आई हवी आहे—"

" तेवढ्यासाठींच मी आलों आहें " पाद्री म्हणाला, "बिचारी लता—तुम्हांला माहीतच असेल, माझ्याकडे असते ती मुलगी—लता अगदीं हात-घाईला आली आहे. तिची एक देवी आहे. ती देवी तिचं सारं कोड पुरवते पण तिला आई देणं त्या देवीच्या हातीं नाहीं म्हणून मी तुमच्याकडे आलों आहें. आईच्या पान्ह्यासाठीं लालचावलेल्या त्या भाबड्या पोरीला द्याल का एक आई ? व्हाल का तिची आई ? "

" मोठ्या आनंदानं ! " दुर्गाबाई म्हणाली, " मलाही एक मुलगी

ाहिजेच होती. मुलासाठीं मी तळमळत होतें—काकुळतीला आलें होतें—
ुम्हांला माहीतच आहे—देवानं माझा धावा ऐकला, मला एक मुलगा
ेला. पण मला कशाची खरी उणीव होती हें माझ्यापेक्षां देवालाच जास्त
ाहीत होतं म्हणूनच, मला वाटतं, त्यानं आतां ही मुलगी पाठवून
ेली ! नाहीं ? ”

“ खरं आहे. “ पाद्री म्हणाला, “ माझं काम झालं. देवीची अब्रू
ाचवली. पण एकच विनंती करायची आहे मला. त्या मुलीचा इतिहास
िचारायचा नाहीं—तिलाही तसला प्रश्न येऊं द्यायचा नाहीं. जसा तुमचा
ुमार तशिच लता असंच समजून चालायचं. यापेक्षां—माफ करा—मला
ास्त कांहीं सांगतां येत नाहीं. ”

“ ठीक आहे. ” दुर्गाबाई म्हणाली “ नकळत माझी उणीव
रून आली. ”

पाद्रीला आनंद झाला. कुमारलाही आनंद झाला.

कुमारला वाटलं, आपला शब्द खरा झाला. आतां पाद्रीबावानींच
ांगितल्यावर लतेची खात्री पटल्यावांचून रहाणार नाहीं या आनंदानं हुर-
ून तो म्हणाला “ आई, मग लतेची आई झालीस तर तूं ?”

तिघांचेही डोळे आसवांनीं भरून आले होते. त्या पुण्यमय अश्रूंमुळं
ेची मोठ्यांतली मोठी उणीव धुवून निघाली.

---

## ८

तेव्हांपासून लतेचा बहुतेक वेळ दुर्गाबाईच्या आश्रमांत जाऊं लागला.
ुर्गाबाईच्या प्रत्येक कामांत ती मोठ्या उत्साहानं भाग घेऊं लागली. दुर्गा-
बाईचीं रोजचीं प्रवचनं ती मोठ्या आतुरतेनं ऐकत असे. आपण हिंदू आहों
—ख्रिस्ती नव्हे— एवढंच ती नुसती अभिमानानं म्हणे, पण या पलिकडे
दोन्ही धर्मांचें ज्ञान तिला यापूर्वी नव्हतं.

कृत्यं चालत असत त्यावेळीं तो तिला केव्हांच हजर राहूं देत नसे. देवाचं नांव घेऊन त्यानं वचन दिलं होतं. ते वचन तो अक्षरश: पाळीत असे. रोज चालणाऱ्या प्रार्थना पाहिल्यानं लतेच्या मनावर स्वाभाविकपणें परिणाम झाला असता याची त्याला कल्पना होती, म्हणूनच खिस्ती धर्म म्हणजे काय याची एका खिस्ती पाद्रीच्या घरीं रहात असूनहि लतेला कल्पना आली नाहीं.

पण दुर्गाबाईच्या घरीं जाऊं लागल्यापासून हिंदुत्वाची कल्पना मात्र तिच्या आंगीं बाणूं लागली. ती रोज गीतापाठ ऐकत असे, प्रवचन संपल्या-वर ती प्रश्न करी, त्या प्रश्नाच्या अनुरोधानं दुर्गाबाई तिला भारत भागवतां-तील कथा सांगे. संस्कृत समजण्याचं तिचं वय नव्हत म्हणून पांडवप्रतापा-सारखे मराठी ग्रंथ ती तिच्याकडून वाचून घेई, त्यामुळं महाभारतांतील मुख्य कथानक तिला अवगत झालं होतं.

भारतीय तत्वज्ञानांतील महत्वाच्या गोष्टी दुर्गाबाई तिला सोप्या भाषेत समजावून सांगे. रूढाचाराच्या कल्पनेपेक्षां मूळ तत्वज्ञानच तिला समजावून देण्याची तिनं खबरदारी घेतली होती. दोन घरांखेरीज लता गावांतल्या इतर कोणत्याही माणसांत मिसळत नसे म्हणून हिंदुत्वाच्या नांवाखालीं रूढ झालेले भलते आचारविचार तिला परिचित झाले नव्हते. एका विशिष्ट मार्गानंच दुर्गाबाईनं तिचं शिक्षण चालू ठेवलं होतं आणि त्या मार्गानं जात असतां येणाऱ्या अडीअडचणी तेव्हांपासूनच ती तिला समजावून देऊं लागली होती.

या शिक्षणक्रमांत अर्थातच कुमार सहभागी होता. जें कांहीं शिकवलं जाई तें दोघांना. दोघांनीही ऐकायचं, दोघांनीही आपल्या परीनं प्रश्न विचा-रायचे आणि दुर्गाबाईनं दोघांच्याही बुद्धीच्या तोलाप्रमाणें त्यांचं समाधान करायचं असा हा शिक्षणक्रम चालत असे.

अर्थातच हें शिक्षण एकमार्गी होतं. गीताकारानं सांगितलेला धर्म तोच हिंदुधर्म, असाच या दोन्ही मुलांचा समज झाला होता. हिंदुधर्मातील

इतर अवडंबरं त्यांच्यावर लादण्याचा दुर्गाबाईनं कधींच प्रयत्न केला नाहीं त्यामुळं एका विशिष्ट तत्वज्ञानाच्या अनुभूतीपलिकडे त्यांच्या धार्मिक शिक्षणाची मजल गेली नव्हती.

हें शिक्षण एकांगी आहे असं दुर्गाबाईला वाटे—केव्हां केव्हां असं एकांगी शिक्षण देण्यांत आपल्याकडून चूक होते आहे कीं काय असा प्रश्न तिच्यासमोर उभा राही, पण ती वर्तमानकालाकडे नजर ठेवीत होती. भविष्यकाल पुढं होता. त्या कालांत स्वतःच्या बुद्धीनं हिंदुधर्मांतील इतर किरकोळ बाबींचं ज्ञान करून घेण्याची त्यांना संधी मिळाली असती याची तिला जाणीव होती. पण हिंदुधर्म म्हणजे उपनिषदांचं तत्वज्ञान आणि त्या उपनिषदांचं सार म्हणजे श्रीकृष्णानें भारतीयुद्धाच्या वेळीं अर्जुनाला कार्यप्रवण करण्यासाठीं सांगितलेली भगवद्गीता, असाच तिचा निश्चयात्मक समज असल्यामुळं तिनं हिंदुधर्मांतील भाराभर गोष्टींचा बोजा त्या अल्पवयी मुलांच्या बुद्धीवर लादण्याचं पाप केलं नाहीं.

हा त्यांचा शिक्षणक्रम चालत असतां केव्हां केव्हां पाद्रीही हजर रहात असे. त्या शिकवणीचं त्याला मोठं कौतुक वाटे. अशिक्षितांना गीतेचं तत्वज्ञान सांगण्याची जबाबदारी पडल्यामुळं साध्या आणि सोप्या भाषेत बोलण्याची कला दुर्गाबाईला अवगत झाली होती. त्यामुळं तिचीं तीं प्रवचनं पाद्रीलाही आकर्षक वाटल्यावाचून राहिलीं नाहींत.

या शिक्षणाबरोबरच शाळेंतील शिक्षणही सुरू होतंच आणि त्या शिवाय इंग्रजी भाषेचं शिक्षण त्या दोघांनाही पाद्री स्वतः देत असे तें निराळंच. या बहुविध कार्यक्रमामुळं त्या दोन्ही मुलांना गावांतल्या मुलांत मिसळायची संधी बहुधा मिळत नसे. या दोन्ही पालकांचा उद्देश तोच होता. या दोन्ही मुलांनाही एक पूर्वेतिहास होता. तो इतिहास म्हणजे गांवच्या चर्चेचा विषय होता. गांवगप्पांतून तो इतिहास त्या दोन्ही मुलांच्या कानीं येऊं नये अशी त्या दोघांची इच्छा होती. म्हणूनच त्यांनी इतर शिक्षणाचा कार्यक्रम वाढवून त्या दोन्ही मुलांना सर्वकाल गुंतवून ठेवलं होतं.

तिकडे मुंबईलाही शंकरनं मोहनचा शिक्षणक्रम सुरू केला होता. पुढल्या काळांत जी कर्तबगारी मोहनच्या करवीं व्हावी अशी त्याची इच्छा होती तिला शिक्षणाची जरुरी होती. विद्वानांच्या आणि व्यापाऱ्यांच्या सहवासांत त्याचा पुढचा काळ जाणं अवश्य होतं म्हणून या अशा समाजांत वावरायला पात्र होईल अशा प्रकारचं शिक्षण मोहनला देण्याची त्यानं व्यवस्था केली होती.

शाळा कॉलेजांत घालून मोहनला पदवीधर करण्याच्या भानगडींत तो मुळींच पडला नाहीं. निष्कारण भलत्या विषयांचा बोजा त्याच्या मेंदूवर पडून तो खुजट व्हावा हें त्याला पसंत नव्हतं. मुंबईत प्रचलित असलेल्या सर्व भाषा म्हणजे मराठी, गुजराथी आणि इंग्रजी या तिन्ही भाषेचं ज्ञान त्याला झालं, या तिन्ही भाषांतून त्याला सर्व प्रकारचे व्यवहार करतां आले, या तिन्ही भाषा मातृभाषेइतक्या उत्कृष्ट रीतीनं अवगत झाल्या कीं काम झालं असाच शंकरचा निर्धार होता. म्हणून त्यानं मोहनला एवढ्यापुरतंच शिक्षण देण्याची व्यवस्था स्वतंत्रपणें केली होती.

आणि मुख्य शिक्षण चाललं होतं तें मुंबई काबीज करण्याचं. प्रतिष्ठित नांवाखालीं वावरणारीं मुंबईतील किती मोठमोठीं माणसं गुन्ह्यांच्या मुळाशीं आहेत याचा त्यानं आढावा घेतला होता. मुंबईत होणारे सारेच गुन्हे कांहीं भुरटे मवाली करीत नाहींत हें त्याला कळलं होतं. भिकाऱ्यांचे देखील संघ आहेत आणि त्या भिकाऱ्यांना संघटित करून त्यांच्याकरवीं गुन्हे घडवले जातात, भिकाऱ्यांच्या द्वारें बातम्या काढूनसुद्धां मोठमोठे दरवडे घातले जातात याचा अंदाज घेण्यांत त्यानं पोलिसांवरही ताण केली होती. जुगाराचे अड्डे, आंकफरकावर जुगार चालवण्याच्या कचेऱ्या, रेसिसच्या जुगाराचे लहानसहान अड्डे आणि तिथं होत असलेल्या कारवाया त्याला तपशीलवार माहीत होत्या. कापूस बाजारांत सुद्धां त्यानं प्रवेश केला होता. कापसाच्या व्यापारी घडामोडीच्या नांवाखालीं जो मोठा जुगार चालतो, त्या जुगाराला मुंबईच्या प्रतिष्ठित पडद्याआड गुन्हेगारीचं स्वरूप कशा प्रकारानं

आलं आहे याचा पूर्ण अभ्यास करून त्यानं त्या शास्त्रांतही प्रावीण्य मिळवलं होतं. म्हणजे अल्प श्रमांत अचाट पैसा मिळवण्याचीं जीं जीं साधनं त्याच्या परिस्थितींत उपलब्ध होतीं त्या त्या साधनांचा उपयोग करून तो आपलं वैभव झपाट्यानं वाढवीत होता.

हें वैभव वाढवीत असतांना त्यानं पापपुण्याची कदर केव्हांच केली नाहीं. खुर्चीतला ढेंकूण मारणं आणि चालत्याबोलत्या माणसाचा जीव घेणें या दोन्हीं गोष्टी त्याच्या लेखीं सारख्याच होत्या. जन्माला आलेला माणूस केव्हांतरी मरणारच, मग आपलं वैभव वाढवण्यासाठीं त्या माणसानं स्वतःचा बळी कां देऊं नये, असाच प्रश्न करून 'अर्थात् द्यावा' असंच उत्तर देणारं त्याचं तत्त्वज्ञान होतं. त्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करतांना मोहन सदोदित त्याच्या हस्तकाचं काम करीत होता. कुणाही परक्या माणसाला कधींही त्यानं आपल्या विश्वासांत घेतलं नाहीं. कोणत्याही स्त्रीच्या जाळ्यांत तो केव्हांही पडला नाहीं. कोणत्याही व्यसनाच्या पाशांत त्यानं स्वतःला कधींच अडकवून घेतलं नाहीं, आणि म्हणूनच त्यानं टाकलेले प्रत्येक डाव यशस्वी होत होते. केशवलाल आणि शंकर या दोघांत फरक होता तो इंथंच.

निरनिराळ्या क्षेत्रांत स्वतःची प्रतिष्ठा वाढविण्याच्या मोहाला बळी पडून केशवलाल निरनिराळे व्याप निर्माण करीत होता. त्या व्यापांच्या पसाऱ्यामुळं हस्तकांची संख्या त्याला वाढवावी लागत होती. त्या हस्तकांना फोडून त्यांच्या करवीं स्वतःचीं कामं करून घेण्याचा डाव शंकर टाकीत असे, आणि त्यामुळंच केशवलालनं केलेल्या साऱ्या योजनेचा फायदा शंकरला मिळत असे. अशा वेळीं उपयोगी पडणाऱ्या केशवलालच्या बेइमान हस्तकांना एकाद्या ढेंकूण-बरडाप्रमाणें चिरडून टाकतांना शंकरला कांहींच वाटत नसे.

शंकरचं केशवलालशीं जे हें युद्ध चाललं होतं तें दुरून होतं. प्रत्यक्ष दोघांची गांठ समोरासमोर पडण्याचा योग आला नव्हता. केशवलालच्या

अड्ड्यांत घुसून एकदां त्याला आपली जरब दाखवण्याचा मोह शंकरला अनावर झाला.

केशवलालचा एक जुगाराचा अड्डा होता. त्या अड्ड्याचं ठिकाण अत्यंत गुप्त राखण्यांत आलं होतं. त्या अड्ड्यांत रोज रात्रीं लाखो रुपयांची घडामोड होत असे. तीन पत्त्यांच्या डावापासून रौलेटच्या चक्रापर्यंत जुगाराचे सर्व प्रकार त्या अड्ड्यांत रोज लाखो रुपयांच्या रकमा या हातांतून त्या हातांत भिरकावून देण्याच्या कामीं उपयोगी पडत असत. त्या अड्ड्यांतच घुसण्याचा शंकरनं निश्चय केला.

ठराविक माणसांशिवाय कुणालाच या अड्ड्यांत प्रवेश मिळत नसे पण केशवलालच्या एका हस्तकाला फोडून शंकरनं या अड्ड्यांत प्रवेश करण्याची किल्ली संपादन केली.

अड्ड्यांत त्या रात्रीं मोठीच झुंबड उडाली होती. तो रेसचा दिवस होता. कांहींजणांना रेसमधें भरपूर पैसे मिळाल्यामुळं आणि कांहींजणांचे सारे पैसे रेसमधें गमावल्यामुळं दोघांनाही दोन प्रकारें चेव आला होता. पैसे मिळण्याच्या आणि हरवण्याच्या बेफाम कैफाची परमावधी झालेले त्या अड्ड्याचे सभासद डावावर डाव टाकून एका क्षणांत रावाचे रंक आणि रंकाचे राव बनत होते.

हें रहाटगाडगं चालू असतां शंकर मोहनला घेऊन त्या अड्ड्यांत आला. त्यांनीं एक टेबल बळकावलं. खेळणारे तयार होतेच. कोण कुणाच्या परिचयाची अपेक्षा करीत नसे किंवा चौकशीही करीत नसे. ज्याच्याजवळ पैसा असेल त्यानं खेळायला सुरवात करायची असा तिथला बेफाम नियम होता.

शंकर खेळूं लागला. मोहन दुसऱ्या बाजूला उभा राहून डावांतील गफलत करायला शंकरला मदत करीत होता. सुंदरी आणि भिकू दोघेंही या गर्दीत या टेबलाकडून त्या टेबलाकडे हिंडत होतीं. पाद्रीच्या घरीं आलेली सुंदरी आणि ही सुंदरी यांच्यांत जमीन अस्मानाचं अंतर होतं. रणांगणावर

चमकणाऱ्या एखाद्या रणदेवतेप्रमाणें ती या जुगारी लोकांच्या रणांगणावर सर्वांना उत्तेजन देत वावरत होती. पाद्रीच्या घरीं दिसलेलं तिच्या मुद्रेवरचं दुःखीकष्टीपणाचं लक्षण यावेळी चुकूनसुद्धां तिच्या चेहऱ्यावर दिसत नव्हतं. दारू पिऊन बेफाम झालेल्या एखाद्या मस्त अतिमानवीप्रमाणें ती या जनसमाजांत वावरत होती. पाद्रीनं जर तिला यावेळीं पाहिलं असतं तर त्याच्या आंगावर कांटा उभा राहिला असता.

शंकर बेफामपणें खेळत होता. त्याच्या बेफामपणांतच साऱ्या यशाची गुरुकिल्ली होती. जेवढ्या बेफिकिरीनं तो पैसा मिळवीत होता तितक्याच बेफिकिरीनं तो घालवीत होता असं पाहून अट्टल खेळाडू त्याच्याबरोबर दोन हात करण्यासाठीं अहमहमिकेनं पुढं सरसावत होते आणि शंकरही आपल्या नित्याच्या बेफिकिरवृत्तीनं त्यांच्याशीं दोन हात करीत होता.

मोहन नुसता प्रेक्षक म्हणून वावरत आहे असं जरी सर्वांना दिसत होतं तरी तो आपल्या बापाला खेळांत गफलत करायला बेछूट मदत करीत होता. लहानपणापासूनच हातचलाखीच्या कामीं सिद्धहस्त असल्यामुळें या खेळांत हातांतलीं पानं हातोहात बदलून बापाचे डाव यशस्वी करण्यासाठीं त्यानं बेमालूम कारवाई चालवली होती. एवढे कसलेले खेळाडू सुद्धां ती हातचलाखी उमगून काढायला समर्थ झाले नाहींत.

ती हातचलाखी सुंदरीच्या नजरेला आली असावी. ती सारखी टक लावून मोहनकडे पहात होती. ऐन विशीच्या तारुण्यात तो चमकत होता. त्याच्या रुबाबाचा सुंदरीच्या मनावर परिणाम झाल्यावांचून राहिला नाहीं. त्याच्या हाताकडे असलेली सुंदरीची नजर त्याच्या चेहऱ्याकडे गेली. तारुण्याबरोबरच झळकणाऱ्या असामान्य तेजानं सुंदरीच्या डोळ्यांवर क्षणभर झांपड आणली. तिचा पहारा सुटला—ती त्याच्या डोळ्यावाटे पाहूं लागली—त्याच्या अंतःकरणाचा ठाव घेण्याचा प्रयत्न करूं लागली—तो प्रयत्न करीत असतां स्वतःच्या मनावरचा तिचा ताबा सुटला.

तिला वाटलं, आपल्या जीवनांत कधींही न अनुभवलेली एक विलक्षण

भावना आपल्या हृदयांत जागी होऊं पहात आहे. त्या दोघांच्या वयांत बरेंच अंतर होतं. ऐन तारुण्याची ओलांडली जाणारी मर्यादा सुंदरीला आतां हलु-हलु पारखी होऊं लागली होती—त्याच वेळीं तारुण्याच्या ऐन उमेदीच्या जळजळीत सीमेवर मोहन पहिलंच पाऊल टाकीत होता.

बेभान होऊन ती त्याच्याकडे पहात राहिली असतां सारा दिवाणखाना कोसळून पडेल एवढया मोठ्या आवाजांत केशवलालचा इषारा ऐकूं आला, " थांब ! "

शंकर खेळत होता— टाकलेलीं पानं उचलण्यासाठीं हात पुढं करीत होता. तोंच केशवलाल तीरासारखा त्याच्याजवळ आला आणि कडाडून म्हणाला, " थांब—हात लावूं नकोस—मी पाहिलंय्. "

" काय पाहिलंय " तेवढयाच बेफामपणं शंकरनं विचारलं.

" तुझी लबाडी !" केशवलाल शंकरच्या समोर येऊन म्हणाला, " तुझी हातचलाखी. खरोखरच कौतुक करण्यासारखी आहे तुझी हातचलाखी हातचलाख लोकांचाच हा अड्डा आहे. पण या साऱ्या हातचलाखांच्या डोळ्यांत धूळ टाकून खेळणारा तुझ्यासारखा अट्टल खिलाडू मी यापूर्वी पाहिला नव्हता. "

शंकर मस्तवालपणानं हंसत आहे असं पाहून केशवलाल म्हणाला, " हसूं नकोस. एवढया अट्टल हातचलाख्याची कर्तबगारी टिपून काढण्याइतकी तीक्ष्ण दृष्टी या केशवलालच्या आंगीं आहे याची तुला कल्पना नव्हती म्हणूनच इथं यायचं धाडस केलंस—" हातचा खेळ टाकून सारे लोक त्यांच्यासभोंवार गोळा झाले होते. त्यांच्यावर एकदां नजर फिरवून केशवलाल म्हणाला, " लाज नाहीं वाटत तुम्हांला ? एक परका माणूस इथं घुसतो, तुमच्या खिशांतले पैसे तुमच्या देखत हातोहात हिरावून नेतो —आणि नुसते खेळत बसलां आहांत तुम्ही ! अजून पकडलं नाहींत या बदमाषाला—"

" खामोष ! " शंकर ओरडला, "कोण बदमाष ? "

" तू " केशवलाल हंसून म्हणाला, " तू आणि मी दोघेही बदमाष आहों. आज दहा वर्षे मी तुझे चाळे पहातों आहें. माझ्या प्रत्येक कारस्थानांत तू हात घालतो आहेस—सापाशीं खेळतो आहेस. तुझ्या पुंगीनं माझे हस्तक फसले असतील पण मी फसणार नाहीं. माझीं कारस्थानं तू हाणून पाडलींस, माझा कारवाई उलटी पाडून तू गबर झालास तरी मी सहन केलं. अशा चारदोन कारवाया कोसळल्या म्हणून या केशवलालचा एक रोम सुद्धां वाकडा होत नाहीं. पण आतां तुझी मजल फार पुढं गेली. आजवर तुमचे चाळे बाहेर चालले होते—इथं नव्हते—या माझ्या सिंहाच्या गुहेंत नव्हते—"

" म्हणूनच इथं आलों " शंकर म्हणाला " मुद्दाम आलों—"

" असं ? " आणखी थोडं हंसून केशवलाल म्हणाला, "फार कठीण आहे हें ! माझी सत्ता चालते या मुंबईवर. इथं मीच अधिकार गाजवणार. दोघांचं काम नाहीं इथं. दोघांना लहान आहे ही मुंबई. एक कुणीतरी—"

" एकच कुणीतरी—" शंकर उद्गारला, " आणि तो मी—केशवलाल नव्हे. "

" असं ! " केशवलाल उद्गारला. दोघेही दोन चवताळलेल्या वाघांसारखे एकमेकांवर झडप घालण्यासाठीं एकमेकांकडे पहात एक क्षणभर उभे राहिले होते. ती नजर चळूं न देतां बेफिकीरपणानं टेबलावर पडलेल्या नोटा उचलून शंकरनं खिशांत कोंबल्या. तोंच—

तोंच धडाका सुरू झाला. केशवलालचा ठोसा शंकरच्या कानशिलांत बसला आणि त्याबरोबरच शंकरनंही टेबल आडवं पाडून दोघांच्या मधें आणलं. बाकीचे लोक एकदम मागं हटले. बहिरी ससाण्याच्या वेगानं शंकर केशवलालवर तुटून पडला आणि त्याच्या एका ठोश्यासरशीं केशवलाल पलीकडल्या भिंतीवर जाऊन आदळला.

केशवलालनं पिस्तुल काढण्यासाठीं आपल्या खिशांत हात घातला त्यावेळीं सुंदरीनं जाऊन एकदम त्याचा हात धरला. " नाहीं—नाहीं ! "

ती म्हणाली, " इथं पिस्तुलाचा आवाज नको व्हायला—इथं खून नको. "
केशवलालनं पिस्तुल पुनः खिशांत टाकून दिलं. एकेक पाऊल मोजीत तो शंकरसमोर येत होता त्याचवेळीं भिकू त्याच्या कानाशीं लागून म्हणाला, " दुसरा मार्ग आहे—यापेक्षां बरा. यावेळीं जाऊंदे त्याला—परभारें—हूं ! "

शंकर नुसता हंसत होता. त्याच्यासमोर येऊन केशवलाल म्हणाला, " चालता हो इथून पुनः—पाऊल टाकूं नको इथं. "

एक पाऊल पुढं होऊन शंकर पुढं हात करून म्हणाला, " शेक हॅंड्स माय फ्रेंड. "

केशवलालनं त्याच्या हाताला हात दिला नाहीं. तें पाहून शंकर तिरस्कारानं हंसला.

शंकरची पाठ थोपटून केशवलाल म्हणाला, " शाबास, मर्द आहेस. ध्यानांत ठेव, किती झालं तरी मी तुझ्या आधींचा आहें – तुझा उस्ताद आहे. जा आतां—जयजय. पुनः भेटूं—समजलं ? पुनः भेटूं. "

सलाम फेकून शंकर तिथून बाहेर पडला. त्याच्यामागोमाग मोहनही निघाला.

सुंदरी सारं जग विसरून गेली होती. शंकरच्या पाठोपाठ जाणाऱ्या मोहनवर तिची नजर खिळली होती. ते बाहेर गेले तरीही तिनं धांवत पलीकडल्या गॅलरींत जाऊन रस्त्यावरच्या अंधुक प्रकाशांत मोहनला एकदां डोळेभर पाहून घेतलं.

त्या गजबजणाऱ्या दिवाणखान्यांत एका क्षणांत सर्वत्र सामसूम झाली.

—०—

## ९

ईर्ष्या आणि अभिमानाच्या पायीं शंकरच्या हातून जरी अनेक दुष्कृत्यं घडत होतीं तरी त्याच्या हृदयांत झांकून राहिलेला सात्विक वृत्तीचा अंकुर केव्हां केव्हां त्याच्या नकळत उगवत असे. प्रसंगांत सांपडलेल्या

कुणीही माणूस त्याच्याकडे आला, तो खरोखरच संकटांत आहे अशी खात्री झाली तरी परतीची अपेक्षा न करतां तो त्याला मदत करीत असे.

केशवलालसुद्धां मोठा धार्मिक माणूस म्हणून प्रख्यात होता. पण त्याचे दातृत्वाचे प्रकार दिखाऊ होते. दाता म्हणून त्याची पहिली प्रसिद्धी झाली ती लढाईच्या वेळीं. वॉर फंडाला त्यानं त्यावेळीं एकदम पंचवीस हजार रुपये दिले होते.

ही प्रसिद्धी त्याला महाग पडूं लागली. धर्माच्या नांवाखालीं झोळी पुढं करणारा प्रत्येक सार्वजनिक कार्यकर्ता त्याचा पाठपुरावा करूं लागला आणि जुनी इभ्रत कायम ठेवण्यासाठीं त्यालाही आपल्या पिशवीचं तोंड वेळोवेळीं मोकळं सोडावं लागलं.

बऱ्याच शाळांना त्यानं देणग्या दिल्या होत्या. व्यायाम शाळा बांधून दिल्या होत्या. मजुरांची चळवळ करणाऱ्या संस्थांना सुद्धां वेळोवेळीं त्याच्याकडून कांहींना कांहीं मिळत असे. तो देत नसे काय तें एक सदावर्त अन्नछत्रांना. देवळाच्या जीर्णोद्धाराच्या भानगडींतही तो कधीं पडत नसे. एका बाबतींत मात्र त्यानं कधींच नकार दिला नाहीं; आणि ती बाब म्हणजे सरकारच्या उत्तेजनानं निघालेला कुठलाही फंड.

सरकारांत त्यामुळंच त्याचं चांगलं वजन बसलं होतं. निरनिराळ्या नोकरांना दिवाळी शिमग्याला तो बक्षिसं पोचवीत असे. नाताळच्या सणांत साहेब लोकांकडे त्यांच्या डाल्या जात असत.

शंकरला या सर्व गोष्टींचा तिटकारा होता. असल्या सार्वजनिक दातृत्वांत तो कधींच पडला नाहीं. वैय्यक्तिक दातृत्वाला म्हणूनच त्यानं कधीं माघार घेतली नाहीं. केव्हां केव्हां कुणी अनोळखी माणूस कां असेना—पण तो संकटांत पडल्याचं कळलं तर आपणहून जाऊन त्याला मदत करीत असे—क्वचित गुप्तदान पाठवीत असे. अतएव त्याचं दातृत्व स्वतःच्या समाधानासाठीं होतं. केशवलालप्रमाणें प्रसिद्धी किंवा बशिलेबाजीच्या लालसेनं तो केव्हांही कसलंच दान करीत नसे.

असाच एक संकटांत पडलेला माणूस त्याच्याकडे आला होता. त्याला संकटमुक्त केल्यामुळं तो एकप्रकारें त्याचा अनुयायी बनला होता. उघड उघड करण्याजोगीं जेवढीं कामं असत तेवढी राजरोसपणें शंकर त्याला सांगे, पण आपल्या भानगडींच्या उपद्व्यापाची त्या माणसाला शंकरनं कधींच दाद लागूं दिली नव्हती.

एके दिवशीं संध्याकाळीं बाहेरून आल्यावेळीं शंकरला असं दिसून आलं कीं वर उल्लेखिलेला गृहस्थ त्याची वाट पहात व्हरांड्यावर बसला होता. तो बराच वेळ तिथं बसला असावा, कारण शंकर येईपर्यंत त्याला झोंप लागली होती.

शंकरनं त्याला जागा केलं तेव्हां क्षणभर तो घाबरून नुसता त्याच्याकडे पहात राहिला. त्याच्या तोंडून शब्दसुद्धां बाहेर फुटेना असं पाहून शंकरनं विचारलं, "केव्हां आला होतास रामलाल ? काय आहे ?"

त्याच्या पायाला हात लावून नमस्कार करीत रामलाल म्हणाला, "हें माझं काम आहे रावसाहेब. आपल्या खेरीज दुसऱ्या कुणाचाच आधार नाहीं. केव्हांचा वाट बघत बसलों होतों. म्हटलं आपण याल आणि आपल्यापुढं माझं गाऱ्हाणं मांडीन. पण तशीच वाट पहातांना माझा डोळा लागला—"

"चटकन बोल—" शंकर हातवाईला येऊन म्हणाला, "काय काम आहे— ?"

शंकरच्या मागोमाग आलेला मोहन दूर अंतरावर उभा राहून त्यांचं भाषण ऐकत होता.

"काय सांगावं रावसाहेब—" रामलाल म्हणाला, "फांस लागला आहे गळ्याला—आजवर एवढी सेवा केली आपली अन् आतां सर्वस्व गेलं."

"लवकर सांग—लांबण लावूं नकोस."

"सरूपचंदाला सांगितलं होतं ना आपण? —"

"काय बरं सांगितलं होतंस मला ?"

" त्या माझ्या देण्याबाबत—"

" हं हं. बरं मग—काय केलं त्यानं ? "

" देण्यापायीं माझ्या घरचे सारे दागिने तो घेऊन गेला. " बोलत असतांना रामालालला एकदम हुंदका आला.

" देण्यापायीं दागिने घेऊन गेला ? " शंकर कपाळाला आंठ्या घालीत म्हणाला, " मी सूट द्यायला सांगितली होती त्याला. "

" पण खत होतं ना माझ्या सहीचं. दहा वर्षांपूर्वीचं देणं—दामदसपट झाली व्याजानं—आणि आतां मी अगदीं खंक झालों. "

" अस्सं ? " शंकर चिडून म्हणाला, "शब्दाची किंमत नाहीं काय या सरुपचंदाला ? कुठाय तो हल्लीं ? "

" तेंच तर संकट आहे ना ? " रामलाल म्हणाला, " जाऊन कांहीं सांगेन म्हटलं तर तो आजच मुलखाला गेलाय. घरीं दुसरं कुणी माणूस नाहीं त्याच्या. टाळं लावून गेलाय बंगल्याला. "

शंकरच्या कपाळाच्या आंठ्या आणखी वाढल्या. क्षणभर विचार करून तो म्हणाला. " उद्यां मिळतील तुझे दागिने — "

" पण बंगला बंद आहे त्याचा ! "

" पण आपली तिजोरी घेऊन तर गेला नाहीं ना तो ? "

" छे छे. अगदीं सारं जिथल्या तिथं आहे. मागं आपण त्यांच्याकडे गेलों होतों मांडिवाळ करण्यासाठीं, त्यावेळीं होती तशीच व्यवस्था आहे अगदीं. माझ्या समोरच त्यानं घराला टाळं लावलं. मी काकुळतीला येऊन त्याचे पायसुद्धां धरले पण मला दाराबाहेर लोटून त्यानं घर बंद करून स्टेशनचा रस्ता धरला."

" ठीक ! तूं जा आतां रामलाल " शंकर म्हणाला, " अन् उद्यां येऊन आपले दागिने घेऊन जा. "

" पण— " रामलाल कांहीं बोलत होता तोंच शंकर त्याला दाबून

म्हणाला, "पण भीण कांहीं नाहीं. तुझे दागिने उद्यां तुला मिळाले म्हणजे झालं ना ? आतां जा पाहूं इथनं."

पुनः एकदां नमस्कार करून रामलाल निघून गेला.

आंत जाऊन मोहन कपडे काढीत होता त्याला शंकर म्हणाला, "थांब—कपडे काढूं नकोस. आपल्याला बाहेर जायचंय."

मोहन म्हणाला, "या रामलालसाठीं?"

शंकरनं होकार देतांच मोहन म्हणाला, "मला वाटतं सरुपचंद येईपर्यंत आपण वाट पाहू."

"नाहीं." शंकर म्हणाला, "तूं एकलं नाहींस मी त्याला काय सांगितलं तें ? सरूपचंदची शेंडी माझ्या हातीं आहे. रामलालला सूट दे असं मी त्याला सांगितलं होतं— त्यानं तें कबूल केलं होतं अन् आतां हें वचन मोडलं—"

"आपल्याला कशाला ही भानगड ?" मोहन म्हणाला, "मरेना का रामलाल."

"मूर्ख आहेस !" शंकर म्हणाला, "माझं वचन गेलंय त्याला. उद्यां त्याला त्याचे दागिने मिळाले पाहिजेत—" मोहन निघून आपल्या खोलींत जात आहे असं पाहून शंकर म्हणाला, "थांब, कपडे कर पुनः, सारीं हत्यारं घे. दुसरं कोण नको यावेळीं तुझ्याशिवाय."

कांहीं न बोलतां मोहननं पुनः कपडे केले, बरोबर हत्यारांची बॅग घेतली. तो नाराजीनं येत होता हें शंकरला दिसत होतं. पण एकदां पुढं टाकलेलं पाऊल मागं घ्यायचं नाहीं ही त्याची वृत्ति होती.

दोघेही मोटारींतून निघाले आणि सरूपचंदाच्या मलबार हिलवरच्या बंगल्याजवळ आले. बंगल्यापासून बऱ्याच अंतरावर पुढं मोटर ठेवून देऊन ते दोघेही परत मागं आले.

बंगल्यात चोहीकडे सामसूम होतं. जिकडे तिकडे काळोख होता. त्यांनीं कंपौंडांत कानोसा घेतला. कुणीच माणूस कुठं दिसून आलं नाहीं असं पाहून हत्यार चालवून शंकरनं दाराचं कुलूप उघडलं.

विजेच्या हातकंदिलाच्या प्रकाशांत त्यांनीं सारं घर धुंडाळून आंत कुणीच माणूस नसल्याची खात्री करून घेतली. या बंगल्यांत शंकर बऱ्याच वेळां आला होता त्यामुळं त्याचा कानाकोपरा त्याला माहीत होता.

दोघेही सरळ तिजोरीच्या खोलीत आले अणि तिजोरीवर हत्यार चालवून शंकरनं ती उघडली. रामलालची दागिन्याची पेटी बाहेर काढून ती तो मोहनच्या हातांत देणार तोंच—

तोंच साऱ्या खोलींत एकदम प्रकाश पडला. हातांतली पेटी खालीं पडली.

शंकरनं मागं वळून पाहिलं तों पोलिसांनीं आपल्याला घेरून टाकलं आहे असं त्याला दिसून आलं. पोलिस इन्स्पेक्टरनं त्याच्यावर पिस्तुल रोख-लेलं होतं अन् आश्चर्याची गोष्ट ही, की रामलाल त्याच्या शेजारीच उभा होता.

सर्वांना आवाज ऐकूं येईल अशारीतीनें ओरडून शंकरनं रामलालकडे पाहिलं. पण त्याचा नाइलाज झाला होता. एवढी सुद्धां हालचाल करण्याची सोय नव्हती.

त्याच्या जवळ येत पोलिस इन्स्पेक्टर म्हणाला, " बरा सांपडलास. आज एवढीं वर्षं मुंबई गाजवलीस —सर्वांच्या डोळ्यांत धूळ फेकलीस—सभ्य म्हणून मिरवलास पण आतां तिजोरी फोडतांना सांपडलास.

इन्स्पेक्टरचं तें भाषण शंकरच्या कानीं जात नव्हतं. त्याची नजर सारखी रामलालकडे लागली होती.

" तूं ? " दात ओठ खात तो म्हणाला, " तूं यांना सामील ? तुझ्या साठीं मी हें—" रामलाल घाबरला असं पाहून शंकर मोठमोठ्यानं हंसूं लागला. पिस्तुल रोखल्यापासून त्यांनीं दोन्हीं हात वरच केलेले होते. इन्स्पेक्टर अगदीं जवळ आला असं पाहून पोलिसांच्या तुकडीपलिकडे पहात शंकर एकदम ओरडला, " हूं—हूं—थांब गोळी झाडूं नकोस—मला लागेल.. मग हे पिस्तुल—"

मागून कुणीतरी पिस्तुल झाडणार या कल्पनेनं दचकून इन्स्पेक्टरनं मागं पाहिलं—सारे पोलीसही मागं वळले तोंच शंकरनं इन्स्पेक्टरच्या हातून पिस्तुल हिसकावून घेऊन खिडकींतून उडी टाकली.

एकच गिल्ला झाला. त्या गर्दीत मोहननं आधींपासून नजर ठेवलेला दिव्याचा स्विच बंद केला आणि एकदम बाहेर धूम ठोकली.

शंकर केव्हांच निघून गेला होता. पोलीस आंधळेपणानं वरून काळो-खांत गोळ्या झाडीत होते. ती संधी साधून मोहननं मोटर गांठली. शंकर कोणत्या बाजूला गेला याचा त्याला अंदाज नव्हता. थांबावं कीं जावं याचा निश्चय करायला अवधी नव्हता. आपण मोटर सुरू केली म्हणजे पोलीस आपल्या मागोमाग येतील आणि बापाचा रस्ता मोकळा होईल अशा कल्प-नेनं त्यानं मोटर हांकली.

मोटरींतून जातांना गोळ्या झाडल्याचे आवाज त्याला ऐकूं आले. ह्यूजरोडवरून मोटर खालीं घेऊन तो पुनः परत बॅकबेवरून मलबार हिलवर सरूपचंदच्या बंगल्याजवळ आला त्यावेळी जिकडे तिकडे सामसूम होतं. पुनः मोटर दूर अंतरावर ठेवून त्यानं पायींच कंपौंडांत फिरून पाहिलं. कुठंच कुणाची चाहूल लागली नाहीं.

मोहन मोठ्या संकटांत पडला होता. बापाची काय वाट झाली हें कळायला कांहींच मार्ग नव्हता. चौकशी करणं शक्य नव्हतं. पुनः घरीं जाणं धोक्याचं होतं. म्हणून तो तसाच मुंबईच्या रस्त्यांतून सारी रात्र चकरा मारीत राहिला.

त्याला पहिल्यानंच संशय आला होता म्हणूनच निघायच्या वेळीं त्यानं बापाला अडथळा केला होता. वस्तुस्थितीची त्याला कांहींच कल्पना नव्हती. हें सारं भिकूचं कारस्थान होतं शंकरशीं संधान बांधण्यासाठीं भिकूनंच रामलालला पाठवलं होतं. कित्येक दिवस त्याच्या सहवासांत राहून त्यानंच रामलालला शंकरचा विश्वास संपादन करायला लावलं होतं.

रामलाल म्हणजे एक कसलेला गडी होता. त्यानं केव्हांच आपल्या

उद्देशाचा थांगपत्ता शंकरला लागूं दिला नाहीं. जो बनाव घडवून त्यानं शंकरला घराबाहेर काढलं त्यांत सरूपचंदही सामील होता. शंकर आपल्या घरांतून निघाल्याबरोबर भिकूनं केशवलालला वर्दी दिली आणि केशवलालनं ती वर्दी पोलीसना पोंचवली. पोलिसना केशवलाल टेलिफोन करीत असतां सुंदरी तिथं हजर होती. तिला केशवलालनं मुळींच दाद लागूं दिली नाहीं. जुगाराच्या अड्यावर मोहनला पाहिल्यापासून सुंदरीचं मन द्विधा झालं होतं. शंकरचं आणि केशवलालचं नातं काय आहे, एकमेकांचें वैर कां आहे याची सुंदरीला मुळींच कल्पना नव्हती. कित्येक कामांत केशवलाल जरी सुंदरीची मदत घेत असे तरी आपल्या महत्वाच्या खाजगी गोष्टी तिला कळूं न देण्याची तो खबरदारी घेई. सुंदरीला अशा वेळी त्याचं वैषम्य वाटे, पण ती सर्वस्वीं त्याच्या आधीन झाली होती. कोणत्याही विवाहित एकनिष्ठ पत्नी इतकीच ती त्याच्याशीं प्रामाणिकपणानं वागत होती.

पोलिसला टेलिफोन करून झाल्यावर ज्यावेळी तिनं केशवलालला विचारलं त्यावेळीं तो एकदम चिडून गेला आणि म्हणाला, “ ऐक सुंदरी, तुला पुन: सांगून ठेवतो. मी सांगेन तेवढेंच ऐकत जा. केव्हांही मला प्रश्न करूं नकोस. कुणी मला प्रश्न केलेला आवडत नाहीं. ज्यावेळी कांहीं सांगण्याजोगं असेल त्यावेळीं तूं विचारलं नाहींस तरी मी सांगत जाईन. तुला माहीत आहे, कीं माझे बरेच व्यवहार मोठ्या नाजूक स्वरुपाचे असतात त्यांचा उल्लेख करणंसुद्धां धोक्याचं असतं—”

“ पण आतां कुठं होतं तसं ? ” सुंदरी मधेंच म्हणाली, “ तुम्ही पोलिसला वर्दी दिली. कुणाला तरी पकडण्यासाठीं कुठंतरी जायला त्यांना सांगितलंत तें मी स्पष्ट ऐकलं. पोलिसांना जें सांगितलंत तें मला नाहीं का सांगता येत ? या ऐन रात्रीं मी कुठं तुमचीं गुपितं फोडायला जात होतें ?—”

“ बस बस — जास्त बोलूं नकोस ! ” केशवलाल म्हणाला, “ असल्या कामीं कुणीं आपल्या लग्नाच्या बायकोवर सुद्धां विश्वास ठेवीत नाहीं.. तूं बोलूनचालून एक रखेली—एक नोकर—मी हुकूम करायचा आणि तूं तो

अंमलात आणायचा. यापेक्षां जादा बात करण्याचं काम नाहीं," असं म्हणून एकदम तो तिथून निघून गेला.

सुंदरीच्या हळुवार मनाला केशवलालचं तें भाषण फार लागून गेलं. ती एक रखेली होती खरी पण यापूर्वी त्यानं रखेलीपणाचा उच्चार कधींच केला नव्हता. आज आनंदाच्या भरांत त्याच्या मनावरचा ताबा सुटला होता, म्हणूनच बेसावधपणें तो अंतरंगांतला उद्गार अचानक बोलून गेला.

सुंदरीला केशवलालबद्दल मोठं प्रेम होतं असं नव्हे पण गोव्याच्या कलावंतीणीच्या जातिवंत एकनिष्ठेला अनुसरून तिनं कव्हांच त्याच्याशीं प्रतारणा केली नव्हती. ती एकादी सामान्य बाजारबसवी नव्हती. आपल्या कुलाबद्दलचा तिला अभिमान होता. त्या कलावंतीणीच्या इमानदार कुलाची केशवलालला‌ही जाणिव नव्हती म्हणूनच तिला फार वाईट वाटलं.

तिला लतेची आठवण झाली. या पापाच्या खाईत पडण्यापूर्वींच लतेला दूर केल्याचा तिला अभिमान वाटला. कुलधर्माला अनुसरून आपण या खाईत पडलों पण लतेच्या नशिबानं तें संकट टळावं म्हणूनच तो कुल-धर्म सोडून तिनं लतेला दूर केलं होतं. तसं करतांना तिला अत्यंत यातना झाल्या होत्या. एकुलत्या एक बहिणीचा विरह तिला असह्य झाला होता.

तिला वाटलं, आपली आई मेली हें बरं झालं. ज्या परिस्थितींत सध्यां तिनं लतेला नेऊन ठेवलं होतं ती परिस्थिती किंवा त्या परिस्थितीचा मूळ उद्देश तिच्या आईला मुळींच पटला नसता. कुलाचाराच्या खोट्या भावनेनं याच धंद्याला अनुरूप होईल अशाच प्रकारचं शिक्षण तिनं लतेला दिलं असतं. म्हणूनच आई मेल्याचं दुःख तिला झालं नाहीं.

केशवलालला ती देवाप्रमाणं पूज्य मानीत होती. तो अघोरी होता, बदमाष होता, संभावित गुन्हेगार होता हें तिला माहीत होतं. पण तिनं आपलं व्रत सोडलं नाहीं.

तिला वाटलं, या एकनिष्ठेचं फळ आपल्याला काय मिळालं ! केशवलालनं आपल्यावर विश्वास सुद्धां टाकूं नये ?

केशवलालच्या त्या बेफाम भाषणाचा ती विचार करीत आहे तोंच टेलिफोनची घंटा वाजली. पोलिसनीं शंकरला पकडून तुरुंगांत टाकल्याची वर्दी भिकून दिली होती. मोहन सुद्धां पकडला गेला कीं काय तें विचारावं असं तिच्या मनांत आलं खरं पण भिकू संशय घेईल या भीतीनं तिनं आत्मसंयमन केलं.

तिच्या मनाला सारखी रुखरुख लागली होती— मोहनलाही पकडलं नसेल ना?

---

## १०

सारी रात्र भटकत असलेल्या मोहनला सकाळच्या वर्तमानपत्रांत शंकरला पोलिसांनीं पकडल्याची बातमी वाचायला मिळाली. एका अर्थी त्याचा जीव निश्चित झाला. शंकर सारी रात्र नापत्ता होता कीं काय, आपण मोटर घेऊन गेल्यामुळं आणि आपली चुकामुक झाल्यामुळं तो पकडला गेला कीं काय अशी जी शंका मोहनच्या मनांत आली होती ती वर्तमान पत्रांतील हकिकत वाचल्यानंतर दूर झाल्यामुळंच त्याला एक प्रकारें समाधान वाटलं. खिडकींतून उडी टाकल्याबरोबर खालीं असलेल्या पोलिसांनीं त्याला पकडलं होतं—इतकंच नव्हें, तर त्याला पकडण्याची पोलिसांची जी धांदल उडाली त्याचमुळं मोहनला पळून जातां येणं सुलभ झालं होतं. पोलिसांकडून पकडला जात असतां शंकरनं ज्या गोळ्या झाडल्या त्यांनीं दोन पोलिस ठार झाल्यामुळं खून, दरवडा, घरफोडी या आरोपावर त्याच्यावर खटला भरण्यांत आला होता.

आपल्या घरावर पोलिसांची टेहळणी असेल याची मोहनला कल्पना होती म्हणूनच कांहीं दिवसपर्यंत तो त्या बाजूला फिरला सुद्धां नाहीं. त्याच्या आणि त्याच्या बापाच्या चेहेऱ्यांत विलक्षण साम्य असल्यामुळं कांहीं दिवसपर्यंत तरी कुठं तरी दडी मारून रहाणं अवश्य आहे असं त्याला वाटलं.

शंकरचा खटला सुरू झाला. त्या खटल्यांतील जबानी देतांना त्यानं मोहनला मोठ्या कौशल्यानं आपल्या या घाडसापासून बेमालूम वगळायचं ठरवलं होतं. दरवड्याच्या वेळीं त्याच्याबरोबर असलेला माणूस कुणीतरी निराळाच होता असा त्यानं समज करून दिला. पोलिसांनीही त्याला त्या वेळीं चांगलसं हेरलं नव्हतं. शिवाय मोहनवर पोलिसांचा डोळाही नव्हता. अर्थात् या खटल्यांतून तो अचानक वगळला गेला.

अर्थातच त्याला धीर आला आणि तो उघडपणें आपल्या रहात्या जागेंत येऊन राजरोसपणें राहूं लागला. तो पुनः घरीं येऊन राहिला त्या-वेळीं त्याला असं दिसून आलं, कीं पोलिसांनीं त्याच्या घराची कसून झडती घेतली होती. ते बापलेक सदोदित सावधगिरीनं वागत असल्यामुळं पुराव्याला उपयोगी पडेल असं कांहीं मुद्धां त्या झडतींत पोलिसांना सांपडलं नव्हता.

शंकरचा खटला पुष्कळ दिवस चालला होता. केशवलालच्या मदतीनं पोलिसांना त्याच्यावर निरनिराळ्या गुन्ह्याचे आरोप शाबीत करणं लभ झालं होतं.

एकामागून एक खटले चालत होते आणि त्या प्रत्येक खटल्यांत त्याला शिक्षा दिली जात होती. त्याच्या वाट्याला जी एक शिक्षा आली होती त्या शिक्षेत इतर साऱ्या शिक्षांची तोंडमिळवणी आपोआप होत होती आणि ती म्हणजे पोलिसांचा खून केल्याबद्दल फांशी जाणं.

फांशीची शिक्षा झालेल्या माणसाला दयेची याचना करणं शक्य असतं पण तो कमकुवतपणा त्यानं दाखवला नाहीं. एका दृष्टीनं तो मोठा भावनाप्रवण माणूस होता. आपल्यावर पुरावा शाबीत होत आहे असं पहातांच बचाव करण्याचं धोरण त्यानं मुळींच सोडून दिलं. बचाव करण्याचा प्रयत्न करावा, तो यशस्वी होऊं नये आणि शेवटीं कुत्र्याच्या मोतीनं मरावं त्यापेक्षां मर्दाप्रमाणें गुन्हे कबूल करून फासावर चढणं त्याला जास्त अभिमानाचं वाटलं.

मात्र या प्रत्येक खटल्यांत मोहनचं नांव कुठंही न येण्याची त्यानं

खबरदारी घेतली होती. केशवलालच्या वतीनं पोलीसांना मदत करतांना भिकूनंसुद्धां मोहनला हिशेबांत घेतलं नाहीं. पहिल्यापासूनच मोहन शंकर-पेक्षां जास्त सावधगिरीनं वागत असे. बापाची चूक कुठं होते याची त्याला अचूक कल्पना असे. रामलालच्या सांगण्यावरून शेवटच्या घटकेला स्वरूप-चंदाच्या घरीं जाण्यासाठीं निघतांना जेवढया मर्यादेनं त्यानं बापाला सावध केलं होतं तेवढयाच मर्यादेनं इतर वेळींही तो त्याला धोक्याची सूचना देत असे,पण अविचारी शंकरनं ती कधींच मनावर घेतली नव्हती. पहिल्यापासूनच त्यानं प्रत्येक गोष्ट अविचारानं केली होती. त्यांत यश येत गेल्यामुळं यशस्वितेचं साधन म्हणजे अविचार असाच त्याचा समज झाला होता. असल्या कामीं कुणाचीहि दयामाया बाळगणं योग्य नाहीं असं शक्य तेवढया बेताबातानं मोहन ज्यावेळीं सुचवी त्यावेळीं शंकर म्हणूनच तें मनावर घेत नसे. त्याचंच प्रायश्चित शेवटीं त्याला मिळालं.

फाशीची शिक्षा दुसऱ्याच दिवशीं अमलांत येणार होती. शेवटची इच्छा काय आहे म्हणून शंकरला विचारण्यांत आलं त्या वेळीं नित्याच्या मगरुरीप्रमाणें तो म्हणाला, " माझी शेवटची इच्छा ? कोण तुम्ही माझी शेवटची इच्छा पुरवणार ! आणि काय तुम्ही माझी शेवटची इच्छा पुरव-णार ! माझ्या साऱ्याच इच्छा अतृप्त राहिल्या आहेत. माझं आयुष्य संपलं आहे. आतां त्या पुऱ्या होणें शक्य नाहीं. कुणी त्या पुऱ्या कराव्या असंही मला वाटत नाहीं. या उभ्या जगांत माझं म्हणायला माझ्या मुलाखेरीज दुसरं कुणी नाहीं—" दुर्गाबाईची आठवण होऊन क्षणभर त्याची जीभ अड-खळली. आपल्या वंशांत भर टाकणारा एकादा जीव जन्माला येऊन तो आज दहा वर्षांचा झाला असेल—तो मुलगा असेल कीं मुलगी असेल याचीही कल्पना नव्हती—आयुष्यांतला तो इतिहास त्यानं अगदीं पुसून टाकला होता. म्हणूनच एक क्षणभर थांबून तो म्हणाला, "एकच माझा सोबती, माझा मुलगा— बरं झालं कीं त्याला मी माझ्या या भानगडीपासून दूर ठेवला. मरण्यापूर्वी माझी एकच इच्छा—फासावर चढण्या पूर्वीची रात्र त्याच्या सहवासांत घालवावी—सारी रात्र—अगदीं एकांतांत ! "

त्याची मागणी कबूल करण्यांत आली. त्या रात्रीं मोहन ज्यावेळीं शंकरच्या कोठडींत आला त्या वेळीं तो निधड्या छातीनंच आला. शंकरच्या मनाचीही तयारी झाली होती. त्यांना एकांत देण्यांत आला होता खरा पण त्यांच्यावर टेहळणी रहाणार याची त्या दोघांनाही कल्पना होती.

आपल्या पूर्वाश्रमींच्या कोणत्याच हकिकती यापूर्वी शंकरनं मोहनला सांगितल्या नव्हता. मोहनला कळूं लागल्या पासून शंकरचं जें स्वरूप त्यानं पाहिलं होतं तें असंच होतं.

त्या कोठडींत पाऊल टाकतांच मोहनच्या मनावरचा ताबा ढिला झाल्यावाचून राहिला नाही. त्याला एकदम रडूं कोसळलं नाहीं पण त्याचे डोळे ओले झालेले पहातांच शंकर म्हणाला, " मी तुला इथं कां बोलावलं कळलं ? मी फासावर चढणार—उद्यां या जगांतून नाहींसा होणार म्हणून मला पाहून बायकांसारखीं टिपं गाळायला मी तुला बोलावलं नाहीं. माझ्या मागं रडण्यासाठीं कुणीतरी आहे याची खात्री मरायच्यापूर्वी करून घेण्यासाठींही मी तुला बोलावलं नाहीं. मी तुला एकच गोष्ट सांगतों—"

एक क्षणभरच शंकरनं आपलं मन सावरून घेतलं जुन्या आठवणींचे इतिहास नजरे समोर आल्यामुळं त्याचं निधडं काळिज क्षणभर हादरून गेलं होतं.

तो म्हणाला, "एक गोष्टच सांगतो. घाबरूं नकोस—ही अशीच एक दंतकथा आहे. आपल्या गांवची कथा आहे ही. ती कथा तूं ऐकलीस तर तुझं सारं आयुष्य बदलून जाईल—" पुनः एकदां त्यानं आपलं मन आवरून घेऊन बोलायला सुरवात केली, " ऐक-तीस वर्षे झालीं. आपल्या शरणगावांत एक मोठा भगवत्‌भक्त ब्राम्हण होता. ईश्वराचं भजन पूजन करीत सुखासमाधानांत काळ कंठीत होता. त्याची वाडिलोपार्जित जी कांहीं इस्टेट होती. ती संसार चालवायला त्याला पुरेशी होती. शक्तीप्रमाणें त्यानंच परक्यावर तो उपकार करीत होता. दुःखी जीव दिसला, कीं स्वतःच्या सुखाकडे तो पहात नसे. जें हातीं असेल तें देऊनं त्याचं दुःख निवारण

करीत असे—कित्येक वर्षं असंच चाललं होतं. त्या चांगुलपणाच्या पायीं त्याची सारी दौलत खलास झाली. तो दरिद्री झाला. पण त्या दारिद्र्याच्या वेळीं कुणी त्याची दया केली नाही. ज्यांच्यावर त्यानं उपकार केले होते तेच त्याच्यावर उलटले—" त्या आठवणीनं त्याच्या मुद्रेवर आत्यंतिक त्वेषाची भयानक छाया सळसळत असल्याचें मोहनला दिसलं. तो पुढं म्हणाला, "असंच चालत असतं या जगांत. कृतघ्नाच्या नीचपणामुळंच हें जग बुजबुजलं आहे. या सडलेल्या जगाला पाहून त्याला शिसारी आली. जगान लाथ मारून त्याला घालवलं. कांहीं दिवसपर्यंत त्या लाथा खाऊनसुद्धां तो स्वस्थ राहिला होता. पण एके दिवशी त्याच्या हृदयांतला स्वाभिमान जागा झाला. जगानं लाथ मारली याचेच त्याला उपकार वाटले. तसं कां वाटलं त्याला माहीत आहे ? पुढं जगाला त्याच्या लाथा खायच्या होत्या ! "

पुन: तो क्षणभर स्वस्थ राहिला. अंत:करणांतल्या एका कोवळ्या भावनेला जाग आली होती. ती भावना बळेंच दडपून टाकून तो म्हणाला, " एक मुला, त्याची बायको मोठी सालस होती— मोठी साध्वी होती. ती देखील मोठी ईश्वरभक्त होती. मूळचीच ती भाविक—त्यांतून त्या नवऱ्याच्या सहवासानं तिच्या वृत्तीला उत्तेजन मिळालं होतं. ती देखील मोठी परोपकारी होती— जग त्याच्यावर उलटलं त्या वेळीं तो वाघासारखा चिडून उठला पण तिला चीड आली नाहीं. तो निर्भय होता— पुण्याप्रमाणेंच पापालाही भीत नव्हता— पण ती पापभीरू होती. स्वत:च्या सावलीलासुद्धां भीत असे ती ! त्याचीच माणसं त्याच्यावर उलटलीं. एका काळ रात्रीं त्याचे डोळे उघडले—त्याला प्रकाश दिसला— तिलाही तो प्रकाश दिसला— त्यानं डोळे उघडून बाहेर पाहिलं पण ती डोळे झांकून अंत:मुंख झाली. त्याचं अंत:करण खळबळून उठलं— पण ती मात्र शांत राहिली— " पुन: तो क्षणभर स्तब्ध राहिला. या वेळीं अंत:करणांत चालत असलेला खळबळाट आवरणं त्याला कठीण जात होतं असं मोहनला वाटलं. एक आवंढा गिळून तो म्हणाला, " जगापुढं जो मान वाकवतो

त्याला जग लाथा मारतं पण जो लाथ मारतो त्याच्यापुढं जग नाक घासतं, हें जेव्हां त्याला कळलं त्याच क्षणाला तो बदलला. त्याचं काळीज दगडाचं झालं. त्याची काया वज्राची झाली. त्या एकाच क्षणांत त्या महान् सज्जनाचं महान् बदमाषांत रुपांतर झालं."

आतां मात्र त्याच्या मनावरचा ताबा सुटला. तो म्हणाला, "तेव्हां-पासून मी नीति सोडली— धर्म सोडला— पापापुण्याची कल्पना सोडली— घर सोडलं आणि ती घरवालीही सोडली. एकलंस. त्यामुळंच मी सुखी झालों— श्रीमंत झालों! अजून उणीव आहे! ती उणीव भरायला आतां अवधी नाहीं. पण मी मरणाच्या दारीं उभा आहे. तुला जर जगायचं असेल तर असा हो! माझ्या सारखा—— माझ्यापेक्षां जास्त कठोर— माझ्या-पेक्षां जास्त भयंकर— माझ्यापेक्षां जास्त कर्तबगार हो. माझ्या हृदयांत थोडा ओलावा राहिला. त्यामुळं भलत्या वेळीं माझं मन पाझरूं लागलं. हृदयाचं दार थोडं किलकिलं राहिलं, त्यामुळं हळुच आंत लपून बसलेला सज्जनाचा तिळाएवढा जीव हळूच डोकावून पाहूं लागला. हृदयाचं दार तूं बंद करून टाक. मोठं वाईट आहे हें हृदय. हृदय असलं तर माणूस जगतो म्हणतात. पण मला वाटतं, हें हृदयच माणसाला दगा देतं— हृदयाच्या धडधडीनं त्यानं उभारलेले उंच मनोरे कोसळून पडतात. म्हणूनच म्हणतों, हें हृदयच मुळीं काढून टाक. संस्कार मोठा वाईट आहे. देव नांवाचा कुणी एक सैतान आपल्या भवितव्याचीं सूत्रं चालवतो असा संस्कार आम्हा लोकांच्या रक्ताला खिळून गेला आहे. तो संस्कार तोडून झोडून उखडून टाक. देवाचं नांव सुद्धां घेऊं नकोस. देवाच्या भीतीनं माणसं पांगळीं बनतात. देवाच्या मोठेपणाच्या खोट्या कल्पनेनं स्वतः लहान होतात— मोठेपणा हिरावून बसतात. म्हणून म्हणतों, देवाचं नांव पुसून टाक. माया-ममता झुगारून दे. माझा मोहन सवाईशंकर झाला आहे असं मी जिथं कुठं असेन तिथं मला दिसूं दे. बोल, होशील असा?"

मोहननं होकारार्थी नुसती मान हलवली. त्याच्या जिभेवरचा शब्द बापाच्या भाषणाच्या जळजळाटानं विरघळून गेला होता.

" ऐकलंस ? " शंकर गंभीरपणें म्हणाला, " बापाच्या मरणाचा— नव्हे खुनाचा सूड घे ! विश्वासघात झालाय— तो विश्वासघात कुणी केला, कां केला, त्याचा पत्ता लाव. त्या विश्वासघात करणाराला हुडकून काढ. त्याचा सूड घे. आतां बापाला विसरून जा. सामान्य नाहीं तुझा बाप. तो मरणार नाहीं. गीता आठवते तुला ? त्यांत कृष्णानंच सांगितलंय अर्जुनाला, कीं शठाचं शाठय मी म्हणून. तोच मी. मी मरणार नाहीं. चिरंजीव होणार आहें मी !– तोच तूं– माझा चिरंजीव– नव्हे, चिरंजीव झालेला मी तोच तूं. जिथं तूं जाशील तिथं तुझ्या पाठीशीं मीं आहें. जा, यशस्वी हो ! "

मनाचा उद्वेग मोहनला यावेळीं अनावर झाला. हा वेळपर्यंत दाबलला हुंदका त्याचं निधडं काळीज फोडून बाहेर निघाला आणि ओक्साबोक्शीं रडत त्यानं बापाला कडकडून मिठी मारली.

"वेडा आहेस !" त्याचे डोळे पुशीत मोठ्या वात्सल्यानं हंसत शंकर म्हणाला, "वाघाच्या बच्च्याच्या डोळयांत अशी मेंढराचीं आसवं शोभत नाहींत—"

डोळे पुसून मोहननं शंकरकडे पाहिलं. क्षणभर उत्पन्न झालेला अनावर उद्वेग फेकून देऊन तो आतां कठोर बनला होता. शंकरच्या डोळ्यांत चमकणारं निर्भयपणाचं तेज शतगुणित होऊन आतां त्याच्या डोळ्यांतून ओसंडत होतं.

त्याची ती मुद्रा पाहून शंकरला आनंद झाला. त्याला हृदयाशीं कवटाळून धरीत तो म्हणाला, "आतां आणखी एकच शब्द—माझी शेवटची आज्ञा--प्रसंगी वाटेल त्याच्यावर विश्वास ठेव पण कोणत्याही स्त्रीवर केव्हांही विश्वास ठेऊं नकोस. मग ती आई असो, बहीण असो, बायको असो, मुलगी असो कीं—कीं एकादी रखेली असो–जिवाची जिवलग असो. 'देव देव' म्हणून जो काय म्हणतात तो या बायकांच्या आसवांतून जागा होतो. त्यांचं तोंडसुद्धां पाहूं नकोस. तो देव नांवाचा सैतान स्त्रीच्या डोळ्यांत लपून बसलेला असतो. नजरेला नजर भिडली, अंतःकरण हळवं झालं, कीं

एकदम तो तिच्या डोळ्यावाटे तुझ्या डोळ्यांत शिरेल—तुझ्या काळजाची पकड घेईल आणि मग तूं दुबळा बनशील. म्हणून म्हणतों, देव पत्करेल पण स्त्रीपासून दूर रहा—जा आतां—" असं म्हणून त्यानं मोठ्या निर्धारानं त्याला आपल्या कोठडीबाहेर लोटून दिलं.

मोहन तिथंच कोठडीबाहेर उभा राहिला होता. कुणातरी एका भटजीला घेऊन जेलर कोठडींत गेला. तो भटजी आणि त्याच्या हातचं गीतेचं पुस्तक पहा-तांच शंकरच्या अंगाचा भडका झाला. एक ठोसा लगावून त्यानं त्या भट-जीला खोलीबाहेर घातलं. तो ओरडला, "कुणासाठीं ही गीता ? पापाचं प्रायश्चित करणारासाठीं ! पश्चात्तापी जीवासाठीं ! मला पश्चात्ताप झालाय असं तुम्हांला वाटलं ? मर्द आहें मी. मर्दासारखा फासावर चढेन—मर्दा-सारखा हें जग सोडून जाईन. मला गीताही नको आणि गीताकारही नको. चला मला घेऊन."

पोलिसची तुकडी आली. त्यांनीं त्याच्या हातांत बिड्या घालून त्याचे हात मागं जखडले. संगीनीच्या पहाऱ्यांत तो कोठडीबाहेर पडला. वाट पहात असलेल्या मोहनकडे त्याची दृष्टी गेली. त्याला वाटलं, मोहनचा डोळा पाझरतो आहे. रागानं डोळे वटारून त्यानं मोहनकडे पाहिलं.

मोहन सावध झाला—ध्यानावर आला. मागंपुढं असलेल्या संगिनीच्या पहाऱ्यांत लढाईवर निघालेल्या वीराप्रमाणें दणदण पावलं टाकीत फांसावर चढण्यासाठीं शंकर निघाला होता. मोहन तुरुंगाबाहेर ज्या वेळीं पडला त्याच-वेळीं शंकरचा आत्मा या नश्वर देहाला सोडून कुठंतरी निघून गेला होता.

---

## ११

नित्याप्रमाणें गीतापाठ सुरू होता. हा सार्वजनिक गीतापाठ नव्हता. कुमार आणि लता या दोघांनाही दुर्गाबाई स्वतंत्र रीतीनं गीतेतील प्रत्येक श्लोक समजावून सांगत असे, निरनिराळ्या भाष्यकार आणि टीकाकारांनीं प्रदर्शित केलेलीं मतं विवेचून दाखवीत असे, तो हा गीतापाठ असे. हे

गीतेचं विवचन केव्हांही यथार्थदीपिकेच्या द्वारेंच चाले. शेवटच्या अध्यायांतील अगदीं शेवटच्या श्लोकांचं विवेचन चालू होतं.

दुर्गाबाई वाचीत होती, " अर्जुन म्हणे जी अच्युता। मोह माझा गेला पुरता ! स्मृति पावलों तत्वता। प्रसादें तुझिया ॥ करीन तुझें वचन। करीन कौरवांचे कंदन। म्हणूनि म्हणे अर्जुन--- "

" म्हणजे ?" कुमार म्हणाला," अर्जुन आतां आपल्या गुरुजनांना अन् भाऊबंदांना मारणार तर ? "

" होय ! " दुर्गाबाई गंभीरपणें हंसत म्हणाली, " हीच भगवंताची शिकवण. गुरुजनांना तो कां मारणार ? परित्राणाय साधूनाम्— विनाशायच दुष्कृताम्—धर्मसंस्थापनार्थाय आपपर भाव पहायचा नाहीं- नातगोतं पहायचं नाहीं. सज्जनांच्या संरक्षणासाठीं दुर्जनांचा नाश होणं अवश्य असतं आणि दुर्जनांचा नाश झाल्याशिवाय धर्मसंस्थापना होणार नाहीं. मैयेव ते निहत: सर्व पूर्वे, असं भगवंतांनीं आधींच नाहीं कां सांगितलं आहे ? निमित्तमात्र भव सव्यसाचिन् स्वत:च्याच कर्मानं दुर्जन स्वत:चाच नाश करून घेतात तीच भवितव्यता. त्या भवितव्यतेप्रमाणें---भगवंताच्या इच्छेप्रमाणें---त्यांचा नाश तत्वत: झालेलाच असतो, पण प्रत्यक्ष त्यांचा निरास करण्यासाठीं कुणीतरी निमित्तमात्र व्हावा लागतो. प्रत्यक्ष दुर्जनांचा नि:पात करणारा निमित्तमात्र—बऱ्या वाईटाचा अधिकारी असा जो कुणी व्हायचा तोच तूं हो. मी त्यांचा पूर्वीच नि:पात केला आहे असं भगवंतांनीं अर्जुनाला जेव्हां सांगितलं तेव्हांच गुरुजनांवर सुद्धां शस्त्र उचलायला अर्जुन तयार झाला. संभवामि युगेयुगे ! युगे युगे कां ?—प्रत्येक घडीला—प्रत्येक क्षणाला ईश्वर अवतार घेतो आहे. क्षणाक्षणाला जीव जन्म पावताहेत तेच हे ईश्वराचे अवतार. प्रत्येक जीव ईश्वराचा अंश आहे, त्या प्रत्येक जीवाचं हें कार्य आहे, हेंच भगवंतांनीं अर्जुनाला सांगितलं. म्हणूनच अर्जुन म्हणाला, नष्टो मोह: स्मृतिर्लब्ध्वा. मनुष्यपणाचा मोह गेला— ईश्वरी स्मृति जागी झाली—त्या ईश्वरपणाच्या कर्तृत्वानं जीवपणाचा

माझेपणा टाकून—हे माझे आजे, हे माझे गुरु, हे माझे भाऊ हा मोह टाकून धर्मसंस्थापनेसाठीं, जगत्कर्ता ईश्वर मी या भावनेनं तो आप्तस्वकीयांच्या नाशाला—दुर्जन असलेल्या, सज्जनांचा छळ करणाऱ्या, दुसऱ्याचं सर्वस्व हिरावून घेणाऱ्या, जीवाचं अनादि स्वातंत्र्य हिरावून दुसऱ्यांना गुलामगिरींत बळेंच घालूं पहाणाऱ्या दुर्जनांना—ते आपले आहेत खरे पण दुर्जन आहेत हें म्हटल्यानंतर आपलेपणा विसरून—त्यांचा दुर्जनपणा हिरेवीं घेऊन त्यांचा नाश करून धर्मसंस्थापना करण्यासाठीं अर्जुन पुढें सरसावला— ”

“ आप्तस्वकीयांचा नाश करून ? ” लतेनं विचारलं.

इतकं विवरण करून सांगितलं असतांही पुनः लतेनं तो प्रश्न केला म्हणून दुर्गाबाईला आश्चर्य वाटलं. ती म्हणाली, “होय, आप्तस्वकीयांच्या नाशानंच--कां ?”

“ कुंती ज्ञानी होती का ?” लतेनं विचारलं

“ हो !” असं म्हणतांना दुर्गाबाईला क्षणभर विचार पडला.

“दुर्जन आप्तांचा नाश तिलाही हवा होता ना ?” दुर्गाबाईनं नुसता मानेनंच होकार दिला तेव्हां लता पुढं म्हणाली, “मग लढाई करूं नको असं सांगायला ती कर्णाकडे कां गेली ? इतकीं वर्षे गुपित ठेवलेलं त्याच्या जन्माचं रहस्य सांगून लढाईत पडूं नकोस असं ती कर्णाला कां म्हणाली ?”

दुर्गाबाई क्षणभर विचारांत पडली. त्या प्रश्नाचं उत्तर देतांना तिला मागल्या पुढल्या पुष्कळ गोष्टींचे पूर्वापार संबंध सांगावे लागले असते. गीतेच्या तत्त्वज्ञानाशी तुलना करून पहातां कुंतीनं केलेला तो अविचार ग्राह्य नव्हता— म्हणूनच ती म्हणाली, “ तें विचारूं नकोस लते—”

“ कां ? ” लतेनं ईर्ष्येनं विचारलं.

“ तो दुबळेपणा होता तिचा. ” दुर्गाबाई म्हणाली, “ तो आईचा दुबळेपणा होता. अत्यंत क्षमाशील अशा आईच्या हृदयाचा तो दुबळेपणा होता. लोकापवादाच्या भीतीनं तिनं कर्णाच्या जन्माचं रहस्य कितीतरी काल उघड केलं नाहीं, पण संहाराचा काल जवळ आला असं जेव्हां तिला

दिसलं, त्यावेळीं तिच्या हृदयांतली आई जागी झाली. आपल्या साऱ्याच मुलांचा नाश होऊं नये असं तिला वाटलं. एका मुलानं दुसऱ्या पांच मुलांच्या घाताला कारणभूत होऊं नये असं तिला वाटलं. हा तिचा मोह होता. पण ' आई 'च्या हृदयाचा अंत अजून कुणाला लागला नाहीं. साऱ्या तत्त्वज्ञानापलीकडची ती भावना आहे! आई– माता– जगन्माता—"

क्षणभर ती स्तब्ध राहिली. डोळे मिटून तिनं क्षणभर विचार केला. त्या प्रश्नाचं उत्तर तिच्या अंत:करणांत स्फुरण पावलं होतं. पण त्या उत्तराचं विवेचन ऐकण्याइतकी तिच्या त्या चिमुकल्या श्रोत्यांच्या मनाची अजून तयारी नव्हती. म्हणून ती म्हणाली, " नको लते, तें विचारूं नकोस. एव्हांच तुला उत्तर देण्याजोगा प्रश्न नाहीं तो."

तितक्यांत घंटा झाली. सार्वजनिक प्रवचनाची वेळ झाल्यामुळं त्या दोन्हीं मुलांना सोडून आपल्या नित्यकृत्यासाठीं ती निघून गेली.

तें कार्य चाललं असतांना तो एकच प्रश्न तिच्या मनांत सारखा घोळत राहिला होता. मनांत चाललेल्या त्या विचारांच्या अनुरोधानंच ती त्या दिवशींचं प्रवचन करीत होती. त्या दिवशीं तिचं मन अत्यंत उद्विग्न झालं होतं. तरीही नित्य क्रमांत चूक घडूं नये म्हणून ती दररोजच्या निष्ठेनं आपला कार्यभाग पार पाडीत होती.

संध्याकाळ झाली—सर्व कार्यक्रम संपले—तो दिवस तिच्या उपोषणाचा असल्यामुळं जेवण करण्याची घाई नव्हती. कुमारसुद्धां तिच्या बरोबरच तिचे सारे उपास पाळीत असे—अर्थात त्यालाही जेवणाची घाई नव्हती. कितीतरी वेळ तो मिशन हाऊसमधें लतेशी खेळत राहिला होता. पाद्रीबाबाही त्यांच्या खेळांत त्यांच्या जोडीनं भाग घेत होता.

त्या दिवशीं तीं दोघंही मुलं मोठीं खुषींत होतीं. देवीकडून खाऊचे पुडे आले होते. त्यांत मुद्दाम कुमारसाठीं म्हणून देवीनं खाऊ पाठवला होता, याचाच कुमारला मोठा आनंद झाला होता.

तो खाऊ घेऊन कुमार घरीं धांवतच आला. सायंपूजा झाल्यानंतर ती नित्याप्रमाणें देवासमोर उभी राहून प्रार्थना करीत होती.

तिची प्रार्थना संपेपर्यंत हातांत खाऊचा पुडा घेऊन कुमार वाट पहात उभा राहिला होता. देवाला नमस्कार करून ती उठून उभी रहातांच कुमार म्हणाला, " आई, आई हें बघ काय ! "

" काय आहे ? " तिनं विचारलं.

" खाऊ पाठवलाय—देवीनं—लतेच्या देवीनं—माझ्यासाठीं—मुद्दाम माझ्यासाठीं पाठवलाय. आंत पत्र लिहिलंय तिनं मला. "

" बरं बरं " दुर्गाबाई म्हणाली, " तूंच खा, म्हणजे मला पोंचला.'

" अहं, तसं नाहीं " कुमार लाडिकपणानं तिच्या गळ्यांत हात टाकीत म्हणाला, " आधीं तूं खाल्ल्याशिवाय मी नाहीं खाणार हा खाऊ. माझी देवी ना तूं ? नैवेद्य नको का दाखवायला तुला ? — "

" होय ना !" दुर्गाबाई हंसत म्हणाली " मग इथंच ठेव थोडासा नैवेद्यासाठीं. मला नैवेद्य दाखवून तूं खा म्हणजे झालं. अजून माझा पाठ व्हायचा आहे. तो झाल्याशिवाय कांहीं खायचं नाहीं मला."

पुड्यांतल्याच एका कागदावर बर्फीचा एक तुकडा ठेवून कुमार निघून गेला. नित्याचा पाठ होईपर्यंत तो तुकडा तसाच राहून गेला होता. पाठ होतांच दुर्गाबाई उठली आणि जाऊं लागली तोंच तिला त्या खाऊची आठवण झाली. मनांतल्या मनांत तिनं देवाला त्या खाऊचा नैवेद्य दाखवला आणि कागदावरचा बर्फीचा तुकडा उचलून तिनं हातांत घेतला.

तोंच तिची नजर त्या कागदावर गेली. तो एक वर्तमानपत्राचा तुकडा होता. त्या तुकड्यावर तिला शंकरचा फोटो दिसला. बर्फीचा तुकडा बाजूला ठेवून तिनं तो कागद हातीं घेऊन पाहिला—

शंकरला फाशी दिल्याची ती बातमी होती.

तो कागद तिच्या हातांत तसाच राहिला. ती दगडासारखी तटस्थ झाली. दुःखावेग दाखवण्याचा तो क्षण नव्हता. तिचं मन दगडासारखं झालं होतं. आयुष्याच्या लेखांतून पुसून टाकलेल्या त्या प्रसंगाला पुनः वाचा फुटली होती.

पत्नी या नात्यानं तिचं एक कर्तव्य होतं. लोभाचा मोह—नात्याचं बंधन—सहवासाचा जिव्हाळा आतां मुळींच राहिला नव्हता. पूर्वजन्मींच्या आठवणीसारखी ती एक अंधुक अस्फुट अशी कांहीं तरी स्वप्नमय आठवण होती. ती आठवण जागी होतांच क्षणभर तिच्या हृदयाला धक्का बसल्यावांचून राहिला नाहीं.

पण तो धक्का क्षणिक होता—अगदीं स्वप्नमय वाटण्याइतका क्षणिक होता. त्या धक्क्यानं तिचं अंतःकरण हादरलं नाहीं. एक कांहीं तरी विशिष्ट स्थिती होती आणि ती आतां लोप पावली, एवढंच तिला वाटलं. शरदृतूंत सूर्यावरून सहज निघून जाणाऱ्या ढगाप्रमाणें तिच्या हृदयाकाशांत एक क्षणभरच तिचा आत्मा झांकुळला गेला.

आतां तिची वृत्ती स्थितप्रज्ञाची होती. सुखदुःखाच्या धक्क्या पलीकडे ती जाऊन पोंचली होती. म्हणूनच या सकृद्दर्शनीं अत्यंत महत्वाच्या वाटणाऱ्या प्रसंगामुळं तिच्या मनःस्थितींत कसलाच फरक झाला नाहीं.

मुकाट्यानं ती बाहेर गेली. बाहेरच्या मंडपांत असलेल्या श्रीकृष्णाच्या मूर्तीसमोर तिनं आपलं सौभाग्यपूर्ण मस्तक शेवटचं टेकून घेतलं.

तिच्या मनाच्या आवेगाचा आतां मागमूस सुद्धां राहिला नव्हता. हातांतल्या बांगड्या तिनं वाढवून टाकल्या—गळ्यांतील मंगळसूत्र तोडून टाकलं—कपाळचं कुंकू तसंच पुसलं आणि तितक्यांच गंभीर शांत वृत्तीनं स्नान करून ती घरांत आली.

शंकरच्या फांशीची खबर शरणगावांत आली होती. पण कुणी ती तिच्या कानीं जाऊं दिली न व्हती. प्रत्येक जण ती बातमी तिला सांगायला भीत होता. कुठून ना कुठून तरी, कव्हांना केव्हांतरी ती बातमी तिला कळेल या अपेक्षेनं तिच्या जवळ येणारीं माणसं त्या गोष्टीचा उल्लेख करीत नव्हती.

गांवचे कुटाळ लोक जें बोलायचं तें बोलत होते. पण असल्या गांवकुटाळक्या तिच्या कानीं केव्हांच पोंचत नसत. गांवांत ती कुठंच जात नसे. कुणाशींच संबंध ठेवीत नसे, त्याचाच हा परिणाम होता.

पाद्रीला सुद्धां ही हकिकत कळली होती. पण तेवढयाच सुहृद्भावनेनं त्यानं त्या गोष्टींचा उल्लेख केला नव्हता.

दुर्गाबाईच्या बाह्यस्वरूपांत झालेला फरक दुसऱ्या दिवशीं सर्वांच्या ध्यानीं आला. पण कुणीच त्याचा उल्लेख केला नाहीं. ती स्वतः त्या बातमीचा उच्चार करीपर्यंत या संबंधीं तिच्याजवळ बोलण्याचं धैर्य कुणालाच होत नव्हतं.—

आणि ती कांही बोलत नव्हती. कांहींच झालं नाहीं असं समजून तिचे सर्व व्यवहार चालले होते.

कुमारच्या कानीं यापैकीं कांहींच गेलं नाहीं. या क्षणापर्यंत कुमारला आपल्या बापाच्या अस्तित्वाचीसुद्धां कल्पना नव्हती. शाळेतील मुलं कुज-बुजूं लागलीं होतीं. लतेच्या कानीं ती बातमी गेली. तिनं पाद्रीला सांगितलं.

या बातमीच्या बाबतींत कुमार पूर्ण अंधारांत आहे असं पाहून कुमा-रला बाजूला घेऊन पाद्रीबावानं सारी हकिकत त्याला सांगून टाकली. ती सांगतांना त्याला मोठे कष्ट होत होते. जें कुमारच्या आईलाही सांगतां आलं नाहीं तें सांगण्याचा दुर्धर प्रसंग त्याच्यावर आला होता. शक्य तितक्या सौम्य भाषेत—पितृवात्सल्याच्या पोक्तपणानं त्यानं त्या प्रसंगाची कुमारला जाणिव करून दिली. दुर्गाबाई या प्रकरणीं कांहींच बोलली नाहीं असं ज्या-वेळीं त्याला कळून आलं, त्यावेळीं या बाबतींत आपल्या आईजवळ कसलाच उल्लेख करूं नकोस असं पाद्रीनं कुमारला सांगितलं. कुमार तितकाच सम-जुतदार मुलगा होता. खरं पाहिलं तर त्याच्या मनावर परिणाम व्हायला कांहीं कारणच नव्हतं. आपला बाप कुठंतरी आहे याचीसुद्धां त्याला कल्पना नव्हती—तरीही क्षणभर त्याच्या मनावर परिणाम झाल्यावाचून राहिला नाहीं.

तिकडे मुंबईला मोहनच्या मनावर मात्र आपल्या बापाच्या मृत्यूचा—त्याच्या समजाप्रमाणे खुनाचा— विलक्षण परिणाम झाला होता. सूडाच्या भावनेनं तो सारखा पेटत होता. तो सूड उगवण्याचा मोका हाताजवळ असतांना सुद्धां त्यानं कांहीं काळ जाऊं दिला.

खरा विश्वासघातकी कोण याचा निश्चित अंदाज त्याला येत नव्हता. प्रत्यक्ष पुराव्याच्या दृष्टीनं पहातां रामलाल काय तो तेवढाच पुढं आला होता. पण शंकर फांशीं गेल्यानंतर रामलाल जो नाहींसा झाला त्याचा पत्ता कुठंच लागेना.

रामलालच्या मागं भिकूची कारवाई होती आणि त्या भिकूचा सूत्र-चालक केशवलाल होता. रामलाल नाहींसा झाल्यामुळं त्या प्रकरणांतले हे धागेदोरे तिथल्या तिथंच तुटले होते.

आतां मोहनला जो सूड उगवायचा होता तो त्या खटल्यांत साक्षी देणाऱ्या साक्षीदारांवर—ज्यूरीवर—न्यायाधीशावर.

खरं पाहिलं तर हीं सारीं माणसं पूर्णपणें निर्दोषी होतीं. शंकर फांशी जावा म्हणून कांहीं त्यांनीं साक्षी दिल्या नव्हत्या कीं निकाल दिले नव्हते. पण कुणावर तरी सूड उगवल्याशिंवाय मोहनचं समाधान होत नव्हतं.

बापानं टाकलेलं कार्य त्यानं पुढं सुरू केलं. शंकरसारखा तो अवि-चारी नव्हता. तो जितका धाडसी होता तितकाच धूर्त होता. त्या धूर्ततेच्या बळावर त्यानं शंकरच्या खटल्याशीं संबंध असणाऱ्या प्रत्येकाचा बळी घेतला. तो बळी घेतांना जीं कारणं उघडउघड दिसून आलीं तीं स्वाभाविक होतीं. कुणाच्या घरावर दरवडा पडला, त्या चकमकींत त्याचा खून झाला होता, तर कुणाला मोटरचा अपघात झाला होता. कुणी गळफांस लावून आत्महत्या केली असं सकृद्दर्शनीं ठरत होतं, तर कुणाचा सहज झालेल्या दंग्यांत खून पडला असंही सिद्ध झालं होतं. आपल्या बापाच्या मृत्यूला कारणीभूत होणाऱ्या—मोहनच्या मताप्रमाणें—रामलाल खेरीज इतर साऱ्या व्यक्तींचा जीव घेतल्याचं समाधान मिळाल्यानंतर मोहन शतपट आवेशानं केशवलालशीं सामना द्यायला सिद्ध झाला.

---

# १२

केशवलालच्या आणि मोहनच्या चकमकी झडत होत्या. पण ते दोघेही केव्हांच समोरासमोर आले नव्हते.

त्यांची जी ही लढाई चालली होती ती सारी पडद्याआडून. प्रत्येक जण प्रत्येकावर मात करायला पहात होता— डावावर डाव टाकले जात होते. पण ते डाव कुणावर कोण टाकतो, कसा टाकतो, कुठून टाकतो याचा पत्ता बाहेरच्या जगाला लागत नव्हता

हा हल्ला मोहनच आपल्यावर करीत आहे याची केशवलालला जाणीव होती. शंकर फांशी गेल्यापासून मोहनची नजर आपल्यावर आहे, त्यानं आपल्यावर डूख धरला आहे हें केशवलालला कळत होतं. पण मोहन त्याला कुठंच सांपडत नव्हता. दोघेही बाहेरच्या जगांत मोठे प्रतिष्ठित गृहस्थ म्हणून वावरत होते.

तसं पाहिलं तर, केशवलाल पुढं मोहन म्हणजे एक बच्चा होता. नुकती विशी उलटलेला एक पोर आपल्याला त्राही भगवन् करून सोडतो आहे हें पाहून केशवलालच्या आंगाचा तिळपापड होत होता. ढगाआडच्या विमानाच्या लढाईप्रमाणेंच ही लढाई चालली होती. ढगाआडून गोळीबाराची चमक यावी, क्षणभर दिसून नाहींशी व्हावी पण तिचा परिणाम मात्र जगाला भोगावा लागावा, तसंच हें चाललं होतं. या दोन सैतानांच्या डावांना निरु-पद्रवी माणसं अकारण बळी पडत होतीं.

जुगाराच्या अड्ड्यांत मोहनला पाहिल्यापासून सुंदरीचं मन बेचैन झालं होतं. शंकर फांशीं गेल्यानंतर मोहन त्या खटल्यांतून अजिबात निस-टला--त्या खटल्याशीं मोहनचा संबंधही आला नाहीं हें कळतांच सुंदरीला आनंद झाला.

ती मोहनचा तपास करूं लागली. अचानक केव्हांतरी सिनेमा थिए-टरांत तो तिच्या दृष्टीला पडे. पण त्यानं कधीं तिच्याकडे ढुंकूनही पाहिलं नाहीं कीं ओळखही दाखविली नाहीं.

त्याला ओळख दाखवण्याचा तिनं कित्येक वेळ प्रयत्न केला, पण त्यानं तिरस्कारानं तिला झिडकारून लावलं.

केवळ बापाच्या मरणकाळच्या उपदेशामुळंच नव्हे, तर स्वतःच्या मनःप्रवृत्तीला अनुसरून तो स्त्रीजातीपासून दूर रहात असे. एकच ध्येय त्यानं पुढं ठेवलं होतं. तें ध्येय म्हणजे केशवलालचा निःपात करणं आणि त्याबरोबरच वाटेल त्या मार्गानं भरपूर पैसा मिळवणं. बायकांच्या नादीं लागल्यामुळं केशवलालला केव्हां केव्हां कसा गोता खावा लागत असे हें त्याच्या नजरेला आल्यामुळं तो आणखी सावध झाला होता.

तो एकटाच रहात असे. एकटयाचा कां होईना, पण संसार त्यानं कधीच थाटला नाहीं. सार्वजनिक दृष्टया प्रख्यात अशी याची रहाण्याची जागा एकच असली तरी मुंबईतल्या निरनिराळ्या विभागांत त्याचीं निरनिराळीं स्थानं होतीं. जरूरीप्रमाणें त्या त्या भागांत राहून तो आपल्या कारवाया करीत असे. पण त्याचा पत्ता लागायचा तो मात्र त्याच्या मुख्य ठिकाणींच.

कापूस बाजारांतला तो एक मोठा खिलाडू होता. कापसाचा सट्टा खेळण्यांत त्याचा हात धरणारा मुंबईच्या बाजारांत कुणीच नव्हता. या खेळांत त्यानं लाखों रुपये कमावले होते आणि गमावलेही होते. केशवलालशीं त्याचा उघडउघड सामना होई तो याच क्षेत्रांत.

पण त्या खेरीज जीं इतर क्षेत्रं होतीं त्या क्षेत्रांतले सामने मात्र पडद्याआड चालत असत. या क्षेत्रांत तो स्वतः जातीनं वावरत असे. केशवलालचं तसं नव्हतं. या अंधारी व्यवहारांत त्याची जागा भिकूशेट चालवीत असे. कधीं पकडला जाण्याचा प्रसंग आला तर अचानक सुटून जायला ती—माळ भिकूच्या गळ्यांत घालणं सुलभ जाईल असं वाटल्यामुळं तो या भानगडींत स्वतः गुंतत नसे.

भिकूलाही याची जाणीव होती, आणि म्हणूनच तो परिस्थितीचा फायदा घेऊन केशवलालकडून वेळोवेळीं पैसे उकळीत असे. या कामीं केशवलाल सदोदित हात मोकळा सोडीत असल्यामुळं भिकूलाही असलं तें जोखीम घेण्याची पर्वा वाटत नसे.

मोहनला कुठून तरी पेचांत आणायचा केशवलालचा प्रयत्न भिकूच्या करवीं सुरू झाला होता. पण मोहन इतका हुषार होता, कीं तो कधींच त्यांच्या जाळयांत सांपडला गेला नाहीं.

एके दिवशीं बाळाराम स्ट्रीटवरून मोहन जात असतां एका बाईला कांहीं मवाली अडवीत आहेत असं त्याला दिसून आं. एक क्षणभरच त्यानं विचार केला. पण भूतदया त्याला राहूं देईना. पुढं होऊन त्यानं त्या मवाल्यांच्या हातून त्या बाईची मुक्तता केली.

कृतज्ञतेनं भारून जाऊन त्या स्त्रीनं त्याचे आभार मानून आपल्या घरीं पायधूळ झाडण्याची विनंती केली. एक क्षणभरच मोहनला आपल्या निश्चयाचा विसर पडला. तारुण्याच्या स्वाभाविक परिणामानं एक क्षणभरच त्याचं मन डळमळलं आणि त्यानं तिला येऊन भेटण्याचं वचन दिलं.

भायखळयाच्या रस्त्यावरील एका सामान्य वस्तींतल्या चाळींत ती रहात होती. तिनं दिलेल्या पत्त्याप्रमाणें एके दिवशीं मोहन तिच्या घरीं गेला. मोठ्या आदरानं तिनं त्याचं आदरातिथ्य केलं.

मोहनला असं दिसून आलं कीं ती एक वेश्या होती. दारिद्र्याच्या पायीं तिला देहविक्रय करणं भाग पडलं होतं.

पहिल्या भेटीला ही हकिकत कळल्यानंतर मोहनला तिची शिसारी आली. पुनः तिच्या घरीं पाऊलसुद्धां टाकूं नये असं त्याला वाटलं. पण त्याच वेळीं त्या तरुणीबद्दल त्याला अनुकंपा उत्पन्न झाली.

त्याला वाटलं, तिचा विचारीचा काय दोष ? वेश्येच्या कुलांत तिचा जन्म झाला नव्हता. कुणी तरी एका उत्तर हिंदुस्थानी माणसानं तिच्या घरांतून तिला पळवून आणून मुंबईला असंच कुणाला तरी विकलं होतं. आपल्यावर कोणत्या प्रकारचा प्रसंग येणार याची कल्पना आल्यामुळं ती त्या कुंटणखान्यांतून पळून गेली होती.

पण पळून जाऊन तरी ती काय करणार होती ? तिला कुणाचा तरी आधार पाहिजे होता. ती एक स्त्री होती— सुंदर होती, नुकतंच तिनं तारुण्याच्या मर्यादेवर पाऊल टाकलं होतं— अशा परिस्थितींत स्वतःच्या पायावर उभं राहून अपंग स्थितींत आयुष्य कंठणं तिला कठीण गेलं. एका गरीब बाईच्या घरीं ती आश्रयाला राहिली. विड्या वळून कांहीं दिवस तिनं आपला चरितार्थ करण्याचा प्रयत्न केला. तितक्यांत ती बाईही आजारी पडली. उपकाराला स्मरून तिची सेवाशुश्रुषा करणं तिला क्रमप्राप्त होतं. पण पैशाशिवाय काय करणार ? पैशाशिवाय कोण औषध देणार ? पैशा-शिवाय कोणता डॉक्टर येऊन तिला पहाणार ? ज्या विडीवाल्याकडे ती विड्या वळण्याचं काम करीत असे तो एक सज्जन माणूस होता— पण तिच्या दुर्भाग्यानं तो तरुण होता— अविवाहित होता. त्याच्या हातांत भरपूर पैसे खेळत होते. म्हातारीच्या शुश्रुषेसाठीं त्यानं मोकळ्या हातानं तिला मदत केली. म्हातारी बरी झाली. पण तिचं मात्र दुर्दैव ओढवलं.

उपकाराच्या जाणीवेनं ती चुरडून गेली होती. म्हातारीनंच प्रस्ताव केल्यावर तिला कठीण गेलं. ती ज्या परिस्थितींत वावरली होती त्या परि-स्थितीमुळं कुणाशीं तरी लग्न करून संसार थाटणं तिला अशक्य झालं असतं असा म्हातारीनंच तिचा समज करून दिला. त्यापेक्षां विडीवाल्यासारख्या सज्जन माणसाच्या आश्रयाला राहून पुढला काळ शक्य तितक्या पावित्र्यानं घालवण्याचा निश्चय करून ती त्या मोहाला बळी पडली.

त्या विडीवाल्याच्या सहवासांत तिचे कांहीं दिवस सुखांत गेले. पण तितक्यांत धंदा करणाऱ्या कांहीं मवाल्यांची तिच्यावर नजर गेली. पुनः पुनः तिला पैशाचं आमिष दाखविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. पण त्या आमिषाला ती बधत नाहीं असं पाहून त्या दिवशीं बळजबरीनं तिला पळवून नेण्याचा जो प्रयत्न त्यांनीं केला त्यांतूनच मोहननं तिला सोडवलं होतं.

ती म्हणाली, “ हा प्रसंग माझ्यावर आला नसता. विडीवाल्याचा आधार असता तर या मवाल्यांनीं मला असं पळवून नेण्याचा धीरच केला नसता. पण माझ्या दुर्दैवानं त्याचं लग्न झालं आणि तेव्हांपासून तो माझ्याशीं

संबंध ठेवीनासा झाला. माझ्या चरितार्थाची त्यानं सोय केली आहे—पूर्वीप्रमाणेंच तो मला दरमहा तनखा देतो—आपल्यामुळं ही पापांत पडली याच्या जाणिवेनं त्याला दुःख होतं म्हणूनच तो मला तनखा देतो. पण तो घेणं माझ्या जिवावर येतं. कां म्हणून मी त्याचा पैसा घ्यावा ? काय सत्ता आहे माझी त्याच्यावर ? माझं मन मला खातं. पण नाइलाजानं मी अजून त्याच्या उपकारावर जगलें आहें. या दुःखांतून मला सोडवाल का ? माझ्या या निराधार स्थितींत मवाली लोक पुनः माझ्यावर हल्ला करतील—कदाचित पोलिसांत माझ्याबद्दल वर्दी देतील—मला कुणाचाच आधार दाखवतां येणार नाहीं आणि शेवटीं एके दिवशीं मला फोरासरोडवर जाऊन पडण्याचा प्रसंग येईल—"

मोहनला तिची दया आली. क्षणभर तो बेसावध झाला. त्याला वाटलं, काय बिघडलं यांत ? आपल्यालाही कुठंतरी आश्रयाला स्थान पाहिजे होतं. हजारों उपद्यापांनीं गांजून गेलेल्या जीवाला कुठल्यातरी जिव्हाळ्याच्या हृदयाचा आश्रय दिवसाच्या चौवीस तासांतील एकाद्या घटकेला तरी हवा होता.

त्यानं तिला कांहींच उत्तर दिलं नाहीं. खिशांत असलेली एक शंभर रुपयांची नोट तिच्या अंगावर फेकून तो जायला निघाला.

तिनं धांवत जाऊन त्याचे पाय घट्ट धरले आणि आपल्या अश्रूंनीं त्याच्या पायांना स्नान घातलं.

तिच्या हातून स्वतःची सुटका करून घेऊन तो निघून गेला खरा पण त्याच्या दगडी अंतःकरणाला तिनं पाझर फोडला होता. मधूनमधून जाऊन तो अचानक तिची भेट घेई, घटकाभर तिथं बसे, कांहींतरी पैसे तिला देई आणि निघून जाई. कधीं त्यानं तिला स्पर्श केला नाहीं कीं तिनंही कधीं त्याच्या गळीं पडण्याचा प्रयत्न केला नाहीं.

या मुग्ध सहवासाच्या बंधनांत दिवसेंदिवस तो गुरफटत होता. त्याची स्वतःची वृत्ती चळली होती. बापाच्या उपदेशाची त्याला विस्मृति झाली होती. अजूनही जरी त्यानं तिला स्पर्श केला नव्हता तरी त्या दयेचं स्वरूप प्रेमांत परिणत होणार कीं काय असं त्याचं त्यालाच वाटूं लागलं होतं.

अजून तो तिच्यापासून दूर होता तो केवळ तिच्या पूर्वेतिहासामुळं. पतितेच्या प्रेमांत पडण्यांत त्याला एक प्रकारची खंत वाटत होती. पण दिवसेंदिवस ती शिसारी नाहींशी होऊं लागली.

एके दिवशीं तो तिच्याकडे आला. एक बहुमोल कंठा आणून त्यानं तिच्या गळ्यांत घातला. तिनं आपले हात त्याच्या गळयाभोवतीं टाकले तोंच त्याला कुणाची तरी चाहूल लागली. समोरच्या पडद्यामागं कुणीतरी अस-ल्याचा त्याला भास झाला

एका सपाट्यासरशीं त्यानं तिला दूर लोटून दिलं आणि खिशांतील पिस्तुल काढून पडद्याच्या रोखानं त्यानं गोळया झाडल्या. एका माणसाची केविलवाणी किंकाळी त्याला ऐकूं आली आणि त्याबरोबरच दुसरा माणूस पळून जात असलेला त्याच्या नजरेला आला.

त्यानं त्याचा चेहरा चांगलाच लक्षांत ठेवला--तो भिकू होता.

पडदा दूर करून त्यानं पाहिलं तों रामलालचं प्रेत त्याला दिसलं. त्याला आनंद झाला. शेवटीं रामलाल सांपडला. आपल्याच हातून त्याला त्याच्या पापाचं प्रायश्चित द्यायचं भाग्य त्याला लाभलं.

पिस्तुल खिशांत टाकून तिच्याकडे वळून मोहन म्हणाला, "यावेळीं मी तुलाही गोळी घालून मारलं असतं. पण मी तुला जीवदान देतों. पण तें एकाच अटीवर--खरं खरं सांग, कुणी नेमलं तुला या कामावर ?"

ती थरथर कांपत होती. तिची बोबडी वळली होती. खिशांतलं पिस्तुल काढून त्यानं तिच्या समोर धरलं आणि पुनः विचारलं, "सांग--कुणी नेमलं तुला या कामावर ?"

"केशवलालनं !--" ती चट्कन बोलून गेली आणि नंतर तिला पश्चात्ताप झाला. त्यानं तिच्या गळयांतल्या कंठ्याला हात घातला. तो काढून घ्यावा असं क्षणभर त्याला वाटलं-- पण पुनः त्यानं हात सोडला. असली क्षुद्र भावना आपल्या हृदयांत आल्याबद्दल त्याचं त्यालाच वाईट वाटलं. तो म्हणाला, "या वेळीं मी तुझा खून केला असता. पण बाई काम तूं

केलंस. तुला मारून मला काय मिळणार? तुझ्यासारख्या एका कीड मुंगीला मारलं तर केशवलालला त्याचा चिमटा लागणार नाहीं. भिकू माझ्या हातचा सुटला पण अजूनही—"

तो बोलतां बोलतां चटकन् थांबला. आपण वहावत आहों असं त्याला वाटलं. खिशांतल्या पाकिटांतल्या चारदोन नोटा तिच्या अंगावर फेंकीत तो तिला म्हणाला, " हें श्राद्ध केलं तुझं आतां! खरोखरच तुला पश्चात्ताप होत असेल तर हे मार्ग सोडून दे. स्वतःच्या कर्तबगारीवर जग—पापं करायचीं असलीं— खून करायचे असले तरी स्वतःसाठी स्वतः कर. पण दुसऱ्याच्या हातचं खेळणं होऊन तिसऱ्याच्या जिवावर उठायचा प्रयत्न या पुढं तरी करूं नकोस." असं म्हणून तो तडक तिथून बाहेर पडला.

त्याचं मन अत्यंत उदासीन झालं होतं तत्त्वाला विसरून आपण केलेल्या भयंकर चुकीच्या पश्चात्तापानं त्याच्या अंगाचा भडका झाला होता. मूळची स्वतःची वृत्ती विसरून, मरणकालचा बापाचा उपदेश विसरून सुद्धां आपण जी चूक करीत होतों तिच्या परिणामांतून आपल्या बापाच्या आत्म्यानंच आपल्याला बचावलं असं त्याला वाटल्यावांचून राहिलं नाहीं. बापाच्या मरण कालच्या उपदेशांतील शेवटल्या शब्दांतील प्रत्येक अक्षरन् अक्षर त्याच्या नजरेसमोर दिसूं लागलं. तंट्या भिल्लाला मृत्यू कसा आला, उमाजी नाईकाचा विश्वासघात कुणी केला, अगदीं परवाच कर्नाटकांतल्या लखमा बेरडाची हकिकत त्याला आठवली.

तो सावध झाला— त्याची बुद्धी ठिकाणावर आली— आयुष्यांतल्या पुढल्या कार्यात ' स्त्री ' हा शब्द सुद्धां येऊं द्यायचा नाहीं असा निश्चय करून तो नव्या दमानं आपल्या नित्यक्रमाला लागला.

पण स्त्रीच्या तडाख्यांतून तो सुटला का? दुसऱ्या एका स्त्रीची त्याच्यावर नजर होती— ती त्याला हेरून राहिली होती— कुणी सांगावं, तिनं त्याचा विश्वासघातही केला नसता.

सुंदरी मोहनचा सारखा तपास करीत होती. पण मोहन मात्र आतां तिच्या आटोक्याच्या पलीकडे गेला होता.

---

## १३

कुणावरही विश्वास ठेवायचा नाहीं असा मोहनचा बाणा असल्यामुळें अत्यंत धाडसाचं काम ज्यावेळीं करायचं असे त्यावेळीं तो एकटाच जात असे.

प्रत्यक्ष व्यवसाय असं ज्याला म्हणतां येईल अशा प्रकारचे कापसाचे सट्टे, शेअर बाजारांतील उलाढाली वगैरे बाबतींत जरी तो यशस्वी होऊन भरपूर पैसे मिळवीत होता तरीही त्यांची स्वाभाविक प्रवृत्ती दरोडा घालण्याकडे जास्त असे. तें एक प्रकारचं व्यसन होतं. पैसे मिळविण्यापेक्षांही त्याच्या धाडसीपणाचा चरितार्थ या दरोड्यांमध्यें होत असे म्हणूनच तो जिवावर उदार होऊन असल्या कामीं प्रवृत्त होत असे.

बंद असलेल्या एका श्रीमंत व्यापाऱ्यांच्या घरांत त्या दिवशीं त्यानें दरोडा घातला होता. पोलिसांना त्याचा सुगावा लागला.

तिजोरी फोडून त्यांतील लूट घेऊन तो बाहेर पडत असतांच पोलीस आपल्यासाठीं टपून बसले आहेत अशी चाहूल त्याला लागली.

वळचणीतून बाहेर पडून तो रस्त्यावर आला. समोरच्याच घरांत गाणं चाललं होतं. गाणं ऐकण्यासाठीं आलेल्या लोकांच्या बऱ्याच मोटारी रस्त्यावर उभ्या होत्या. या गाण्याच्याच गडबडीचा फायदा घेऊन त्यानं या दरोड्याची योजना केली होती.

रस्त्यावर उभ्या असलेल्या मोटारींत जाण्यासाठीं तो रस्त्याच्या कडेला आला तोंच एकदम आवाज होऊन सूं सूं करीत एक गोळी येऊन त्याच्या हाताला लागली. जिवावर उदार होऊन त्यानं धूम ठोकली आणि पाठलाग करायला मागून येणाऱ्या पोलिसांना चकवून तो पुनः त्याच जागीं आला. बऱ्याचशा मोटारींपैकीं कुठल्या तरी एका मोटारींत शिरून खालीं दबून बसून त्यानं दार लावून घेतलं.

गोळीचा आवाज झाल्यामुळं गाण्याच्या बैठकीचा बेरंग झाला. लोक एकदम बाहेर आले. गाणं तसंच राहिलं. प्रत्येकजण आपापल्या मोटारींत बसून जाऊं लागला.

मोहन ज्या मोटरींत होता ती मोटर योगायोगानं सुंदरीची निघाली सुंदरी येऊन त्या मोटरींत बसायला जाते आहे तोंच आंत कुणीतरी असल्याचा तिला भास झाला. दुसरी कुणी असती तर तिनं घाबरून आरडाओरड केला असती. आंत शिरून तिनं पाहिलं. दोघांनीही एकमेकांना ओळखलं. कांहींच न बोलतां तिनं ड्रायव्हरला गाडी हांकायची खूण केली.

मोटर निघाली आणि त्याचवेळीं पोलीसांनीं त्यांना हेरलं. मोटरीच्या बाजूला रक्ताचे थेंब पडले होते.

सुंदरी आपल्या घरीं येऊन पोचली त्यावेळीं मोहन जखमेंतून वहाणाऱ्या रक्तस्रावामुळं थकत चालला होता. तिनं त्याला धरून आपल्या दिवाणखान्यांत नेलं. त्याला बसवून घेऊन ती त्याची जखम बांधूं लागली. इतक्या दिवसांनीं आपला इष्ट हेतु अशा विलक्षण रीतीनं साध्य झाल्यामुळं तिला जितका आनंद होत होता तितकीच जखमेमुळं झालेली त्याची अवस्था पाहून ती घाबरून गेली होती.

त्याचा हात तिच्या हातांत होता. कपडयाच्या पट्टीनं ती तो बांधीत होती, पण ती तो बांधीत असतांना तिची मनस्थिती खवळून गेली होती. जखम बांधायची सोडून आपले दोन्हीं हात एकदम त्यांच्या गळ्याभोंवतीं टाकावे असं तिला वाटत होतं,

मोठ्या कष्टानं आत्मसंयमन करून ती जखम बांधीत असतां मोहन शुद्धीवर आला. त्यानं इकडे तिकडे पाहिलं—समोर सुंदरी पाहून तो दचकला, " केशवलाल—-!"

" इथं नाहीं " सुंदरी हळुच म्हणाली. " एव्हां येणारही नाहींत."

बाहेर मोटर येऊन थांबल्याचा आवाज ऐकूं आला. ती दचकून पहाते आहे तोंच, ' पोलीस बाहेर आले ' असं सांगत तिची दासी आली.

सुंदरी घाबरून गेली. मोहननं उठायचा प्रयत्न केला पण त्याच्या आंगांत मुळींच त्राण राहिलं नव्हतं. सारं बळ खर्ची घालून तो उठून दाराकडे जाऊं लागला असं पाहून सुंदरी म्हणाली, " तिकडे नव्हे. "

बळेंच त्याचा हात धरून ओढून तिनं त्याला समोरच्या भिंतीतल्या कपड्याच्या कपाटांत लोटून दार बंद केलं, बाजाची पेटी लोटून त्या दाराजवळ ठेवली आणि तिनं गायला सुरवात केली:—

वैरी कुठे जाय । जिवा लावुनी अपाय ॥

तें कडवें घोळवून घोळवून ती गात होती, तोंच पोलिस आंत आले.

" कोण आलाय इथं ? " इन्स्पेक्टरनं विचारलं. तरीही ती तें कडवं घोळवीत गात होती.

" थांबा " इन्स्पेक्टर म्हणाला. " आधीं माझ्या प्रश्नाचं उत्तर द्या.. कुठाय तो ! "

" कोण ! " सुंदरीनं विचारलं.

" आमचा गुन्हेगार " इन्स्पेक्टर म्हणाला.

सुंदरी गाऊं लागली.:—

गुन्हा घडला खरा । नाहिं त्याला उपाय । वैरि कुठे जाय

" जखमी आहे तो " इन्स्पेक्टर म्हणाला. " बरोबर आहे " सुंदरी म्हणाली, " जखमीच लोक इथं येतात !—मूळची जखम नसली तर इथं आल्यावर जखमी होतात—" ती गाऊं लागली:—

नयनींचा बाण विषारी । तरुणाच्या बसुनी जिव्हारीं । बेहाय होय बेचैन वाहातां । रुधिर धार करि हाय ॥ वैरि कुठे जाय

" सध्यां गाणं राहूं द्या तुमचं. आधीं सांगा—" इन्स्पेक्टर म्हणाला

सुंदरी गात होती—तिच्या गायन कौशल्याचा त्या ऑफिसवर क्षणभर परिणाम झाल्यावाचून राहिला नाहीं. तो ऐकत होता, ती गात होती:—

प्रेम कुणाचें कांहीं न ठावें ।
कां उगिच मी रडत रहावें ।

चतुर मधुर वचिं फसलें बाई ।
फुकट जिवाची केली खाई ॥

" जिवाची खाई करा मग सावकाश " इन्स्पेक्टर म्हणाला, " आधीं आम्हाला झडती घ्यायची आहे इथली."

" मग घ्या ना झडती." सुंदरी म्हणाली, "सारीं दारं मोकळीं आहेत, कर नाहीं त्याला डर कसला !" असं म्हणून ती पुनः गाऊं लागली.

इन्स्पेक्टरच्या हुकुमासरशीं सारे पोलीस सारं घर धुंडाळूं लागले. बाथरूम आणि संडास पहायचा सुद्धां त्यांनीं ठेवला नाहीं. तें तपासून आल्या-नंतर सुंदरी म्हणाली, " हें फडताळ पहायचंय का ?" पेटी बाजूला घेऊन ती फडताळ उघडायला गेली तेव्हां इन्स्पेक्टर म्हणाला, " नको—नको—राहूं द्या. आम्ही उगीच तसदी दिली तुम्हांला. मिळाली ती बातमी खात्रीची होती असा आमचा समज होता. पण कुणी तरी फसवलं वाटतं या शिपायांना. हें असं चालत असतं. फार त्रास होतो आम्हाला या खोट्या बातम्यांपायीं अन् तुमच्यासारख्या चांगल्या माणसांनाही आम्हाला उगीच त्रास द्यावा लागतो. "

सुंदरीची माफी मागून तो जाऊं लागला तेव्हां ती म्हणाली, " बसा ना. जरा ऐका ना माझं गाणं. गंमत आहे ती पुढंच आहे:—

कुठला आला हा चोर । लावी हृदयाला घोर ॥

" राहूं द्या—राहूं द्या " इन्स्पेक्टर म्हणाला, " उगीच तुम्हांला तसदी नको. आतां दुसरीकडे तपास केला पाहिजे. माफ करा हं ! " असं म्हणून तो शिपायांना घेऊन निघूनसुद्धां गेला.

तरीही सुंदरी गात होती:—

कुठला आला हा चोर । लावी हृदयाला घोर ।
बांधी प्रेमाचा दोर । बाई माझा जीव जाय ॥ वैरी कुठें जाय

दासीनं येऊन पोलीस दूर जाऊन दिसेनासे झाल्याचें सांगितल्या-नंतरही ती तशीच कांहीं वेळ गात होती.

गाणं संपून तिनं बाजाची पेटी बाजूला घेतली, दार उघडलं— मोहन जवळजवळ बेशुद्धावस्थेंत आंत कसाबसा राहिला होता तो दार उघडतांच झोंक जाऊन सुंदरीच्या आंगावर पडला.

त्याला सावरून तिनं आंत कोचावर बसवीत असतां, सावध होऊन त्यानं तिला दूर लोटलं.

आतां तो चांगलाच शुद्धीवर आला होता. सुंदरीनं सारीं दारं खिडक्या एकदम लावून घेतलीं.

मोहन उठून उभा राहिला आणि तिच्यासमोर येऊन म्हणाला, "कां केलंस हें?"

"काय?" सुंदरीनं विचारलं.

"कां वाचावलंस मला?" मोहननं कठोरपणानं विचारलं.

सुंदरी नुसती हंसली. अगदीं सारं अंतःकरण पिळवटून त्यांतला सारा कोमलपणा आपल्या नजरेंत सांठवून घेऊन हंसली.

"हसूं नकोस—" मोहन रुक्षपणें म्हणाला, "बोल—कां बचावलंस मला? तूं मला ओळखलंस?—" सुंदरीनं होकारार्थी नुसती मान हालवली तेव्हां मोहन म्हणाला, "मला ओळखलंस तर! तुला माहीत आहे?— मी वैरी आहें केशवलालचा—" पुनः सुंदरीनं होकार दिला तेव्हां तो म्हणाला, "तरी बचावलंस मला?—" आणखी एकदां तिनं होकार दिला, अगदीं डोळे भरून, डोळ्यांत जीव आणून त्याच्याकडे अनावर आतुरतेनं पहात तिनं होकार दिला तेव्हां तिच्याकडे पहात रागानं डोळे वटारीत मोहन म्हणाला, "कां?"

"कां!" सुंदरी म्हणाली—तिनं एक मोठा सुस्कारा सोडला. तो सुस्कारा ऐकतांच मोहननंही तितक्याच कठोरपणानं धिःकारप्रदर्शक उद्गार काढला.

"मी केशवलाल नव्हें—" मोहन म्हणाला, "समजलीस? मी केशवलाल नव्हें. हसूं नकोस. असल्या पायकी भुलवणीला फसण्याइतका

मी नामर्द नाहीं. हीं तुझीं कवटाळं केशवलालसारख्या उल्लूसाठीं राखून ठेव—" म्हणून तो बाहेर जायला निघाला.

"थांबा ! " त्याला आडवीत सुंदरी म्हणाली," बाहेर जाण्यासारखी यावेळीं तुमची स्थिति नाहीं—" मोहन मोठमोठ्यानं हसूं लागला असं पाहून ती एकदम गंभीर झाली. कामुकतेचं यत्किंचितही लक्षण आतां तिच्या मुद्रेवर दिसत नव्हतं. प्रौढ, गंभीर, वत्सल स्त्रीजातीच्या जिव्हाळ्यानं ती म्हणाली, " बायकांची नजर आहे ही. पुरुषांना कळत नाहीं. बायका आहेत म्हणून पुरुष आहेत. मोठे मर्द असाल तुम्ही पण बायका नसत्या तर सारे मर्द नामर्द झाले असते. बायकांशिवाय पुरुष दुबळा असतो— अन् आतां तुम्हांला जखम झाली आहे. दुबळ्याहून दुबळे झालां आहांत तुम्ही. असेच बाहेर जाल तर पकडले जाल. "

" मग ? " मोहन म्हणाला, " पकडतील मला ! तुला काय होय त्याचं ? "

" बसा तिथं ! " हुकमतीच्या आवाजांत तिनं त्याला बजावून सांगितलं, " कुठं जायचं नाहीं या वेळीं. "

तिच्या नजरेला नजर भिडवून मोहन पाहूं लागला. बिलोरी गवाक्षांत उभा राहिलेला सुंदरीचा आत्मा एवढासुद्धां डगमगला नाहीं.

" कां जायचं नाहीं ? " मोहन दांत ओंठ खात म्हणाला, " पकडतील म्हणून ? बरं पकडतील ! काय झालं मला पकडलं तर ! रस्त्यावरच्या एका चोराला पोलिसांनीं पकडलं तर त्यांत तुझं काय बिघडलं ? तुला कां त्याची काळजी ? "

" सांगितलं ना मी एकदां. " सुंदरी म्हणाली, " मी एक स्त्री आहे ! "

" असशील ! " मला काय त्याचं ? "

" कर्तव्य आहे तें माझं— स्त्रीजातीचं कर्तव्य— दुबळ्यांचं रक्षण करणं ! "

" पुनः सांगतों " मोहन ओरडला, " मला दुबळा म्हणूं नकोस. दुबळा म्हटलेलं मी केव्हांही ऐकून घेणार नाहीं— तुझ्याकडूनसुद्धां नाहीं— स्त्रीजातीकडून सुद्धां नाहीं— समजलीस ? "

सुंदरी नुसती हंसली.

"हंसूं नकोस—" मोहन म्हणाला, " तुला काय वाटलं ? उपकारानं याला मारून टाकीन असं वाटलं ? तुला माहीत आहे, मी केशवलालचा वैरी आहे. तूं केशवलालची– कुणी तरी आहेस. त्याच्या अन्नाला जागलं पाहिजे तुला. मला पकडलं तर केशवलालचा एक वैरी नाहींसा होईल."

" नको नको. " ती काकुळतीनं उद्गारली.

" काय नको ? " मोहन रुक्षपणें म्हणाला.

सुंदरीनं मान खालीं घातली. पुनः आपल्या मनावरचा ताबा सुटून आपलं अंतःकरण उघडं करायची चूक आपल्या हातून घडली असं तिला वाटलं. मनांत आलेला भावनेचा उमाळा दाबून अगदीं गंभीरपणानं ती म्हणाली, " असा अविचार करूं नका. मुद्दाम खाईत उडी घेऊं नका. नशीब कुणाच्या स्वाधीनचं नाहीं. पण मुद्दाम दुर्दैवाला हांक मारणं बरं नव्हे– "

" बस बस पुरे झालं " मोहन म्हणाला, " मला पकडतील, तुरुंगांत घालतील, फांशी देतील.—तुला काय त्याचं ? "

" असं कांहीं बोललात कीं बाण बसतो मला! "

" अस्सं ? " मोहन तिला वेडावून दाखवीत म्हणाला, " तुला बाण बसतो अं ? मी भोळन असं वाटलं तुला ? मी केशवलाल नव्हें–समजलीस– असले विलास मला आवडत नाहींत. तिटकारा आहे मला त्यांचा ! मी स्वतंत्र माणूस आहें. कुणाची पकड नको आहे मला माझ्यावर—" असं म्हणून तो जाऊं लागला.

त्याला पुनः अडवून सुंदरी म्हणाली, " पण ही जखम ! "

" कुटली ? " मोहननं विचारलं.

" ही—" सुंदरी म्हणाली, " आतां मी बांधली ही. अजून रक्त वहातंय— " असं म्हणून तिनं त्याचा हात धरला.

अगदीं कठोरपणानं तिच्या हातांतला हात सोडवून घेऊन तो म्हणाला, " पुरे झाला हा लघळपणा. "

" लघळपणा नव्हे " सुंदरी म्हणाली, " स्त्रीहृदय आहे हें !—" मोहन तितक्याच तिरस्कारपूर्वक हसूं लागला असं पाहून ती म्हणाली, " हसूं नका. जखम होते मला या हंसण्यानं. मला कुणी नाहीं ती जखम बांधायला. रक्त सुद्धां वहायचं नाहीं त्या जखमेतून. रक्त सांकळून जातं त्या जखमेंतलं– तुम्हांला नाहीं कळायचं तें–" एक सुस्कारा टाकून ती म्हणाली, " राहूं द्या माझी जखम. आपल्या या जखमेची तरी काळजी घ्या. माझी गाडी देतें हवी तर पोंचवायला– "

" कां ?" मोहन खवचटपणानं म्हणाला, " माझ्या मुक्कामाचा पत्ता काढायला ? "

" जा, वाटेल तसे जा, " सुंदरी म्हणाली, " मला पत्ता नको आहे तुमचा— "

मोहन दारापर्यंत गेला. पण दारांत त्याला आड येऊन ती म्हणाली, " एक वचन द्या मला !"

" कसलं वचन ? " मोहननं विचारलं.

" पुन्हां भेटायचं " सुंदरी काकुळत वाणीनं म्हणाली, " होय ना, पुन्हां भेट होईल ना ? "

' बरं बरं ' म्हणून मोहन त्या जागेतून बाहेर पडला.

जखमी झालेल्या माणसाइतकीच थकून सुंदरी एका कोचावर पडली. सारं घर फिरतं आहे असं तिला वाटलं. एक नवीन भावना तिच्या हृदयांत जागी झाली होती. त्या भावनेनं भारवल्यामुळं ती मोहनचा तपास करीत होती. अचानक तो तिच्या हातीं आला. पण तिला त्याला धरून ठेवतां आलं नाहीं.

तिला स्वतःचाच राग आला. किती जणांना तरी तिनं आपल्या बोटा-भोंवतीं खेळवलं होतं. पण मोहननं तिला झिडकारलं. तिच्या आयुष्यांत हा अनुभव पहिलाच होता. त्या पराजयाचं तिला दुःख झालं नाहीं.

त्या प्रसंगाचं चिंतन करीत किती तरी वेळ ती तशीच बसून राहिली—

---

## १४

पाद्रीबावाचं मिशनचं काम अलीकडे तितक्या समाधानानं चालत नव्हतं. अमेरिकेंतून येणारी पैशाची मदत अलीकडे जवळ जवळ बंद झाली होती. पूर्वी अमेरिकन मिशनचे जे फंड होते तेवढ्यांच्याच व्याजांतून मिशनचे व्यवहार कसेबसे चालत होते. हिंदुस्थानांतल्या बहुतेक मिशन्सनीं काटकसर करायला सुरवात केली होती. त्याचाच परिणाम शरणगांवांत थाटलेल्या मिशनरींच्या संसारालाही भोगावा लागला.

शाळा आणि प्रसूतिगृह या दोन संस्थांबद्दल सर्वांनाच फार आदर होता. त्या शाळेचा खर्च कसाबसा निभावत होता. पण प्रसूतिगृहाचा खर्च दिवसेंदिवस वाढूं लागल्यामुळें पैशाची फार ओढाताण होऊं लागली होती. जे दाते दुर्गाबाईला तिच्या कामासाठीं पैसे द्यायला तयार होते, ज्यांच्या पैशांच्या मुळाशीं पाप आहे म्हणून दुर्गाबाई ते घेत नव्हती, ते पैसे मिशन हाऊस करतां त्यांनीं दिले असते तर पाद्रीबावानें नाकारले नसतें. पण हे दाते आपल्याला धर्माभिमानी म्हणवीत असत. त्यांच्या भूतदयेच्या मुळाशीं आपण कांहींतरी धार्मिक कृत्य करतों आहों—आपल्या धर्मासाठीं कांहीं धार्मिक कृत्य करतों आहों—अशी एक आकुंचित भावना असल्यामुळं ते हा धर्मादाय मिशनहाऊससाठीं करायला तयार नव्हते. अमेरिकेंतून पैसे आणून मिशनरी लोक हिंदुस्थानांतील सर्व धर्मांच्या लोकांच्या सेवेसाठीं लावीत होते याची जाणीव त्या धर्मात्म्यांना होत नव्हती. मिशनरी लोक करित असलेलीं धर्म-

कार्ये सारींच कांहीं बाटवण्यासाठीं नव्हतीं. धर्मांतर करून घेण्यापेक्षां भूतदयेचा भागच त्यांत जास्त असे याची जाणीव या हिंदु आणि जैन धर्मीयांना झाली नाहीं, आणि म्हणूनच मॅटर्निटी होम आवरण्याचं संकट पाद्रीबावाला पडलं.

घरांत होणाऱ्या बाळंतपणापासून बायकांचे जे हाल होतात तसे हाल या होममधें होत नाहींत, घरीं बाळंतपण झालं तर महिना महिना बाळंतीण खोलीबाहेर येऊं शकत नाहीं, तीच जर ती या मॅटर्निटी होममधें गेली तर दहाबारा दिवसांत घरीं येऊन कामाला सुद्धां लागूं शकते हें प्रत्यक्ष दिसून आल्यामुळं गरीबगुरीब लोक सुद्धां या होमचा फायदा घेऊं लागले होते आणि त्यामुळंच तें होम चालवण्याचा खर्च वाढत होता.

आजपर्यंत या होममधें सर्वांना फुकट येण्याची सवलत ठेवली असतां आतांच फी ठेवली तर तें लोकदृष्ट्या गैर दिसेल असं वाटून पाद्रीनं होममधें येणाऱ्या बाळंतिणींची संख्या मर्यादित करण्याचं ठरवलं.

दुर्गाबाईना तें रुचलं नाहीं. या कामीं त्यांनीं पुढाकार घेऊन वर्गणी गोळा करण्यास सुरवात केली. दुर्गाबाईला या होमबद्दल अर्थातच एक प्रकारचा जिव्हाळा होता. तिच्या कुमाराचा जन्म याच संस्थेंत झाला होता. अत्यंत असहाय्य असतांना याच संस्थेनं तिला जगवलं होतं. म्हणून धर्मभेदाची कोतीरी कल्पना मनांत येऊं न देतां तिनं ही संस्था जगवण्यासाठीं पुढाकार घेतला.

लतेलाही या पुढाकारामुळं एक प्रकारचा हुरूप आला. या कामीं आपणसुद्धां कांहींतरी करावं असं वाटून तिनं एक विविध कार्यक्रम करायचं ठरवलं. नाच, गायन, लहानसा नाट्यप्रयोग अशा प्रकारचा तो कार्यक्रम होता. कॉलेजची परीक्षा झाल्यामुळं घरीं आलेला कुमारही या कामीं तिला मदत करीत होता. थोडक्याच दिवसांत त्याचा रिझल्ट लागणार होता.

नित्याप्रमाणें गीतापाठासाठीं लता दुर्गाबाईकडे आली होती. ती बाहेर निघाली त्यावेळीं कुमार नाराज झाला. अलीकडे कॉलेजांत जाऊं

लागल्यापासून तिची त्याची भेट फारच थोडा वेळ होत असे. तीही आतां बरीच प्रौढ झाली होती. लोकदृष्ट्या व्यंग दिसू नये म्हणून त्याच्यापासून शक्य तितकं दूर रहाण्याचा ती प्रयत्न करीत आहे हेंच त्याला फार जाणवे.

" मला आतां गेलं पाहिजे. " लता म्हणाली, " बाबाजी वाट पहात असतील.

" मग जा ना ! " कुमार म्हणाला, " नको कुणी म्हटलं ! "

" असं काय बरं ? असा रागावूं नको. थोडं जगाकडे पाहिलं पाहिजे. इथं मी आईकडे आलें तर कोण कांहीं म्हणत नाहींत; पण तुझ्याबरोबर हिंडूं फिरूं लागलें तर खेडगांवच्या लोकांच्या दृष्टीनं तें अयोग्य दिसतं. "

" मग इथंच येऊन रहा ना. "

" इथंच येऊन कसं रहायचं ? तेंसुद्धां लोकदृष्टया अयोग्यच नाहीं का ? "

" लोकांची पर्वा कशाला करायची ?"

" नाहीं बरं. असं म्हणून चालायचं नाहीं. इतरांची गोष्ट निराळी आहे. मला तरी लोकांची पर्वा केली पाहिजे. मी कोण, कुठली, हें कुणालाच माहित नाहीं—मलासुद्धां माहित नाहीं. मी एक नांवनसती आहें म्हणूनच मला जगाला भ्यालं पाहिजे. "

" मग काय करायचं ?"

" एक उपाय आहे—" कुमाराच्या तोंडाकडे आतुरतेनें पहात लता भीत भीत म्हणाली, "परकी म्हणून रहाण्यापेक्षां—" लता पुनः थांबली आणि म्हणाली, " कुणीतरी घरची म्हणून राहिलें—पण तें कसं व्हायचं. घरचं नातं जोडायला जात गोत तरी कळलं पाहिजे ? मी ही अशी—"

" जातगोताची मी पर्वा केली नसती" कुमार म्हणाला, "माझी आईही त्याची पर्वा करणार नाहीं. पण सध्यां तरी तें शक्य नाहीं. आधीं स्वतःच्या पायावर उभं राहिलं पाहिजे मला. कितीतरी ऋणं फेडायचीं

आहेत मला. मातृऋण, देवऋण, ग्रामऋण—साऱ्या गांवाचा ऋणाईत आहें मी. साऱ्या गांवानं मला जगवलं आहे. माझ्या शिक्षणासाठीं साऱ्या गांवचीं माणसं येऊन इथं राबताहेत—"

"तें खरं आहे" लता म्हणाली, "पण आपलं लग्न व्हायला ही ऋणाची फेड कशी आड येते ?"

"तसं नव्हे—" कुमार म्हणाला, "सध्यां कसलीच बेडी अडकावून घ्यायची नाहीं मला. आईनं माझ्यासाठीं एक दिशा ठरवली आहे. एका विशिष्ट कार्यासाठीं मी स्वतःला वाहून घ्यावं अशी तिची इच्छा आहे. तें कार्य म्हणजे जगांतले गुन्हे नाहींसे करणं. त्यासाठीं बॅरिस्टर झालं पाहिजे मला. बॅरिस्टर होण्यासाठीं विलायतेला गेलं पाहिजे. विलायतेला जाणं सुलभ व्हावं म्हणून मी अभ्यास करतांना जिवाचं रान केलं आहे. फर्स्टक्लास मिळावा म्हणून मी प्रकृतीकडेसुद्धां पाहिलं नाहीं. म्हणूनच सध्यां मला बंधन नको आहे."

"पण जाणार कसे विलायतेला ?"

"कसं जाणार विलायतेला ! तें एक देवच जाणे ! पण मी जाणार एवढं मात्र खरं. आईचा आशीर्वाद आहे मला आणि तो केव्हांही खोटा व्हायचा नाहीं असा माझा विश्वास आहे. जाऊं दे—तुझ्या कॉन्सर्टचं काय झालं ! उद्यां आहे ना तुझा कॉन्सर्ट ? किती झाली तिकिट विक्री ?"

"मला काय करायचंय तिकिटविक्रीशीं ?" लता म्हणाली, "तो सारा भार गांवच्या लोकांनीं घेतला आहे. बावाजीसुद्धां घरोघर फिरताहेत. मी पुष्कळशी रक्कम मिळवून दिली असं त्यांना ठरवायचं आहे—"

"तुझा कॉन्सर्ट यशस्वी होवो." कुमार म्हणाला.

लता त्याला वेडावून दाखवून म्हणाली, "म्हणे कॉन्सर्ट यशस्वी होवो ! अगदीं म्हाताऱ्याचाच आव आणलाय जसा."

कुमार गंभीर होऊन म्हणाला, "बालपणापासूनच मी म्हातारा आहें लता. तुझ्या आयुष्यांत जसं एक व्यंग आहे तसंच माझ्याही आहे.

बाळपणीं मला तें कळत नव्हतं— आतां कळूं लागलं. बालपणीं जरी तें व्यंग कळत नव्हतं तरीही तें व्यंग ध्यानीं घेऊन माझी आई मला शिक्षण देत होती. त्याचा माझ्या मनावर परिणाम होत होता. आतां कळल्यावर त्या परिणामाची दुप्पट झाली. त्या मुळंच मी चुरून गेलों आहे. त्यामुळंच मी आपल्याशींच चोरासारखा होऊन गेलों आहें. म्हणूनच मला वाटतं, कांहीं तरी स्वतःची कर्तबगारी दाखवल्याशिवाय संसारांत पडूं नये—"

कुमारचं तें भाषण ऐकत असतां लतेची मनःस्थिति चमत्कारिक झाली होती. अनाथ म्हटल्यास अनाथ— पण अनाथ आहे म्हणावं तर सारी कांहीं तरतूद होत आहे—अशा चमत्कारिक परिस्थितींत तिचं मन तिच्याशींच चोर झालं होतं. हें 'देवी' प्रकरण काय आहे तें जाणण्याची तिलाही जिज्ञासा झाली होती. कुमार बोलत असतां ती याच प्रश्नाचा विचार करीत होती. म्हणून कुमार काय बोलला हेंच तिला कळलं नाहीं.

"कसला विचार करीत होतीस ?" कुमार म्हणाला, "मी नुसता वेड्यासारखा बोलत होतों पण तुझं लक्ष कुठंतरी भटकत होतं—"

"असं झालं होतं खरं" लता म्हणाली, "आपण दोघंही अशा कांहीं विलक्षण परिस्थितींत आहों, कीं तिसऱ्याला त्याची कल्पनाच व्हायची नाहीं—अन् व्हायला हवी आहे तरी कशाला ? काय तें आपलं आपल्यालाच कळलं म्हणजे झालं—नकोत या गोष्टी. कसे गेलेत तुझे पेपर ?"

"फर्स्ट क्लास मिळवीन असं वाटतं. पण त्यांतही पहिला आलों तरच माझ्या श्रमाचं सार्थक होईल—"

आणि मग तीं दोघंही परीक्षेच्याच गोष्टी बोलूं लागली. त्याचवेळीं तिकडे मिशनहाऊसमधें सुंदरी आली होती. मोहनची भेट झाल्यानंतर तिचं मन उदास झालं होतं. उदासपणा घालवण्यासाठीं जरी ती शरणगांवला आली तरी समाधान होण्याऐवजीं तिची उदासीनता अधिकच वाढली.

ती पाद्रीला म्हणाली, "माझ्या ममाची कांहींच कां कल्पना येत नाहीं ? कां माझा छळ करतां ! नुसती डोळ्यांनीं मी तिला पाहूं सुद्धां

नये ? आतां लता मोठी झाली—ती कशी दिसत असेल, कशी बोलत असेल, कशी वागत असेल याची रोज मी डोळ्यापुढं कल्पना करतें. पण कल्पनेच्या चित्रानं काय मनाचं समाधान होतं. माझं ? एका भिंतीपलीकडे ती असावी आणि मला ती दिसूं सुद्धां नये असं काय पाप मी केलंय ? ”

“ तें तुलाच माहिती आहे.” पाद्री म्हणाला, “म्हणूनच ना तूं तिला माझ्याकडे ठेवलीस ? ”

“ पण मी तिला पाहूं सुद्धां नये ? ”

“ नाहीं, नाहीं, नाहीं. मी हजारदां सांगतों मी तुला भेटूं देणार नाहीं. ”

“ कां ?”

“ आतां ती लहान नाहीं. तिला कळूं लागलंय. दृष्टी आलीय तिला. नुसतं तुझ्याकडे पाहिलं—तूं बहीण म्हणून कळलं तर एकदम ती खचून जाईल. मन निराळं आणि मुद्रा निराळी, असला तुझा चोरटा व्यवहार आहे. तो चोरटेपणा तुझा तुला कळतो—जगाला कळत नाहीं. पहाणाराला कळत नाहीं. म्हणूनच तुला पाहिल्याबरोबर लता एकदम खचून जाईल. ”

“ मग मी काय करूं ? एवढीं वर्षे वाट पाहिली. आतां आणखी किती वाट पहूं ? ”

“ अनादि कालापर्यंत. ”

“ किती कठोर आहांत तुम्ही बावाजी ! लहानपणींच आम्हांदोघींची ताटातूट झाली—झाली कसली मीच तिला माझ्यापासून दूर केली, तुमच्या हातीं दिली. तुम्ही तिला वाढवलीत. कुमाराच्या आईसारखी दुसरी एक गुरू तिला लाभली—तिथं सेवाधर्माचं शिक्षण मिळतंय तिला. पण तेंही तुमच्याच कृपेनं. ”

“ त्या देवाच्या कृपेनं. ” पाद्री आकाशाकडे पहात म्हणाला.

“ पण त्या देवाची कृपा आम्हांवर कां होत नाहीं ? ” सुंदरी रड-

कुंडीला येऊन म्हणाली, " आम्हां दोघां बहिणींच्या आड कां येतो तो देव ? "

" तिच्या कल्याणासाठीं तुझ्या कल्याणासाठीं "—

" कल्याणासाठीं का दोघांची ताटातूट ?" ओठाशीं आलेला आवंढा गिळीत सुंदरी म्हणाली, " नाहीं बावाजी, मी तुमच्या पाया पडतें—एकदां तरी तिला मला भेटूं द्या—हृदयाशीं घट्ट कवटाळूं द्या. पारणं फेडूं द्या या वियोगाचं. "

" नाहीं, नाहीं, नाहीं. " पाद्री बळेंच मन घट्ट करून म्हणाला, " मुली, मन कठोर कर. तुझी तिची दृष्टभेट होतां कामां नये. तुझी दृष्ट लागेल तिला ! नाश होईल तिचा. मायेच्याच माणसाची नजर बाधते म्हण-तात, तसं व्हायला नको. "

दुःखाचा आवेग तिला अनावर झाला. अंतःकरणांत दाबून ठेवलेलं रडं एकदम बाहेर पडलं आणि फुलून फुलून रडत ती जवळच्या बैठकीवर पडली. वात्सल्यपूर्ण ममतेनं तिच्या मस्तकावर हात फिरवीत पाद्री म्हणाला, " एक उपाय आहे—नव्हे एक संधी आहे— "

ताड्कन उठून उभी राहून सुंदरी म्हणाली, " संधी ! लतेला भेटायची संधी ! "

" हो " पाद्री म्हणाला, " पण भेटायची नव्हे-पहायची संधी. उद्यां आमच्या मॅटर्निटी होमच्या मदतीसाठीं एक कॉन्सर्ट होणार आहे इथं. ती काम करणार आहे त्यांत.—"

" उद्यां ? " आशाळभूतपणानं सुंदरीनं विचारलं.

"हो. उद्यां रात्रीं—" पाद्री म्हणाला," तोंपर्यंत इथंच कुठं तरी रहा. "

" इथंच ? " सुंदरी म्हणाली, " मी इथंच रहातें. कुठं तरी आडोश्याला रहातें. मुळीसुद्धां समोर यायची नाहीं. आडून तरी पाहीन तिला. "

" नाहीं, " पाद्री म्हणाला,, " उद्यांच पहा. सार्वजनिक जागीं,

सार्वजनिक रीतीनें पहा. हें मिशन हाऊस आहे. देवाचं घर आहे हें. तूं दिसतां नयेस इथं कुणाला. जा—स्टेशनवर रहा वेटिंगरूममधें रहा. मला कठोर व्हावं लागतंय पण तें माझ्या कार्यासाठीं. या जागेचं पावित्र्य राखलं पाहिजे मला. समजलीस ? मी एक मिशनरी आहें. जा. ”

“ खरं आहे तें!” सुंदरी म्हणाली आणि एकदम तिथून बाहेर पडली. नित्याप्रमानें भिकू बरोबर आला होता. त्याला मुंबईला जायला तिनं सांगितलं. सुंदरी स्टेशनवरच एक दिवस रहाणार आहे याचं भिकूला आश्चर्य वाटलं.

तो गेला तो सरळ मुंबईला केशवलालला भेटला. आजवर लपवून ठेवलेल्या शरणगांवच्या या फेऱ्यांच्या साऱ्या हकिकती त्यानं केशवलालला सांगितल्या.

“ मिशनरी ? ” केशवलाल म्हणाला, “ पाद्री ? देखणा आहे ? तरुण आहे ?”

“ छे छे अगदीं म्हातारा आहे.”

“ म्हातारा आहे ! मग श्रीमंत आहे वाटतं ? ”

“ पाद्री कुठला आलाय श्रीमंत ?”

“ मग हें कसं झालं असं ? कां धांवतेय त्याच्या मागून इतकीं वर्षे ? आजपर्यंत कां हें चोरून ठेवलंस माझ्याकडून ?”

“ तिनं शपथ घातली होती.” भिकू म्हणाला, “ ती शपथ सुद्धां मोडली असती. आजवर ती नुसती जात होती, घटकाभर बोलत होती आणि लगेच निघून येत होती. पण आजच पहिल्यानं ती तिथं रहातेय—त्याच्या घरीं नव्हे—स्टेशनवर वेटिंगरूममधें राहातेय. म्हणूनच मला संशय आला. असल्या बायकांच्या या भानगडी तुम्हांला कळायच्या नाहींत. या सुंदरी-सारख्या बायका कुणाच्या गळीं पडतील तें तुम्हांलाही सांगतां यायचं नाहीं. आणि मलाही सांगतां यायचं नाहीं.”

“ मला संशय येतो ” केशवलाल म्हणाला.

" संशय कसो ? कुणाचा ? माझा ? तिच्यामागं एवढ्या खेपा घातल्या, एवढी करडी नजर ठेवली तिच्यावर. आतां तिला अचूक पकडली आणि तुम्हांला येऊन सांगितलं नि आतां तुम्ही संशय घेतां माझा."

" पण म्हाताऱ्यावर कशी भाळेल ती ? "

" त्याची पंचाईत आतां कशाला ? उद्यां या माझ्याबरोबर, मी खात्री करून देतों तुमची. "

" कशी ? "

" प्रत्यक्षच दाखवतों—मग तर झालं ? " भिकू म्हणाला. जरा जास्त लगट करून त्यानं गळेपडूपणा करायला सुरवात केली. तो म्हणाला, " पण आधं एक हजार रुपये द्या ना मला. "

" हीच एक वाईट खोड आहे तुला भिकू. " केशवलाल चिडून म्हणाला, " माझी कामगिरी तूं चोख बजावतोस यांत शंका नाहीं. अशी ही न सांगतां सुद्धां तूं कामगिरी करतोस– पण त्याबरोबरच लगेच पैशासाठीं हात पुढं करतोस हें मात्र बरं नाहीं. तुला नाहीं म्हणायचं नाहीं मला– "

" मी कांहीं बक्षिस मागत नाहीं ! " भिकू रागावून म्हणाला, " संसार आहे ना मला ? एक दुकान चालवलं पाहिजे ना मला ?— पतीसाठीं. त्या दुकानाच्या पतीच्या जोरावरच मला बाकीचे धंदे करतां येतात. नाहीं तर– "

" बरं बरं " केशवलाल म्हणाला, " उद्यां घेऊन जा चेक. "

" मग उद्यां जायचं ना जलशाला ? "

" कुठल्या जलशाला ? "

" जलसाच आहे तिथं. " भिकू म्हणाला, " काय तें आतां उद्यांच पहा– "

ठरल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं भिकूला पैसे मिळाले आणि दोघे शरणगांवला जायला निघाले.

# १५

त्या दिवशीं दुर्गाबाईनीं गांवच्या सर्व लोकांना आमंत्रण दिलं होतं. आजूबाजूच्या गांवांतल्या बायकासुद्धां गोळा झाल्या होत्या. आज आपल्याला कांहीं तरी द्यावं लागणार या बुद्धीनं येणाऱ्या बायकांबरोबरच नुसती काय गंमत होणार आहे तें पहाण्यासाठीं म्हणूनही कित्येक आल्या होत्या.

दुर्गाबाईच्या आश्रमांत ही सभा भरली होती. सुरवातीला दुर्गाबाई म्हणाली, "उद्यां इथं जलसा होणार आहे. तो करायचा भार आपल्या मुलांबाळांनीं घेतला आहे. आपल्या बावाजींच्या दवाखान्याला आज पैशांची जरुरी आहे. मुलांनीं त्या कामीं पुढाकार घेतला आहे म्हणून आपण स्वस्थ बसायचं का? आपण काय केलं आहे या सत्कार्यासाठीं? परदेशांतून पैसा आणून त्यांनीं हा दवाखाना चालवला होता. आतां तो पैसा यायचा थांबला. आपण सर्वांनीं या संस्थेचा फायदा घेतला आहे. योग्य योजनेच्या अभावीं अकालीं मेले असते असे किती तरी जीव तिथं जगले आहेत. माझीच गोष्ट घ्या—कुठं तरी गल्लीकुचींत पडून मी मेलें असतें. पण हा दवाखाना होता म्हणून आज मीं आहें—माझा मुलगा आहे. आम्ही तुमची सेवा करतों आहोंत ती केवळ या संस्थेनं जगवलं म्हणून. तें ऋण फेडलं पाहिजे. टाका ना या माझ्या झोळींत कांहीं. खरं दान असलं तर हें आहे. आम्ही दिलं तसं कुणीच दिलं नाहीं असं साऱ्या जगानं म्हटलं पाहिजे:—

मर जाऊं मांगूं नहीं अपने तन के काज।
परमारथके कारने मांगूं करूं न लाज॥

दुर्गाबाईच्या तोंडून ते उद्गार निघतांच प्रत्येकीनं आपल्याकडे असेल नसेल तें टाकायला सुरवात केली. देण्याच्या इच्छेनं म्हणून ज्या आल्या होत्या त्यांनीं तर दिलंच पण नुसत्या प्रेक्षक म्हणून आलेल्या बायांनीं सुद्धां आपल्या अंगावरचे दागिने काढून दुर्गाबाईच्या झोळींत फेकले.

"देव तुमचं कल्याण करो." दुर्गाबाई गहिंवरून म्हणाली, "इतकं मिळेल अशी माझी अपेक्षा नव्हती. कुणा माउलीनं आपलं

मंगळसूत्रसुद्धां टाकलंय माझ्या झोळींत. दरिद्री नारायणांच्या सेवेसाठीं आपलं सौभाग्य खर्ची घातलंय. आतां एक करायचंय आपल्याला. नमुनेदार करायचंय हें गांव. स्वराज्य झालं पाहिजे या गांवापुरतं. इथली शेती—वाढलीय—अन्नाची ददात गेलीय. बंद पडलेले चरखेमाग चालू झालेत. वस्त्रासाठीं सुद्धां आतां आपल्याला दुसरीकडे पहावं लागायचं नाहीं. उद्यां वेढा पडला या गांवाला तर आपल्या पुरत्या अन्नवस्त्राची तरतूद आतां झालीय. बहुतेकांना लिहितां वाचतां येऊं लागलंय. अगदींच थोडी राहालींयत अजून, त्यांनाही येऊं लागेल उद्यां. पोटभर अन्न आणि अंगभर वस्त्र मिळालं कीं, गांवचे गुन्हे कमी होतील आणि गुन्हे नाहींसे झाले कीं वकील पोलिसांची जरूरी राहणार नाहीं. पुढं निरोगी झालांत सारीं म्हणजे हे दवाखाने सुद्धां बंद करावे लागतील. स्वतःची काळजी माणूस स्वतः घेऊं लागलं, कीं डॉक्टरांचीही जरूरी रहाणार नाहीं. एवढं सारं करायचंय आपल्याला. एवढं हें आपल्या गावचं स्वराज्य आपल्याजवळ आलं—" असं म्हणून तिनं आपली भरलेली झोळी पाद्रीच्या हातीं दिली. त्याच्या डोळ्यांतून सारख्या अश्रुधारा वहात होत्या.

सारं वातावरण भारून गेलं होतं. द्यावं म्हणून आलेला प्रत्येक जीव आपली सारी शक्ति खर्ची घालून मोकळा झाला होता. पाद्रीबावाला त्या उपकारांचं मोठं ओझं वाटलं. त्या कार्याशीं तो इतका समरस झाला होता, कीं झाले हे उपकार सारे आपल्यावरच झाले— व्यक्तीवर झाले असं त्याला वाटत होतं. तो म्हणाला, "तुम्हां मायबहिणींचे आभार कोणत्या शब्दानीं मानूं ? ज्या कार्याला मी आज इतकीं वर्षे हात घातला होता तें सोडून द्यावं लागणार या भीतींतं मी खचून गेलों होतों. मोठमोठ्यांच्या दारीं गेलों पण त्यांनीं माझी दाद घेतली नाहीं. आज तुम्हीं माझ्या घरीं येऊन घे घे म्हणून मला दिलं आहे. दरिद्रीच देतो— श्रीमंत देत नाहीं— दान करीत नाहीं— उपकार करतो— उपकाराचा बोजा चढवतो परक्याच्या माथीं. तुम्हीं त्याग करतां— दान नाहीं करीत. दिल्यानंतर तें तुमच्या हिशेबीं सुद्धां राहात नाहीं, म्हणूनच ही देणगी मला मोठी वाटते. हें घेणं झालं नाहीं, ही ठेवणी झाली आहे. तुमचं तुम्हींच हें सेवेचं काम चालवतां आहां असं होणार आहे. केवढे तुमचे उपकार मानूं—"

"हे उपकार नव्हेत" दुर्गाबाई म्हणाली, "आमचं कर्तव्य आहे हें. आमच्यासाठीं आम्हीं करतों आहों-- तुमच्यासाठीं नव्हे. श्रीमंतांनीं शेंकड्यांनीं दिले असते पण इथं हे आमचे दहा हजार आहेत– रुपये नव्हेत, पैसे— तांब्याचं नाणं– गरिबांचं लेणं– म्हणजे गरिबाच्या गरिबीचं मोल, हें आम्हीं तुमच्या हातीं देतों आहोंत— आमच्या कामासाठीं! गरिबांच्या मुक्या मुरगाळून श्रीमंत होण्यासाठीं केलेलें, पापाची फेड करण्यासाठीं केलेलं हें प्रायश्चित्त नव्हे– दानाचं ढोंग नव्हे हें. हा प्रत्येक पैसा निढळाच्या घामाचा आहे म्हणूनच लाखांच्या मोलाचा आहे."

"शाबास दुर्गाबाई" पाद्री म्हणाला, "धन्य आहे तुमची. आज इतकीं वर्षे आम्ही मिशनरी लोक ज्या कार्यासाठीं धडपडतों आहों–आज तीस चाळीस वर्षे इथं राहून जें मला साधलं नाहीं तें तुह्मी एवढ्या थोड्या काळात प्रत्यक्षांत आणून दाखवलंत. धन्य आहे तुमची."

"पण हें कां झालं बावाजी?" दुर्गाबाईनं विचारलं, "तुम्हाला साधलं नाहीं असं कां म्हणतां? तुम्ही प्रयत्न केला पण तिथं धर्माचं नांव आणलं. बाटवण्यासाठीं तुम्ही काम करतां आहांत असं सर्वांना वाटत होतं म्हणून हे लोक तुमच्या पासून दूर राहिले. तुम्हीं परके आहांत याची जांणीव पदोपदीं या लोकांना होत होती. गांवाबाहेर रहात होतां तुह्मी–आणि मग गावांत येत होतां. मी यांच्यातलीच आहें, यांच्यांतच राहिलें आहें म्हणून मला हें साध्य झालं. तुम्ही दूर रहातां, क्षणभर जवळ येतां आणि मग उपदेश करतां. मी उपदेश करीत नाहीं—काम करतें, काम कसं करायचं हें दाखवतें. स्वतः काम करतें आणि दुसऱ्याकडून करून घेतें. तें तुम्ही केलं नाहीं आणि तेंच आम्ही करणार आहों. तेंच आम्हां सर्वांच्या हातून घडावं असा आम्हाला आशीर्वाद द्या—" असं म्हणून तिनं त्याच्या पायावर डोकं ठेवलं. तिला वर उचलून पाद्री जेव्हां तिचे पाय धरायला गेला तेव्हां ती म्हणाली, "नाहीं नाहीं, तुम्ही वडील आहांत. मीं लेकरूं आहे तुमचं. तुह्मी काय केलं तें पाहिलं म्हणून मला ही बुद्धी झाली. म्हणूनच तुमचा आशीर्वाद मागतें मी."

जमलेल्या प्रत्येकाच्या डोळ्यांतून आसवांचे पूर लोटत होते. तितक्यांत धांवत जाऊन कुणीतरी आपल्या संचयाला असलेली दमडी दुगाणी आणून झोळींत टाकली. उपकाराच्या ओझ्याखालीं आपण दडपून जात आहोंत असं पाद्रीबावाला वाटलं.

जलशाची तयारी मोठ्या जोरानं चालली होती. तिकिट विक्रीही मोठ्या झपाट्यानं होत होती. त्या रकमा पाहून पाद्रीबावाला आनंदाच्या उकळ्यावर उकळ्या येत होत्या.

गांवाबाहेरच्या आंबराईत एक लहानसा रंगमंच उभारला होता. चोहींबाजूनीं कुंपण घालून प्रेक्षकांना बसायची जागा केली होती. ती जागा उघडी होती. ज्यांना तिकीट घ्यायचं सामर्थ्य नव्हतं त्यांनीं कुंपणाच्या बाहेर उभं राहून पहावं अशी योजना केल्यामुळं कुणाचीच तक्रार राहिली नव्हती.

स्वभावतःच गाण्यानाचण्याकडे लतेचा ओढा होता. त्या कला तिच्या रक्तांतच होत्या. तिची ती आवड ओळखून पाद्रीबावानं, त्या खेड्यांत सुद्धां, तिन्हीं कलांचं शिक्षण तिला द्यायची जी व्यवस्था केली होती त्याची परीक्षा आज ती देणार होती.

या जलशासाठीं आतां किती लोक येतील, किती लोकांकडून किती पैसे मिळतील याची काळजी राहिली नसल्यामुळं जलशांतील कार्यक्रम कसे उत्कृष्ट होतील याच्याकडेच लतेचं लक्ष लागून राहिलं. त्या कार्यक्रमांत भरपूर नाविन्य होतं. त्या खेड्यांत तसले कार्यक्रम यापूर्वी कुणीच पाहिले नव्हते. मुंबईत होणारे अशा प्रकारचे कार्यक्रम पाहून त्या अनुरोधानं कुमारनं ही योजना केली होती. सारीं सूत्रं पडद्याआड राहून तोच चालवीत होता.

सुंदरीला प्रेक्षकांत बसण्याची खास व्यवस्था पाद्रीबावानं केली होती. ती लोकांच्या नजरेंत भरूं नये, त्याचप्रमाणें तिला कार्यक्रमही डोळे भरून पाहतां यावे, अशीच जागा त्यानं तिच्यासाठीं राखून ठेवली होती.

नृत्याच्या कार्यक्रमांत लता रंगभूमीवर आली तेव्हां पाद्रीनं सुंदरीला डोळा घातला. हीच लता—हीच आपली बहीण—हें सुंदरीला ओळखावं

लागलं नसतं. तिचं स्वाभाविक नर्तनकौशल्य पाहाण्याकडे तिचं लक्ष नव्हतं. लोक तिच्या नृत्याची तारीफ करीत होते त्यावेळीं दुष्काळांतल्या आधाशी माणसाच्या भुकाळू दृष्टीनं सुंदरी तिला डोळे भरभरून पाहून घेत होती. तिचं हृदय भरून आलं होतं. ही आपली बहीण!—तिला वाटलं ही जर आपल्याकडेच राहिली असती तर अशीच गायली असती, अशीच नाचली असती—मुंबईतल्या हजारों श्रीमंतांच्या कामुक डोळ्यांना तिनं खेचून धरलं असतं. हजारों केशवलाल तिचे जोडे चाटण्यासाठीं जमिनीपर्यंत वांकले असते—

पण तिचं कल्याण झालं असतं का त्यामुळं? ती सुखांत लोळली असती—वैभवांत लोळली असती—सुंदरीला वाटलं, आपण सुद्धां सुखांत लोळतें आहे, वैभवांत लोळतें आहे, पण तें सुख आहे का—वैभव आहे का? जिथं पावित्र्य नाहीं तिथं सुखाचं समाधान कसलं? आकाशपुष्प होऊन हवेंत वितळून जाण्यापेक्षां चिखलांतलं कमळ होऊन रहाणं सुखाचंच नव्हे का?

चिखलांतलंच कमळ होतं तें! पण तें चिखलांतून काढून देवाच्या पायीं वहाण्यासाठीं—जनता जनार्दनाच्या पायी वहाण्यासाठीं तिनं तिला वैभवाच्या पापी हवेंतून दूर करून दारिद्र्याच्या पुण्यमय वातावरणांत ठेवलं होतं. ती कमळाची कळी उमलूं लागली आहे, तिचा अस्फुट सुवास दरवळायला सुरवात झाली आहे, हें पाहून तिला समाधान वाटलं.

न कां भेट होईना—ती सुखांत आहे हें प्रत्यक्ष पाहिल्यावर आतां विरहाची चाड कशाला? आतां भेटीची आसोशी कशाला? तिला वाटलं, पाद्रीनं म्हटलं तेंच खरं. आपल्या पापी श्वासानं सुद्धां ही नुकती उमलूं लागणारी पवित्र कळी कोमेजून जाईल.

पडदा पडला,—ती भानावर आली.

पाद्रीनं तिला बाजूला घेतलं आणि विचारलं, "पाहिलीस ही आमची गांवठी रंगभूमि! करमणुकची करमणूक होते आणि त्यांतूनच धर्मकार्य होतं."

" धर्मकार्य ? " सुंदरीनं विचारलं, " कसलं धर्मकार्य ? "

" माझ्याच घरचं कार्य आहे हें ! " पाद्री म्हणाला, " आजच्या जलशाच्या उत्पन्नाचे सारे पैसे गांवच्या दवाखान्याच्या मदतीसाठीं जाणार. हें सारं कुणी केलं माहिती आहे ?" समोर बसलेल्या दुर्गाबाईकडे बोट करून तो म्हणाला, " ती पहा. ती तिथं बसली आहे, तिनं. "

" कोण ती ?" सुंदरीनं विचारलं.

" या गांवची लक्ष्मी आहे ती. " पाद्री म्हणाला, " मूर्तिमंत आई आहे आम्हां सर्वांची. तिच्याच तालमींत तुझी लता वाढते आहे. खरी हिंदु बनली आहे. या गांवच्या उद्धारासाठीं तिनं केवढं काम केलं आहे—"

" श्रीमंत आहे वाटतं !" सुंदरी उद्गारली.

" छे छे अगदींच निर्धन आहे. " पाद्री उद्गारला, " अगदींच निराधार आहे. नुसता एक मुलगा आहे तिला. अगदीं एकुलता एक. आजच बी. ए. च्या परीक्षेंत तो फर्स्ट क्लासांत पहिला आल्याची तार आली. लतेचा तो एक जोडीदार आहे. दोघेंही लहानपणापासून बरोबरच वाढलीं आहेत. लोभाचे धागेदोरे विणले जात आहेत—"

सुंदरीच्या मनांत आशेचा अंकुर उगवला. हा कुमार कोण तो एकदां पहावा असं तिला वाटलं. लतेचा उद्धार करील का तो ?

पाद्री बोलत होता, " विलायतेला जाऊन बॅरिस्टर व्हावं अशी त्याची मोठी महत्वाकांक्षा आहे. पण जाणार कसं ? पैसा पाहिजे ना विलायतेला जायला ? "

" लोभाचे धागेदोरे जुळताहेत—" सुंदरी म्हणाली, " असं तुम्ही म्हणालांत पण त्याचा परिणाम काय होणार ? लता एक वेश्येची मुलगी आहे—"

" म्हणूनच तूं तिला भेटूं नकोस असं मी म्हणतोंय. असल्या जातगोताच्या वेड्या रूढीला दुर्गाबाई बळी पडणार नाहीं. तिला त्याची पर्वा नाहीं. ती मोठी धार्मिक आहे खरी पण कर्मठ नाहीं--सनातनी नाहीं.

गीतेच्या तत्वज्ञानानं तिची नजर मोठी व्यापक झाली आहे. कुमार आणि लता यांचं नातं जुळायचं असलं तर ती विरोध करणार नाहीं. तुम्ही संमति मिळाली तर कदाचित तो तिचा पतीसुद्धां होईल— सुंदरीचं " लक्ष आपल्या भाषणाकडे नाहीं असं पाहून तो म्हणाला, " कसला विचार करतेस सुंदरी ?"

" विचार ? " सुंदरी म्हणाली, " विचार नव्हे बेत करतेंय. कुमारला विलायतेला जायचंय नाहीं ? पैसे पाहिजेत ना त्याच्यासाठीं ? "

" हो. मोठीच रक्कम पाहिजे आहे. अन् ती मिळायची मुळींच आशा नाहीं. "

" किती पाहिजे ? "

" चारपांच हजार रुपये. कदाचित जास्तही. "

" ते मी दिले तर ? " सुंदरी आतुरतेनं म्हणाली.

" तूं !" पाद्री विचार करीत म्हणाला, " तूं देशील, पण तुझा पैसा तीं माणसं घ्यायचीं नाहींत. "

सुंदरीला धक्का बसला. आपला पैसा सुद्धां पापी अं ! एकक्षणभर विचार करून ती म्हणाली, " तर मग माझं नांव सांगूं नका. तुमच्याकडून — तुमच्यामार्फत इतर कुणाकडून—कुणातरी पुण्यवान् दात्याकडून ती रक्कम येतेय असं कांहीं सांगा. "

" खोटं बोलूं ? " पाद्रीनं विचारलं, " दुर्गाबाई समोर ? "

" माझ्या कल्याणासाठीं--" सुंदरी म्हणाली, " एवढं तरी सत्कार्य घडूं द्या माझ्या हातून. जन्मभर पापाच्या खाईत लोळत पडलेंय--एवढी तरी सज्जनाची सेवा माझ्या हातून घडूं द्या. तसं पाहिलं तर त्यांत माझाच स्वार्थ आहे—नाहींका ? लतेच्या कल्याणासाठीं— "

" थांब—" पाद्री म्हणाला. कुमारला घेऊन दुर्गाबाई येत होती. ती जवळ येतांच पाद्री म्हणाला, " काय निघालांत ? " सुंदराबाईकडे बोट करून तो म्हणाला, "या सुंदराबाई,-आमच्या मुंबईच्या पाहुण्या आहेत. या

जलशासाठीं मुद्दाम मुंबईहून आल्या आहेत— अन् या दुर्गाबाई. आत्तांच मी ज्यांच्याबद्दल सांगितलं ना, त्याच या. अन् हा त्यांचा मुलगा कुमार."

एकमेकांनीं एकमेकांना नमस्कार केला. दुर्गाबाईनं संकोचित वृत्तीनं तिला कुशल प्रश्न विचारले. तिच्या बाह्य स्वरूपामुळंच हा संकोच उत्पन्न झाला होता. अशा बाईची पाद्रीशीं ओळख कां, असा प्रश्न क्षणभर तिच्या मनांत आल्यावांचून राहिला नाहीं.

समोरून लता येत आहे असं पाहून कुमार निघून गेला तेव्हां पाद्री म्हणाला, "पाहिलंत? असी ओढ आहे तारुण्याची. आम्हां म्हाताऱ्यांना कोण विचारतो आतां?"

दुर्गाबाई नुसती हंसली आणि निरोप घेऊन गेली. सुंदरीही अस्वस्थ झाली होती. आपल्याला पाहिल्यामुळं दुर्गाबाईच्या मनावर झालेला परिणाम तिच्या ध्यानीं आल्यावांचून राहिला नाहीं. आजवर पाद्रीनं केलेल्या विरो-धाचं मर्म तिला आतां कळून आलं.

"मी जातें आतां." सुंदरी म्हणाली, "गाडीची वेळ झाली. आतां कुमारबद्दल काळजी करायला नको. ठरलं ना हें?"

"हो, ठरलंच म्हणायचं!" पाद्री म्हणाला.

त्याचा निरोप घेऊन सुंदरी निघून गेली.

केशवलाल आणि भिकू कुंपणा बाहेर जमलेल्या गर्दीत मिसळून जलसा पहात होते, लतेला पाहिल्यापासून केशवलाल अस्वस्थ झाला होता. पाद्रीला पाहिल्यानंतर भिकूला आलेला संशय अस्थानीं होता असं त्याला वाटलं. लतेच्या चेहेऱ्यांत सुंदरीच्या चेहेऱ्याशीं जें विलक्षण साम्य होतें तें त्याच्या ध्यानीं आल्यावांचून राहिलं नाहीं. एवढ्याच वयाची असतांना सुंदरीला त्यानं आपल्या आश्रयाला ठेवलं होतं. आज त्याला ही सुंदरीच वाटली. तारुण्याच्या अवस्थेतील ती जुनी भावना जागी झाली.

आजूबाजूच्या लोकांकडे त्यानं चौकशी केली त्यावेळीं लतेची सारी हकिकत त्याला कळून आली. सुंदरीनं आपल्याशीं प्रतारणा केल्याचा त्याला राग आला.

स्टेशनवर त्यानं सुंदरीला गाठलं. भिकू केशवलालच्या बरोबर असलेला पहातांच सुंदरीला सारा उलगडा झाला. त्यानं विचारलं तर काय सांगावं याचा ती विचार करते आहे तोंच केशवलाल तिच्यासमोर येऊन म्हणाला, "तूं इथं कुठं सुंदरी ? महाबळेश्वरला जाणार होतीस ना ? हेंच का तें तुझं महाबळेश्वर ? ही लबाडी कशाला ? सरळ सांगितलं असतंस तर मी नको म्हटलं असतं का ?—" तिच्याकडे रोखून पाहून दाबलेल्या दुष्टपणाचं हंसं चेहऱ्यावर आणीत तो म्हणाला, "ही तुझी बहीण तर अं ! ठीक. बहिणीला भेटायला यापुढं तुला इथं यावं लागणार नाहीं—समजलीस ? यापुढं हे चोरटे प्रवास संपले !"

"केशवलाल !" सुंदरी काकुळतीला येऊन म्हणाली. त्याचा उद्देश तिच्या ध्यानीं आला होता. कांहींच न बोलतां तो निघून जाऊं लागला, तेव्हां तिनं त्याचा हात धरला.

तिच्या हाताला जोराचा हिसडा देऊन तो निघून गेला. गाडींत दोघं दोन डब्यांत बसलीं. सुंदरीच्या डोळ्यापुढं काजवे चमकूं लागले होते. अंत:करण पिळवटून ती देवाची करुणा भाकीत म्हणाली. "देवा मंगेशा, माझ्या लतेला या लांडग्याच्या हातीं सापडूं देऊं नकोस !"

## १६

प्रवासांत दोघं दोन बाजूला जरी बसलीं होतीं तरी प्रत्येकाच्या मनांत एकमेकांबद्दलचेच विचार येत होते. सुंदरीची मन:स्थिति जितकी अस्वस्थ झाली होती तितकीच ती आपल्या मूळ स्वभावानुसार मन घट्ट करून आल्या प्रसंगाला धैर्यानं तोंड देण्याची तयारी करीत होती.

केशवलाल मात्र अगदीं वेगळ्या मन:स्थितींत होता. शरणगांवला येतांना भिकूनं त्याच्या मनांत रुजवलेलं संशयाचं बीज आतां करपून गेलं होतं. आतां तिथं निराळीच भावना निर्माण झाली होती. सुंदरी आपल्याशीं प्रतारणा करते आहे हें आतां त्याला कळून चुकलं. पण ती प्रतारणा त्याच्या एकनिष्ठेबद्दलची नव्हती—आपल्या छोट्या बहिणीला सर्वांच्या नजरेआड करायची तिची युक्ती पाहून केशवलालला संताप आला होता.

तो स्वतः तरी एवढा एकनिष्ठ कुठं होता ? तरीही त्याला वाटत होतं, कीं सुंदरीनं आपल्याशीं एकनिष्ठ रहावं. व्यभिचारी माणसाची वृत्ति ही अशी असते. तो स्वतः मधुकरी वृत्तीनं वागतो पण आपल्या उपभोगाच्या वस्तूकडून मात्र एकनिष्ठेची अपेक्षा करीत असतो. दुर्दैव हें, कीं त्या तशा एकनिष्ठ असतातही. स्त्रीजातीचा तो सर्वसाधारण गुण आहे.

सुंदरी आपल्याशीं एकनिष्ठ आहे याची केशवलालला खात्री झाली. पाद्रीला प्रत्यक्ष पाहिल्यावर संशयाला जागाच उरली नाहीं—आणि पाद्रीकडे जाण्याचं कारण कळल्यावर तर साऱ्या संशयाचं निराकरण झालं.

विलासी जीवनांत कामुकतेच्या चरितार्थासाठीं वयोमर्यादेचं बंधन नसतं. विलासी जीव सदोदित कालाची गती विसरत असतो. आपल्या तारुण्याबद्दलची आठवण त्याला इतकी जाज्वल्य असते, कीं कालमर्यादेप्रमाणें बदलणारे मानवी देहांतले फरक सुद्धां तो विसरून जातो.

केशवलालचं तसंच झालं होतं. त्यानं लतेला पाहिलं त्यावेळीं त्याला आपल्या तारुण्याची आठवण झाली—नव्हे तारुण्यापासून त्या कालापर्यंतच्या कालाच्या गतीची विस्मृति झाली. बाह्यस्वरूपाच्या दर्शनानं तो एकदम जुन्या काळांत गेला. सुंदरीला जी भीति वाटली ती त्याच्या याच उद्गाराची. आपण नकळत इतकीं वर्षे शरणगांवला येत होतों याचा राग केशवलाल काढील असं जें तिला पहिल्यानं वाटलं होतं, ती भीति आतां राहिली नव्हती. म्हणूनच ती फार घाबरली होती.

मुंबईला येऊन पोचतांच केशवलाल केव्हां उतरून निघून गेला हें तिला कळलं सुद्धां नाहीं नित्याप्रमाणें भिकूशेट सुद्धां तिची वाट पहात राहिला नाहीं.

ती घरीं आली तेव्हां तिला वाटलं होतं, कीं केशवलाल तिची वाट पहात राहिला असेल. पण त्या साऱ्या दिवसांत तो तिच्या घरीं आला नाहीं.

म्हणूनच ती फार घाबरून गेली होती. तिला वाटलं, लतेला आपण-

प्यासाठीं तो शरणगांवला गेला तर नाहीं ? पुनः शरणगांवला जाऊन अंदाज घ्यावा असंही तिच्या मनांत आलं.

तितक्यांत भिकू आला. त्यानं तिच्याबद्दल चुगली केली, केशवलालला घेऊन तोच गेला होता, हें जरी खरं होतं तरीही त्या आरोपांत आपण सापडूं नये म्हणून त्यानं भलताच कांगावा करायला सुरवात केली. तो म्हणाला, " मी तरी काय करूं ? तुम्हीच पहिल्यापासून चूक करीत आलांत. कां लपवून ठेवलंत शेटकडून ? अन् आतां जातांना महाबळेश्वरला जाणार म्हणून सांगितलंत आणि इकडे शरणगांवला आलांत !—कधीं रहात नसतां तिथं एक दिवस राहिलांत—बरं राहिलांत त्या राहिलांत, मला तरी मुंबईला पाठवायचं नव्हतं. मी इथं कां आलों म्हणून विचारतांच कांहींतरी सांगणं मला भाग होतं. शेटच्या समोर खोटं बोलणं तुम्हांला जितकं सोपं जातं तितकंच मला कठीण जातं. त्यांनीं दमदाटी देतांच खरी गोष्ट माझ्या तोंडून बाहेर पडली—"

" मग लतेबद्दल कां सांगितलंत तुम्ही ? " सुंदरी म्हणाली.

" कोण म्हणतो मी सांगितलं म्हणून ?" भिकू म्हणाला, "त्याबद्दल मी एक शब्दसुद्धां बोललों नाहीं. मला तरी कुठं काय माहित होतं ! शेवटीं तिथं चौकशी केली—लोकांनीं त्यांना हकिकत सांगितली. त्यांनींच अंदाज केला कीं ती तुमची कुणीतरी असावी म्हणून. ती दिसते ना अगदीं तुमच्या सारखीच—"

" पुरे पुरे " सुंदरी म्हणाली, " एवढं खरं, कीं तुम्ही माझा घात केलात. आज इतकीं वर्षे माझं गुपित राखून ठेवून अगदीं ऐनवेळीं माझा गळा कापलात. जा इथून. आतां एक शब्द सुद्धां बोलूं नका. "

आपला निरपराधीपणा शाबीत करण्यासाठीं भिकू आणखी लांबण लावीत होता पण सुंदरीनं त्याला बोलूं दिलं नाहीं. जे व्हायचं तें होऊन गेलं होतं. कुणामुळं काय झालं हें ठरवण्यांत आतां कांहीं स्वारस्य नव्हतं.

दुसऱ्या दिवशीं केशवलाल आला त्यावेळीं पहिल्यानं तिच्याशीं

बोललासुद्धां नाहीं. नित्याच्या वागणुकींत तिनं कांहींच फरक दिसूं दिला नव्हता.

तो कांहींच बोलत नाहीं असं पाहून ती म्हणाली, " काल मला टाकून निघून गेलांत हें बरं दिसलं का ? "

" मी कुठं तुझ्याबरोबर गेलों होतों ? " केशवलाल म्हणाला.

" तें खरं— पण एकदां भेट झाल्यावर मग मला टाकून निघून येण्यांत विशेष काय केलंत तुम्हीं ? "

" आतां तुझी पर्वा वाटत नाहीं मला ! "

" कां ? "

" पहिलं कारण हें— " केशवलाल तिच्या डोळ्याला डोळा देऊन गंभीरपणें म्हणाला, " पहिलं कारण हें, कीं इतकीं वर्षं तूं माझ्याशीं प्रतारणा करीत आलीस– मी सर्वस्वी तुझ्यावर विश्वास ठेवला पण तूं मला फसवलंस–"

" केव्हांही नाहीं– केव्हांही मी तुमच्या हाताला हात देऊनच उभी राहिलें होतें. "

" नाहीं. ही लतेची गोष्ट कां लपवून ठेवलीस माझ्यापासून ? "

" तुमच्या व्यवहाराशीं काय संबंध होता तिचा ? "

" अस्सं ?—व्यवहारापुरतंच बघायचं का ? त्याखेरीज तुझं माझं कांहींच कां नातं नव्हतं ?"

" तें खरं–पण तें माझं नातं होतं–माझ्या बहिणीचं नव्हतं. ती एक पोरकी पोर, निराश्रित, अजाण–तिला कशाला या पापांत घालूं ? मी एक रुतलेंच आहे या कर्दमांत—"

" हा कर्दम का ? कुठला कर्दम ? हें वैभव ? ही श्रीमंती ? हे तुझे थाट ? तुझे वाटेल ते चोचले चालवीत आलों मी ! मागशील तें देत आलों– पण तूं माझ्याशीं प्रतारणा केलीस. त्याचं उट्टं फेडल्यावांचून मी राहाणार नाहीं. "

"मी तुमच्या पायां पडतें—" त्याचे पाय धरून रडत सुंदरी म्हणाली, "पण त्या बिचारीला या पापांत ओढूं नका."

"मी वाटेल तें करीन. तूं कोण मला सांगणार ?"

"मी कोण ?" चवताळलेल्या वाघिणीसारखी ताड्कन उभी राहून सुंदरी म्हणाली, "मी सुंदरी—मी तुमची सहधर्मिणी नसेन कदाचित पण सहचारिणी मात्र आहें खास. प्रत्येक कामांत मी तुमच्या हाताला हात देत आलें. पापापुण्याचासुद्धां विचार केला नाहीं. एका शब्दानंसुद्धां तुम्हांला विरोध केला नाहीं. पण इथं मात्र मी आडवी येणार. इथं मला पापपुण्याची आठवण होते. बहीण आहे ती माझी. माझ्या पापाचं फळ तिनं नको भोगायला, म्हणून मी तिला माणसांत आणली. कुणीसुद्धां आसरा देत नव्हतं मला. वेश्येची मुलगी म्हणून कुणीसुद्धां तिला जवळ करायला तयार नव्हता. तो बिचारा पाद्री—विधर्मी—पण त्यानं मला मदत केली. त्यानं तिला लहानाची मोठी केली. त्यानं तिला योग्य मार्ग दाखवला. तिला बाटवून खिस्ती करणं त्याच्या हातीं होतं. पण त्यानं तसं केलं नाहीं. अन् तिला तुम्हीं—"

"इथं आणणार तिला मी !" केशवलाल निर्धारानं म्हणाला, "आजपर्यंत जशी तुला माझ्यापुढं वाकवली तशी तिलाही वाकवणार. मनांत येईल तसं घडवून आणायची मला धमक आहे. कधींच फसले नाहींत माझे बेत. म्हणून म्हणतों, लता जगेल तर माझी होऊनच जगेल."

"माझ्या आयुष्याचा नाश केलात तेवढा पुरे नाहीं का झाला ?" सुंदरी काकुळतवाणीनं म्हणाली.

"कसला नाश झाला तुझा ?" उसळून उठून केशवलाल म्हणाला, "कुठल्या तरी उकिरड्यांत पडणार होतीस— त्या तुला आणून या सोन्याच्या श्रीमंतीत लोळत ठेवली हा नाश केला का तुझा ? तिचा देखील तसाच घात व्हायला नको आहे. कुणातरी दरिद्री माणसाच्या घरीं खितपत पडण्यापेक्षां माझ्या जनानखान्यांत उद्धार होईल तिचा. म्हणूनच म्हणतों, लता जगेल तर माझी होऊनच जगेल !"

" हं: ! माहीत आहे ! " सुंदरी बेफिकीरपणानं म्हणाली.

" काय माहीत आहे " केशवलाल म्हणाला, " माझ्या पैशावर ती वाढली आहे—तूं कुठले आणलेस पैसे ? तिला माणसांत आणल्याचा अभिमान बाळगतेस ! कुठल्या पैशाच्या जोरावर ती माणसांत आली आहे ? माझी मालकी आहे तिच्यावर. तिचं वाटेल तें करायला मी मुखत्यार आहें. मी मालक आहें तिचा आणि ती मालकी मी गाजवणार."

" नाहीं—नाहीं—" सुंदरी काकुळतीला येऊन म्हणाली, "माझ्यासाठीं—आजवर एकनिष्ठेनं तुमच्या हातांत हात घालून राहिलेल्या या सुंदरीसाठीं असं कांहीं करूं नका. तिनं कांहींच अपराध केला नाहीं तुमचा. आपल्या आयुष्यांत ती कधींच तुमच्या माझ्या आड आली नाहीं ! गरीब बिचारी एक कुमारिका—धर्माच्या मार्गावर नुकतीच कुठं पाऊल टाकते आहे, तिच्या आयुष्याचा असा नाश करूं नका. अजून मी तिला माझी ओळखसुद्धां दाखवली नाहीं—यापुढं सुद्धां माझं नातं मी तिला कळवणार नाहीं—बोलणार नाहीं—भेटणार नाहीं—तिच्या डोळयाला डोळा सुद्धां देणार नाहीं. धर्माच्या प्रकाशांतून तिला अशी पापाच्या खाईत ओढूं नका. मी तुमच्या पायां पडतें—" असं म्हणून त्याचे पाय धरून ती ओक्साबोक्शीं रडूं लागली. तिला लाथेनं धुडकावून केशवलाल एक शब्दसुद्धां न बोलतां निघून गेला.

सुंदरी तशीच रडत बसली होती. दु:खाच्या भारानं तिचं काळीज झिरपत होतं. तें पाणी डोळ्यावाटे ओसंडून तो भार हलका करण्याचा ती प्रयत्न करीत होती.

कितीतरी वेळ ती तशीच विचारचक्रांत बसली होती. तिला मार्ग दिसेना. आपल्या एकनिष्ठेबद्दल तिला चीड येऊं लागली. तिला वाटलं, हेंच कां त्या एकनिष्ठेचं बक्षिस ? पुरुषानं वाटेल ते थेर करीत हिंडावं आणि स्त्रीनं मात्र एकनिष्ठेनं रहावं ? प्रत्यक्ष आपल्या धर्मपत्नीशीं बेइमान झालेल्या या माणसाशीं आपण इमानानं वागल्यें ही आपली चूक झाली का ?

आणि आपल्याशीं तरी त्यानं कुठं इमान बाळगलं ? धर्मपत्नीशीं जशी प्रतारणा केली तशीच आपल्याशीं प्रतारणा करूनही तो आपल्या विलासी वृत्तीचा चरितार्थ करीत होता. अन् आतां तर एक कोवळी कळी खुडून टाकायचा अघोरी विचार त्याच्या मनांत आला आहे— आतां कां म्हणून त्याच्याशीं इमान राखावं ?

ती आपलं मन पारखून पाहूं लागली. तिला वाटलं आपल्या हातून सुद्धां कुठं तरी चूक झाली आहे. मोहन दिसल्यापासून तिचं मन चळलं होतं— तरीही तिनं आपल्या मनाला लगाम घातला होता. एकनिष्ठच्या तात्विक भावनेनं तिनं आपलं मन ताब्यांत ठेवण्याचा कसून प्रयत्न केला होता.

एकदांच तिची त्याची भेट झाली होती. त्यावेळीं तो संकटांत होता. त्या संकटांतून त्याला तिनं सोडवलं होतं. तिनं आपल्या मनाशीं प्रश्न केला, तें जें कांहीं केलं तें नुसत्या भूतदयेनंच का ?

मोहननं त्यावेळीं तिला झिडकारलं. त्या झिडकारण्याचा तिच्या वर परिणाम झाला नाहीं. कां ? तिला त्या प्रश्नाचं उत्तर देतां येत नव्हतं.

तिला वाटलं, हीच ती प्रतारणा. याच प्रतारणेचं प्रायश्चित म्हणून आतां आपल्यावर हा प्रसंग आला आहे काय ? मग केशवलाल इतकीं वर्षे जी सारखी प्रतारणा करीत आला त्याचं प्रायश्चित त्याला कधींच कां मिळालं नाहीं ? ईश्वरानं प्रतारणा करायची पुरुषाला सरसहा मुभा दिली आहे का ?

हळुहळू तिची मनःस्थिति बिघडूं लागली—तिची निष्ठा मावळूं लागली—कोमल भावनांचा लोप झाला—अंतःकरणांतलं वादळ बेफाम होऊं लागलं—तोंच भिकू तिथं आला. त्याला पहातांच ती चवताळून त्याच्या अंगावर धावली आणि म्हणाली, "चालते व्हा इथून. पुनः पाऊल सुद्धां टाकूं नका इथं !"

" जरा थांबा !" भिकू म्हणाला, " तुमच्या फायद्यासाठींच मी इथं आलों आहें"

"पुरे झाला माझा फायदा–" सुंदरी चिडून म्हणाली, "आतां नाशाच्या मार्गाला लागलेंय मी. केशवलालशीं आजवर मी एकनिष्ठ राहिलेंय, आतां तो माझ्याशीं प्रतारणा करतोय—

"अन् माझ्याशींही !" भिकू म्हणाला, "मला दिलेलं वचन त्यानं मोडलं. त्यानं पैसे दिले नाहींत—आज माझ्या गळ्याला फास लागला आहे. आतां मी गय करणार नाहीं त्याला—"

भिकूचं धोरणं सुंदरीच्या ध्यानीं येईना. तो खरोखरच बिथरून आला आहे, कीं केशवलालच्या सांगण्यानं बिथरल्यानं ढोंग करतो आहे याचा अंदाज तिला येईना.

भिकू म्हणाला, "तुम्हाला माझा संशय येतोय ? तुमच्या दृष्टीनं बरोबर आहे तें. पण मला सुद्धां वाटत नाहीं, कीं त्या पोरीचा नाश व्हावा. आणि केशवलाल तर तिला आणायला निघाला आहे—"

"कुठं ?" सुंदरीनं घाबरून विचारलं.

"शरणगांवला—मोटरनं—पत्ता लागूं नये म्हणून तो मोटरनं चालला आहे. मला पैसे दिले नाहींत ते नाहींतच पण मला बरोबरसुद्धां येऊं दिलं नाहीं—मी सुद्धां निघालोंय त्याच्या मागोमाग. तुम्ही येतां माझ्याबरोबर ?"

सुंदरीला मनाचा निश्चय करतां येईना. अजूनही तिला भिकूचा संशय येत होता. ती म्हणाली, "काय तिच्या नशिबीं असेल तें होईल. या जातींत जन्म घेतल्याचं फळ भोगायचंच असेल तर मी तरी काय करणार त्याला ! —"

"ठीक आहे." भिकू म्हणाला, "यायचं नसलं तर नका येऊं. पण मी मात्र त्यांचा पाठलाग करणार. काय करतोय एवढं नुसतं पाहाणार. तुम्हांलाच आपल्या बहिणीची कळकळ नाहीं तिथं मी तरी काय करूं !—" असं म्हणून तो एकदम निघून गेला.

सुंदरी बेफाम झाली होती. भिकूजवळ तसं बोलतांना मन ताब्यांत ठेवणं तिला अत्यंत कठीण जात होतं. भिकूवर तिचा विश्वास नव्हता. या क्षणाला तो केशवलालवर उलटला असेल पण चार पैसे मिळतांच पुनः आपल्यावरही उलटेल हें तिला माहीत होतं. म्हणूनच तिन मनाचा निश्चय केला—

तिला वाटलं, झाली एवढी एकनिष्ठा पुरे झाली. लतेला जगवायचं असेल तर केशवलाल मेलाच पाहिजे—तो मरायला एकच उपाय—

तो उपाय करण्यासाठीं ती मनाचा कठोर निश्चय करून एकदम घराबाहेर पडली.

---

## १७

पोलिसांच्या हातून सुंदरीनं मोहनला सोडवलं त्यानंतर दोनचार वेळ तो तिच्या घरीं येऊन गेला होता. त्याच्या स्वाभाविक वृत्तीप्रमाणें तो तिच्यापासून शक्य तितका दूर राहिला होता. तिच्या घरीं गेला, बसला, बोलला, तरी त्यानं तिला स्पर्शसुद्धां केला नाहीं. आंगलट यायचा तिनं प्रयत्न केला तर तो आंग चुकवून दूर होत असे.

एवढा जरी तो तिच्यापासून दूर राही तरीही जातांना एखादं हजार पाचशेंचं नोटांचं पुडकं तिच्या आंगावर फेकून जाई.

तिला त्या पैशांची जरुरी नव्हती. पैशासाठीं ती त्याच्या येण्याची अपेक्षा करीत नव्हती. तरीही त्यानं दिलेले पैसे परत करण्याचं धैर्य तिनं केलं नाहीं. तिनं तसं केलं असतं तर तें त्याला पटलं नसतं—त्याच्यावर छाप टाकण्यासाठीं ती निरपेक्षतेचं ढोंग करते आहे असा समज करून घेऊन तो पुनः आला सुद्धां नसता. म्हणूनच तिनं मोहननं दिलेले पैसे कधींच परत केले नाहींत. वेळोवेळीं त्यानं दिलेल्या नोटांचीं पुडकीं तिनं जपून एका बाजूला ठेवलीं होती. केव्हां तरी असा प्रसंग येईल, केव्हांतरी

आपलं मन त्याला कळून येईल, केव्हांतरी तो आपलासा होईल आणि त्यावेळीं हीं सारीं नोटांचीं पुडकीं आपण त्याला परत करीन असा विचार करून ती स्वस्थ राहिली होती.

मोहन तिच्याकडे जात होता तो मात्र अगदीं वेगळ्या उद्देशानं. उपकाराची जाणीव तो विसरला नव्हता. तो कितीही क्रूर असला तरी उपकारकर्त्यावर उलटण्याइतका कृतघ्न नव्हता.

पण तेवढ्याचसाठीं तो तिच्या घरीं जात नव्हता. त्याला माहीत होतं, कीं सुंदरी ही केशवलालची रखेली होती. केशवलालच्या कारस्थानांची जाळीं याच जागीं विणलीं जात असत. त्यांतला एकादा धागादोरा केव्हांना-केव्हां, कुठून ना कुठून तरी पकडण्याच्या आशेनं तो तिथं जात असे.

सुंदरी मात्र गैरसमज करून घेत होती. अंत:करणांत कुठंतरी ओलावा आल्यामुळं तो येतो असं तिला वाटे. तो तिचा आशाळभूतपणा होता. त्या दोघांच्या वयांत केवढं तरी अंतर होतं. सुंदरी मोहनपेक्षां कितीतरी वर्षांनीं वयस्क होती. पण कित्येक बायका ज्या अखंड तरुण असतात त्यांपैकींच ती होती. कित्येक वर्षांत काळाच्या पाऊल वाटेनं तिच्या देहावर यत्किंचितही परिणाम केला नव्हता. कित्येक वर्षे ती एकच वय सांगत होती आणि तें ऐकणाराला सहज पटण्याइतकी ती तरुण दिसे. म्हणूनच तिला वाटे, कीं मोहन आज ना उद्यां आपल्याला अनुकूल होईल.

केशवलालचं आणि तिचं नातं केवळ दुकानदारीचं होतं. पहिला सोहोळा त्याच्याकरवीं झाला या कुलीन स्त्रीला शोभणाऱ्या एकांतिक जाणिवेनं ती त्याच्याशीं एकनिष्ठ राहिली होती, एवढंच. स्त्रीच्या जीवनांत कुणाही पुरुषाबद्दल जी एक विशेष प्रकारची कोमल भावना उत्पन्न होते ती तिच्या मनांत पहिल्यानंच मोहनला पाहिल्यानं झाली. आज ना उद्यां त्या अंकुराला वाढ येईल या अपेक्षेनं ती वाट पहात राहिली होती.

केशवलाल केव्हांही तिला एकाद्या पाळलेल्या कुत्र्यासारखीच वागवीत आहे. त्याबद्दल तिनं कधींही तक्रार केली नव्हती. तिला वाटे, लग्नाच्या

बायकांना तरी पुरुष यापेक्षां कुठं निराळे वागवतात? केशवलालच्या बायकोची परिस्थिति ती पहात होती— तशीच आपण म्हणून समजत होती. पण आतां त्यानं आज तिला झिडकारल्याचा राग आला.

नुसत्या झिडकारल्यामुळं तो राग आला नव्हता. आपल्या अनाथ बहिणीवर झेप टाकण्याची जी क्रूर पशुवृत्ती त्यानं दाखवली त्यामुळंच ती चवताळली होती. आणि म्हणूनच ती जी आपल्या घराकडून निघाली ती सरळ मोहनच्या घरीं आली.

योगायोगानं मोहन त्यावेळीं हजर होता. कुणी बाई आली आहे अशी नोकरानं वर्दी देतांच तो क्षणभर विचारांत पडला. पूर्वीप्रमाणं केशवलालनं केलेला हा कांहीं तरी बनाव असेल अशी त्याला शंका आली. दरवाजाच्या छिद्रांतून त्यानं पाहिलं आणि सुंदरा आलेली पाहून तो आश्चर्यचकित झाला— क्षणभर स्तंभित झाला.

पुनः त्याला शंका आली. हाही केशवलालचाच बनाव नसेल?

पूर्वीचा आठवण झाली. मरणप्राय स्थितींत असतांना तिनं त्याला बचावलं होतं—

दुसरी आठवण झाली. त्या एका तरुणीलाही त्यानं बचावलं होतं— तीही केशवलालची हस्तक होती— तिनंही आपल्या घरीं बोलावून फसवायचा प्रयत्न केला होता - हें तसंच तर नसेल?

पण त्याची वृत्ती भेकड नव्हती. मुद्दाम संकटांत उडी टाकून सहीसलामत बाहेर निघायची धमक त्याच्या अंगीं होती. म्हणूनच त्यानं तिला आंत येऊं दिलं. त्या खोलींत पाऊल टाकतांच सुंदरीला त्यानं विचारलं, "कशाला आलीस इथं?"

"कशाला आलें?" सुंदरी निर्भयपणें म्हणाली, "कां असे निर्दय झालांत? कां माझं घर वर्ज्य केलंत?"

"मला जगायचंय अजून." मोहन हंसत म्हणाला.

"जगायचंय?" सुंदरीनं त्याच्या डोळ्याला डोळा देऊन त्याच्या-

समोर येत विचारलं, "कोण म्हणतंय् तुम्हांला जगूं नका म्हणून ? कोण जीव घेत होतं तुमचा ?"

पुन: हंसून मोहन म्हणाला, "तें काय तें तुला माहित आहे— तें काय तें मलाही माहिती आहे. कशाला विचारायचं ढोंग करतेस ? एकीला हातीं धरून केशवलालनं मला फासांत अडकवायचा कसा प्रयत्न केला तें मी एकदां तुला सांगितलं नव्हतं का ? कशाला विचारायचं ढोंग करतेस ? स्त्रियांच्या जातीनं कधीं कुणाचं कल्याण केलंय ? म्हणून म्हणतों, इथून निघून जा. अन् पुन: केव्हांही इथं पाऊल टाकूं नकोस."

"कां ?"

"मी म्हणतों म्हणून !"

"कां म्हणतां असं ?"

"मला वाटतं तें मी बोलतों. स्त्रीजातीवर माझा विश्वास नाहीं. स्त्रियांचं मला आकर्षण नाहीं. मला षंढ म्हण हवा तर. पण स्त्रीला पाहून माझं मन विरघळत नाहीं. माझ्या भावना मी मर्यादित केल्या आहेत. मी इतरांसारखा नाहीं.—मी सामान्य माणूस नाहीं. केशवलालच्या मापानं मला मोजूं नकोस. तुझ्या फंदांत मी केव्हांही सांपडणार नाहीं."

सुंदरी क्षणभर स्तब्ध राहिली. झडप घालण्यासाठीं वाघीण ज्या नजरेनं आपल्या सावजाकडे पहाते त्या नजरेनं मोहनकडे पहात ती म्हणाली, "आज मी माझं मन उघडं करणार आहे. उभ्या आयुष्यात माझं मन कुठं गुंतलं नव्हतं. जुगाराच्या अड्ड्यांत तुमच्या बापाबरोबर मी तुम्हांला पहिल्यानं पाहिलं—"

दोन प्रकारच्या आठवणी त्या दोघांच्याही हृदयांत या वेळीं जाग्या झाल्या होत्या. पहिल्याच खेपेला कुणातरी परक्या व्यक्तीनं मोहनच्या समोर त्याच्या बापाचा उल्लेख हा असा केला होता, त्यामुळं पुन: साऱ्या आठवणी जाग्या झाल्या. त्या नुसत्या उल्लेखासरशीं संतापानं तो दांत ओठ खाऊं लागला.—ती करकर सुंदरीला ऐकूं आली. तिच्या अंगावर शहारे आले.

त्वेशाच थरारलेल्या मन:स्थितींत ती म्हणाली, " माझा दुबळेपणा कबूल करण्यासाठीं मी आलें आहें---या पायाची दासी व्हावं म्हणून मी आलें आहें. केशवलालचं माझं नातं तुम्हीं जाणतां. तसलं नातं मला नको आहे—तसला संबंधसुद्धां मला नको आहे. या जगांत मी एकटी आहें---इतक्या माणसांत वावरत असून सुद्धां मी एकटी आहें. कुणाचा तरी आधार पाहिजे. जिव्हाळ्याचा आधार पाहिजे—मी प्रेमाचा म्हणत नाहीं. तो पवित्र शब्द उच्चारण्याची पात्रता माझ्याठायीं नाहीं. तुमच्या पायाची दासी व्हायचंय् जरी तुम्हीं माझा स्वीकार केला—"

" कुणाच्या पायाची दासी व्हायचंच तुला ?" मोहननं कठोरपणानं विचारलं

" तुमच्या ! " म्हणतांना सुंदरीला गहिंवर आला.

" वा : " मोहन म्हणाला, " उत्तम नटी आहेस. छान अभिनय करतेस. पायाची दासी अं ?"

"प्रियतमा !" सुंदरी तोंडांतल्या तोंडांत पुटपुटली.

" वा: " पुन: तिरस्कारानं हंसून मोहन म्हणाला, " आणि प्रियतमा सुद्धां का ? तूं पायाची दासीही होशील-प्रियतमाही होशील-पण कुणाची ?-" शेजारच्या टेबलाचा खण उघडून आतलं एक नोटांचं पुडकं हातीं घेऊन मोहन म्हणाला, "याची !-या पैशाची. या पैशाची दासी-या पैशाची प्रियतमा. ऐकलंस सुंदरी, मी धाडसी असलों तरी मूर्ख नाहीं. तुमच्या जातीला मी चांगला ओळखतों. प्रियतम, प्रभु, परमेश्वर म्हणून तुम्हीं पुरुषांना झुलवतां. कां माहीत आहे?-" उत्तरासाठीं तो क्षणभर थांबला. पण सुंदरी कांहींच बोलत नाहीं असं पाहून म्हणाला, " धंद्यासाठीं ! पोट जाळण्यासाठीं ! या पैशाचा चिखल पायाखालीं तुडवण्यासाठीं-" नोटांचं पुडकं तिला दाखवून तो म्हणाला, " हाच ना तो तुझा प्रियतम ?-तुझा प्रभु !-तुझा परमेश्वर ! घे हा तुझा परमेश्वर आणि मर एकदांची ! " असं म्हणून त्यानं त्या नोटा तिच्या अंगावर भिरकावल्या. नोटा खोलीभर विखुरल्या गेल्या.

शांतपणें हंसत सुंदरी म्हणाली, "एवढ्या नोटा मी सुद्धां अशाच उडवून देऊं शकतें. तुम्ही माझ्या घरी येत होतां त्या वेळीं तुम्ही दिलेलीं नोटांचीं पुडकीं मी घेऊन ठेवीत होतें म्हणून तुम्हाला असं वाटलं. आतांच या माझ्याबरोबर—मी तुम्हांला दाखवतें, तीं पुडकीं तशींच ठेवून दिलेलीं आहेत—फीत सुद्धां सोडली नाहीं त्यांची. पैशाला भाळणाऱ्या कुणी असतील—नव्हे आहेत—पण मी त्यांतली नाहीं. पैशाची भूक भागवण्यासाठीं मी इथं आलें नाहीं. प्रेमाची भूक भागवण्यासाठीं सुद्धां मी आलें नाहीं. त्या भुकेच्या खाईत मी पिचत राहिलें असतें—उच्चार सुद्धां केला नसता त्या प्रेमाचा. पण आज मी तुमच्या कामासाठीं आलेय्. तुम्हांलाही एक भूक आहे—"

"मला ? मला कसली भूक ?"

"सूडाची भूक—नव्हे सूडाची आग."

"कसला माझा सूड ?"

सुंदरी पुनः हंसून म्हणाली, "तें काय तें तुम्हांला माहीत आहे—तें काय तें मलाही माहीत आहे. ती सूडाची आग—"

"काय माहिती आहे तुला ?" ताड्कन उभा राहून तिचा हात धरीत मोहननं विचारलं.

"बायकांची नजर मोठी तिखट असते मोहन," सुंदरी शांतपणें म्हणाली, "पुरुषाच्या डोळ्याला डोळा दिला, कीं त्यांच्या अंतःकरणांतल्या तळाखालचा गाळ सुद्धां दिसून येतो बायकांना. तुमच्या अंतःकरणांतला तो गाळ मला दिसलाय्. गाळ नव्हे—जाळ—पेटती आग—सूडाची आग—"

"बोल—स्पष्ट बोल." कासावीस होऊन मोहन म्हणाला, "काय माहीत आहे तुला ?"

शांतपणानें बोलत असतां सुंदरी मनावर पूर्ण ताबा ठेवण्याचा प्रयत्न करीत होती. एक क्षणभर थांबून ती म्हणाली, "मर्दासारखा मर्द तुमचा बाप. कुणा दगाबाजानं विश्वासघात केला नसता तर या जगांत आज सूर्यासारखा तळपत राहिला असता—"

" थांबलीस कां—पुढं बोल. "

" कुणी त्याचा विश्वासघात केला ? " मोहनच्या डोळ्याला डोळा भिडवून सुंदरीनं विचारलं, " कुणी पकडून दिलं त्याला—"

" कुणी ? " थरथर कांपत मोहननं विचारलं.

" दगा देऊन त्यानं तुमच्या बापाचा—बापाचा खून—खूनच नव्हेतर काय ?—कुणी खून करवला ? "

" हो—हो-हो—! " दांत करकर वाजवीत बेफाम झालेला मोहन म्हणाला. "

" केशवलाल ! " एक आंवढा गिळीत सुंदरी म्हणाली, " तुमचा वैरी—माझा मालक—"

मोहन मोठमोठ्यानं हंसत सुटला. त्याचं हंसं अगदीं अनावर झालं होतं. उकळ्यावर उकळ्या देत तो हंसतो आहे असं पाहून सुंदरी स्तंभित झाली.

हंसं आवरीत मोहन म्हणाला, " असा त्याचा कांटा काढायला पहातेस होय ? त्याला मी मारलं कीं मग तूं माझ्या गळीं पडणार—अन् पुनः केव्हां तरी माझा असाच खून पाडणार ! जा. मूर्ख आहेस."

" नाहीं. " सुंदरी म्हणाली, " मी खरं सांगतेय्. हें गुपित माझ्या हृदयांत सळसळत होतं. भीतीनं मी तोंड उघडलं नव्हतं—पण आतां—" असं म्हणून ती थांबली.

" आतां असं काय विशेष झालं ? " मोहननं तोंड वेंगाडून विचारलं.

" आतां काय झालंय् तें सांगतें ऐका " असं म्हणून सुंदरीनं झालेली सर्व हकीकत मोहनला सांगितली. ती हकिकत संपतांच ती म्हणाली, " आतां अनावर झालं—माझाही सूड आहे हा. सूडाची गोडी काय आहे त्याची कल्पना मला आज आली म्हणून मी तुमच्याकडे आलें. आतां त्या वेळीं काय झालं तें सांगतें. रामलालला तुमच्या बापाकडे पाठवलं तें केशवलालनंच. भिकू त्याच्याबरोबर तुमच्या घरापर्यंत गेला होता. तो बाहेर राहिला होता.

तुमच्या बापानं कबुली देतांच भिकूनं केशवलालला फोन केला-त्यानं पोलिसांना फोन वरून कळवलं. मी प्रत्यक्ष ऐकलं. माझ्या समोरच त्यानं फोन केला. आतां पटलं ? असा तुमच्या बापाचा खून पाडला आणि आतां तो शरणगांवला निघालाय्—माझ्या बहिणीची अब्रू घ्यायला—तुमच्या आईचा छळ करायला. शंकरचं नांव-निशाण सुद्धां जगांत राहूं द्यायचं नाहीं अशी प्रतिज्ञा केली आहे त्यानं. अन् म्हणूनच मोटरनं तो सरळ शरणगांवला निघालाय्—"

"केव्हां ?" मोहननं विचारलं.

"आतांच—मी इथं आलें तेव्हांच."

एक शब्द सुद्धां न बोलतां कपडे करून मोहन निघाला. जातांना खणांतलं पिस्तुल काढून त्यानं आपल्या खिशांत टाकलं.

सुंदरी तिथंच उभी होती. तिचा आनंद अनावर झाला होता. आपली बहीण बचावणार याची आतां तिला खात्रीच वाटत होती. केशवलाल मरो कीं जगो, लता बचावली कीं आपलं काम झालं एवढंच तिला वाटत होतं. पण केशवलाल मेल्याशिवाय लतेचा बचाव झाला नसता आणि मोहन निघाल्यामुळं केशवलाल मरणार हें देव बोलून चुकला असं तिला वाटलं.

ती जायला निघाली तोंच खोलीभर विखुरलेल्या नोटांकडे तिची नजर गेली. एक क्षणभरच तिला वाटलं, कीं त्या नोटा तशाच टाकून निघून जावं. तितक्यांत तिला पाद्रीला दिलेल्या वचनाची आठवण झाली. तिला वाटलं, भावाचे पैसे भावाच्या कामीं लागतील. तिनं त्या नोटा गोळा करून घेतल्या. मोहननं दिलेल्या साऱ्या रकमा पाद्रीकडे नेऊन द्यायचा निश्चय करून ती त्या जागेंतून बाहेर पडली.

## १८

जलशाला अपेक्षेबाहेर उत्पन्न झालं. दुर्गाबाईनीं गोळा केलेल्या रकमाही बऱ्याच मोठ्या होत्या. सूतिकागृहाची कांहीं तरी ददात मिटली असं पाहून पार्द्राप्रमाणेंच दुर्गाबाईलाही समाधान वाटलं.

त्या जलशामुळं एक मोठा फायदा झाला. आजवर आजूबाजूच्या गांवांतील जे लोक दुर्गाबाईच्या चळवळीपासून दूर राहिले होते त्यांचंही लक्ष त्या कामाकडे वेधलं. त्या आश्रमांत माणसाची गर्दी होऊं लागली. पुरेसे चरखे आणि माग मिळवतां मिळवतां सर्वांनाच पुरेवाट झाली. माग. मिळवण्याबरोबरच मागावर काम करणारी माणसंही मिळवणं अवश्य होतं जुनीं माणस नाहींशीं झाली होती. एका काळचं तें कोष्ट्याचं गांव पण आतां ते कांहीं कोष्टी मुंबईत जाऊन गादी गिरण्यांतून मजुरी करीत होते. त्यांना परत आणण्याचा प्रयत्न करण्यांत आला. पण तो यशस्वी झाला नाहीं. एकदां मुंबईची चटक लागल्यावर पुनः खेड्यांत यायला कुणीच तयार नव्हता.

खेड्यांत येऊन त्यांना जी मजुरी मिळणार होती ती खेड्यांत चरितार्थ करायला जरी पुरेशी होती तरी मजुरीचा आंकडा दिसायला लहान होता. मुंबईला मिळणारी मजुरी मुंबईत रहायला जरी पुरी पडत नसे तरी तो आंकडा मोठा दिसत असल्याकारणानं मोह अनावर होत होता. म्हणून माग चालविणारीं माणसं नवीं तयार करणं भाग पडलं. नवीन माणसं तयार व्हायला अवधी लागत होता, तोंपर्यंत तयार होत असलेलं सूत इतर ठिकाणीं पाठवून त्याचं कापड तयार करून आणण्यांत येत होतं.

आपल्या गांवीं तयार झालेल्या सूताचा कपडा आपल्याच गांवच्या उपयोगाला पडला पाहिजे असा दुर्गाबाईचा आग्रह होता. आपण तयार केलेली खादी बाहेर नेऊन विकायची आणि आपल्यासाठीं बाहेरून येणारा कपडा विकत घ्यायचा, तो विकत घेण्यासाठीं स्वतः मिळवलेला पैसा खर्ची घालून फायदा परक्या गांवाला द्यायचा, हें दुर्गाबाईला पसंत नव्हतं.

जाडाभरडा कपडा वापरायला पहिल्यानं सारेच लोक तयार नव्हते. पण पुढं हळुहळु तें अंगवळणी पडूं लागलं. बायकासुद्धां रंगीबेरंगी चिटा-पातळांची हौस सोडून आपल्या सुताचं तयार झालेलं कापड आपणच वापरूं लागल्या. अशा रितीनं कापडाच्या बाबतींत तरी शरणगांव स्वावलंबी बनला.

दुर्गाबाईच्या कार्याचं महत्व सर्वांना पटूं लागलं होतं. लहानशा प्रमाणावरचे काढलेले लोणचीं पापडाचे कारखानेंही जोरांत चालत होते. गरिबाचं प्रत्येक घर म्हणजे एक लहानसा कारखानाच झाला होता. या कारखान्याला मोठं स्वरूप देण्यासाठीं जलशाच्या उत्पन्नांतील कांहीं भाग पाद्रीबावानं देण्याचा प्रस्ताव केला पण दुर्गाबाईनीं ती देणगी नाकारली. ज्या कामासाठीं जो पैसा मिळवला तो त्याच कामाला खर्ची पडला पाहिजे असा तिचा आग्रह होता. कित्येकांना तें रुचलं नाहीं— पण तिनं त्यांची समजूत घालून आजपर्यंत आलेल्या अनुभवाच्या जोरावर स्वावलंबी होण्या-बद्दल सर्वांचं मन यशस्वी रीतीनं वळवलं.

कुमार शरणगावांत राहून आईच्या कामाला मदत करीत होता. पण त्याचं लक्ष विलायतेकडे लागलं होतं. प्रतिकूल परिस्थितींत त्यानं अभ्यास केला होता. ती परिस्थिति शिक्षणक्रमाच्या या शेवटच्या घडीला संपेल असं जें त्याला वाटलं होतं तें खोटं ठरलं. कांहींतरी केल्यावांचून गत्यंतर नव्हतं. आणि काय करावं हें त्याला सुचेनासं झालं होतं. पुढला मार्ग ठरवण्याच्या कामीं दुर्गाबाईनं त्याला कोणतंच बंधन घातलं नव्हतं— पण तेंच त्याला कठिण जात होतं. आईनं हुकूम करावा आणि त्यानं तो ऐकावा अशी आजपर्यंतची संवय झाल्यामुळं पुढला मार्ग स्वतः ठरवणं त्याला कठीण गेलं.

बिचारी लता तरी काय सांगणार होती? सर्वच दृष्टीनीं ती अपंग होती. तिला आतां बरंवाईट कळूं लागलं होतं. आपण कोण आहे, आपले आईबाप कोण, आपलं कुलशील काय, हें कळण्याची जिज्ञासा पदोपदीं

अनावर होता असे, तरी अदृश्य अशा भूतकालांत डोकावण्यापेक्षां तिला सुद्धां भविष्यकाळाची काळजी लागली होती. कुमारच्या भवितव्यावर तिचं भवितव्य अवलंबून होतं.

एका प्रकारें त्या दोघांचं लग्न ठरल्यासारखं झालं होतं. पण स्वतःच्या पायावर उभा राहायच सामर्थ्य आल्याशिवाय संसारांत पडायचं नाहीं असा कुमारचा निर्धार होता. म्हणूनच लतेच्या प्रश्नाला उत्तर देणं त्याला कठीण गेलं. तो म्हणाला, "करायचं काय ? मनांत पुष्कळ येतं--कितीतरी कल्पना कितीतरी योजना मी आखून ठेवल्या आहेत पण ते नुसते कल्पनेचे खेळ आहेत. ते खेळ प्रत्यक्ष खेळायचे कसे हेंच मला ठरवतां येत नाहीं."

"मग ?" लता म्हणाली, "मग काय करणार आतां ? असंच इथं या शरणगांवांत बाकीच्या चार लोकांसारखं यांत्रिक जीवनच कां भरडीत राहाणार ?

"दुनियेंतले इतर चार लोक जें करताहेत तेंच केल्याखेरीज आतां गत्यंतर नाहीं. मार्ग एकच दिसतो आहे—नोकरी !"

"नोकरी ? या खेड्यांत कसली नोकरी मिळणार ?"

"इथं नव्हे—कुठंही ! जिथं पोटभर अन्न मिळेल, आईला कष्ट करावे लागणार नाहींत इतकं स्वास्थ्य मिळेल, तिथं ! शेवटचा आधारा म्हणजे मुंबई तर आहेच ?"

"मुंबई ?" लता घाबरून म्हणाली, "तूं मुंबईला जाणार कुमार ?"

"नको जायला ?" कुमार हंसून म्हणाला, "मग कुठं जायचं ? कुठं आहे दुसरा आधार ? एवढं कसं कळत नाहीं तुला ? आतां मी कर्ता सवरता झालों—अजून किती दिवस आईवर भार टाकायचा ? माझ्या जन्मापासून तिनं संकटांत दिवस काढले. परिस्थितीशीं ती झगडली. तो झगडा चालतांना स्वतःबरोबरच साऱ्या गांवच्या गोरगरिबांच्या चरितार्थाचं साधन तिनं निर्माण केलं, मी बी. ए. होईपर्यंत माझं शिक्षण केलं—तुझंही शिक्षण केलं, आतां किती दिवस तिला असं कष्ट करीत जिणं कंठूं द्यायचं ? काय म्हणून तिनं आतां माझा भार वहात राहावं ?"

लतेच्या डोळ्यांतून आसवं गळूं लागलीं असं पाहून तो म्हणाला, " आशा मोठी वाईट असते लते. पुढच्या आशेवर आजचे क्लेश सहन करणं सोपं जातं खरं पण निराशा होतांच माणूस एकदम खचतो--म्हणूनच आशा निराशेच्या मोहांत मुळींच पडतां नये. शक्य असेल तेवढं काम करीत राहायचं, पुढें जें काय व्हायचं असेल तें होईल. आजवर हाच उपदेश नाहीं का आईनं केला ? तो कसा विसरतेस ? विलायतेच्या कल्पना सोडून देण्या-खेरीज आतां गत्यंतर नाहीं. झालं—— माझं शिक्षण संपलं——"

" नाहीं ! " दुर्गाबाईची आश्वासनात्मक वाणी त्यांच्या कानीं आली. त्या एकाच शब्दानं त्या दोघांची मुद्रा पालटली.

" म्हणतेस काय आई? " कुमार म्हणाला, " अजून आशा आहे ? "

" नुसती आशा ?" दुर्गाबाई म्हणाली, "आशा नव्हे खात्री. पुढल्या आठवड्यांतल्या बोटीनं तूं विलायतेला जाणार. ऐकलेस ? तूं विलायतेला जाणार. जा—तयारीली लाग. पुढल्या अभ्यासाची तरतूद झालीय आतां."

दोघेंही स्तंभित झालीं हा चमत्कार कसा घडून आला याची त्यांना कल्पना होईना. विलायतेला जाणं म्हणजे कांहीं थोड्या खर्चाचं काम नव्हतं. एवढी मोठी रक्कम त्यांना कोण देणार होतं ?

" कुणी केली ही व्यवस्था ! " कुमारनं विचारलं.

" पाद्रीबावांनीं ! " दुर्गाबाई म्हणाली, " कुणीतरी दाता भेटला त्यांना. पांच हजार रुपयांची व्यवस्था झाली. आज ही रक्कम कर्जाऊ म्हणून घ्यायचीच आणि उद्यां बॅरिस्टर होऊन आलास, पैसे मिळवूं लागलास, कीं हप्त्याहप्त्यानं ती फेडायची, असं ठरलं आहे. बावाजींच्या हातांत रक्कम येऊन सुद्धां पडलीय. "

दोघांच्याही डोळ्यांतून आनंदाश्रू वाहूं लागले. निराशेच्या अनिश्चित बादळांतून हा किनारा लागल्यामुळं त्या दोघांनाही जो आनंद झाला होता तो अवर्णनीय होता.

किती तरी वेळ कुमारच्या तोंडांतून शब्दसुद्धां बाहेर फुटेना. तो

नुसता दुर्गाबाईच्या तोंडाकडे पहात राहिला होता. ती हंसून म्हणाली, " तुला खरं वाटत नाहीं कुमार ? अमृतरायांनीं काय सांगितलंय ? जो निश्चय ठेवून बैसतो। त्याला घरीं बसल्या राम देतो ॥ पटलं ना हें आतां ?"

अजूनही कुमारच्या तोंडांतून शब्द बाहेर फुटत नाहीं असं पाहून लता म्हणाली, " किती दिवस राहाणार कुमार विलायतेला ? "

" तीन वर्षं ! " दुर्गाबाईनं उत्तर दिलं.

ती स्तंभित झाली. कुमार कॉलेजांत जाण्यासाठी मुंबईला राहात असे, तो विरहाचा काळ तिला असह्य होत असे पण त्यावेळीं रजेंत वारंवार येऊन भेट होण्याची अपेक्षा होती. पण आतां विलायतेला गेल्यावर तीन वर्षंपर्यंत—छत्तीस महिने—किती दिवस आणि किती तास त्याचा वियोग होणार? पत्राखेरीच मधल्या काळांत भेटीचं दुसरं साधन सुद्धां नाही, या कल्पनेनं तिचं हृदय भरून आलं.

ती अनाथ होती—सनाथ होण्याची अपेक्षा करीत होती—पण तो सनाथ होण्याचा काल आणखी तीन वर्षांनीं लांबणार असं पाहून तिचं मन भारावून गेलं. कुमार विलायतेला जावा, विलायतेला जायची योजना होत नाहीं म्हणून त्याला वाटत असलेली निराशा दूर व्हावी असं तिला त्या क्षणापर्यंत वाटत होतं. पण प्रत्यक्ष ती योजना झालेली दिसतांच आनंदाबरो-बरच विरहदु:खानं वर उसळी घेतली.

" तीन वर्षं ! " ती उद्गारली.

" केवढा थोडा काल आहे हा ! " दुर्गाबाई म्हणाली, " कुमाराच्या जन्मापासून आजपर्यंत इतकीं वर्षं मी कशा रीतीनं कंठीत आलें आहें याची तुला कल्पना करतां येईल पण ती कल्पना आणि माझ्या अंत:कर-णांतल्या यातना यांचा मेळ तंतोतंत घालतां यायचा नाहीं तुला. अजूनही तीन वर्षं जावं लागणार. आजचा काळ सहवासांत राहून विरह अनुभवण्याचा होता--आतां प्रत्यक्ष विरह झाला आहे. आईच्या हृदयाची तुला कल्पना नाहीं; लते !—" एक क्षणभर थांबून मनांत आलेला आवेग आवरून ती म्हणाली.

"पुढल्या काळाकडे नजर ठेवून हा विरह सहन केला पाहिजे. तीन वर्षं ! एवढ्या अनंत कालांत तीन वर्षं म्हणजे एक क्षण आहे. विलायतेला जातां येतं आहे हें काय थोडं झालं. ? अशक्य वाटणारी गोष्ट प्रत्यक्षांत आली हें काय थोडं झालं ? अशक्य जिथं शक्य झालं तिथं पुढल्या सुखाच्या अपेक्षेवर हा आला काळ कंठायला तुला कां कठीण जावं ? माझ्याकडे पहा—गेल्या दिवसाची आठवण करीत, येणाऱ्या सुखाची कल्पना करीत, तीन वर्षं स्वप्नाप्रमाणें निघून जातील. अभ्यास पुरा करून कुमार सुखरूप परत येईल आणि मग—" तिनं तिची हनुवटी धरून तिच्या गालाला हळुच चिमटा घेतला.

आसवांच्या वर्षावांत, तृप्तीच्या समाधानानं उत्पन्न होणारी प्रकाशाची छटा लतेच्या चेहऱ्यावर चमकली.

पाद्रीबावाचे आभार मानण्यासाठीं लता आणि कुमार दोघेही मिशनहाऊसकडे जायला निघालीं.

त्या दोघांबरोबर दुर्गाबाईसुद्धां मिशन हाऊसपर्यंत गेली. तिघांनीही पाद्रीचे आभार मानले. बिचारा पाद्रीबावा अस्वस्थ झाला होता. जिचे आभार मानायचे तिच्या नांवाचा नुसता उल्लेख करणंसुद्धां अशक्य असल्यामुळं आपल्याला हें निष्कारण श्रेय मिळत आहे याबद्दल त्याला दुःख होत होतं.

दुर्गाबाईचा स्वभाव फाजील चौकस नव्हता खरा, तरीही तिच्या नित्याच्या पद्धतिप्रमाणें हा पैसा कुठून आला याची चौकशी तिनं जितक्या तीव्रतेनं केली पाहिजे होती तितकी केली नाहीं. आपली वृत्ती पाद्रीला माहीत आहे, तेव्हां तो भलता पैसा आपल्याला स्वीकारूं देणार नाहीं, अशा मनोमन साक्षीनं तिनं जास्त विचारपूस करण्याचं टाळलं होतं. पाद्री म्हणाला, "त्या धर्मात्मा जीवाचं नांव मला सांगतां येत नाहीं याबद्दल मी दिलगीर आहें. पण हें कांहीं दान नव्हे—ऋण आहे. उद्यां हें ऋण फेडायचं आहे. ऋण काढण्यासाठीं तारण ठेवावं लागतं तें मागितलं गेलं नाहीं, एवढाच यांतला उपकाराचा अंश."

तेवढ्या उत्तरानं दुर्गाबाईचं समाधान झालं आणि ती घरीं निघून आली. दारांत एक मोटर उभी असलेली पहातांच ती आश्चर्यचकित झाली. मोटर फार मोठी होती तशीच किंमतवानही असावी असं तिला वाटलं. एवढा कोण बडा श्रीमंत आपल्या घरीं आला आहे हें पहाण्यासाटीं तिनं आंत डोकावलं तों दरवाजाकडे पाठ करून चौकीवर कांहींतरी खात बसलेला एक गृहस्थ दिसून आला. त्याचा पोषाख पूर्णपणें साहेबी थाटाचा होता. आंत गेल्यावर त्यानं बूटसुद्धां काढले नव्हते त्यावरून त्या घरची शिस्त त्याला माहीत नसावी असं वाटलं. एवढा गैरमाहितगार माणूस आपल्या घरांत येऊन कांहींतरी खात बसला कसा याचं तिला आश्चर्य वाटलं.

तिची चाहूल लागतांच त्यानं मागं वळून पाहिलं, त्याबरोबर ती एकदम दचकली. किती साम्य होतं त्याच्या चेहऱ्यांत ! क्षणभर तिला वाटलं कीं शंकरच पुनः आला.

तो चट्कन उभा राहून म्हणाला, " मला ओळखलं नाहीं ? हो, मीच मोहन. तुला आनंद झाला नाहीं मला पहातांच ? "

तिनं होकारार्थी नुसती मान हलवली. तिची मुद्रा गंभीर झाली होती. मोहन हंसून म्हणाला, " माझा अंदाज चुकला. मला वाटलं होतं मला पहातांच तुला केवढा तरी आनंद होईल. "

" कोण म्हणतं मला आनंद झाला नाहीं म्हणून ? "

" तसं दिसलं नाहीं तुझ्या मुद्रेवर. "

" आईच्या हृदयाची तुला पारख नाहीं मोहन. पहिल्यापासूनच तूं आईपासून दूर राहिलेला—पुरुषाच्या नजरेनं पहाणारा—जाऊं द्या. खुशाल आहेस ना ? "

" खुशाल ? " मोहन हंसून म्हणाला, " त्याहीपेक्षां पुढं गेलोंय—बाबांचं भविष्य खरं झालंय—अगदीं शब्दशः खरं झालंय—" दुर्गाबाईचा चेहरा जास्त गंभीर झाला असं पाहून तो म्हणाला, " कां ? तुला वाईट वाटलं ! "

" मला कांहींच वाटलं नाहीं. "

" मा एवढा वैभवशाली झालों तरी तुला कांहींच वाटलं नाहीं ! "

" नाहीं. " दुर्गाबाई म्हणाली, " वैभवाची माझी कल्पना तुझ्यापेक्षां निराळी आहे. तूं वैभवशाली झालास—मी दरिद्री आहें पण मी खात्रीनं सांगतें, माझं समाधान तुला लाभलेलं नाहीं. कसली सुद्धां काळजी नाहीं मला. कुणाचीही भीति वाटत नाहीं मला—"

" आणि मला वाटते ! कां वाटलं तुला असं ? "

" तुझा चेहरा सांगतोय ! " त्याच्याकडे रोखून पहात दुर्गाबाई म्हणाली. मोहन क्षणभर दचकला असा तिला भास झाला.

" नाहीं—नाहीं—" मोहन म्हणाला, " मी अगदी निर्भय आहें. कुणाची सुद्धां भीति वाटत नाहीं मला. सारे लोकच उलट मला भीतात. "

" तेंही कांहीं बरं नाहीं. तूं कुणाला भीत नाहीस तसं तुलाही कुणी भीता कामा नये. प्रत्येकाला मोठी आपुलकी वाटली पाहिजे तुझ्याबद्दल. "

मोहन मोठमोठ्यानं हसूं लागला आणि म्हणाला, " असल्या बावळेपणांत समाधान नाहीं आई. जगानं मला थरकांप भ्यावं अशीच बाबांची इच्छा होती आणि ती त्यांची इच्छा आतां पुरी झालीय. आनंद वाटला नाहीं तुला हे ऐकून ? "

दुर्गाबाई स्तब्ध राहिली. त्याच्या डोळ्यावाटे ती निरखून पहात होती. त्याचा घाबरलेला अंतरात्मा त्यांच्या डोळ्याच्या बिलोरी खिडक्यांतून डोकावतो आहे असं तिला वाटलं. ती म्हणाली, " मला आनंद आहे हें ऐकून असाच निर्भय राहा. कुणालासुद्धा भिऊं नकोस. पण एक ध्यानांत ठेव, कीं या जगांत अशी एक शक्ती आहे, कीं त्या शक्तीपासून कुणालाच कांहीं लपवून ठेवतां येत नाहीं. त्या शक्तीची आठवण ठेव—देवाची आठवण ठेव. "

मोहन मोठमोठ्यानं हसूं लागला. हसतां हसतां त्याचा चेहरा अगदीं भेसूर झाला. हंसत हंसत तो म्हणाला, "मी कुणालाच भीत नाहीं—देवाला

सुद्धां भीत नाहीं. काय जरूर आहे देवाला भ्यायची ? कुणी पाहिला नाहीं कुणाला दिसला नाहीं, कुणाला दिसेल असं वाटत नाहीं, अशा त्या बुजगावण्याला काय म्हणून भ्यायचं ? ”

दुर्गाबाई गंभीर झाली होती– सारखी रोखून त्याच्या डोळ्यावाटे पहात होती.

एक क्षणभरच त्याच्या हृदयाचा थरकाप झाला. पण दुसऱ्याच क्षणाला मन सावरून तो म्हणाला, “ माझी चौकशी केली नाहींस ? मी कुठं असतों, काय करतों, कांहींच विचारलं नाहींस ? ”

“ तूंही सांगितलं नाहींस ! ” दुर्गाबाई संथपणें म्हणाली.

“ कशाला सांगायचं ? ” मोहन म्हणाला, “ तुला कांहीं तें आवडायचं नाहीं !—जाऊं आतां मी ! ”

“ तुझी मर्जी ! ” दुर्गाबाई मनांत येत असलेला आवेग आवरून शांतपणानं म्हणाली.

“ जातों तर.” असं म्हणून मोहन निघाला. त्याला वाटलं होतं कीं ती त्याला क्षणभर थांबवून घेईल, आणखी कांहीं तरी विचारील आपल्या वैभवाचा अंदाज घेईल ! त्याची निराशा झाली—तिनं कांहींच विचारलं नाहीं. तिला दिपवून टाकीन असं त्याला वाटलं होतं.–पण त्याची निराशा झाली.

तो दाराबाहेर पडत आहे असं पाहून ती म्हणाली, “ कुणालाच डरूं नकोस मोहन—पण एक ध्यानांत ठेव–देवाची आठवण ठेव–देवाची आठवण ठेव ! ”

तो बाहेर निघून गेला—मोटार चालू झाल्याचा आवाज ऐकूं आला. तरीही ती आपल्याशींच पुटपुटत होती–देवाची आठवण ठेव.

वाऱ्याच्या वेगानं जाणाऱ्या मोटरीमागून तिचे ते अस्फुट शब्द त्याचा पाठलाग करीत होते काय !

तिला आठवण झाली, त्यावेळीं ती मोहनला जाऊं देत नव्हती. आज तो आला—स्वप्नासारखा निघून गेला—राहा म्हणावं असं तिला कां वाटलं नाहीं ?

काय झालं हें ?

---

## १९

मोहन दुर्गाबाईला भेटायला आला तो सहज आला नव्हता. शरणगांवच्या अगदीं सीमेवरच केशवलालचा पाठलाग करून त्यानं त्याचा खून केला होता. बेफामपणानं केशवलाल निघाला असतां कुणीतरी आपला पाठलाग करतो आहे अशी त्याला शंका आली. त्या शंकेचं समाधान व्हायला फारसा वेळ लागला नाहीं.

केशवलाल भित्रा नव्हता.—पण यावेळींमात्र तो बेसावध राहिला होता रागाच्या तिरमिरीसरसा तो निघाला होता. त्या तिरमिरींत नित्याप्रमाणें योग्य ती खबरदारी घ्यायला तो चुकला. तो एकटाच निघाला होता. बरोबर क्लीनर सुद्धां नव्हता.

पाठलाग करणाऱ्या माणसाची मोटर अगदीं त्याच्या मोटारी मागोमाग येतांच समोरच्या आरशांत त्याला दिसून आलं, कीं, तो भिकू होता.

आपल्याशींच हंसून त्यानं मोटर थांबवली. मोटरींतून उतरून त्याच्या समोर येऊन भिकू म्हणाला, “ काय अविचार केलात हा ! मला तरी कळवायचं ? ”

“ पण मी या बाजूला आलों हें तुला कसं कळलं ? ” केशवलालनं विचारलं.

“ सुंदरीनं सांगितलं ! ” भिकू म्हणाला.

एकदम चवताळून केशवलाल ओरडला, “ सुंदरीनं तुला सांगितलं ! कां सांगितलं ? ”

" नाहीं—" भिकू म्हणाला, " तुम्ही एकटेच गेलांत म्हणून तिला काळजी वाटली—"

" खोटं—अगदीं साफ खोटं—" केशवलाल म्हणाला, " माझा विश्वास नाहीं तुझ्यावर—" तो एकदम थांबला.

वाऱ्याच्या वेगानं एक मोटर त्यांच्यासमोरून निघून गेली. केशवलालला संशय आला,—सुंदरीच होती का त्या मोटारींत? तो भिकूला कांहीं विचारणार तोंच——

तोंच तीरासारख्या वेगानं येणारी दुसरी एक मोटर त्यांच्यासमोर येऊन उभी राहिली.

मोहन एकदम उडी टाकून केशवलालच्या आंगावर धावला. भिकू घाबरून मागं हटला. मोहननं केशवलालला विचार करायलासुद्धां अवधी दिला नाहीं—त्यानं एकदम त्याच्या नरडीला हात घातला.

" थांब थाब, आधीं ऐक माझं—" केशवलाल म्हणत होता पण मोहननं त्याला दुसरा श्वास टाकायला फुरसत दिली नाहीं.

" आतां काय सांगायचं ते माझ्या बाबांना जाऊन सांग !" असें म्हणून त्यानं इतक्या जोरानं त्याचा गळा दाबला, कीं तो त्याच क्षणांत जमिनीवर पडला. घाटातल्या कड्याच्या टोकावर ते उभे होते. एका लाथेच्या ठोकरीनं त्यानं केशवलालला कड्याच्या खालीं उडवून दिलं. मोटरींत बसून भिकू केव्हांच पसार झाला होता.

तृप्तीच्या समाधानानं मोहननं कड्याखालीं वळून पाहिलं. छिन्नभिन्न झालेला केशवलालचा देह त्याला दिसला.

" बाबा—बाबा—" मोहन आपल्याशींच म्हणाला, " तुमची आज्ञा पार पाडली. सूड घेतला. मी कृतार्थ झालों."

हें कृत्य उरकल्यानंतर तो आपल्या आईला भेटायला गेला होता. बापाची आज्ञा पुरी केल्यामुळेंच त्याला आपल्या आईची आठवण झाली.

आपण आपल्या आईला भेटायला कां गेलों हें त्याचं त्यालाच कळलं नाहीं. आपण कांहींतरी शतकृत्य केलं, कुणाकडून तरी त्याबद्दल आपल्याला शाबासकी मिळाली पाहिजे असं त्याला वाटलं. शरणगांवच्या रस्त्यांतून त्यांनीं एका काळीं पळ काढला होता. त्या रस्त्याला—त्या रस्त्यांतल्या धुळीला आपल्या विजयाची वार्ता सांगावी म्हणून का तो तिकडे गेला होता ?

तो गेला तसाच परत आला. पण आईच्या दोनच शब्दांनीं त्याच्या हृदयाला चिमटा घेतला. त्या चिमट्यामुळं झालेली ती नाजुकशी जखम मनाच्या जोरानं पुसून टाकायचा तो प्रयत्न करीत होता. पण ती पुसून गेली का ?—तिचा डाग नाहींसा झाला का ?

तो कृतकृत्य झाला होता. त्या नाजूक जखमेची आठवण विसरून जायचं ठरवून तो आपल्या मुक्कामाला परत आला.

केशवलालच्या खुनाची बातमी दुसऱ्या दिवशीं जिकडे तिकडे पसरली. डॉक्टरच्या तपासणींत प्रेत छिन्नविच्छिन्न झाल्यामुळं मरणाचं निश्चित कारण बाहेर आलं नाहीं. केशवलालनं कड्याखालीं उडी टाकून आत्महत्या केली, कीं त्याचा कुणी खून केला हें पोलिसांना ठरवतां येईना. केशवलालच्या व्यवहारांत बऱ्याच भानगडी निर्माण झाल्या होत्या. त्याचं दिवाळं वाजण्याचा प्रसंग आला होता असं त्याच्या मृत्युनंतर उघडकीला आलं. अब्रूच्या भीतीनं त्यानं आत्महत्या केली असावी असंच सर्वांना वाटलं. तरीही पोलीस तपास चालू होता. त्या तपासांत कांहीं निष्पन्न झालं नाहीं. कुठलाच धागादोरा मिळाला नाहीं. दोघांच्या हाताहातीच्या वेळीं झालेल्या पावलटीच्या खुणा मोहननं पुसून टाकल्या होत्या. मोटरीची गती समजू नये म्हणून त्यानं आपली मोटर उलटी सुलटी फिरवून चाकांचे माग विरूप करून टाकले होते. त्या मागांच्या संशयामुळंच पोलिसांनीं तपास ठेवला होता.

केशवलालचा खून झाला आहे असं धरून चालत असलेल्या पोलिसांनीं बक्षिसं जाहीर केलीं पण कुणीच पुढं आलं नाहीं.

एकट्या भिकूलाच काय ती ही हकीकत माहिती होती. केशवलालचा

बचाव करण्याचा प्रयत्न न करतां तो पळून गेला असल्यामुळं पुढं येण्याचं त्याला धैर्य होईना. शिवाय त्याला मोहनची भीति वाटत होती ती निराळीच. तो पुढं आला असता तर वाटेल तें करून मोहननं त्याचा खून पाडला असता. मोहन पकडला गेला असता तरी देखील आपल्या सारखाच कुणी-तरी त्याचा पित्त्या आपला जीव घेईल या भीतीनं भिकूनं आपल्या तोंडाला कुलुप घातलं.

बिचारी सुंदरी मात्र खचून गेली होती. केशवलालवर तिचं प्रेम नव्हतं. पण त्या उभयतांनीं इतकीं वर्षे सहवासांत काढलीं होतीं. त्या सह-वासाच्या दुःखाचा परिणाम तिच्या मनावर झाल्यावांचून राहिला नाहीं.

केशवलालच्या कृपेनं तिची सुस्थिती होती. चरितार्थासाठी दुसऱ्याच्या तोंडाकडे पहाण्याची तिला जरूरी नव्हती, उलट चार माणसांना वेळींप्रसंगीं सढळ हातानं मदत करण्याइतकी तिची सांपत्तिक स्थिति समाधानकारक होती.

जुगाराचे अड्डे मोडून गेले. केशवलालच्या साऱ्या उलाढाली जिथल्या तिथं राहिल्या. मोहनचा मार्ग निष्कंटक झाला.

मोहनची भेट घ्यावी असं सुंदरीच्या मनांत वारंवार येत असे पण तें धाडस तिनं केलं नाहीं. स्वतः मोहनही तिला कधीं भेटला नाहीं. तिच्या-मुळंच मोहनला केशवलालवर सूड उगवतां आला होता, तरीही कृतज्ञता दर्शविण्यासाठीं सुद्धां त्यानं सुंदरीची भेट घेतली नाहीं.

इकडे कुमार विलायतेला निघून गेला. दुर्गाबाई एकटी पडल्यामुळं लता मिशन हाऊस सोडून तिच्याकडेच येऊन राहिली. दुर्गाबाईच्या नित्यकार्यांत ती तिच्या इतक्याच उत्साहानं भाग घेऊं लागली. कुमार-पेक्षांही लतेच्या सहवासांत आणि सहकार्यांत दुर्गाबाईचे दिवस आनंदांत जाऊं लागले.

सुंदरी मधून मधून येऊन पाद्रीला भेटत असे. लतेच्या उपयो-गासाठीं म्हणून पूर्वीप्रमाणेंच ती पैसे देत असे; पण अलीकडे ती दुर्गाबाईकडे

जाऊन राहिल्यापासून लतेनं ते पैसे घेण्याचं नाकारल्यामुळं ती रक्कम पाद्रीबावाकडे तशीच अनामत म्हणून पडून राहात होती.

'देवी देते' या भुलावणीवर फसण्याइतकं आतां तिचं वय राहिलं नव्हतं. आपण कोण हें समजण्याची तिची जिज्ञासा वारंवार जागी होई पण त्या त्या वेळीं दुर्गाबाई तिची समजूत घाली. ती म्हणे, "काय करायचंय त्या हकीकतीशीं ? तूं निराधार आहेत, तूं निराधार आहेस असं जाणून कुणीतरी तुला मदत करतं आहे, त्या मदत करणाराबद्दल तुला जी कृतज्ञता वाटते तिच्या बद्दल त्या व्यक्तीचे आभार मानावे असं तुला वाटणं साहजिक आहे. त्याबद्दल मी तुला दोष देत नाहीं. पण तुला हें सांगतें, गुप्तदान करणारीं मोठ्या मनाचीं माणसं उपकाराच्या फेडीची अपेक्षा करीत नसतात. त्या गोप्यांतच त्यांना आनंद वाटत असतो. त्या आनंदाचा भंग होणं अशा माणसांना आवडत नसतं. म्हणून ती जिज्ञासा मारून टाकणंच बरं—"

"पण मी कोण आहें—" लता म्हणाली, " हें मला कळावं असं नाहीं का तुम्हांला वाटत ?

"कशाला कळायला हवं ?" दुर्गाबाई म्हणाली, "ईश्वराच्या या या सृष्टींत तूं जन्म घेतलायस. भाग्य तुझं, कीं तूं कोण आहेस हें तुला कळत नाहीं. आम्हीं कोण आहोंत हें आम्हाला कळलं आहे पण त्याचा काय उपयोग आहे ? कुमारकंडेच पहा. तो कोण आहे हें त्याला माहीत आहे— तो माझा मुलगा आहे—पण तो आणखी एकाचाही मुलगा आहे. त्या आणखी एकाचा—त्याच्या बापाचा पत्ता त्याला माहीत नसला तरी मला माहीत आहे. तुला सांगायला मला संकोच वाटत नाहीं. खून करून, दरोडे घालून सरकारचा गुन्हेगार ठरलेला त्याचा बाप फाशीं गेला होता—" लतेच्या अंगावर थरारून काटा उभा राहिला. एक क्षणभर थांबून दुर्गाबाई म्हणाली, "हें त्याला कळलं तर त्याचा कोणता फायदा होणार आहे ? आज त्याचं मन निर्मळ आहे— वृत्ती निर्मळ आहे—वर्तन निर्दोष आहे

आपल्या आनुवंशिकतेची जर त्याला जाणीव झाली तर त्याचा परिणाम चांगला होईल असं तुला वाटतं का ? " पुनः ती क्षणभर थांबली आणि म्हणाली, " हें रहस्य उक्त करूं नकोस — कुमार परत आल्यावर त्याला सांगू नकोस. त्याचा बाप नापत्ता झाला आहे एवढंच त्याला माहीत आहे. बदललेल्या नांवानं तो फांशीं गेला. माझ्या खेरीज कुणालाच ही हकिकत माहीत नाहीं. तुला सुद्धां मी ती सांगितली नव्हती. पण हल्लीं पहातें आहें, स्वतःचा इतिहास जाणण्यासाठीं तूं अस्वस्थ झाली आहेस—उतावीळ झाली आहेस. समज, तुझाही इतिहास असाच कांहीं असला तर तो कळल्यानं तुला समाधान होईल का ? अज्ञानांत लाभत असलेलं आजचं सौख्य तूं गमावून नाहीं का बसणार ? काय फायदा होईल त्या पासून ? म्हणजे तुझा इतिहास असाच कांहीं आहे असा मात्र गैरसमज करून घेऊं नकोस. कदाचित तूं एकादी टाकून दिलेली मुलगी असशील, कदाचित आज तुझे आईबाप हयातही नसतील, त्यांनीं केलेल्या व्यवस्थेप्रमाणें तुझी तरतूद कुणीतरी त्यांचा मुखत्यार करीत असेल ! काय करायचंय तें कळून ? काय फायदा होणार आहे तें कळल्यामुळं ? —"

" पण मी कोण ?—" लता म्हणाली, " माझी जात कोण ?—"

" काय करायचंय तुला जातीशीं ? " दुर्गाबाई म्हणाली, " तुझं भवितव्य आतां ठरून गेलंय. तुझ्या जातीची विचक्षणा कुणी करायची असेल तर ती मी—पण मला त्याची पर्वा नाहीं. सारीं माणसं मला सारखीं आहेत. मी तुझं शील पहातें आहें—तुझ्या कुलाची चौकशी करायची मला जरूरी वाटत नाहीं. तुझं शील मला पटलं आहे—कुमारला पटलं आहे—मग त्याची उठाठेव करायची तुला काय जरूर ! अंधारांत पडलेलं तें दुर्दैव शोधून काढून उगीच आत्मघात करून घ्यायचा कशाला ! "

कृतज्ञतेच्या निस्सीम भावनेनं लतेचं हृदय भरून आलं. तिच्या तोंडून एक शब्द सुद्धां बाहेर फुटेना. तिला हृदयाशीं कवटाळून दुर्गाबाई म्हणाली, " मी अनाथ झालें होतें लते, त्यावेळीं देवाकडे मी मुलगा मागत

होतं. देवानं मला मुलगा दिला. माझ्या आकांक्षा त्या मुलानं पुऱ्या केल्या. पण माझ्या अंतरांतल्या अंतरात्म्याचं समाधान झालं नाहीं. मी मागितलं तें देवानं दिलं खरं पण मला काय हवं होतं तें देवाला माहीत होतं. तें मी न मागतां देवानं दिलं. मला एक मुलगी पाहिजे होती—मला तें माहित नव्हतं. पण तूं आलीस तेव्हां मला कळलं, कीं माझी उणीव देवानं नकळत भरून काढली. मी आज आहें, उद्यां नाहीं—माझ्या मागं माझ्या कुमाराचा संभाळ कोण करणार ? तें देवाला कळलं म्हणून त्यानं तुला माझ्याकडं पाठवली. माझ्या साऱ्या इच्छा परिपूर्ण झाल्या. आतां कुमार आला—"

नुसत्या कल्पनेनंच त्या दोघींना आनंदाच्या उकळ्या आल्या.

लतेची अनावर झालेली जिज्ञासा त्या दिवसापासून हळुहळु मावळूं लागली. तिची वृत्ती दिवसेंदिवस अधिकाधिक प्रसन्न होऊं लागली. मोठ्या उत्साहानं प्रत्येक कामांत ती दुर्गाबाईला मदत करीत होती—किंबहुना दुर्गाबाईच्या साऱ्याच कामगिरीचा भार तिनं आतां आपल्या आंगावर घेतला होता.

विलायतेतून कुमारचीं पत्रें येत होतीं. लतेचीं पत्रं कुमारला जात होतीं. या पत्रव्यवहारांतच तीं दोघं सहवासाचं सौख्य अनुभवित होतीं.

---

## २०

कुमार विलायतेहून परत येईपर्यंतचा काळ लतेच्या दृष्टीनं उद्योगाचा गेला. मनाला अस्वास्थ्य उत्पन्न होऊं नये म्हणून ती नवीन नवीन कामं शोधून काढीत होती आणि त्यांत स्वतःला गुंतवून घेत होती. दुर्गाबाईचीही या कामीं तिला मदत होई. स्वतः दुर्गाबाईलाही कुमार गेल्यापासून एक प्रकारें चुकल्यासारखं वाटत होतं. लतेच्या सहवासांत कुमाराची उणीव भरून येत होती, इतकंच नव्हे, तर कांहीं तरी नवी जोड आपल्या संसाराला झाली आहे असं तिला वाटत होतं. पण ज्या मुलासाठीं तिनं आपलं सारं जीवन, सारे परिश्रम, सारा अभिमान खर्चीं घातला होता तो कुमार दृष्टी-

आड झाल्यामुळं विरहानं तें दुःख तिला द्विगुणित वाटत होतं. ती त्याच्या येण्याच्या वाटेकडे डोळे लावून बसली होती.

मुंबईत मोहनचे उपद्व्याप जरी पूर्वीप्रमाणेंच चालले होते तरी प्रतिस्पर्ध्यांच्या अभावामुळं त्याची ईर्षा थंडी पडली होती. जीवनांत त्याला गोडी वाटत नव्हती. केशवलालच्या मृत्यूनंतर नवा प्रतिस्पर्धी उत्पन्न न झाल्यामुळं त्या एकमेव साम्राज्याचा त्याला वीट आला होता. पहिल्यापासून आयुष्य झगडण्यांत गेलेलं, तो झगडा थांबतांच जीवनाचा कैफ मंदावला. केशवलाल आपल्या पहिल्या अमदानींत विलासी कां झाला याचं कारण मोहनला आतां कळून येऊं लागलं.

ते बापलेक येण्यापूर्वी केशवलालचं साम्राज्य देखील असंच एकमेव होतं, असाच त्याचा दरारा होता, त्याला असाच पैसा मिळत होता. पण जोडीला प्रतिस्पर्धी नसल्यामुळं ईर्षेची आग चेतवायला त्याला आधार नव्हता. म्हणूनच त्या चेतवणीचा चरितार्थ तो विलासांत करूं पहात होता. मोहनला वाटलं, आपणही विलासी होणार का ? आपणही स्त्रियांच्या पाशांत सापडणार का ? ज्यां स्त्रीजातीचा अखंड द्वेष केला तिलाच आपली म्हणून कवटाळणार का ? त्यानं मनाचा निर्धार केला—तो दुर्गाबाईचा बच्चा होता. तें मनोबल त्यानं आपल्या आईकडून मिळवलेलं होतं. त्या सामर्थ्याच्या बळावर जीवनांतील ती उणीव त्यानं कार्याचे व्याप वाढवण्यांत भरून काढली.

त्याचे अत्याचार तसेच सुरू होते पण अधिकाऱ्यांना त्याचा पत्ता लागत नव्हता. अधिकाऱ्यांना पूर्वी केशवलालचाही संशय होताच—त्याच्या कार्यप्रणालीवर त्यांची नजर होती—तो गेल्यानंतर ते सारे अत्याचार थांबतील असं त्यांना वाटत होतं—

पण तसं झालं नाहीं म्हणूनच गुन्हे शोधून काढणाऱ्या खात्यालाही मोठा प्रश्न पडला. त्यांना वाटत होतं, कीं केशवलालचा कुणीतरी हस्तक त्याची कामगिरी चालू ठेवीत आहे आणि त्या धोरणानं ते तपास करीत राहिले होते. म्हणूनच मोहनचा मार्ग निष्कंटक झाला होता.

कुमार बॅरिस्टर झाल्याची तार ज्या दिवशीं शरणगांवांत येऊन पोचली त्या दिवशीं साऱ्या गांवालाच आनंद झाला. विशेषतः पाद्रीबावाच्या आनंदाला तर सीमाच नव्हती.

तसं पाहिलं तर कितीतरी लोक बॅरिस्टर झाले होते, त्यांत कांहीं अलौकिक होतं असं मुळींच नाहीं, पण शरणगांवासारख्या खेड्याला मात्र तें कौतुक गौरवास्पद वाटलं. त्या गांवातून आजवर एकादा एल. एल. बी. सुद्धां निर्माण झाला नव्हता.

पूर्वी निंदा करणारे आतां तोंड भरून तारीफ करूं लागले. मुलाच्या यशामुळं आईचंही कौतुक होऊं लागलं. दुर्गाबाईच्या कार्याशीं सहानुभूति नसणाऱ्या व्यक्तीसुद्धां आतां तिच्या शिक्षणाची तारीफ करूं लागल्या.

ही बातमी सुंदरीला कळली होती कीं नाहीं हें पाद्रीबावाला सांगतां येत नव्हतं, कारण बातमी येऊन कित्येक दिवस झाले तरी तिच्याकडून कांहींच खबर आली नव्हती. अशावेळीं ती स्वतःच भेटायला येईल अशी त्याची अपेक्षा होती. पण ती न आल्यामुळं पाद्रीबावालाही मोठी काळजी पडली.

कित्येक दिवस सुंदरीनं लतेची खबर सुद्धां घेतली नव्हती. ती आपल्या मनाची तयारी करीत होती. तिला माहीत होतं, कीं पूर्वीचा इतक्या गुप्तपणानं आतां पाद्रीबावाची भेट घेणं शक्य नव्हतं. आतां लता मोठी झाली होती, तिला कळूं लागलं होतं, ती चोहींकडे वावरत होती, सहज नजरेंत भरणारी सुंदरीसारखी व्यक्ती तिच्या चौकस दृष्टीच्या टापूंतून सहज आड राहूं शकली नसती—म्हणूनच शरणगांवांत यायचं सुंदरीनं बंद केलं होतं.

एकप्रकारें ती संन्यासिनीचं जीवन कंठीत होती. दुर्गाबाईचा आदर्श तिच्या नजरेसमोर होता. एका दृष्टीनं तिच्या जीवनांत आणि दुर्गाबाईच्या चरित्रांत साम्य होतं. दुर्गाबाईप्रमाणेंच तीही एका अट्टल गुन्हेगाराची सहचरी होती. विवाहित पत्नीइतक्याच जिव्हाळ्यानं तिनं केशवलाल बरोबर आयुष्य काढलं होतं. शंकर नापत्ता झाल्यानंतर दुर्गाबाई कशा रीतीनं जीवन कंठीत होती हें तिनं पाहिलं होतं. तोच आदर्श तिनं आपल्यापुढं ठेवला.

पण तिच्या आयुष्यांत एक उणीव होती. दुर्गाबाईला या संकटाच्या कालांत समाधानाचं स्थान म्हणून एक अपत्य होतं. एक मुलगा हातचा गेला तरी देवानं दुसरा मुलगा पाठवून दिला होता. गांवच्या मुलांच्या पहिल्या लोभाचा अंकुर स्वतःच्या मुलांच्या सहवासांतच वाढीला लागला होता. त्या अंकुराची वाढ आतां अक्षय्यवटाइतकीच मोठी झालेली असली तरी मूळच्या लहानशा अंकुराचा उगम एका एक खोलीच्या घरांत असणाऱ्या लहानशा झोळीच्या पाळण्यांतूनच वाढत गेला होता.

सुंदरीला हीच उणीव भासत होती. हातीं असलेली छोटी बहीण तिनं स्वेच्छेनं आपल्यापासून दूर केली होती. तिची उणीव साऱ्या आयुष्यांत पुनः भरून निघाली नाहीं. त्या उणीवेच्या जाणीवेनं वात्सल्याची भरपाई परक्यांचीं मुलं जवळ करून करण्याचं धैर्य तिला होईना. त्या सक्तीच्या विरहानं ती खचून गेली होती. नवे लोक जोडायचे, नवीं नातीं अस्तित्वांत आणायचीं आणि पुनः तीं तोडून टाकायला तयार राहायचं, एवढा मनाचा खंबीरपणा सुंदरीच्या ठायीं नव्हता. म्हणूनच तिच्या जीवनांत एक रितेपणा आला होता.

एकाकालीं तिच्या हृदयांत उत्पन्न झालेली मोहनबद्दलची कोमल भावना आतां पांगुळली होती. मोहनला भेटण्याचा प्रयत्न केला आणि त्यानं आपल्याला झिडकारलं तर तो अपमान सहन करण्याइतका खंबीरपणा आतां तिच्या ठायीं राहिला नव्हता. एक लतेचं वात्सल्य आणि दुसरं मोहनचं प्रेम या दोन्ही उणीवा भरून काढण्यासाठींच ती संन्यासिनीचं त्यागी जीवन आचरण्याचा प्रयत्न करीत होती. अनाचारापासून निर्माण झालेली संपत्ती आपल्या जीवनाचा आधार होऊन बसलेली आहे, याची जाणीव असल्यामुळं परोपकारासाठीं तिचा विनियोग करण्याकडे ती शक्य तेवढे प्रयत्न करीत होती. अनाथ अपंगांना मदत करण्यासाठीं तिचं पाऊल केव्हांही पुढं असे. विशेषतः तिचं लक्ष असे तें पतित स्त्रियांकडे. स्वतःवरून ती इतरांची कल्पना करीत होती. गोमांतकीय कलावंत समाज यावेळीं जागा झाला होता. अनादि-

कालापासून चालत आलेलं, धर्माच्या नांवाखालीं टिकून राहिलेलं त्याज्य जीवन झुगारून देण्याचा त्या समाजांतील स्त्रीपुरुषांत मोठा जोराचा प्रयत्न सुरू झाला होता.

त्या चळवळींत ती उत्साहानं भाग घेऊं लागली. त्या चळवळीसाठीं मोकळ्या हातानं देणग्या देण्यांत ती सदा अग्रेसर असे. हें कार्य म्हणजे तिला एक समाधानाचं स्थान होऊन बसलं होतं.

अचानक एके दिवशी तिची आणि मोहनची गांठ एका थिएटरमधें पडली. मोहनला चुकवून ती जात होती. पण त्यानंच परिचयाचं हास्य मुद्रेवर दाखवल्यामुळं ती थबकून उभी राहिली. मोहन तिच्या समोर आला आणि म्हणाला, " अनंत आभारी आहे तुझा. माझ्या जीवनाचं सार्थक तूं केलंस ! "

ती कावरीबावरी झाली. काय बोलावं हें तिला सुचेना. एकदम त्याच्या गळीं पडाव असं तिला एक क्षणभरच वाटलं.

तो पुढं म्हणाला, " कसं काय चाललंय तुझं ? "

" ठीक चाललंय. " एक मोठा सुस्कारा सोडून ती म्हणाली.

" असंच चालूं दे. " उत्तेजनपर हास्य चेहऱ्यावर आणीत मोहन म्हणाला, "माझी नजर आहे. मी पहातों आहें. चाललंय तेंच ठीक आहे. तसंच कांहींतरी करीत राहा—" असं म्हणून तो एकदम निघून गेला.

विसरलेली आठवण पुनः जागी झाली. राखेखालीं दाबून ठेवलेली आगीची ठिणगी फुंकर घालून चेतवली गेली. पुनः तिच्या जीवनांत उद्वेग उत्पन्न झाला. इष्ट कार्यांत विक्षेप होऊं लागला. मोहनला जाऊन भेटावें असं तिला पुनः वाटूं लागलं.

धीर करून एके दिवशीं ती मोहनला भेटायला त्याच्या घरीं गेली. योगायोगानं तो घरीं होता. ही भेट मोहनला अनपेक्षित वाटली नाहीं. तिला पाहतांच त्यानं विचारलं, " कां आलीस ? "

" तेंच विचारायला मी आलें आहें." सुंदरी म्हणाली, " कां मला चाळवलंत ? मी चुकवून जात होतें. पुनः तुमची भेट व्हावी असं वाटत

असूनही मी मनाचा निर्धार करून तुम्हांला टाळीत होतें. कां मला चाळवलंत ?"

" माझी चूक झाली." मोहन म्हणाला— आणि हंसला.

सुंदरी चिडून गेली होती. चवताळून त्याच्या अंगावर जात ती म्हणाली, " चूक झाली काय ? आधीं एकाद्याचा गळा कापायचा आणि मग चूक झाली म्हणायचं ! "

" थांब. गळे कापणं हा माझा धंदाच आहे. पण अशावेळीं मी चूक झाली म्हणून कबूल करीत नसतों. यावेळीं कबूल केलं हेंच भाग्य समज !"

" नुसत्या कबुलीनं झालेली चूक दुरुस्त होत नाहीं. चूकच दुरुस्त करायची असली---" असं म्हणून ती दचकल्यासारखं करून स्तब्ध राहिली.

" तर काय ?--" तुच्छतेनं हंसत मोहन म्हणाला, "बोल--तर काय ? तर काय मी केशवलालची जागा भरून काढूं ? केशवलालची जागा मी बाहेर सर्वस्त्री भरून काढली आहे. तुला नाहीं माहीत ? "

" नाहीं. " सुंदरी म्हणाली, " त्या राज्यांत मी हल्लीं वावरत ; पण ती जागा भरून निघाली—सर्वस्वी भरून निघाली असं मल तांना तुम्ही मला विसरलांत—" मोहन हंसला असं पाहून ती पुढं " मला वगळून ती जागा सर्वस्वी भरून निघत नाहीं !"

" मी तुझा केशवलाल झालों पाहिजे का ?" मोहननं खोंचून वि॰

" नाहीं." सुंदरी म्हणाली, " मला केशवलाल नको आहे—मला केशवलाल नको होता—नको होता म्हणूनच ना मी तुम्हाला ती हकिकत सांगितली ! मला मोहन पाहिजे—"

तो मोठमोठ्यानं हसूं लागला. हंसण्याच्या उकळ्यावर उकळ्या येत असतां तो कोचावर पडून गडबड लोळूं लागला असं पाहून सुंदरी म्हणाली, " हंसायला काय झालं ?"

" हसूं नको तर काय करूं ? केशवलालचं सर्वस्व हरण करतांना तूं देखील माझ्या गळीं पडशील असं नव्हतं वाटलं मला ! "

" केशवलालचं लक्तर म्हणून नव्हे— केशवलालच्या सर्वस्वांतली

कुणीतरी एक म्हणून नव्हे— तर मी ही जशी आहें– माझी मी आहें– अशीच जर मला स्वीकारणार असाल– ”

“ कुणी म्हटलं मी तुझा स्वीकार करीन ? ” मोहन गंभीर होऊन म्हणाला, “ सुंदरी, मी एक स्वतंत्र जीव आहें. प्रेमाच्या भानगडींत पडण्या- इतकी पारतंत्र्याची आवड मला नाहीं. प्रेम म्हणजे बंधन आहे— स्त्री म्हणजे बंधन आहे– मग ती विवाहित असो कीं अविवाहित असो–विवाहित प्रेमळ पत्नीचा कठोरपणानं त्याग करून निघालेल्या बापाचा मी मुलगा आहें. मी असल्या फंदांत पडणार नाहीं. ”

हताश होऊन सुंदरी समोरच्या बैठकीवर बसली. कितीतरी वेळ दोघंही एकमेकांकडे नुसतीं पहात राहिलीं होतीं. मोहनचं बोलणं संपलं होतं पण सुंदरीला अजून बोलायचं होतं. त्या बोलण्याला कशी सुरवात ावी हेंच तिला कळत नव्हतं. क्षणभर विचार करून ती म्हणाली, ा आईला मी ओळखतें. तुम्हीं सुद्धां तिला ओळखत नसाल. तिचं ा मार्गदर्शक झालंय. माझ्या आयुष्यांतली माझी मोठी महत्वा- ी करण्याचा भार तिनं घेतला आहे— तिला तें माहीत नाहीं. ्हीं तीं कामं ती करतेय. माझ्या बहिणीची आई झालीय. कुणी उद्यां ती तिची सासू होईल-- ” मोहननं दचकून तिच्याकडे पाहिलं ती म्हणाली, “ कां दचकलांत ? हें रामायण व्हावं असं मला वाटलं–”

“ हं हं ” मोहन म्हणाला, “ आतां आठवलं मला. आई म्हणत असे– लहानपणीं मी ऐकलं होतं– भरताची मांडवी स्त्री। लक्ष्मणाची उर्मिला ॥ तसं व्हायला हवंय तुला. होय ? बरं रामायण आठवतं तुला ! ”

सुंदरी पुनः स्वस्थ बसली. पुनः किती तरी वेळ गेला. थोड्या वेळानं सुंदरी म्हणाली, “ जाऊं मी आतां ? ”

“ जा.” मोहन अगदीं गंभीरपणें म्हणाला.

“ पुन: येऊं ?–” असं विचारून सुंदरी आतुरतेनं उत्तराची अपेक्षा करीत राहिली.

आणखी एक क्षणभर थांबून मोहन म्हणाला, " ये— खुशाल ये. पण एक मित्र म्हणून ये. तुझे उपकार आहेत माझ्यावर! तुझं अंतःकरण मी ओळखतों. तुला दुखवायचं नाहीं मला. तूं निराधार आहेस, अपंग नसलीस तरी अनाथ आहेस. मी तुझा नाथ होणं शक्य नाहीं. पण तुझी मैत्री मी झिडकारणार नाहीं. ये— बैस— बोल आणि निघून जा. बस एवढंच."

सुंदरीला गहिंवर आला. तिच्या तोंडांतून शब्द बाहेर पडेना. आवेगानं अनावर झालेलं मन कठोर करून डोळे पुशीत ती निघून गेली.

"गरीब बिचारी!" मोहन आपल्याशींच म्हणाला.

खिडकींत जाऊन तो उभा राहिला. रस्त्यावरून जातांना तिनं मागं वळून पाहिलं—तो हंसला— तीही हंसली.

त्या दिवशीं सुंदरी घरीं गेली ती अत्यंत समाधानानं गेली. स्वर्ग हातीं आला असं तिला वाटलं.

---

## २१

कुमार विलायतेहून परत आला. त्यांच्या स्वागतासाठीं दुर्गाबाई, लता आणि पाद्री मुंबईला आलीं होतीं.

अभिनंदनाच्या सभांवर सभा भरत होत्या. सर्व ठिकाणीं कुमाराचा गौरव होत होता.

तीं शरणगांवांत आलीं त्यावेळीं शरणगांवच्या लोकांनीं त्यांची मोठी मिरवणूक काढली. दुर्गाबाईचं हृदय भरून आलं होतं पण लतेचा आनंद गगनांत मावत नव्हता. आतां या शरणगावांतून आपण बाहेर निघणार अशी तिची खात्री झाली होती. बाहेरच्या जगाच्या हकिकती तिनं नुसत्या ऐकल्या होत्या. कुमाराचं स्वागत करण्यासाठीं मुंबईला गेल्या वेळीं

तें शहर पाहून ती थक्क झाली होती. विहिरींतला मासा समुद्रात जाऊन पडला म्हणजे त्यांची जी स्थिती होते तशीच लतेची अवस्था झाली होती.

केव्हां एकदां मुंबईला जाईन असं तिला झालं होतं. पण शरणगांव सोडायची दुर्गाबाईची तयारी नाहीं असं पाहून तिच्या उत्साहाचा विरस झाला. बॅरिस्टर झाल्यामुळं कुमारला आतां मुंबईला राहाणं भाग होतं, आणि आईला शरणगांवांत टाकून मुंबईला जाणं त्याच्या जिवावर आलं होतं. तो विलायतेला असल्या मुदतींत नाइलाजानं तिनं हा विरह सहन केला होता तो म्हणाला, " आतां कां म्हणून तुला टाकून राहूं ? जन्मभर क्लेश सोसलेस, निष्काम कर्मयोगाचं व्रत अखंड आचरणांत आणलंस, फलाची अपेक्षा तूं केली नाहींस पण केल्या कर्माचं फल—मग तें बरं असो कीं वाईट असो, केव्हांतरी मिळाल्याशिवाय राहात नाहीं, असं तूंच ना आम्हांला शिकवीत आलीस ? सुखाचं जीवन तूं मागितलं नाहींस पण देवानं आतां सुखाचं ताट तुझ्यापुढं वाढून ठेवलं आहे तें लोटून जाणं म्हणजे देवाचाच अपमान नव्हे का ? "

" खरं आहे तें ! " दुर्गाबाई म्हणाली, " पण या कार्यांत मी इतकी गुंतून गेलें आहे—या मातींत मी इतकी मिसळलें आहें, कीं शरणगांवची ही माती टाकून मुंबईचं सोनं हातीं घेणं मला मोठं कठीण जातंय. आज तूं जा, तुझा जरा जम बसूं दे, चांगला मिळवता हो, म्हणजे मग मी येईन. लता सुद्धां तेव्हांच येईल. विसरूं नकोस, शिक्षणाचं कर्ज तुझ्या माथीं आहे. जोंपर्यंत तें कर्ज फिटलं नाहीं तोंपर्यंत तुझा तूं मालक नाहींस—तोंपर्यंत तुला संसार थाटतां येत नाहीं– "

कुमार स्तब्ध राहिला. त्याचा उत्साह मावळला. खरोखरच या कर्जाची त्याला विस्मृति झाली होती. इतक्या सहज रीतीनं तें कर्ज मिळालं होतं, कीं तें मिळाल्याची जाणीव त्यांच्या हृदयांतून अगदींच मावळली होती. तें मिळण्यासाठीं त्याला पुरेसे कष्ट पडले नव्हते म्हणूनच त्याला ही विस्मृति झाली आपल्या हातून गुन्हा झाला असं त्याला वाटलं. तो म्हणाला

"" क्षमा कर आई, मी विसरलों होतों. विसरलों होतों म्हणायला मला लाज वाटते पण तुझ्यासमोर कबुली द्यायला मी कां भिऊं ? खरोखरच या कर्जाची गोष्ट मी विसरलों होतों. मला क्षमा कर आणि हें कर्ज फिटेपर्यंत हा विरह सहन करायचं मला धैर्य होईल असा आशीर्वाद दे."

हा सारा संवाद लतेच्या समोरच झाला. त्यापासून जो धडा घ्यायचा तो तिनं घेतला. सुखाचं जीवन अजून कांहीं काळ दुरावणार आहे असं वाटून तिचा जीव खचल्यासारखा झाला. दुर्गाबाईच्या तें लक्षांत आलं. ती म्हणाली, " अशी घाबरतेस कां लते ? काल अनंत आहे. जीवन अनंत आहे. त्या अंनतांतला हा लहानसा क्षण सहन केला पाहिजे. दुःखांत देखील मोठा आनंद असतो—विरहांतही आनंद असतो—तिथं मीलनाची अपेक्षा असते. अजून कांहीं दिवस धीर धर. सेवाधर्माचं कार्य करण्याची जी संधी तुला लाभली आहे तिचा इथं पुरेसा फायदा घे. ध्यानांत ठेव, शरणगांव सोडलं तरी हेंच माझं कार्य तुला पुढं चालवायचं आहे. त्यागासाठींच आम्हीं जन्म घेतला आहे. त्यागांतच आमचं वैभव आहे. त्या त्यागाची वृत्ती पूर्ण-पणें अंगीं बाणल्याशिवाय तूं संसारांत पडूं नयेस असं मला अजून वाटतं."

कुमार मुंबईला निघून गेला. त्यानं तिथं प्रॅक्टिस करायला सुरवात केली. सुरवातीलाच कांहीं महत्वाचे खटले मिळून त्यांत जय आल्यामुळं त्याचा एकदम नांवलौकिक झाला. ज्युनियर असतांना सुद्धां त्यानं खंद्या बॅरिस्टरांना सामना दिला.

त्याची प्रॅक्टिस भराभर वाढूं लागली. तो काटकसरीनं रहात होता. पूर्वीच्या रहाणींत त्यानं फारसा फरक केला नव्हता. नखशिखांत खादीचा पोषाख करूनच तो कोर्टांत जात असे. घरची राहाणीही त्यानं अगदींच साधी ठेवली होती. कोणत्याही प्रकारचा थाटमाट त्याच्या राहात्या घरांत दिसून येत नव्हता.

एक वेळ आपल्या आईनं येऊन आपलं वैभव पाहून जावं असं त्याला वाटत होतं. पण ती येण्याचं टाळीत होती. शिक्षणासाठीं

झालेल्या कर्जाची फेड करण्याचं सामर्थ्य आतां त्याला आलं होतं. त्यानं आपल्या आईला तसं कळवलं.

दुर्गाबाईनं पाद्रीची भेट घेतली आणि कर्ज फेडण्याची कुमारची तयारी आहे असं त्याला सांगितलं.

पण सावकाराचाच पत्ता नव्हता. ज्या दिवशीं कुमारसाठीं पैसे पाद्रीच्या हातीं देऊन सुंदरी गेली त्या दिवसापासून तिची आणि पाद्रीची भेट झाली नव्हती. पाद्रीनं सुंदरीचं नांव उघड न करतां ती हकिकत दुर्गाबाईला सांगितली. दुर्गाबाईनं या सावकाराचा कसून पत्ता लावण्याबद्दल पाद्रीला विनंति केली.

पण बिचारा पाद्री तरी काय करणार होता? सुंदरीचं पुरतं नांव सुद्धां त्याला माहीत नव्हतं. अलीकडे तिच्याकडून लतेसाठीं पैसे किंवा देणगी येण्याचं सुद्धां बंद झालं होतं, त्यामुळं ती हयात आहे कीं नाहीं याचीच शंका पाद्रीला येत होती.

तो तपास तरी कुठं करणार होता? ज्या बोर्डिंग हाऊसमधें पहिल्यानं लता रहात होती त्या बोर्डिंग हाऊसच्या वृद्ध सुपरिटेंडेंट बाईकडे त्यानं चौकशी केली पण तिथंही कांहीं पत्ता लागला नाही. सुंदरीला वाचतांच कळेल अशा शब्दांत त्यानं निरनिराळ्या वर्तमानपत्रांतून जाहिराती प्रसिद्ध केल्या त्याचा मात्र परिणाम झाला. खालीं सही नसलेलं एक पत्र त्याला आलं. तें असं होतं-: "आपण माझा तपास करीत आहांत असें मला वर्तमानपत्रांत आपण दिलेल्या जाहिरातीवरून कळलें मी आतां मेल्यासारखी आहें. लतेलाही माझ्या मदतीची यापुढें जरूरी नाहीं असें माझ्या निदर्शनास आल्यामुळें मी पूर्वीची व्यवस्था बंद केली होती. तिला जर जरूर असेल तर आपण अशीच × × वर्तमानपत्रांत जाहिरात द्यावी म्हणजे मी योग्य ती तजवीज करीन. आपली आज्ञा मी अक्षरशः पाळीत आहें. लता आतां मोठी झाली आहे. अशा वेळीं मी शरणगावांत येणें धोक्याचें आहे, हें आपल्यालाही पटेल. या पेक्षां जास्त कांहीं लिहीत नाहीं."

पाद्रीनं तें पत्र दुर्गाबाईला सुद्धां दाखवलं नाहीं कीं त्यांतला मजकूरही कळवला नाहीं. त्यानं पुन: जाहिरात दिली आणि त्यांत कुमाराचं नांव न देतां कर्जफेडीचा उल्लेख केला.

ती जाहिरात हातीं येतांच सुंदरी तें वर्तमानपत्र घेऊन मोहनकडे आली. अलीकडे मोहनकडे तिचं जाणं येणं सुरू झालं होतं. मोहननं आपलं वचन पाळलं होतं, त्याचप्रमाणें तीही त्या वचनाला चिकटून राहिली होती. कुठल्याही दोन निस्सीम मित्रांप्रमाणेंच त्यांच्या भेटी होत होत्या. सुंदरीला त्यांतच सौख्य होत होतं. एक प्रकारें ती हा 'निष्काम कर्मयोग' आचरीत होती. ती जाहिरात मोहनला दाखवून ती म्हणाली, "काय वाटतं ही जाहिरात वाचून ?"

"मला कांहींच बोध होत नाहीं." मोहन म्हणाला.

"तुम्हाला आठवतं का ?—" सुंदरी म्हणाली, "त्यावेळीं पूर्वी तुम्ही जेव्हां माझ्याकडे येत होतां तेव्हां माझ्या आंगावर नोटांचीं पुडकीं फेकीत होतां—"

"हो आठवतं—" मोहन म्हणाला, "पैशासाठींच तुझ्यासारख्या बायका माणसांच्या मागं लागत असतात असा माझा समज होता—"

"आतां नाहीं ना तसा समज ?" सुंदरी म्हणाली. मोहन हंसला पण कांहींच बोलला नाहीं. सुंदरी पुढं म्हणाली, "ज्या दिवशीं तुम्हांला मी ती खबर दिली त्या दिवशींही तुम्हीं बऱ्याचशा मोठ्या रकमेच्या नोटा माझ्या आंगावर फेकल्या. आठवतं ना ? तुमच्यासमोर मी त्या नोटांना हात लावला नव्हता. तुम्ही गेल्यावर त्या नोटा मी गोळा केल्या—आणि त्या घेऊनही गेलें ! आठवतं ?"

"नाहीं आठवत." मोहन म्हणाला, "त्या दिवशीं मी कैफांत होतों. आतां आठवतं, कीं मी नोटा तुझ्या आंगावर फेंकल्या. पण पुढं ती गोष्ट मी अजिबात विसरलों."

"मी त्या कां घेऊन गेलें असं तुम्हांला वाटतं ?"

"पैशाच्या मोहानं तर खास नव्हे—असंच ना तुला म्हणायचं आहे ?"

" नाहीं." सुंदरी म्हणाली, " पैशाच्या मोहानंच मी त्या नोटा नेल्या. पण तो मोह माझ्यासाठीं नव्हता–" असं म्हणून ती उगीच राहिली.

" मग कुणासाठीं ? " मोहननं विचारलं.

" तुमच्या भावासाठीं !—" मोहनचा चेहरा एकदम पडला असं पाहून सुंदरी म्हणाली, " त्याच वेळीं तुमचा भाऊ बी. ए. होऊन फर्स्ट क्लासांत पहिला आला होता. बॅरिस्टर होण्यासाठीं विलायतेला जावं असं त्याच्या मनांत होतं. मला तें जेव्हां कळलं तेव्हां तो विलायतेचा खर्च द्यायचं एका मध्यस्थाला मी वचन दिलं. तें वचन देतांना ती कल्पना मला आली नव्हती. त्या दिवशीं आली. ज्या दिवशीं तुम्ही त्या नोटा माझ्या आंगावर फेकल्या त्याच वेळीं मला वाटलं, कीं ज्याचा पैसा त्याच्या कामीं लागावा. वेळोवेळीं मला तुम्ही देत होतां त्या साऱ्या रकमा मी बाजूला ठेवल्या होत्या. सारे पैसे गोळा करून पाहिले त्यावेळीं कुमारला विलायतेला जायला जेवढी रक्कम पाहिजे होती तेवढीच ती भरली---"

" आतां कळलं मला–" मोहन म्हणाला, "बॅरिस्टर होऊन आमच्या-सारख्या गुन्हेगारांच्या मागं हात धुऊन लागलेला हा माझा भाऊ आतां श्रीमंत झालाय, आतां हें कर्ज फेडणार आहे, असंच ना ? "

" हो." सुंदरी म्हणाली, " आतां मी काय करूं ? "

" तें मला काय विचारतेस ? " मोहन बेफिकिरीनं म्हणाला, " ते पैसे मी तुला दिले होते. आतां त्यांच्याशीं माझा कांहीं संबंध नाहीं. "

" नाहीं." सुंदरी म्हणाली. " ती तुमची ठेव होती माझ्याकडे. तुमच्या भावासाठीं ते पैसे मी दिले नसते तर यापूर्वीच ते परत केले असते. ते मी त्याला दिले ते तुमचे म्हणून दिले---तुमच्या परवानगीशिवाय दिले खरे, पण तुमचे म्हणून दिले."

मोहन क्षणभर स्तब्ध राहून म्हणाला, " ठीक आहे. ते पैसे मला पोंचले. कळव तसं त्याला—पावती देऊं का लिहून ?–" पुनः क्षणभर थांबून तो म्हणाला, "पण यांत कसली पावती द्यायची ! भावाभावांच्या व्यव-हारांत कधीं पावत्या बेत नसतात.—जा, काय तुला वाटेल तें कर—"

क्षणभर तो सचिंत बसला होता. " अस्सं ? " तो म्हणाला, " एकूण माझ्याच पैशानं माझा वैरी तयार होतोय तर ? "

" वैरी ? " सुंदरीनं विचारलं, " वैरी कसा ? "

" तुला माहीत नाहीं. " मोहन म्हणाला, " भलते उपद्व्याप चालवले आहेत त्यानं—या माझ्या शहाण्या भावानं--! कुणाचा खटला आला कीं वकिली करायची, पैसे घ्यायचे, तें सोडून गुन्हे शोधून काढून त्यांची वासलात लावायची उठाठेव त्यानं पत्करलीय. माझ्याच मागं लागलाय तो म्हणेनास. एक वैरी होता—तुझ्या कृपेनं तो गेला म्हणून मी निश्चित झालों होतों; ती नुसती कर्तबगारीची चढाओढ होती—त्या चढाओढींत एक प्रकारचा आनंद होता—अभिमान होता— ईर्ष्या होती ! त्या चढाओढींसाठीं आम्हीं दोघे मनगटाला मनगट घासून झगडत होतों. माझ्या बापाच्या मरणाला तो कारणीभूत झाला नसता तर हें असं मुळींच झालं नसतं. पण बाबांना मृत्युसमयीं मी वचन दिलं होतं. आज मला तो पाहिजे होता. तोडीचा वीर असल्याशिवाय झगडायला चेव येत नाहीं. आतां मी कितीतरी उलाढाली करतोंय पण तो आनंद नाहीं. आतां हा माझा भाऊ आलाय. त्यानं झगडा चालवलाय माझ्या प्रत्येक व्यवहारांत. तो ढवळाढवळ करतोय—" पुनः क्षणभर तो थांबला आणि म्हणाला, " काय गंमत आहे ! माझ्याच पैशानं मी माझ्या भावाला माझा वैरी बनवलं अं ! "

त्याचे ते उद्गार ऐकून सुंदरी घाबरून गेली. दोन ठिकाणचे दोन धागे तिला ओढीत होते. लतेच्या वात्सल्यानं कुमारबद्दलचा तिचा ओढा आणि इकडे मोहनचा ओढा. तिला वाटलं, मोहन निर्दयपणानं त्याच्या जिवावर तर उठणार नाहीं ? ती म्हणाली, " रामायण आठवतं ना तुम्हाला ? माझ्या लतेची आठवण आहे ना ? तुम्हाला आतां सारं कांहीं कळलं आहे—"

" हो-हो—सारी आठवण आहे मला. " मोहन म्हणाला, " भ्यायचं कांहीं कारण नाहीं. जोंपर्यंत तो प्रत्यक्ष माझ्या जिवावर उठत नाहीं तोंपर्यंत त्याला माझ्यापासून मुळींच भय नाहीं. पण जर का माझ्याशीं सामना

द्यायला तो आखाड्यांत उतरेल तर मात्र माझ्या आईचा उपदेश मी अमलांत आणीन. ”

“ तुमच्या आईचा उपदेश ?” सुंदरी म्हणाली.

“ हो हो. माझ्या आईचा उपदेश ! ” ताड्कन उठून खोलींत फेऱ्या घालीत मोहन म्हणाला, “ फार जुन्या काळची गोष्ट आहे ती. गीतेचं पुराण सांगत असे माझी आई— अजूनही सांगते म्हणतात. मला फार आग्रह करीत असे, ऐकायला बस म्हणत असे, मी ऐकत नव्हतों पण त्यावेळीं चुकून कानीं आलेले ते शब्द आज मला आठवताहेत. ‘ शत्रु सामन्याला उभा राहिला, कीं आपला परका म्हणूं नकोस ’ असं कृष्णानं अर्जुनाला सांगितलं. लढाईच्या वेळीं आपले काके मामे आजोबा समोर उभे पाहून अर्जुन घाबरला होता. त्यावेळचं एक वाक्य आई म्हणत असे तें आठवतं, ‘ तस्मात् उत्तिष्ठ यशो लभस्व जित्वा शत्रून्भुंक्ष्व राज्यं समृद्धं— ’ तो आईचा उपदेश—तेवढाच तो उपदेश माझ्या ध्यानीं राहिलाय. तसा प्रसंग येईल तर भावाला भाऊ म्हणणार नाहीं हा मोहन. ”

गीतेच्या उपदेशाचा मोहननं केलेला तो विपर्यास ऐकून सुंदरी स्तंभित झाली. कुमारला भेटून एकदां त्याला सावध करायचं, असं तिनं आपल्या मनाशीं ठरवलं.

मोहनचा निरोप घेऊन ती निघून गेली. तिनं पाद्रीला पत्र लिहिलं तें असं :—“ कुमारच्या विलायतेच्या खर्चासाठीं जी रक्कम दिली होती ती माझी नव्हती. ती ज्याच्याकडून आली होती तो ती रक्कम परत घ्यायला तयार नाहीं. भावानें भावाला रक्कम दिली असेंच समजून चालावें. जगत् बंधुत्वाची कल्पना आपल्याला जशी पारखी नाहीं तशीच दुर्गाबाईनांही नाहीं. ही फेड झाली आहे असें समजावें. कुमारला तसेंच वाटत असेल तर त्यानें ती रक्कम अशाच कुणा विद्यार्थ्याला अशाच कामासाठीं द्यावी म्हणजे ज्यानें ती दिली आहे त्याला पोंचल्यासारखी होईल. ”

तें पत्र पाद्रीनं दुर्गाबाईला दाखवलं. अर्थातच त्या पत्रावर कुणाचंही नांव नव्हतं.

दुर्गाबाईचं हृदय भरून आलं. ती म्हणाली, " अशीही माणसं जगांत आहेत तर ! कृपा करा पण या व्यक्तीची आणि माझी एकदां तरी भेट करवा. मी कुणाकडेच ती भेट बाहेर फोडणार नाहीं. पण ही व्यक्ती भेटल्याशिवाय मला समाधान वाटणार नाहीं. "

पाद्रीबाबानं पुनः एकदां प्रयत्न करून पहाण्याचं दुर्गाबाईला आश्वासन दिलं.

---

## २२

कुमारची प्रॅक्टिस मुंबईत जोरांत चालली होती. पण त्याची प्रवृत्ती कोर्टांत खटले चालवण्यापेक्षां गुन्हे शोधून काढण्याकडेच जास्त असे. कोणत्याही गुन्ह्याची बातमी कानीं आली म्हणजे तपास करणाऱ्या गुप्त पोलिसांना सहाय्य करण्यासाठीं तो आपण होऊन पुढं सरसावत असे. त्याचं हें 'वेड' त्याच्या बरोबरच्या आणि त्याच्यापेक्षां जुन्या असलेल्या वकील बॅरिस्टरांच्या थट्टेचा विषय होऊन बसलं होतं.

कुमारच्या या ठाठेवींत ज्या गुन्ह्यांचे प्रकार त्याच्या नजरेला आले होते त्यांत मोहनच्या करवीं होत असलेल्या गुन्ह्यांचा समावेश झाला नव्हता असं नाहीं. मोहनची गुन्हे करण्याची पद्धति इतर गुन्हेगारांपेक्षां अजिबात निराळी असल्यामुळं ज्या ठराविक दृष्टीनं तो या गुन्ह्यांकडे पहात होता त्या दृष्टीच्या टापूंत ते येण्याजोगे नव्हते. तरीही या विशिष्ट प्रकारच्या गुन्ह्यांचा उकल करण्याकडे त्याचं लक्ष वेधलं होतं.

केशवलालच्या मृत्यूनंतर त्याचीं कांहीं माणसं आपल्या ताब्यांत घेण्याकडे मोहनची नजर वळली. भिकूचा एकनिष्ठपणा त्याच्या लक्षांत आला होता. वेळीं अवेळीं केशवलालकडून पैसे उकळण्याची त्याची खोड मोहनला

माहीत नव्हती असं नाहीं; पण कामागिरी होत असेल त्यावेळीं मोबदला द्यायची केव्हांच कुरकुर नसल्यामुळं भिकूसारखा माणूस आपल्या संग्रहीं असावा असं त्याला वाटूं लागलं.

सुंदरीचा आणि मोहनचा परिचय दिवसेंदिवस स्नेहाच्या स्वरूपांत परिणत होत होता. मोहनचा तो एक निष्काम कर्मयोग होता. जीवनांतील कोमलतेची उणीव भरून काढण्यासाठीं तो घटकाभर तिच्या घरीं जाऊन बसत असे—आणि निघून जात असे. पैसे द्यायचा प्रयत्न त्यानं एकदोन वेळ करून पाहिला पण तिनं अशा प्रकारें त्याला झिडकारलं, कीं पुनः ती चूक करण्याची बुद्धी त्याला झाली नाहीं. पैशाच्या बाबतींत ती उदासीन होती असं नव्हे, पण आंतरिक स्नेहांत पैशाचा व्यवहार होऊं शकत नाहीं हेंच तिला दाखवून द्यायचं होतं. पतिपत्नीच्या नात्यानं पतीवर पत्नीच्या अन्नवस्त्राची तरी जबाबदारी असते. इथं ती सुद्धां जबाबदारी नव्हती. त्याचप्रमाणें पति-पत्नीचं जें एक वैषयिक नातं असतं तेंही नव्हतं. वैषयिक भावनेचा सुंदरीलाही तिटकारा आला होता. त्या भावनेच्या पायीं मानवी मनाची अधोगती कशी होते, मालकी हक्काच्या जाणिवेनं संशयाचं बीज कसं रुजलं जातं, त्या संशयामुळं प्रेमाच्या भावनेचं मत्सरांत रूपांतर कसं होतं याचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष अनुभव तिला मिळाला असल्यामुळं पुनः तसल्या प्रकारच्या वैषयिकतेच्या चिखलांत न पडण्याचा तिनंही निर्धार केला होता—आणि म्हणूनच त्या दोघांच्या या प्लॅटॉनिक मैत्रींत कधींच अंतर आलं नाहीं—आणि म्हणूनच सुंदरीच्या अनुभवावर विसंबून मोहननं भिकूला आपल्या विश्वासांत घेतलं.

मुंबईच्या नव्या राजवटींत कुमारला सरकारी वकील होण्याचा योग आला. एवढ्या तरुण बॅरिस्टरला एवढा मोठा अधिकार एकदम दिल्यामुळं तो विषय सर्वांच्याच चर्चेचा होऊन बसला होता. पण कुमार तिकडे लक्ष देत नसे. जगांतून—निदान मुंबईतून तरी गुन्हे आणि गुन्हेगारीची वृत्ती नाहींशी करून टाकण्याची जी त्याची महत्त्वाकांक्षा होती त्या कामीं हा अधिकार त्याला आतां जास्त सहाय्यभूत होऊं लागला होता.

सुस्थिति आल्यामुळं त्यानं आतां आपल्या आईला मुंबईला बोलावून घेतलं. दुर्गाबाईचं आयुष्य पहिल्यापासूनच खेडयांत गेलेलं असल्यामुळं शरणगांव सोडून मुंबईत येणं तिच्या जिवावर आलं. तिला आणण्यासाठीं कुमार मुद्दाम शरणगांवला गेला होता.

पहिल्यानं ती नाराज होती. पण कुमार म्हणाला, " सारं आयुष्य या दरिद्रीनारायणांच्या सेवेंत तूं काढलंस. आतां थोडा विश्रांति घे—आतां थोडी माझ्या सुखाकडे नजर दे—माझ्या समाधानाकडे नजर दे. तूं असे कष्ट करीत राहिल्याचं पाहून मला समाधान वाटत नाहीं. आजवर तुझी नोकरी झाली आहे. आतां पेन्शनराच्या सुखाचा थोडा तरी अनुभव घे."

दुर्गाबाई हंसून म्हणाली, " सरकारी नोकरी पत्करतांच तुला पेन्शन आठवूं लागलं. मोठं वाईट आहे हें लक्षण. ब्रिटिशांच्या राजवटींत या पेन्शनच्या योजनेनं मोठमोठीं कर्तबगार माणसं मरणप्राय होऊन गेलीं आहेत—किंवा मरून गेलीं आहेत. 'पंचावन्नाव्या वर्षी तूं म्हातारा होणार आहेस' असं नोकरीच्या पेशांत शिरणाऱ्या प्रत्येकाला कानीं कपाळीं ओरडून सांगण्यांत येतं. त्याच मंत्राचा तो जप करीत असतो. पंचावन्नावं वर्ष सदोदित त्याच्या नजरेसमोर दिसत असतं आणि त्या पंचावन्नाव्या वर्षाची आठवण करीत करीत तो थकत जातो. जुना इतिहास पहा, ऐंशीं वर्षांचे लढवय्ये रणांगणावर जाऊन लढले आहेत. पुराणकाळांतल्या भीष्म—द्रोणासारख्या पितामहांची गोष्ट बाजूलाच राहूं दे पण इतिहासकालांतले शेलारमामा, पर्शरामपंत अमात्य यांच्यासारखे पितामह आपल्या नजरेसमोर आहेत. परदेशाकडे पाहिलं तरी राजकारण करणारे सारे मुत्सद्दी सत्तरऐंशींच्या घरांत आलेले असल्याचं आपल्याला दिसून येतं. मग आपणच कां खचून जावं ?—" कुमार ओशाळला असं पाहून ती म्हणाली, " काम करीत माझं आयुष्य गेलं आहे, काम करीतच मला हा देह ठेवला पाहिजे. भारती युद्ध संपल्यानंतर कृष्ण जेव्हां द्वारकेला जायला निघाला तेव्हां कुंतीला भेटायला गेला. त्या वेळीं कुंतीनं कृष्णाकडे काय मागितलं तुला

आठवतं ना ? ती म्हणाली, 'देवा संकटं दे. संकटं होतीं त्यावेळीं तूं छायेसारखा आमचा पाठीराखा होतास. तीं संकटं जातांच आतां तूं द्वारकेला जायला निघालास ! ' म्हणूनच मी म्हणतें, कीं मला सुखासमाधानाचं आयुष्य नको—"

"पण मला माझी आई, माझ्याजवळ पाहिजे आहे." कुमार म्हणाला, "इतकीं वर्षं मी दूर राहून काढलीं. आतां मी ऐकणार नाहीं. काय काम करायचं असेल तें मुंबईलाच कर. तिथं आत्यंतिक वैभव आहे तसं आत्यंतिक दारिद्र्यही आहे. त्या मुंबईच्या दरिद्रीनारायणांची सेवा तुला सहज करतां येईल—"

मुलाच्या या कळकळीच्या मागणीला दुर्गाबाईला नकार देतां येईना. ती कुमारबरोबर मुंबईला जायला निघाली तेव्हां लता रडूं लागली. ती निराधार होती. अजून जरी ती मिशन हाऊसमध्यें रहात असे तरी तिचा सारा वेळ दुर्गाबाईकडेच जाई. पहिल्या पासूनच तिनं गांवातल्या कुणाशींच स्नेहाचे धागेदोरे जोडले नव्हते. कुमारवर तिचं प्रेम होतं, कुमारशीं विवाह होण्याची तिची अपेक्षा होती, पण त्या विषयाचा उल्लेख कुणीच करीत नव्हतं म्हणून तिची वृत्ती भित्री बनली होती. कुमारचा दर्जा समाजाच्या दृष्टीनं आतां मोठा झालेला असल्यामुळं तो आपल्यापासून दुरावतो आहे असं तिला वाटत होतं.

वस्तुस्थिति अशी होती, कीं पाद्री आणि दुर्गाबाई यांचं याच वेळीं या विषयासंबंधीं बोलणं झालं होतं. दुर्गाबाई मुंबईला जाणार असं कळल्यामुळं तिचीं आणि सुंदरीची एकदां भेट करवून द्यावी असं पाद्रीलाही वाटूं लागलं होतं. लतेला आपली सून करून घेण्याचा दुर्गाबाईचा निश्चय झालेला असल्यामुळं ती कोणत्या कुळांत जन्माला आलेली आहे हें आतां कळवणं अवश्य झालं आहे, असं पाद्रीला वाटलं. मुंबईला जाऊन पोंचतांच पाद्री हा योग जुळवून आणणार होता.

पण त्या पूर्वी लतेला दुर्गाबाईबरोबर मुंबईला पाठवायचं त्या उभय-

त्यांच्या मतानं ठरलं. ती आतां लहान नव्हती. आणि शरणगांवांत तिची काळजी घेईल असं दुसरं कुणीच माणूस नव्हतं. मिशनहाऊसमध्यें राहाणं तिला आतां कठीण जात होतं हेंही पाद्रीला दिसत होतं. आज ना उद्यां तिचं कुमारशीं लग्न होणार हेंही निश्चित होतं. या सर्व गोष्टींचा विचार करून पाद्रीनं लतेला दुर्गाबाईबरोबर मुंबईला पाठवलं.

नव्या दर्जाला शोभेल अशी एक जागा वापरणं कुमारला अवश्य झालं होतं. टीचभर झोपडींत आयुष्य घालवलेल्या दुर्गाबाईला तें अफाट घर भकास वाटूं लागलं. मुंबईला आल्यावर आपल्या कामाला सुरवात करतां येईल अशी जी तिची कल्पना होती तीही अमलांत येऊं शकली नाहीं. गरीबगुरिबांच्या वस्तीपासून अत्यंत दूर असलेल्या मलबारहिलवरच्या बंगल्यांत राहाणं तिच्या नाशिबीं आलं होतं.

तरीही ती आपल्यापरीनं धडपड करूं पहात होती. श्रीमंती आली होती तरीही तिन आपली पूर्वीची राहाणी बदलली नव्हती. अनुकूलता असून सुद्धां ती खादीच्या वस्त्रांतच वावरत असे, तशीच रोज चरखा चालवीत असे, कुमार आणि लतेला तशीच रोज गीतेचे पाठ ऐकवीत असे.

ठरल्याप्रमाणें पाद्रीनं येऊन दुर्गाबाईची भेट घेतली. तिची भेट घेण्यापूर्वी तो सुंदरीला भेटून आला होता. दुर्गाबाईची तिच्याशीं एकांतांत भेट होण्यासाठीं मुंबईतल्या मिशन हाऊसमधली एक जागा त्यानं मुक्रर केली होती, ती सुंदरीचीच सूचना होती. मोहन तिच्या घरीं केव्हां येईल याचा अंदाज नसे म्हणूनच तिनं पाद्रीला तशी विनंति केली.

लतेची वडील बहीण समोर पहातांच दुर्गाबाईच्या अंतःकरणाला पहिल्यानं मोठा धक्का बसला. हें रहस्य इतकीं वर्षे झांकून ठेवणाऱ्या पाद्रीच्या निर्धाराचं आणि जिव्हाळ्याचं तिला जितकं कौतुक वाटलं तितकंच आश्चर्यही वाटलं. तिनं आपल्या मनाशीं विचार करून पाहिला. पाद्रीच्या वृत्तीशीं स्वतःच्या मनांत त्यावेळीं आलेल्या भावनेची तिनं जेव्हां तुलना केली त्यावेळीं तिची तिलाच लाज वाटली. दैवायत्तं कुलेजन्म मदायत्तं तु

पौरुषम् असं म्हणणाऱ्या कर्णाची तिला आठवण झाली. कोणत्याही कुलांत जन्म घेणं सुंदरीच्या हातीं नव्हतं. त्या कुलपरंपरेला अनुसरून ज्या परिस्थितींत पडण्याचं तिच्या नाशिबीं आलं होतं, त्या परिस्थितींत आपली बहीण पडूं नये म्हणून तिनं जे प्रयत्न केले, जो स्वार्थत्याग केला, बहिणीच्या वृत्तिवर आपल्या पूर्वेतिहासाचा परिणाम होऊं नये म्हणून वात्सल्यानं तळमळणाऱ्या मनाला तिनं कसं काबूंत ठेवलं, याची पूर्ण कल्पना जेव्हां दुर्गाबाईला आली तेव्हां तिच्या कुलाची आठवण होण्यापेक्षां तिच्या शीलाबद्दल तिला अभिमान वाटल्यावांचून राहिला नाहीं.

विशिष्ट परिस्थितींत वाढवल्यामुळं लतेवर तिच्या कुलपरंपरेचा परिणाम यत्किंचितही झाला नाहीं, हें दुर्गाबाईला स्पष्ट दिसत होतं. कुलपरंपरेमुळं कांहीं माणसांच्या बाबतींत निष्कारण अन्याय होतो आहे असं तिला वाटल्यावांचून राहिलं नाहीं.

सुंदरी सांगत होती, “ जीव तुटत होता पण मी लतेची भेट घेतली नाहीं—तिला पाह्यचं सुद्धां टाळलं तें या पाद्रीबावांच्या सक्तीच्या उपदेशामुळं. माझं मन अनावर होत असे पण हे मला पदोपदीं जागं करीत असत. म्हणूनच लता आज आहे तशी झाली. मी तिची बहीण आहें हें तिला केव्हांच कळतां कामा नये. तें कळलं तर ती करपून जाईल. ज्या प्रकारची वृत्ती तुमच्या उपदेशामुळं तिच्या ठायीं उत्पन्न झाली आहे त्या वृत्तीला अनुसरून ती कुमारशीं लग्न करायलाही तयार होणार नाहीं – ”

“ खरं आहे तें ! ” दुर्गाबाई म्हणाली, “ हें कळलं तर तुम्हां आम्हां सर्वांनाच टाकून ती निघून जाईल. कुणालाच कळतां कामा नये हें रहस्य. तिचा हा इतिहास कालाच्या उदरांत अदृश्यच राहिला पाहिजे— ”

“ पण माझं कूळ !—” सुंदरी गहिंवरून म्हणाली.

“ वेडे पोरी ! ” दुर्गाबाई उद्गारली, “ मी गीतेची अनुयायी आहें हें तूं विसरतेस. स्त्रियो वैश्याः तथा शूद्राः तेपि यान्ति परागतिम् असं म्हणणाऱ्या गीताकाराची मी भक्त म्हणवतें, चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्म

विभागशः असं म्हणणाऱ्या भगवंताच्या वाक्याला मी बट्टा लावला असं नाहीं का होणार ? परधर्मीयाच्या घरांत लता वाढली पण तिनं स्वधर्माचं आचरण केलंय. खिस्ताचा धर्म आणि कृष्णाचा धर्म यांच्यांत मला तरी भिन्न भाव दिसत नाहीं. खिस्ताचे अनुयायी आणि कृष्णाचे अनुयायी आपल्या धर्माच्या खोटया अभिमानानं एकमेकांबरोबर झगडत असले तरी खिस्त आणि कृष्ण भिन्न नाहींत असंच मी मानतें. स्थलकालपरत्वें त्यांच्या उपदेशांत क्वचित भिन्न भाव दिसला असेल पण त्या भेदाभेदांतला समन्वय पहाण्याइतकी बुद्धी मला ईश्वरानं दिली आहे. आणि म्हणूनच मला वाटतं, कीं जन्मकर्मावर माणसाची वृत्ती अवलंबून नाहीं. गुणकर्मानं पाहिलं तर तुझी बहीण ब्राह्मणांहूनही मोठी ब्राह्मण आहे—" सुंदरीच्या डोळ्यांतून आनंदाश्रूंच्या धारा वाहूं लागल्या. दुर्गाबाईनं तिला जवळ घेतलं आणि आईच्या ममतेचा हात तिच्यावरून फिरवीत ती म्हणाली, "आणि तूं तर ब्राह्मणानांही वंदनीय होऊन बसशील एवढी मोठी आहेस. केवढा हा अलौकिक त्याग ! असा असामान्य त्याग करण्याची संधी देवानं मला दिली नाहीं म्हणून मला तुझा मत्सर वाटूं लागतो."

दोघांचेही डोळे आसवांनीं भरून आले होते. दोघींचींही अंतःकरणं विश्वप्रेमाच्या भावनेनं ओलावलीं होतीं.

सुंदरीला हा अनुभव पहिल्यानंच मिळाला होता. मातृहृदयाचा ओलावा तिला कधींच माहीत नव्हता. दुर्दैवानं माता होण्याचं भाग्यही तिला लाभलं नव्हतं. जिची 'माता' होऊन ती बसली होती त्या बहिणीपासूनही ती दुरावली होती. ज्या माणसांच्या सहवासांत तिचं सारं आयुष्य गेलं होतं तीं माणसं दैत्यांच्या सदरांत जमा होण्याजोगीं होतीं. त्या दैत्यांच्या राज्यांत प्रल्हादासारखी आपल्या मनाची वृत्ती संभाळून ती आजवर राहात आलेली दिसून आल्यामुळंच दुर्गाबाईला तिच्याबद्दल एवढा आदर वाटला.

त्या दिवसापासून त्या दोघींचा जिव्हाळा वाढत गेला. सुंदरीनं आपली राहाणी बदलली, पोषाख बदला. ती दुर्गाबाईकडे वारंवार जाऊं येऊं

लागली. आवडत्या वाहिणीच्या सहवासाचं चोरटं सुख तिला अनुभवतां येऊं लागलं.

तिघींचंही मीलन झालं. सुखाची समृद्धि झाली असं सर्वांनाच वाटलं. पण—

---

## २३

भिकू मिळाल्यापासून मोहनला एक प्रकारें स्वास्थ्य आलं होतं. केशवलालच्या मृत्यूमुळं ईर्ष्येचा जोर कमी झाला. आतां झगडायचं कुणासाठीं असं वाटूं लागलं—इकडे भरपूर संपत्ती कमावली गेली होती त्यामुळं मोहनच्या उद्योगाला पूर्वीचा उठाव राहिला नव्हता. प्रत्येक गोष्ट स्वतः करण्याची पूर्वीची वृत्ती टाकून तो बरींच कामं भिकूवर सोपवूं लागला होता.

अर्थात कामंही पूर्वीपेक्षां कमी झालीं होती. भिकूला ताब्यांत ठेवणं म्हणजे त्याला सारखं चारीत राहाणं हें मोहनला माहीत होतं. त्या कामीं त्यानं केशवलालसारखी कुचराई केव्हांच केली नाहीं.

सुंदरीकडे त्याचं येणंजाणं नियमित असे. सुंदरीच्या वृत्तींत हल्लीं पालट होत असल्याचं त्याला स्पष्टपणें दिसत होतं. पूर्वीची छानछोकी तिनं आतां समूळ सोडून दिली होती. दुर्गाबाईकडे तिचं जाणं सुरू झाल्यापासून तिनं आपली सारीच राहाणी बदलून टाकली होती. लतेला तिनं ओळख दिली नव्हती, केव्हांहीं ओळख देण्याची तिची इच्छाही नव्हती, तरीही नुसतं तिच्या सहवासांत राहातां येतें, रोज ती नजरेसमोर दिसते एवढ्या एकाच गोष्टीमुळं तिच्या आत्म्याला समाधान वाटूं लागलं होतं.

ती दुर्गाबाईकडे जात येत असते याची कल्पना मोहनला नव्हती असं नाहीं. पण त्यानं केव्हांही त्या गोष्टीचा आपल्या भाषणांत उल्लेख केला नाहीं. सुंदरीच्या वृत्तींत जो फरक झाला होता तो आपल्या आईच्या सहवासामुळंच, हें मोहनला कळत होतं.

कर्तृत्वशक्तीची परमावधी झाल्यामुळं मोहनला जी ग्लानी आली होती तिचा भिकूवर परिणाम होत होता. कांहींतरी कामगिरी करून दाखवल्याशिवाय पैसे उकळणं शक्य नव्हतं. आणि इकडे तर कामगिऱ्या थकत चालल्या होत्या. भिकूला पैशाचं वेड फार होतं. पूर्वी त्याची जी सारखी उकळाउकळ चाललेली असे ती आतां होत नाहीं असं पाहून पैसे मिळवण्याचा आणखी कांहींतरी मार्ग शोधून काढावा असं त्याला वाटूं लागलं. जिकडे तिकडे होत असलेल्या या गुन्ह्यांचा कर्ता कोण हें जरी पोलिसांना उमगलं नव्हतं तरीही हा गुन्हेगार पकडून देणाराला पोलिसांनीं मोठं बक्षिस जाहीर केलं होतं. त्या बक्षिसाच्या मोहानं भिकू एके दिवशीं पोलिसाकडे गेला.

त्याला थोडंसं कारण झालं. कोणत्या का कारणानं असेना मोहन त्या दिवशीं भिकूवर संतापला होता. पुनः पुन्हां होत असलेली त्याची मागणी केशवलाल प्रमाणेंच त्यालाही दुःसह झाली होती. साऱ्या जुन्या गोष्टी काढून मोहननं त्याच्यावर तोंड टाकलं तेव्हां चिडून त्या तिरमिरीसरशीं सरळ पोलिसकडे जाऊन त्यानं वर्दी दिली.

त्याची सारी जबानी कुमारनंच घेतली होती. भिकूच्याच आग्रहावरून एका व्यापाऱ्यावर छापा घालायचं मोहननं ठरवलं होतं. तो तिकडे केव्हां जाणार, कसा जाणार, आणि काय करणार याची इत्थंभूत बातमी त्यानं पोलिसना सांगितली. पूर्वीच्या गुन्ह्यांच्या हकिकती सांगून केशवलालचा खून त्यानं कशा रितीनं केला याचंही वर्णन त्यानं पोलिसांसमोर केलं. पूर्वीचे गुन्हे आणि त्या गुन्ह्यांचे एकूण एक पुरावे त्यानं पोलिसच्या हातीं दिले.

या कामगिरीबद्दल त्याला माफी देण्याचं आश्वासन देण्यांत आलं होतं. पण तेवढ्यानं भिकूचं समाधान झालं नाहीं. तो म्हणाला, " तुम्हांला कल्पना नाहीं, मोहनची दृष्टी मोठी तिखट आहे. त्याच्या डावपेंचाचं जाळं दूरवर पसरलेलं आहे. उद्यां तुम्ही त्याला पकडाल पण माझ्यामुळं तो पकडला गेला याचा त्याला सुगावा लागल्यावाचून रहाणार नाहीं—आणि तसा

सुगावा लागला, की तो तुमच्या तुरुंगांत असला तरीसुद्धां हरप्रयत्नानं माझा खून पडल्याशिवाय राहणार नाहीं."

"कांहीं भिऊं नकोस" कुमार म्हणाला, "आम्हीं सर्व प्रकारें तुला संरक्षण देऊं."

"तुम्हांला कल्पना नाहीं." भिकू म्हणाला, "आजवर तुमच्या डोळ्यांत सुद्धां ज्यानं एवढी धूळ टाकली तो कसा असेल याची थोडी कल्पना करा. माझा जीव आतां धोक्यांत आहे—"

"तर मग असं करा--" कुमार म्हणाला, "माझ्याकडे येऊन राहा."

"छे, छे," भिकू म्हणाला, "त्यानं तर त्याचा संशय अधिकच बळावेल. त्याचे अनेक हस्तक आहेत. ह्यांतला कोण कसा येऊन माझा खून पाडील हें सांगता यायचं नाहीं. तुम्हीं असं करा—मला तुरुंगांत ठेवा—"

"पण कांहीं कायदा म्हणून आहे ना?" कमिशनर म्हणाला, "गुन्हा केल्याशिवाय तुला तुरुंगांत कसा ठेवायचा? उगीच तुला तुरुंगांत ठेवलं, तर आम्हीच नाहीं का गुन्हेगार ठरणार?"

"तर मग द्या ती माझी जबानी इकडे!" भिकू एकदम चवताळून म्हणाला, "मी तुम्हाला कांहीं सांगितलं नाहीं—सांगितलं असलं तर तें खोटं आहे—तुमच्या डोळ्यांत धूळ टाकण्यासाठीं सांगितलं--द्या ती जबानी इकडे-" असं म्हणून तो कुमारच्या हातांतील कागद काढून घेण्याचा प्रयत्न करूं लागला. अर्थात ते कागद त्याला परत मिळाले नसते. भिकू जिवावर उदार झाला होता. झटापट होते आहे असं वाटतांच कमिशनरनं घंटा दिली तोंच भिकूनं कुमारला एक जोराचा ठोसा लगावला. तो आणखी चिडून कुमारच्या आंगावर जाणार तोंच पोलिसांनीं त्याला पकडलं.

पोलिसांनीं पकडतांच तो एकदम हंसत सुटला, तेव्हां कुठं कुमारच्या ध्यानीं आलं. सारा प्रकार इतका झटक्यासरशीं झाला, कीं भिकूनं कोणत्या उद्देशानं ही मारामारी केली तें त्याला पकडीपर्यंत कुमारच्या ध्यानीं आलं नाहीं.

आतां भिकूला तुरुंगांत ठेवणं सुलभ झालं होतं—भिकूचाही जीव आतां निर्धास्त झाला होता.

ज्या ठिकाणीं छापा घालयचा बेत मोहननं केला होता त्याची बातमी मिळाल्यामुळं पोलिसांनीं त्याला अचूक मुद्देमालानिशीं पकडलं. मोठमोठे धाडसाचे गुन्हे करून सहज पचवून जाणाऱ्या मोहनला एका अगदीं क्षुल्लक अशा गुन्ह्यापायीं पकडण्यांत आलं, हें खरोखरच दुर्दैव होय.

यश पचवणं मोठं कठीण असतं. वारंवार यश मिळाल्यानं माणसाच्या ठिकाणीं जी आत्मविश्वासाची एक प्रकारची फाजिल कल्पना निर्माण होते, तिच्या पायीं हिमालय फेकून देणारा माणूस शेवटीं मातीच्या ढेकळाखालीं चेंगरून मरतो. तसंच झालं. पकडला गेल्याबरोबर मोहनलाही दुःख झालें तें हेंच. तुरुंगांत पाऊल ठेवीत असतां तो म्हणाला, "शेवटीं मला पकडलंत तें या अशावेळीं ! दुर्दैवी आहांत झालं !"

केसची तयारी जोरांत सुरू झाली. कुमार या कामीं घरदार विसरून सक्त परिश्रम करीत होता. वर्तमानपत्रं पोलीस कमिशनरपेक्षां कुमारचीच स्तुती करीत होतीं. तें पाहून लतेला मोठा अभिमान वाटत होता. दुर्गाबाई देखील त्या अभिमानाची भागीदार होती. गुन्ह्याचा नायनाट करण्याची प्रतिज्ञा करून कुमारनं जो पेशा पत्करला त्याचं सार्थक झालं असं तिलाही वाटलं.

बिचाऱ्या सुंदरीची मात्र दैना उडाली होती. तिला कांहींच बोलतां येत नव्हतं. मोहनवर खटला सुरू होता. अशावेळीं आपला त्याचा कुठंही लागाबांधा आहे असं उक्त करणं तिला शक्य नव्हतं. दुर्गाबाई आणि लता या विषयाची चर्चा करूं लागलीं म्हणजे ती मुकाट्यानं ऐकत असे. तिची ही निरुत्साही वृत्ती पाहून एकदां लता म्हणाली, "तुम्हीं असं काय करतां सुंदराबाई ! आज सारी मुंबई खळबळून उठली आहे. सारं तोंड फाटेपर्यंत कुमारची स्तुती करताहेत आणि तुम्हीच कशा कांहीं बोलत नाहीं !"

" मी काय बोलणार ? " सुंदरी म्हणाली, " मी नुसती ऐकतें आहे. या बाबतींत मला कांहींच माहित नाहीं—त्यांतलं कांहीं गम्यही नाहीं मला. मग उगीच तुम्ही म्हणतां म्हणून मी कांहीं तरी बोलावं, असलं दिखाऊ बोलणं मला आवडत नाहीं म्हणून मी उगीच राहातें. "

त्या उत्तरानं लतेचं समाधान झालं नाहीं. तिला वाटत होतं, प्रत्येकानं कुमारची तारीफ करीत सुटलं पाहिजे. दुर्गाबाईसुद्धां प्रत्येक गोष्ट अगदीं सरळ नजरेनं पाही, फाजील उत्साहानं बोलत नसे, तें सुद्धां लतेला पटत नसे. लता अगदीं हुरळून गेली होती. कुमारच्या हातून कांहीं तरी अजब कृती घडली असं वाटून त्याच प्रकारें इतरांनींही आपले उद्गार प्रदर्शित करावे अशी अपेक्षा ती करीत होती.

पाद्रीबावालाही तिनं ही सारी हकीकत लिहून कळवली आणि कुमारचं अभिनंदन करण्यासाठीं मुद्दाम येण्याचं आमंत्रण दिलं.

भिकूची आणि मोहनची गांठ घालून दिल्याबद्दल सुंदरीला पश्चात्ताप होत होता. पूर्वीपासून त्याची वृत्ती तिला माहित होती. पण कृतघ्न होऊन तो असा उलटेल असं मात्र तिला वाटलं नव्हतं. रोज ती खटला ऐकण्यासाठीं कोर्टांत जाई. मोहनच्या विरुद्ध पुरावा देण्यासाठीं भिकू कोर्टांत उभा राहिला तेव्हां तिला मोठा धक्का बसला. प्रत्येक गोष्ट तो उघड करून सांगत होता. कृतघ्नतेची ही परमावधी पाहून सुंदरीचं अंतःकरण करपून गेलं.

खटला सेशनकमिट करण्यांत आला. खटला म्हणण्यापेक्षां 'खटले'च म्हणणं जास्त योग्य होईल. निरनिराळ्या गुन्ह्यांबद्दल निरनिराळे खटले भरण्यांत आले होते. त्यांतील कांहीं सेशन कमिट झाले होते आणि कांहींच्या बाबतींत निकाल तहकूब होते. केशवलालच्या खुनाच्या खटल्याला मुख्य महत्व देण्यांत आलं होतं.

या प्रकरणांत दुर्गाबाईची वृत्ती स्थितप्रज्ञाची होती. सुखदुःखाकडे ती सारख्याच दृष्टीनं पहात होती. यावेळीं कुमारची आणि तिची भेट क्वचितच

होई. तो आपल्या कामांत अगदीं गढून गेला होता. पुरावे गोळा करणं, साक्षदिार तयार करणं, पुराव्याचे धागेदोरे बरोबर जुळवून घेणं वगैरे कामांत तो इतका गढून गेला होता, कीं त्याला घरची आठवण सुद्धां राहात नव्हती. पोलिसांच्या येरझारा सारख्या सुरू होत्या. बरंचसं काम त्याच्या घरींच चालत असे. वातावरणांत झालेला हा बिघाड दुर्गाबाईला जाणवत होता पण ' दुर्जनाच्या संहारासाठीं ' या सर्व गोष्टी करणं अवश्य असल्यामुळं तें वातावरण आवडत नसलं तरीही ती मुकाट्यानं सहन करीत होती.

भिकूच्या कृतघ्नतेची जरी परमावधी झाली होती तरी त्यानं एक गुन्हा केला नाहीं. सुंदरीच्या नांवाचा संबंध या साऱ्या प्रकरणांत त्यानं कुठंच येऊं दिला नाहीं. सुंदरीला तेवढंच समाधान वाटत होतं.

या साऱ्या प्रकरणाचा पाढा एकदां दुर्गाबाईपुढं वाचावा असं सुंदरीच्या मनांत पुनः पुन्हा येई. पण ती आत्मसंयमन करीत असे. दुर्गाबाईच्या वृत्तीची तिला यथातथ्य कल्पना होती. या खटल्यांतील मुख्य रहस्य उघड करून जर तिनं सांगितलं असतं, तरीही दुर्गाबाईनं मुळींच माघार घेतली नसती. कर्तव्याची कठोरता ती किती काटेकोरपणानं आचरीत असे हें सुंदरीला पुरेपूर माहित होतं, म्हणून त्या रहस्याचा उल्लेख करून वातावरण न बिघडवण्यासाठीं सुंदरीनं आपल्या तोंडाला कुलुप घातलं.

---

## २४

सेशनांत ज्यावेळीं मोहनच्या खटल्याचं काम सुरू झालं त्यावेळीं सारी मुंबई खळबळून उठली होती. रोज कोर्टांत बेसुमार गर्दी होत असे.

कांहीं किरकोळ साक्षदिार झाल्यावर महत्वाची साक्षीदार या नात्यानं ज्या बाईच्या घरांत रामलालचा खून मोहननं केला होता त्या बाईची साक्ष सुरू झाली. वकील देण्याची मोहनची ऐपत नव्हती असं नाहीं. पण कुणाही वकिलाच्या हातीं आपली केस देण्याची त्याची इच्छा नव्हती. एकतर आपलीं रहस्यं, बचावासाठीं का होईना, दुसऱ्याला सांगण्याची त्याची तयारी

नव्हती. ज्या ज्या माणसांच्या साक्षी घ्यावयाच्या त्या त्या प्रत्येकाला वेगवेगळ्या रीतीनं कसं प्रश्नांच्या पकडींत धरलं पाहिजे, हें कोणत्याही वकिलाला सांगून कळलं नसतं अशी मोहनची खात्री होती. तो स्वतः वकील नव्हता खरा, इतकंच काय, पण तो सुशिक्षित या सदरांत सुद्धां मोडण्याजोगा नव्हता, तरीही त्याला कायद्याचं उत्तम ज्ञान होतं. ज्या प्रकारच्या उलाढाली तो करीत असे त्या उलाढाली करण्यासाठीं कायद्याच्या पकडींतून सुटून जाण्या-करितां सर्व प्रकारच्या कायद्यांची माहिती असणं अवश्य होतं म्हणूनच त्यानं कायद्याचा अभ्यास केला होता. कोर्टांत चालत असणारे खटले तो वारंवार पहात असे. अशा खटल्याच्या वेळीं कशा रीतीनं वागलं पाहिजे हें म्हणूनच त्याला चांगलं कळत होतं. बाळाराम स्ट्रीटवर त्याला भेटलेल्या बाईची पहिली जबानी ज्यावेळीं कुमारानं घेतली त्यावेळीं तिथं झालेल्या हकिकतीच्या नुसता निर्देश झाला होता.

मोहन ज्यावेळीं तिची उलट तपासणी करण्यासाठीं उभा राहिला त्यावेळीं पहिल्यानंच ती घाबरली. त्याच्या डोळ्याला डोळा देण्याची सुद्धां तिला छाती होईना. त्यांची प्रश्नोत्तरं झालीं तीं अशीं:—

“ बाळाराम स्ट्रीटच्या नाक्यावर तुझ्यावर कांहीं बदमाषांनीं हल्ला चढविला त्यावेळीं त्या हल्ल्यांतून तुला कुणी सोडवलं ? ”

“ तुम्हीं. ”

“ ठीक. त्यावेळीं तूं मला आपल्या घरीं बोलावलंस ? कां बोलावलंस ? ”

ती घाबरून कुमारकडे पाहूं लागली. कुमारला सूचना देणं शक्य नव्हतं. मोहन पुनः दरडावून विचारीत होता, “ बोल, कां मला आपल्या घरीं बोलावलंस ? ”

“ ओळख झाली म्हणून. माझा धंदा आहे तो. ”

“ ठीक—ठीक ! मी तुझ्या गळ्यांत कंठा घातला. त्यावेळीं तूं मला काय विचारलंस ? ”

प्रश्न भानगडीचा वाटला तर ‘ आठवत नाहीं ’ असं उत्तर द्यावं

असं तिला पढवण्यांत आलं होतं. त्याला अनुसरून ती म्हणाली, " आठवत नाहीं. "

" ठीक, ठीक. तूं धंदेवाली आहेस असं पहिल्या भेटींत मला सांगितलं नव्हतंस ? "

" आठवत नाहीं. "

" मी तुझ्या बरोबर बोलत असतां पडद्याआडून दोन इसम येतांना मला दिसले. होय ना ? " ती बोलत नाहीं असं पाहून मोहननं पुनः दरडावून विचारलं, " पिस्तुलवाले दिसल्यामुळं मी तिकडे वळलों, होय ना ?"

होय म्हणावं कीं नाहीं म्हणावं याची तिला पंचाईत पडली होती. या प्रश्नांत कांहींतरी खोंच आहे असं वाटून ती घाबरली आणि म्हणूनच होकारार्थी आणि नकारार्थी दोन्ही प्रकारें मान हालवून मोकळी झाली. मोहननं तिच्या आंगावर जाऊन विचारलं, " खरं सांग. दोघे पिस्तुलवाले आंतून आले. त्यांनीं माझ्यावर पिस्तुल रोखलं ? "

" होय. "

" केशवलालचा आणि तुझा संबंध होता ? "

नाहीं म्हणून उत्तर द्यावं असं तिच्या मनांत होतं पण तिच्या तोंडून नकळत होकार निघून गेला.

" मला फसवून तुझ्या घरीं नेतां यावं म्हणून मोटरमधल्या लोकांनीं बाळाराम स्ट्रीटवर तुला पकडायचं नुसतं ढोंग केलं होतं—केशवलालच्या सांगण्यावरून तो बनाव घडवून आणला होता. होय ना ? "

पुनः तिला पंचाइत पडली. पुनः तिनं कुमारकडे पाहिलं आणि पुनः होकार आणि नकार एकाच वेळीं देऊन ती मोकळी झाली.

" दोघे पिस्तुलवाले पडद्याआडून आले म्हणून स्वतःच्या बचावासाठीं मी त्यांच्यावर गोळी झाडली. होय ना ? "

तिनं घाबरून होकार दिला.

" मी गोळी झाडली नसती तर त्यांनीं मला गोळी घालून मारलं असतं. होय ना ? केशवलालनं असंच ठरवलं होतं. होय ना ? "

ती कावरीबावरी झाली. मोहननं आपल्याला उत्तरांत पकडलं असं तिला वाटूं लागलं. होय म्हणावं कीं नाहीं म्हणावं हें ठरवण्यापेक्षां एकदम रडत सुटावं हेंच बरं असा विचार करून–ती तितकी रडकुंडीला आलीच होती–कठड्यावर डोकं टेकून तिनं रडायला सुरवात केली.

" झाली माझी उलट तपासणी !" मोहन म्हणाला. कुमारकडे वळून साक्षीदाराकडं निर्देश करून तो म्हणाला, " हा तुमचा सरकारी साक्षीदार ! "

त्या बाईला सावरून घेण्यासाठीं कुमारनं फेरतपासणी करायला सुरवात केली. त्यानं विचारलं, " तुझा आणि केशवलालचा पूर्वी कांहींच संबंध नव्हता ? "

आणखी काय प्रश्न येतील या कल्पनेनं ती घाबरून गेली होती. आपल्याकडून भलतं उत्तर गेलं तर उगाच आपल्यावर शेकेल त्यापेक्षां खरं काय तें सांगून टाकावं असा विचार करून ती म्हणाली, " त्याचाच संबंध होता माझा. मी केशवलालची ' ही ' होतें. त्यानंच मला फसवलं. त्यानंच मला या घोटाळ्यांत घातलं. बरं झालं मेला तो !" असं म्हणून ती एकदम पिंजऱ्यांतून बाहेर निघून पळत सुटली. कुमारकडे पाहून मोहन आरोपीच्या पिंजऱ्यांतून हसूं लागला तेव्हां त्यालाही ओशाळल्यागत वाटल्या-वाचून राहिलं नाहीं.

सामान्य जनसमाजाचं धोरण असं असतं, कीं तें आरोपीचीच तरफदारी करूं लागतात. मोहनचा लौकिक फार मोठा होता. आपल्या गुन्ह्यावर पांघरूण घालण्यासाठीं तो मोठमोठया रकमा धर्मादाय करीत असे. त्यामुळं आज लोकांची त्याच्याबद्दल सहानुभूति होती. ही केस बनावट आहे, बिचाऱ्या सज्जन माणसाला संकटांत आणण्यासाठीं आकसानं हा खटला करण्यांत आला आहे, असं म्हणणारांची संख्या अगदींच थोडी नव्हती. स्वतःची केस तो स्वतः चालवीत असल्यामुळं आणि तशी केस चालवतांना सरकार तर्फेच्या साक्षीदारांची तो रेवडी उडवूं लागल्यामुळं लोकांची सहानुभूति त्याच्याकडे वळली होती.

त्या दिवशींचं कोर्टाचं काम संपवून कुमार जायला निघाला तेव्हां प्रेक्षकांनीं त्याची हुर्यो करायलाही कमी केलं नाहीं. त्याचं त्यालाच आश्चर्य वाटलं. मोहनच्या अत्याचार पासून ज्यांना सोडवानं म्हणून तो एवढं जिवाचं रान करीत होता, तेच लोक त्याची आतां थट्टा करीत होते! खटल्याचा निकाल होईपर्यंत आत्मसंयमन करण्याखेरीज त्याला गत्यंतर नव्हतं.

आणखीही असंच कांहीं साक्षीदार मोहननं उलट तपासणींत उधळून लावले. त्याच्या वाणींत जोर होता. त्याच्या दृष्टींत जहर होतं. नुसत्या दृष्टीच्या फेकीनं तो वाटेल त्याला भूल घालीत असे. या त्याच्या शक्तीच्या जोरावरच आजपर्यंत त्यानं एवढे अत्याचार केले होते. तो एकादा वकील किंवा बॅरिस्टर झाला असतां तर त्यानं सारीं कोर्टें गाजवलीं असतीं, असे उद्गार प्रत्येकाच्या तोंडातून निघत होते.

कुमारलाही तसंच वाटल्यावांचून राहिलं नाहीं. मोहनची असामान्य बुद्धिमत्ता पाहून तोही थक्क झाला होता. त्याला वाटलं हीच बुद्धिमत्ता त्यानं सत्कारणीं लावली असती तर! स्वतःच्या बुद्धिमत्तेबद्दल कुमारलाही मोठा अभिमान होता. पण मोहनपुढं आपण पदोपदीं दिपून जात आहोंत असें त्याला वाटल्यावाचून राहिलं नाहीं.

ही बुद्धिमत्ता आनुवंशिक होती याची कुमारला कल्पना नव्हती. सत्कार्यासाठीं बुद्धिमत्तेचा व्यय करणं जितकं कठीण जातं, तितकंच तें कुकार्याला सोपं जातं, याचा प्रत्यक्ष पुरावा हे दोन सहोदर सार्वजनिकरीत्या देत होते. मोहनला त्याची जाणीव होती; कुमार मात्र अंधारांत होता. आपला बाप आणि आई या दोघांमधली ही चढाओढ आहे, त्या चढा-ओढींत जय कुणाचा होतो, यावरच धर्म आणि अधर्म यांचा जयापजय ठरायचा आहे, हें मोहनच्या ध्यानीं होतं. कुमारबद्दल त्याच्या मनांत द्वेष नव्हता, तसंच प्रेमही नव्हतं. पण आईच्या विजयापेक्षां बापाची प्रतिष्ठा प्रस्थापित होण्यांत मोहनच्या अभिमानाची परिपूर्ति होणार होती. स्वतःचा

बचाव करण्यापेक्षां, म्हणूनच, कुमाराचा पाणउतारा करण्याकडे त्याचं लक्ष जास्त वेधलं होतं.

भिकूची साक्ष सुरू झाली त्या साक्षींत साऱ्याच हकिकती बाहेर आल्या. आतां मोहन पुढं काय करणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं होतं. भिकूच्या साक्षींत मोहनवरचे सर्व आरोप बेमालूमपणें शाबीत झाले होते. उलट तपासणी सुरू झाली तेव्हां मोहननं भिकूला पहिलाच प्रश्न केला, " मरणापूर्वी कांहीं दिवस केशवलालचं आणि तुझं वाकडं आलं होतं ? "

" नाहीं. " भिकूनं ठासून सांगितलं.

" अस्सं ! " मोहन हंसून म्हणाला, " पहिल्यापासून तूं केशवलाल-कडून वेळोवेळीं पैसे उकळीत होतास. अलिकडे कांही दिवस तो तुला पैसे देत नव्हता ? "

आपलं व्यंग उघड्या कोर्टांत बाहेर येत आहे हें पाहून भिकू म्हणाला, " खोटे आहेत हे आरोप ! "

" अस्सं ? " मोहन त्याच्या डोळ्याला डोळा देऊन म्हणाला, " मग तुझ्या बँकेत जी रक्कम आहे ती तुझ्या कापडाच्या दुकानावरच मिळाली आहे का ? "

" अर्थात् ! "

" मग तुझ्या दुकानाच्या सावकाराचं देणं कां थकलंय ? पैसे असून तूं त्यांना देत नाहींस ? दुकानाचे हिशोब पुढं मांडून दुकानांत फायदा होतो आहे असं सिद्ध करून दाखवशील का ? "

भिकू घाबरला, हिशेब कोर्टांत आले असते तर सारं बिंग बाहेर आलं असतं.

" सरळ उत्तर सांग." मोहननं दरडावून विचारलं, " तूं केशव--लालकडे पैसे मागितलेस आणि त्यानं पैसे देत नाहीं असं म्हटलं ? "

मोहन प्रत्येक प्रश्न करीत होता आणि भिकू घाबरून प्रत्येक प्रश्नाला होकार देत होता.

" तेव्हां त्याचं न् तुझं कडाक्याचं भांडण झालं ? "

" होय. "

" तो तुझ्या आंगावर धावून तुला मारायला आला. खून करीन म्हणून त्यानं तुला धमकी दिली ? "

खरोखरच तशी गोष्ट घडली होती आणि मोहनला ती भिकूकडूनच कळली होती. मोहनच्या नजरेच्या फेकीसमोर खोटं बोलण्याचं भिकूला धैर्य होईना. त्यानं होकार दिला तेव्हां मोहन म्हणाला, " मग तूं काय केलंस?— बोल, मग तूं काय केलंस ? " तडातड प्रश्न विचारीत मोहन भडिमार करीत होता. भिकूची सारखी हो—ना होत होती. मोहननं विचारलं, " पोलिसांत वर्दी देईन म्हणून त्याला तूं धमकी दिलीस ? "

" होय. "

" तेव्हां तूं काय केलंस ? "

" कांहीं नाहीं. मी पळालों. "

" नाहीं. तूं पळाला नाहींस. तूं उलट त्याच्या आंगावर धावून गेलास, त्यानं तुला ठोसा मारून खालीं पाडलं. खालीं पाडल्यावर त्यानं तुला मार दिला. होय ना ? लाथानीं तुडवलं. होय ना ?"

झालेली हकिकत खरी असल्यामुळं घाबरून भिकू होकार देत सुटला.

" याचा सूड घेईन असं म्हणालास ? "

" नाहीं—नाहीं. "

" नाहीं कसं ? अगदीं साहाजीक होतं ते ! मी सुद्धां असंच म्हटलं असतं. कुणाच्या लाथा कोण सहन करील ? संतापाच्या भरांत तूं तसं बोलून गेलास— सूड घेईन म्हटलंस. होय ना ?

" होय. "

" सांग आतां—मग तूं काय केलंस ? " मोहनच्या या प्रश्नानं भिकू थरथर कापूं लागला. त्यावेळीं मोहन म्हणाला, " तूं माझ्याकडे आलास ना ? केशवलालचा खून करायला तूंच मला सांगितलंस ना ? " वस्तुस्थिति तशी नव्हती पण भिकूच्या तोंडून होकार निघून गेला. तेव्हां मोहननं विचारलं,

" मग मी काय सांगितलं तुला ? बोल. मी काय सांगितलं तुला ? "

" काय सांगितलं तुम्हीं ? "

" असल्या कीडमुंग्यांना मी खिजगणतींत धरीत नाहीं असं सांगितलं ना मी ? मग तूं काय केलंस ? काय म्हटलंस मला ? ' बरं—बरं मीच काय तें पाहून घेईन ! ' असं तूं म्हणालास कीं नाहीं ? "

भिकू घाबरून गेला होता. मोहन अशा प्रकारें बोलत होता, कीं ती गोष्ट खरीच झाली असावी असं भिकूला वाटूं लागलं. मोहनचा भडिमार सुरू होता, " तूं मारेकरी घातलेस केशवलालवर ! तूंच त्याला शरणगांवाकडे घेऊन गेलास ! तूंच त्याला रस्त्यावर अडवलंस—होय ना ? मारेकरी आले आणि त्यांनीं त्याला कड्याखालीं लोटून दिलं ? होय ना ? "

भिकूची बोबडी वळली होती. तो घाबरून नुसता पहात राहिला होता.

मोहनचे प्रश्न सुरू होते. " बोल. त्याला कड्याखालीं लोटून दिलं तें तुझ्याच माणसांनीं ना ? "

भिकू चटकन 'होय' म्हणून गेला पण सावध होऊन मोठ्यानं ओरडून म्हणाला, " नाहीं—नाहीं, हें सारं बनावट आहे. मी त्या बाजूला सुद्धां गेलों नव्हतों. "

" तूं शरण गांवाहून परत येतांना केशवलालबरोबर नव्हतास ? "

" नाहीं. "

" तूं एकटाच मुंबईला जायला निघालास ? "

" होय "

" मग मी केशवलालला गोळी घातली हें तूं केव्हां पाहिलंस ? " भिकू स्तंभित झाला असं पाहून त्यानं विचारलं, " मी केशवलालला गोळी घातली हें तूं पाहिलं असतंस तर मी तुला जिवंत जाऊं दिलं असतं का ? "

भिकूच्या तोंडून एक शब्द सुद्धां निघेना असं पाहून मोहननं आपली उलट तपासणी संपवली आणि कोर्टाकडे वळून म्हटलं, " साक्षीदारानं

आपला प्रत्येक शब्द आपणच बदलला आहे. कोर्टानं हें ध्यानीं घ्यावं."
कुमारकडे वळून तो पुन: म्हणाला, "हाही तुमचा सरकारी साक्षीदार—माफीचा साक्षीदार!"

कोर्टाचं काम त्या दिवसापुरतं संपलं. दुसऱ्या दिवशीं जो पुरावा आला होता तो फारसा महत्वाचा नव्हता. भिकूच्या उलट तपासणीनंतर फेरतपासणी घेण्याचा कुमारनं प्रयत्न केला नाहीं. त्याला भिकूचा संशय आला होता.

त्याला स्वत:चाही संशय आला होता. निरपराधी माणसाला तर आपण आपण गुन्हेगार ठरवीत नाहीं ना? पुरावे बेमालूम होते. पण ते सर्व पुरावे मोहन आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर हाणून पाडीत होता. कुमारला वाटलं, असली असामान्य बुद्धिमत्ता असल्याखेरीच का एवढा काळ एवढे अत्याचार करून निसटून जातां येतं? 'शठाचें शाठ्य मी!' असं गीतेंत भगवंतांनीं सांगितलेलं वाक्य त्याला आठवलं. हें दैवी शाठ्य काय? दुर्जनतेंत जें असामान्यत्व असतं तें दैवी मायेचं लक्षण काय?

कुमार बावरून गेला. काय करावं हें त्याला सुचेना.

---

## २५

स्वत:च्या बचावाचं भाषण करण्यासाठीं मोहन उभा राहिला त्यावेळीं सरकारतर्फे आलेले पुरावे कसे खोडून काढले याचा तपशील देऊन तो म्हणाला, "प्रत्येक साक्षीदार बनावट आहे. उलट तपाणीच्या वेळीं प्रत्येक साक्षीदारानं हा बनावटपणा सिद्ध करून दिला आहे. केशवलालला धमकी भिकूनंच दिली, हें त्याच्या उलट तपासणींत सिद्ध झालं आहे. खाजगी सूड उगवण्यासाठीं मारेकरी घालून भिकूनंच केशवलालला मारलं आणि तो गुन्हा माझ्यावर शाबीत करण्याकरतां त्यानं पोलीसांत वर्दी दिली. खोटे पुरावे तयार करण्याचा हा सारा बोजा भिकूवर आहे. त्यानं स्वत:च्या बचावा-

साठीं पोलिसांची दिशाभूल करून मला फासावर चढवण्याचा घाट घातला. ज्यावेळीं केशवलालचा खून झाला त्यावेळीं मी तिथं हजर असणं शक्यच नव्हतं. त्यावेळीं मीं तिथून कितीतरी मैल दूर होतों—"

मनाचा तोल सुटून कुमारनं मधेंच तोंड घातलं. त्यानं विचारलं, " मग ॲलिबी कां नाहीं शाबित करीत ? "

मोहन म्हणाला, " मी त्यावेळीं माझ्या आईला भेटायला गेलों होतों. "

" मग तिला कां नाहीं आणली साक्षीदार म्हणून ? "

" आणली असती—" मोहन म्हणाला, " पण तिच्या मनाकडे मला पाहिलं पाहिजे–तिच्या दर्जाकडे पाहिलं पाहिजे. साऱ्या हिंदुस्थानांत तिचं नांव मोठं आहे. असल्या खटल्याशीं तिचा संबंध येऊं नये हेंच बरं. "

" ही सारी चलाखी आहे. "

" सांगूं तिचं नांव ? ऐकायची तयारी आहे ? "

" हो हो. ऐकायची तयारी कशाला ? "

" ऐक तर," मोहन म्हणाला, " तिचं नांव "—कुमारच्या डोळ्याला डोळा देऊन अत्यंत गंभीरपणाचा अभिनिवेश आणून तो म्हणाला, " तिचं नांव दुर्गाबाई—शरणगांवची दुर्गाबाई."

" खोटं, साफ खोटं !" कुमार ओरडला.

" तिलाच विचार," मोहन म्हणाला, " ती खोटं बोलणार नाहीं. तिला कोर्टात बोलाव." पुनः कुमारकडे रोखून पाहून तो म्हणाला, "बोलावूं तिला कोर्टांत ? "

कुमार अस्वस्थ झाला त्याला प्रश्न पडला—ती आई ? मोहनची आई ! नांवासारखं नांव असतं म्हणून त्याला पूर्वी ही कल्पना आली नव्हती. मोहन या नांवाचा आपला एक भाऊ आपल्या जन्मापूर्वींच परांगदा झाला होता हें त्याला माहीत होतं. तोच हा मोहन ? तोच हा आपला भाऊ ? त्याचं मस्तक भिरभिरूं लागलं. सर्वांगाला कंप सुटला. तो निढावलेला

वकील नव्हता—त्याच्या भावनेवर आघात झाला. तो आघात सहन करण्याचं सामर्थ्य त्याच्या आंगीं नव्हतं. एकदम मूर्च्छा येऊन तो खुर्चीत पडला.

जिकडे तिकडे धांवाधांव सुरू झाली. कोर्टाचं काम त्या दिवसापुरतं तहकूब ठेवण्यांत आल. तेवढ्या प्रसंगापुरता तरी मोहनचा जय झाला होता. आधींच सामान्य जनतेची त्याच्याबद्दल सहानुभुति होती. आतां तर त्यानं जो हा कळस केला तो पाहून सर्वांनाच त्याच्याबद्दल कौतुक वाटूं लागलं. वीजयी वीराच्या मुद्रेनं मोहन पुनः त्या दिवसापुरता तुरुंगांत गेला.

खटल्याची हकीकत वाचण्यासाठीं सारी मुंबई जरी तुटून पडत असे तरी दुर्गाबाईनं या प्रकरणां मुळींच लक्ष घातलं नव्हतं. कुमार एक मोठा खटला चालवतो आहे, त्यांत त्याची कसोटी लागते आहे, हें तिच्या कानीं येत होतं. कुमारच्या लौकिकांमुळं तिला अभिमान उत्पन्न झाला होता. त्या अभिमानाच्या समाधानांत ती आनंदाच्या शिखरावर बसली होती. आयुष्यांत अनुभवलेल्या साऱ्या दुःखक्लेशांचं परिमार्जन झालं असं तिला वाटत होतं. ईश्वराला ती धन्यवाद देत होती. ईश्वराच्या घरीं न्याय आहे—तो न्याय मिळायला कदाचित उशीर लागत असेल—पण केव्हां ना केव्हां तरी तो न्याय मिळतोच—तसा तो मिळतो म्हणूनच आज कुमार एवढ्या पदवीला चढला, असं तिला वाटत होतं.

नित्याप्रमाणें देव्हाऱ्याजवळ बसून नित्यपूजा उरकल्यावर ती देवाला धन्यवाद देत होती.—तोंच कुमार आला. त्याची मुद्रा पाहून तिला चमत्कारिक वाटलं. त्याचा चेहरा अगदीं उतरून गेला होता. कांहींतरी भयंकर संकट कोसळावं आणि धीराचा माणूस सुद्धां त्या खालीं चुरडून जावा, अशा परिस्थितींत ज्या प्रकारची विषण्णतेची छाया माणसाच्या चेहऱ्यावर ओसंडते. तसा त्याचा चेहरा झालेला पाहून ती म्हणाली, " काय झालं कुमार ! "

कुमारच्या तोंडून शब्द निघणं सुद्धां कठीण जात होतं. मनाचा घडा

करून तो एकेक शब्द मोठ्या कष्टानं उच्चारीत होता. तो म्हणाला, " एक गोष्ट सांगायचीय—तशीच एक विचारायचीय. "

" विचार. " दुर्गाबाई म्हणाली. त्यावेळीं तिच्या काळजानं ठाव सोडला होता.

कुमार म्हणाला, " तुला माहीत आहे, मी आज चार दिवस एक महत्वाचा खटला चालवतोंय ? गेले सहा महिने ज्या गुन्हेगाराला पकडण्यासाठीं अम्हीं आकाशपाताळ एक केलं अन् मोठ्या प्रयासानं ज्याला शेवटीं पकडला, त्याचा हा खटला आहे.—" एक क्षणभर थांबून तो म्हणाला, " हा गुन्हेगार कोण आहे, तुला माहीत आहे आई ? " तिनं मानेनंच नकार दर्शविल्यावरून तो म्हणाला, " ऐक तर—दगडाचं काळीज करून ऐक. तो गुन्हेगार— ऐकलंस आई ? तो गुन्हेगार— मोहन आहे— तुझा मुलगा— माझा भाऊ— "

दुर्गाबाई स्तंभित झाली. ती आपल्याशींच पुटपुटली, " मोहन ! माझा मोहन ! माझा पहिला कुसवा ! "

" हो ! " कुमार म्हणाला, " म्हणूनच विचारायला आलों. सारा पुरावा झाला आहे. नुसतं आर्ग्युमेंट व्हायचं राहिलं आहे. त्याला जगवणं किंवा मारणं माझ्या हातीं आहे—म्हणूनच म्हणतों, सांग, मी काय करूं ? "

हा वेळपर्यंत दुर्गाबाई सावध झाली होती. क्षणभर सुटलेला मनावरचा ताबा आतां तिच्या आटोक्यांत आला होता. ती गंभीरपणानें म्हणाली, " तुला काय वाटतं ? "

" मला ? " कुमार तितकाच गंभीर होऊन म्हणाला, " तो गुन्हेगार आहे असं मला वाटतं. त्यानं अत्याचार केले आहेत, माणसांना लुबाडलं आहे, माणसांचे जीव घेतले आहेत, दुर्जन ठरायला जेवढं कांहीं केलं पाहिजे तेवढं त्यानं केलं आहे. त्याला फासावर लटकावणं हें माझं कर्तव्य आहे. पण रक्ताची माया— "

" तुला आड येते ? " दुर्गाबाईनं विचारलं, " असंच ना ? तुझ्या हृदयांत कुरुक्षेत्र जागं झालं आहे—तें रणांगण तुला दिसूं लागलं आहे ? नाहीं ? मग भगवंताचा उपदेश देखील तुला कसा ऐकूं येत नाहीं तिथला ? तें रणांगण सुरू झालं म्हणूनच ना भगवंतांनीं अर्जुनाला उपदेश केला ?—म्हणूनच ना गीता सांगितली गेली ? अठरा वर्षं ती गीता मी तुला पढवीत आलें—दोन वर्षं विलायतेला जाऊन तूं ती विसरलास ?—"

" नाहीं आई," कुमार म्हणाला, " विसरलों नाहीं. नुसता विचारायला आलोंय. मी काय करूं ? भावाचा मारेकरी होऊं ? भावाला फासावर चढवूं ?–" क्षणभर तो उगीच राहिला. दुर्गाबाई कांहीं उत्तर देत नाहीं असं पाहून त्यानं पुनः विचारलं, " सांग ना आई, काय करूं मी ? "

दुर्गाबाईच्या चेहऱ्यावर यावेळीं दैवी तेज झळकत होतं. सांसारिक भावनांची सीमा ओलांडून ती दैवी भावनेशीं समरस झाली होती. माणसांतला देव जागा झाला होता—ती आतां मानवी राहिली नव्हती. कुमारकडे एवढीसुद्धां दृष्टी न देतां ती म्हणाली, " काय करूं, काय करूं, म्हणून कुणाला विचारतोस ? तुझ्या हृदयस्थ भगवंताला विचार—तुझा धर्म तुला काय सांगतो ? काय सांगितलं देवानं अर्जुनाला ? आई, बाप, भाऊ बहीण, सगेसोयरे—नात्याचे सारे धागे तोडून आपलं कर्तव्य बजाव, असंच ना वासुदेवानं अर्जुनाला सांगितलं ? कुमार, तुझा धर्म तुला आज्ञा करतोय–"

" आई ! " कुमार घाबरून ओरडला.

" हो–हो !" दृढ निश्चयाच्या वाणीनं दुर्गाबाई म्हणाली, " तुझा धर्म तुला आज्ञा करून गेला आहे. विचार करायची ही वेळ नव्हे. कर्म आणि अकर्माचा भार कशाला आपल्या माथीं घेतोस ? त्याला शिक्षा व्हायचीच. देव शिक्षा देऊन चुकलाय त्याला. तूं नुसता निमित्तमात्र हो. धर्माच्या मार्गावर तूं उभा आहेस, त्या मार्गावरून एवढा सुद्धां चळूं नकोस. समजलास ? त्याचं मरण तेंच हजारांचं जीवन—हजारांचं सुख—तीच लाखांची

शांति—तोच कोटिशः जीवांचा उद्धार. जा. परित्राणाय साधूनाम् विनाशायच दुष्कृताम् धर्मसंस्थापनार्थाय ईश्वर रोज अवतार घेतोय. तोच तूं—ईश्वराचा प्रतिनिधी म्हणून ईश्वराचं कार्य कर—जा. ”

ती निःस्तब्ध राहिली होती. कुमाराचं अंतःकरण तिच्या त्या उद्गारांनीं थरारून निघालं. त्याच्या हृदयात नव्या शक्तीचा संचार झाला. नष्टो मोहः स्मृतिर्लब्ध्वा म्हणून तो आपल्या कार्याला अग्रेसर झाला.

कितीतरी वेळ ती तशीच राहिली होती. भानावर आल्यावर तिला दिसून आलं, की कुमार निघून गेला होता. तो गेला असं पहातांच तिच्या हृदयानं ठाव सोडला. तिला वाटलं, “ काय केलं हें ? ही जागृति का ? जागृतीत जीवहत्या असते का ? कीं ही जागृतीची निद्रा ?—या निद्रेंत—या तंद्रेंत कुमार आपल्या भावाचा खून पाडणार का ? काय होणार ? खून कीं शासन ?—” देवाच्या मूर्तीसमोर गाऊन ती काकुळतवाणीनं म्हणाली, “ काय केलंस हे देवा ? जन्मभर तुझी सेवा केली त्याचं हेंच का बक्षीस ? माझ्या पोटच्या गोळ्याचा हाच का शेवट ? गीतेच्या शिकवणीचा हाच का परिणाम ?—माझ्या एका हातानं माझा दुसरा हात तोडून काढावा ! भावानं भावाचा मारेकरी व्हावं !—” तिच्या अंतःकरणांत भयंकर खळबळ माजली होती. ती तशीच देवाशीं बोलत होती, “ परित्राणाय साधूनाम् माझा मुलगा माझ्याच मुलाला मारतोय ! विनाशायच दुष्कृताम् एक भाऊ आपल्या भावाचा जीव घेतोय ! धर्मसंस्थापनार्थाय एक आई आपल्या पोटच्या गोळ्याचा खून करायला आपल्या पोटच्या दुसऱ्या गोळ्याला पाठवतेय ! काय केलंस हें देवा—काय केलंस ? नाहीं—नाहीं, कसं मी हें सहन करूं ? ”

उद्वेगाच्या वेळीं मनाला शांति आणण्याचं एकच साधन तिच्या हातीं होतं. ती चरखा घेऊन बसली. जोरजोरानं ती सूत काढीत होती. चारी दिशांतून तिला गीतेचा श्लोक ऐकूं येत होता—

सर्व धर्मान्परित्यज्य मामेकं शरणंव्रज ।

अहं त्वा सर्व पापेभ्यो मोक्षइष्यामि मा शुचः ॥

त्या श्लोकाच्या दुंदुभीनादानं तिचं सर्वांग हादरून गेलं. नसानसांतून तें भगवद्वाक्य तिला जागवीत होतं. त्या मनःस्थितींत तो अदृश्य ध्वनी सुद्धां तिला दुःसह झाला—धावत जाऊन तिनं दार बंद केलं.

बाहेरचं दार बंद केलं.—पण हृदयाचं दार खुलं होतं.—त्या खुल्या दारांत गीताकार प्रत्यक्ष उभा राहिल्याची तिला जाणीव होती. तोंच तिच्या कानीं शब्द आले, " दार उघड आई, दार उघड. मला आंत घे आई. मी काय म्हणतें तें ऐक एकदां. मी सुंदरी आहें आई. "

" सुंदरी ! " दुर्गाबाई उद्गारली.

" होय आई," सुंदरी दाराबाहेरून म्हणाली, " एक शब्द तरी ऐकून घे. आशेचं दार माझ्या डोळ्यांसमोर असं बंद करूं नकोस. एक क्षण—एक क्षणभरच मला आंत येऊं दे. "

" जा सुंदरी. " भडकलेलं मन आवरीत दुर्गाबाई म्हणाली, " आलीस तशी निघून जा. कशाला माझ्या जिवाला या यातना देतेस ? सारा जन्म मी जगायचा प्रयत्न केला— हा संसारसागर पार व्हायचा प्रयत्न केला—नुकताच कुठं किनारा दिसत होता—नाहीं, किनारा लागला, त्या किनाऱ्याच्या काठावर माझी नाव अशी बुडवूं नकोस. "

" मी तुमची नाव बुडवीत नाहीं आई," सुंदरी काकुळतीला येऊन म्हणाली, " पण माझ्या जिवाची नाव कशी तरेल तें मी पहातेंय. समाजानं टाकलेली, जन्मांतून उठलेली, देवानं दिलेलं शरीर नि मन बाजारांत विकून बसलेली— तरी पण मी एक स्त्री आहें. जळून पिचून राखरांगोळी झालेलं असलं, तरी हें काळीज स्त्रीचं आहे आई ! "

" तें मला कळतंय सुंदरी—सारं कांहीं कळतंय. तूं नुसती स्त्री आहेस पण मी स्त्री आहें नि आईही आहें. दोन दोन डोळ्यांनीं मला पहावं लागतं. दोनदोन हृदयांनीं मला रडावं लागतं—पण माझा धर्म !—"

" तुमचा धर्म ? " आंतून येत असलेली लता म्हणाली, " दुसऱ्याच्या भोळ्या जिवाला आग लावणं हाच ना तुमचा धर्म ? भिक्षा मागणाराच्या झोळींत राख टाकणं हीच ना तुमची नीति ? "

दोन्ही माऱ्यांत बिचारी दुर्गाबाई सांपडली होती. लतेला आतां सारी हकिकत कळली होती. आपल्या भावाला फाशी चढवायला कुमार जाणार, या गोष्टीपेक्षां सुंदरीचा वल्लभ कुमारच्या हातून मरणार, हीच कल्पना तिला जास्त दुःसह झाली होती. सुंदरी आपली बहीण आहे हें तिला माहीत नव्हतं. एका प्रेमी जीवाची कुचंबणा होत आहे एवढंच तिला दिसत होतं. आपल्याच एका जातीच्या—स्त्रीजातीच्या जीवाच्या कळवळ्यानं—भूतदयेनं प्रेरित होऊन लता म्हणाली, " आई आहांत ना तुम्ही ? तुमच्या शब्दांत सामर्थ्य आहे. तुमच्या एका शब्दासरशीं तुमचा मुलगा आणि हिचा प्रियकर—तुमच्या मुलाचा सहोदर जगणार आहे—"

" वेडी आहेस पोरी ! " दुर्गाबाई उद्गारली, " ती पापाची पडछाया जगांत जगली काय आणि मेली काय दोन्हीं सारखींच. माझ्या पुत्राला जगवण्यासाठीं—हिच्या प्रियकराचा बचाव करण्यासाठीं—सहोदराच्या मायेनं मनाची फसवणूक करून त्याला अनीतीचा मार्ग का मोकळा करून देऊं ? एक तर गेलाच आहे पापाच्या खाईत, आतां दुसऱ्यालाही काय तिथंच लोटूं ? दुसऱ्याच्याही अधःपाताचं पाप मी शिरावर घेऊं ? "

लतां चिरडीला येऊन म्हणाली, " तर मग कुमारला राजीनामा द्यायला सांगा. सोडून दे म्हणावं हा खटला. धर्म राखला जाईल आणि भाऊही बचावेल. "

" भ्रम आहे पोरी—" दुर्गाबाई म्हणाली, " खोटी आशा आहे ही. काय होणार त्यांत ? त्यानं खटला सोडला तर दुसरा कुणी नाहीं का उभा राहाणार ? त्याला शिक्षा ही होणारच. त्यासाठीं दुसरा कुणीतरी येऊन खटला चालवील. काय साधेल राजीनामा दिल्यानं ? धर्म जाईल नि अब्रूही जाईल. कठोर कर्तव्य बजावण्यांत माझा कुमार मेरू पर्वतासारखा अढळ उभा राहिला पाहिजे ! नांव गाजलं पाहिजे माझ्या कुमाराचं—"

" आणि मोहन ? " तें भाषण ऐकत हा वेळपर्यंत बाहेर स्वस्थ राहिलेली सुंदरी म्हणाली, " तुमचा कुमार अढळ उभा राहिल पण मोहन रसातळाला जाईल त्याची काय वाट ? कुमारचं नांव गाजलं पाहिजे तुम्हाला, अन् मोहन मेला तर तुम्हांला कांहीं वाटू नये अं ? हाच का तुमचा धर्म ? हीच का तुमची नीति ? हीच का तुमची गीता ? "

" होय सुंदरी," दुर्गाबाई म्हणाली, " माझा नव्हे, हाच आपणा सर्वांचा धर्म. हीच आपणा सर्वांची नीति–नि हीच आपणा सर्वांची गीता– गीता कळेल त्याला दुःख व्हायचं नाहीं अन् गीता आचरील त्याचा कधीं नाश व्हायचा नाहीं. समजलीस सुंदरी ? जा आतां–अन् लते, तूंही जा. एक क्षणभर मला अगदीं स्वस्थ बसूं दे ! "

दोघींचाही नाइलाज झाला. दोघीही निघून गेल्या. दुर्गाबाईची ती निश्चल वृत्ती पाहून स्वस्थ राहाण्याखेरीज आतां दुसरा उपाय नाहीं असंच त्या दोघींना वाटलं.

दोन बहिणी—पण एकीला दुसरीची ओळख नव्हती. दोन भाऊ—पण एकाला दुसऱ्याची ओळख आजवर नव्हती—आतां झाली. सुंदरीला वाटलं, भावाची ओळख झाल्याचा परिणाम काय झाला ? जीव घ्यायलाच उठला ना तो त्याचा ? मग मी तरी लतेला ओळख कां देऊं ? या अज्ञानांतच आजवर समाधान मानलं—तसंच चालूं दे ! तशीच ती सुखांत राहूं दे—मग पुढं काय व्हायचं असेल तें होईल.

———

## २६

कुमारनं मोहनच्या खटल्यांतील शेवटच्या भाषणाला सुरवात केली. पहिल्यापासून सगळ्या खटल्यांचा आढावा घेऊन त्यानं कोणकोणते आरोप कसकशा प्रकारें शाबीत होत होते याचं तपशीलवार वर्णन केलं. नुसत्या दमबाजीवर साक्षीदारांना घाबरवायचा मोहननं प्रयत्न कसा केला आणि विशिष्ट प्रकारच्या त्यांच्या पर्सनॅलिटीमुळं त्यांत त्याला कसं यश आलं, हेंही त्यानं सांगितलं. असं झालं असलं तरी साक्षीदारांनीं ज्या पहिल्या जबान्या दिलेल्या आहेत त्याच ग्राह्य कां धराव्या याची त्यानं साधार आणि सप्रमाण छाननी केली.

अगदीं शेवटीं तो म्हणाला, "आज भाऊ भावाचा मारेकरी होतो आहे. इतर पुरावा आपण पाहिला त्यावरून आपण जो कांहीं निष्कर्ष काढायचा आहे तो काढालच. पण त्यापेक्षां एक मोठा पुरावा मला आपणासमोर मांडायचा आहे. आरोपीच्या बचावाच्या भाषणावरून कालच मला कळून आलं, कीं त्याची आई तीच माझी आई. त्याचं माझं वैर नाहीं. लहानपणींच आम्ही एकमेकांना पारखे झालों. कालच मला कळलं, आरोपी माझा वडील भाऊ. कित्येक वर्षे परागंदा झालेल्या या बंधूच्या दर्शनानं माझ्या हृदयाला पाझर फुटला असेल असं नाहीं का तुम्हाला वाटत ? सकृद्दर्शनी पुराव्याच्या बाबतींत जी गफलत झाली आहे ती आपण ध्यानीं घेऊं नका. माझं हें नातं सुद्धां आपण हिशेबांत धरूं नका. हें नातं असतांना सुद्धां मी म्हणतों आहे, कीं साऱ्या मुंबईत सर्व प्रकारचे गुन्हे करणारा हा आरोपी फासावर लटकलाच पाहिजे—" ज्यूरी, जज्ज आणि प्रेक्षक सर्वच आश्चर्यचकित झाले होते. कुमार आतां कोणता नवा मुद्दा उपस्थित करणार याकडे सर्वांचं लक्ष लागून राहिलं होतं. कुमार पुढं म्हणाला, "आरोपी माझा भाऊ असूनसुद्धां मी असं कां म्हणतों ! न्यायाच्या दरबारांत नात्याचा प्रश्न नाहीं— मायेची चाड नाहीं— हा सज्जनांच्या संरक्षणाचा प्रश्न आहे.

आंधळी न्यायदेवता आपला-परका पाहात नाहीं हें आपण विसरूं नका. पापाचा संहार करण्यासाठीं, सज्जनांचं संरक्षण करण्यासाठीं भावाबंदांचं नातं सुद्धां पाहूं नकोस, असं भगवान श्रीकृष्णांनीं भारती युद्धाच्या वेळीं अर्जुनाला सांगितलं. तें वाक्य म्हणजेच आमच्या हिंदी संस्कृतीचा पाया! हजारों वर्षांचा इतिहास या भगवद्गीतेंतील तत्वज्ञानावर आधारला गेला आहे. विनाशायच दुष्कृताम् ज्या अर्जुनानं आपल्या भावाबंदांचा निःपात केला त्याच अर्जुनाचा एक वंशज म्हणून मी सांगतों-त्या गीताकाराचा एक प्रतिनिधी म्हणून मी तुमची विनवणी करतों, कीं या जगांतलं पापाचं बीज नाहींसं व्हावं म्हणून या आरोपीला तुम्हीं दोषीच ठरवलं पाहिजे. एवढा अत्याचारी माणूस जगांत वावरूं देणं म्हणजे जाणून बुजून सर्वसाधारण जनसमाजाच्या सुरक्षिततेला सुरुंग लावण्यासारखं आहे. यापेक्षां जास्त कांहीं मला सांगायचं नाहीं." असं म्हणून कुमार खालीं बसला. ज्यूरींतील विधर्मी सभासद सुद्धां माना डोलवीत होते.

ज्यूरी विचारासाठीं आंत निघून गेली. सर्वांचं लक्ष निकालाकडे लागलं होतं. कायद्याच्या कक्षेंत न येणाऱ्या पण भावनेच्या दृष्टीनं परिणामकारक झालेल्या कुमारच्या या भाषणाचा परिणाम ज्यूरीवर झाल्यावांचून राहाणार नाहीं असंच सर्वांना वाटत होतं.

आणि झालंही तसंच. ज्यूरीनं मोहनला एकमतानं दोषी ठरवलं. न्यायाधीश त्याला आतां शिक्षा सांगणार होता पण त्यापूर्वी बोलण्याची परवानगी घेऊन मोहन म्हणाला, " ज्यूरीनं मला दोषी ठरवलं आहे. आतां बोलायचं कांहीं राहिलेलं नाहीं. न्यायाच्या दरबारात मला उभं केलं पण इथं अन्याय होतोय. न्यायाच्या कोर्टाला—नगरसंरक्षक पोलीस खात्याला जें करतां येत नव्हतं तें काम मी करीत होतों. दुर्जनांना शिक्षा देत होतों. खोटा बनाव घडवून आणून माझ्या बापाला फाशावर चढवायला जो कारणीभूत झाला त्याचा सूड मी उगवला तर तो काय अन्याय झाला? मी कुणाची भीति

बाळगली नाहीं—माणसाची नाहीं, पोलिसांची नाहीं, दुर्जनाची नाहीं–देवाची सुद्धां भीति मी बाळगळी नाहीं. आणि आतां मला फासावर चढवण्यासाठीं प्रत्यक्ष माझ्या भावानं देवाचं नांव घेतलं–कृष्णाचं नांव घेतलं—अर्जुनाचं नांव घेतलं ! ज्या पुराव्याच्या मीं चिंधडया करून टाकल्या त्या चिंधडया सांधून घेण्यासाठीं त्यानं गीतेचं तत्वज्ञान सांगितलं. आणि तेवढया आधारावर तुम्ही मला दोषी ठरवतां ? हा सज्जनपणा झाला का ? हा माझा भाऊ—विलायतेला जाऊन बॅरिस्टर झाला तो माझ्या पैशावर—" ते शब्द ऐकून कुमारला एकदम धक्का बसला. मोहन पुढं बोलत होता, "एका अज्ञात व्यक्तीनं ते माझे पैसे त्याच्या विलायतच्या खर्चासाठीं दिले होते. त्या माझ्या पैशावर मिळवलेली अक्कल त्यानं माझा गळा कापण्यासाठीं खर्चीं घातली. हा सज्जनपणा झाला का ?—" कुमारला प्रश्न पडला. ही खरीच हकिकत आहे, कीं मोहनची नुसती दमबाजी आहे ?—मोहन पुढं बोलत होता, "आणि हा कृतघ्न माणूस 'मला' पापी म्हणतो. या जगांतलं माझं कर्तव्य संपलं आहे असं आतां मला वाटत आहे. सारे पुरावे मी उधळून लावले असले तरी मी आतां सांगतों, हो !—मी कबूल करतों, हे सारे गुन्हे मी केले—पण मी हेंही सांगून ठेवतों कीं तुम्हीं शिक्षा दिलीत तरी मी फासावर चढणार नाहीं. तुरुंग फोडून—"जज्जानं त्याला तिथंच दाबलं आणि शिक्षा सांगितली.

भर कोर्टात सांगितलेलं भाषण मोहननं खरं करून दाखवलं. मोठया कौशल्यानं तुरुंग फोडून तो बाहेर निघाला, तोंच अधिकाऱ्याच्या तें ध्यानीं आलं. पाठलाग सुरू झाला. जिवावर उदार होऊन तो तुरुंगाच्या भिंतीवरून उडी टाकून बाहेर आला. रस्त्यावर उभ्या असलेल्या एका मोटारीचा ताबा घेऊन त्यानं मोठया वेगानं ती मोटार हांकली. पोलीस मागं लागले होते. गाडी भर वस्तींतून जात असल्यामुळं पोलिसना त्याच्यावर गोळया झाडतां येईनात. जो रस्ता मोकळा सांपडे त्या रस्त्यानं तो जात असे. तो जिवावर

उदार झाला होता. अपघाताची त्याला भीति वाटत नव्हती. मलबार हिलच्या निर्जन रस्त्यावर तो येतांच पोलिसांनीं गोळ्या झाडायला सुरवात केली. त्याला एकदोन गोळ्या लागल्या होत्या पण तसाच तो रस्ता काढीत होता.

तुरुंगातून बाहेर पडल्यापासून आईचे ते शब्द त्याच्या कानावर सारखे आदळत होते, "कुणाला भिऊं नकोस—देवाची आठवण ठेव!" त्या शब्दांनीं त्याला भंडावून सोडलं होतं.

इकडे मागं लागलेले पोलीस आणि तिकडे कानांत चाललेला तो आईच्या वचनाचा कल्लोळ त्याला असह्य झाला होता. रस्त्याला वळण मिळतांच त्यानं एकदम समोर दिसणाऱ्या कंपौंडांत गाडी घातली. त्या बंगल्याच्या दारांत गाडी उलथून पायरीवर पडली. गाडींतून बाहेर निघून तो मोठ्या कष्टानं पायरीपर्यंत आला, त्यावेळीं तो आवाज ऐकून घाबरलेलीं त्या बंगल्यातलीं माणसं बाहेर आलीं.

तो कुमारचाच बंगला होता. पायरीवर रक्तबंबाळ होऊन पडलेल्या मोहनला दुर्गाबाईनं ओळखलं. त्याचं मस्तक उचलून आपल्या मांडीवर घेऊन ती म्हणाली, "कोण मोहन? आलास?—"

"होय आई," मोहन सावध होऊन म्हणाला, "तुरुंग फोडून आलोंय मी. समजलीस?—तुरुंग फोडून आलोंय. पाहिलंस माझ्याकडे? पोलिस माझ्या मागं लागलेयत. कुठंतरी गोळ्या लागल्यायत मला—पण त्यांची मी पर्वा केली नाहीं."

"तूं 'आला' नाहींस" दुर्गाबाई म्हणाली, "तुला 'आणलं' तुला धाडून दिलं इथं—तूला खेचून इथं आणलं देवानं. आतां तूंच सांग, कसा आलास इथं?"

"तेंच मला कळत नाहीं. कुणीतरी माझ्या कानांत ओरडत होतं—सारखा कल्लोळ चालला होता—"

" कसला कल्लोळ ? " दुर्गाबाईनं विचारलं.

मोहन बोलत होता, " खरं आहे तें. मीं नाहीं आलों—बुद्धिपुरस्सर नाहीं आलों. जोराचा पाठलाग सुरू होता—कुठं तरी जायचं होतं मला—कुठं जायचं तें माझं मलाच माहिती नव्हतं—पण इथंच कसा आलों मी ? तूं सांग."

" देवानं तुला इथं धाडलं, " दुर्गाबाई म्हणाली, " आतां तरी कळलं ? "

" नाहीं कळलं—" मोहन उठून बसत म्हणाला, " जिवाचा कसा भडका झालाय. मृत्यू समोर दिसतोय—मृत्यूला मी कधींच डरलों नाहीं—तूंच केलास ना मला उपदेश, कीं कुणाला डरूं नकोस म्हणून ? "

" हो, " दुर्गाबाई म्हणाली, " आणखीही उपदेश केला मी! कुणालाही डरूं नकोस पण देवाची आठवण ठेव. "

" हो ! हो ! हो ! " मोहन दांतओठ खाऊन म्हणाला, " देवाची आठवण ठेव—देवाची आठवण ठेव ! त्याच शब्दांनीं मला भंडावून सोडलं होतं. म्हणूनच मी इथं आलों—" तो उठून उभा राहून म्हणाला, " कुठाय तुझा तो देव ? दाखव ना मला तुझा तो देव ! "

" सर्वत्र भरला आहे तो ! " दुर्गाबाई वर पाहून म्हणाली. तिच्या चेहऱ्यावर यावेळीं दैवी तेज झळकत होतं. ती सांगत होती, " सर्वभूतीं आहे तो ! ज्या भूतमात्रांची तूं छळणूक केलीस, ज्या भूतमात्रांना तूं नाडलंस, ज्या भूतमात्रांचा तूं जीव घेतलास तींच सारीं त्या देवाचीं रूपं—त्यांनींच तुला शिक्षा दिली—न्यायाधीशानं नव्हे—देवानं ! "

" माझ्या भावानं मला गुन्हेगार ठरवलं ! " शांतपणानं मोहन म्हणाला.

" हो. त्यानं आपलं कर्तव्य केलं, तसं तूंही आपलं कर्तव्य बजाव ! " हुकमतीच्या वाणीनं दुर्गाबाई म्हणाली.

" कोणतं माझं कर्तव्य ? " मोहननं विचारलं.

" तुझं कोणतं कर्तव्य ? तुला कळत नाहीं ? " दुर्गाबाईनं त्याच्या मस्तकावर हात फिरवीत म्हटलं, " अशी एक शक्ति आहे, कीं या दुनियेचीं सारीं सूत्रं त्या शक्तीच्या हातीं आहेत. त्या शक्तीनं तुला गुन्हेगार ठरवलं. त्या शक्तीनं तुला सांगितलं, कुणालाच डरूं नकोस--शिक्षेला डरूं नकोस. त्यागाचं महत्व फार मोठं आहे. अभिमानाचा त्याग हा सर्वांत मोठा त्याग. तो अभिमान टाक. मी अजिंक्य आहें असं आजवर तुला वाटत होतं. पण आज तुझा पराजय झाला-" दचकून मोहननं तिच्याकडे पाहिलं तेव्हां ती म्हणाली, " थांब. जगापुढं तुझा पराजय झाला नाहीं—तुझ्यापुढंच तूं स्वतः पराजित झालास. अभिमानापुढं डरलास—कां पळालास ? तुला वाटलं, पळालों नाहीं तर भेकडपणाचा आरोप आपल्यावर येईल-होय ना ? असा स्वतःला भ्यायलास. तो अभिमान टाक. आतापर्यंत कुणालाच डरला नाहीस, आतां स्वतःलाही डरूं नकोस. स्वतःच्या अभिमानांपुढं सुद्धां वाकूं नकोस. समजलं ? त्याग—त्याग—त्याग हीच मुक्ति ! न ज्ञानेन न धनेन न ईज्यया त्यागेन एकेन अमृतत्व मानषु-—हेंच गीतेचं सार. हाच भगवंताचा आदेश-"

पाठलाग करणारे पोलीस चोरट्या पावलांनीं येऊन बंगल्याच्या कंपौंडांत शिरले होते, ते मायलेकरांचा हा संवाद ऐकून तसेच थबकले होते. मोहननं मागं पळून पाहिलं —पोलिस दिसले—एकदां त्यानं आपल्या आईच्या डोळ्याला डोळा दिला—तिचा मनोदय त्याला एकदम कळला-

दोन्ही हात पुढं करून तो पोलीस अधिकाऱ्याच्या समोर गेला. त्यांनीं त्याच्या हातीं बेड्या ठोकल्या.

पोलिस अधिकाऱ्याला सुद्धां आश्चर्य वाटलं, तुरुंग फोडून निघणारा मोहन मुकाट्यानं स्वाधीन होतो कसा !

हाच का तो अभिमानाचा त्याग ? दुर्गाबाईचा उपदेश तोच हाच का !

दुर्गाबाईच्या मागं उभ्या असलेल्या लता आणि सुंदरी या दोघींनींही तें दृश्य पाहिलं. त्यांना वाटलं, त्या पोलीस अधिकाऱ्यानं रुमालानं डोळे पुसले.

पोलीस पहाऱ्यांत मोहन चालूं लागला तोंच समोरून कुमार आला. काय झालं हें कुमारला माहीत नव्हतं, पण आतां मात्र त्याच्यानं राहावेना. जें व्हायचं तें होऊन गेलं होतं. कठोर कर्तव्यांतून तो पार पडला होता. आतां भावनेला गवसणी घालायची त्याला जरूरी वाटली नाहीं.

धावत जाऊन त्यानं मोहनला मिठी मारली. बेड्यांत अडकलेल्या हातांनीं मोहननं आपल्या छोट्या भावाला कुरवाळलं.

पोलीस पहाऱ्यांत मोहन चालूं लागला. पायरीवर उभी असलेली दुर्गाबाई तशीच दगडाच्या पुतळीसारखी तटस्थ राहिली होती. तिचे ओठ पुटपुटत होते, " त्यागेन एकेन अमृतत्व मानषु "

ॐ तत्सत्